आर्थिक व सांस्कृतिक अंगावर लिखान करण्याची ताकत या लिखाणात असते. या लिखानाला परत परत चित्रांची जोड दिली गेली. लहान मुले यासाठी मोठा वाचक वर्ग लाभू शकतो हे संपादक व त्यांचे प्रतिनिधी यांना लक्षात आल्याचे दिसते. यातूनच पुढे कॉमिक्स ला सुध्दा अधिकचा वाचकवर्ग मिळत गेल्याचे दिसते. तसेच दुसरा सामान्य वर्ग देखील मिळू शकतो याची जाणिव झाल्याचे दिसते. ''जॉर्ज गॅलप यांनी 'जर्नॅलिझम क्वार्टर्रली' मध्ये लिहिलेल्या एका संशोधन लेखात वाचकांच्या पाहणीचे १० निष्कर्ष मांडले आहेत. त्यानुसार थोडक्यात जास्तितजास्त बातम्या देणारे व घाईगर्दीत वाचून होणारे वृत्तपत्र वाचकास हवे असते. सर्वसमान्य वाचक वृत्तपत्रातील मजकुराचा फारच थोडा भाग वाचतो. काही वाचक तर क्रीडावृत्ताखेरीज काही वाचत नाहीत. 'कॉमिक्स' ला अधिक वाचकवर्ग आहे.''[२६] राष्ट्राच्या विकासात सुजाण नागरिकांचा सहभाग मिळवण्याचे महत्त्वाचे कार्य आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजहिताच्या नैतिक मानवीमूल्यांचा पुरस्कार करत अग्रलेख, स्तंभलेख, विविध सदरे यांच्याव्दारे ती समाजात रूजविण्याचे काम आजपर्यंत झाले आहे. मानवासाठी आवश्यक मूल्ये, विचार यांची रूजवनच वृत्तपत्रामधून होत असते. यासाठी विविध सदारांचा वापर केला जात असतो. फक्त बातमी देणे ऐवढेच काम वृत्तपत्राने केले तर त्याचा विविधांगी असणारा वाचक हा कमी होण्याची शक्यता नकारता येत नाही. बातमी व त्याहून काही जास्त असाच व्यवहार वृत्तपत्राला ठेवणे आवश्यक असते. माणसाला आवश्यक असणारे त्यात असावे लागते. मानवाचे सामाजिकीकरण करण्याची प्रक्रिया मजबूत करणे यासाठी वृत्तपत्रे काम करते. ''मनुष्य हा इतर प्राण्याप्रमाणेच सामाजिक प्राणी आहे. त्याला इतरांच्या सहवासात राहावे लागते, इतरांच्या मदतीशिवाय तो जगू शकत नाही. मूल लहानाचे मोठे होत असताना त्याचे आई–वडील त्याला समाजात कसे रहावे? कसे वागावे? कोणत्या गोष्टी कराव्यात? काय करू नये? थोरा मोठ्यांचा मान राखावा. समाजाचे नियम कसे पाळावे? याविषयी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सांगत असतात. जन्मतःच हाडा मासाचा गोळा असलेला देह, माणूस म्हणून जगण्याला लायक करण्याचे, त्याला माणूसपण देण्याचे कार्य सामाजिकीकरणातून सतत होत असते. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेव्दारा ज्या सामाजात ती व्यक्ती लहानाची मोठी होते, वाढते त्या समाजाचे नितिनियम, परंपरा ती आत्मसात करते.''[२७] या त्याच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत वृत्तपत्रे मदत करतात. वृत्तपत्रामधून प्रकाशित होणारा मजकूर

वाचला जातो व त्यावर विचाराची दिर्घ प्रक्रिया चालू असते. माणूस हा सतत बदलत राहणारा जीव आहे. तो स्वतः मध्ये जसे बदल करतो तसेच तो इतर त्याच्या कडेने असणारा समाज–संस्कृति, विचार–आचार, भौतिक बाबी यांचा ही बदल करत राहतो. पुढे जाणे ही मानवी प्रवृत्ती त्याच्यामध्ये असल्याने तो विविध बदल आपल्या जीवनात करत असतो, त्यामुळे ''मानव संस्कृती कधीच सनातन असू शकणार नाही. तिच्यात परिवर्तन होत राहणारच. हे परिवर्तन कोणत्या कारणांनी घडते याचा विचार केल्यास असे दिसून येते की काही वेळा अंत:प्रेरणांचा जोर वाढल्यामुळे बाह्य परिस्थितीत क्रांतिकारक बदल झाल्यामुळे अंत:प्रेरणांचे स्वरूपही पालटून गेले आहे. असे असल्यामुळे अंत:प्रवृत्ती आणि बाह्य परिस्थिती यांपैकी एकाच अंगावर जोर देऊन सर्वकाळच्या सांस्कृतिक स्वरूपाचा उलगडा करून पाहणे सत्याला धरून नाही. ती सांप्रदायिक झाली. विचारांचे संप्रदाय बनले म्हणजे सत्यशोधनाची दृष्टी मंदावते अथवा नष्टही होते आणि सत्यापेक्षा संप्रदायच प्रधान ठरतात.''[२८] म्हणजेच अंत:प्रेरणा या सतत मानवी मनाला पुढे ढकलणाऱ्या असतात. त्या सतत प्रेरणा देतात व बाह्य रूप बदलत अंतप्रेरणाही बदलत राहतात. या अंतप्रेरणाच मूल्ये, विचार, तत्त्वे चांगले वागण्याची शिकवण देत असतात. मानव हा प्राणी असूनही त्यामध्ये दडलेली ही अंतप्रेरणाच मूल्ये तस्यम चांगल्या बाबींना जन्माला घालते. ''मानव म्हणजे निर्जीव यंत्र नव्हे. निव्वळ सेंद्रिय शरीरही नव्हे. या शरीराची उन्निर्मिर्ती जे मन ते येथे महत्त्वाचे असते. मानवाचे मन लवचिक असते, संस्कारक्षम असते, तसेच ते चिवटही असते. ते खूप काही सोसू शकते, नवे काही शिकू शकते, अभिनव क्लृप्त्या लढवू शकते.''[२९] या नवनिर्मितीच्या त्याच्या अंतप्रेरणेने चित्रे, साहित्य, कला, वाड्.मय यांना जन्म दिला गेला आहे.

वृत्तपत्र हे समान्य नागरिकांच्या जीवनाचा घटक बनले आहे. वृत्तपत्र हे सर्व लोकांना खरेदी करता येईल अशा किंमतीचे असल्याने ते जवळजवळ सर्व साक्षर व्यक्तीस वाचावयास उपलब्ध होते. वृत्तपत्रामध्ये मोठ्यांना, गृहिणींना, वृध्दांना, तरूणांना, लहानांना उपयोगी असणारी माहिती, संदेश, विचार व मूल्य पुरवण्यासाठी नियमितपणे सदर प्रकाशित होत असतात. प्रत्येक सदराचे उद्दिष्ट हे देखील अशाच प्रकारे असते. सामान्य नागरिकांचे प्रश्न, राजकीय टिका–टिप्पणी, सामाजिक प्रश्न, आर्थिक व देश विकासाच्या प्रश्नांवर महत्त्वाचे कार्य

ह्या सदरातून केले जाते; सोबतच एक स्पष्ट विचार असलेले मूल्य देखील या सदरातून मांडलेले असते.

व्यंगचित्रांच्या माध्यतातून आवाज उठविण्याचे व लोकांपर्यंत संदेशाद्वारे मूल्ये पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य केले जाते. व्यंगचित्र सदराला कोणताही विषय वर्ज नसतो. मोठे विषय अगदी मिश्कीलपणे चित्र व शब्द यांचा सुयोग्य वापर करून थोडक्यात मांडलेले असतात. व्यंगचित्र हे वाचकांचे मनोरंजन तर करतातच शिवाय एका संदेशासोबत मूल्य प्रसारित करतात. व्यंगचित्र सदर हे विविध विषयांवर भाष्य करणारे सदर असते. या सदराला कोणताही विषय वर्ज असण्याचे कारण नाही. या सदरातून जास्तीत जास्त मूल्यांची पेरणीचे काम होत असते.

''मूल्य ह्या शब्दाचा मूळ अर्थ जरी अर्थिक मूल्य असा असला तरी रूडॉल्प लोल्से, आलब्रेस रीचेल ह्या १९ व्या शतकातील तत्त्वचितकांनी त्याला व्यापक अर्थ दिला. त्या व्यापक अर्थाने आजकाल वाङ्मयीन मूल्य, लोकशाही मूल्य, जीवन मूल्य, शैक्षणिक मूल्य अशा तऱ्हेचे शब्द प्रयोग आपल्या बोलण्यात लिहिण्यात येतात.

जीवन जगत असताना मनुष्य बरे ते घेतो आणि वाईट ते सोडून देतो. केवळ साक्षी रूपाने उदासीन राहणे हे मानवी जीवन जगण्याचे स्वरूप नव्हे. प्रिय अथवा अप्रिय, चांगले अथवा वाईटे मूल्याचे स्वरूप आहे.''[३०] मूल्ये, तत्त्वे यांच्या आधारावर मानवी जीवन पुढे जाते, समाजात चांगले, वाईट असे म्हणण्याची प्रथा आहे. प्रत्येक मानवी कृतीच्या मागे हा पाहण्याचा हा दृष्टकोन आहे. या दृष्टीकोनातून मानसे आपले जीवन जगत असतात. महिला, पुरूष, विद्यार्थी, तरूण, अभ्यासक, विचारवंत हे समाजातील सर्व स्थरातील घटकांवर या चांगले व वाईट या बाबींचा म्हणजेच कोणत्यातरी मूल्याचा प्रभाव असतो. पत्रकारितेतही असा विचार सहज असणार. चांगल्या बाबींचे समर्थन केले जाते. त्यासाठी आपली लेखणी खर्च झाली पाहिजे असे संपादक, पत्रकार, वार्ताहार व माध्यमांचे प्रतिनिधी यांची समज असते व ती योग्यही आहे. यातूनच ''सामाजिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, विविध क्षेत्रांत चाललेले काम उत्तम चालावे यासाठी, नीती–अनितीचे दर्शन घडविण्यासाठी, भ्रष्टाचाराच्या समूळ उच्चाटनासाठी शोधपत्रकारिता अतिशय महत्वाची असते.''[३१] समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्य शिक्षणाची आवश्यकता आहे. मूल्ये रूजवण्याचे काम कळत नकळत कुटूंब

व्यवस्थेत, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, पुरोगामी राजकीय प्रवाह, संघटना याठीकाणी केले जात असते. देशाच्या जडण घडणीत मूल्यांचे स्थान अमूल्य असे आहे याची जाणीव समाजातील सर्वच प्रमुख स्थरातील घटकांना असते. ''मानवी मूल्य हे असे विधायक असते की ज्यातून व्यक्ती विकास, समाज विकास, राष्ट्र विकास व आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण होते. शिक्षणाचा उद्देश हा सर्वांगीण विकास असल्यामुळे ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक माहितीव्दारे सहज घडवून आणता येतो तसेच क्रियात्मक विकास हा उपयोजनात्मक कौशल्य आत्मसात करून घडवून आणता येतो. भावनात्मक विकास हा मानवी मूल्य निर्धारण व त्याचे जतन या प्रक्रियेसी संबंधीत आहे. जो पर्यंत भावनात्मक विकास होणार नाही. तोपर्यंत व्यक्तीला शहाणपण आले. असे म्हणता येत नाही...भावनात्मक विकास व्हावा म्हणूनच मूल्यशिक्षणाची निर्मिती झाली. कारण यातून चारीत्र्य संपन्न, जबाबदार व संवेदशील व्यक्तिमत्व निर्माण करता येते. अशी व्यक्ती हक्क आणि कर्तव्य दोन्हीही जबाबदारीने पार पाडीत असतात. म्हणून सर्वांगीण विकासासाठी मूल्य शिक्षणाची आवश्यकता आहे.''[३२] असे असतानाही मूल्यविरहीत समाज निर्माण व्हावा यासाठी समाजात समाजविघातक शक्ती काम करीत असतात. त्यामागे काही समाज घटकांचा स्वार्थ असण्याची शक्यता असते. मूल्यांच्या निर्मितीने माणसे स्वाभिमानी, अभिमानी, विचार करणारी, विवेकवादी, बुध्दीप्रामाण्यवादी, तत्त्वनिष्ठ निर्माण होत असतात. ही निर्माण झाली तर समाजातील प्रस्तापित व्यवस्थेला धक्का लागेल असा समज असल्याने या मूल्यांची वाट लावण्याची त्यांना संपवण्याची तयारी प्रस्तापित व शोषणकारी व्यवस्था करीत असते. समाजामध्ये सध्या ''राजकारणापासून ते क्रिकेटच्या क्रिडाक्षेत्रापर्यंत निव्वळ नफे बाजीसाठी साऱ्या मूल्यांचा लिलाव करण्यात आला. जीवनाचेएकही क्षेत्र असे राहिले नाही की जेथे राजकीय नेते आणि बडे धनिक भांडवलदार यांचे गठबंधन झाले नाही. दारूसम्राट, साखरसम्राट, दूधसम्राट, सिमेंटसम्राट, पोलादसम्राट, किक्रेटसम्राट, बिल्डरसम्राट, नद्याच्या व खाडींच्या वाळूची साठबाजी करणारे सम्राट, बागायतदार इत्यादींच्या टोळ्यांच्या शिखरांवर बडे मक्तेदार भांडवलदार आता बहुराष्ट्रीय भांडवलदार झाले असून भारतीय शासनाचे अनाभिषिक्त राजे झाले. त्यांच्या चाकरीसाठी वृत्तपत्रांचा उद्योग प्रचंड पसरला.''[३३] वृत्तपत्रे ही मूल्यांना प्रेरित मानून चालू झालेली आपण पाहिली आहेत. मूल्यांना, तत्त्वांना, विचारांना आपली शक्ती

मानूनच काम करणे अभिप्रेत असल्याने काहीएक विचारसरीणीचा आग्रह काही वेळा केला जाऊ शकतो. परंतु पत्रकारितेत असे असू नये असा विचार प्रवाह आहे. वृत्तपत्रामध्ये बातमी लागत असताना त्यावर कोणत्याही विचारांचा प्रभाव पडला जाऊ नये हे आपण पाहत आलो आहोत. ''इग्रॉझियो सिलोने यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, नीतीची बांधिलकी कोणत्याही एका विशिष्ट तत्वज्ञानाला नव्हे, तर निष्ठेला धरून असते. नीतिमूल्ये शाश्वत असतात.''[३४] एकूणच काय तर समजाच्या विकासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी, समाजाच्या उन्नतीसाठी, समाज गतिमान होण्यासाठी मूल्यांची आवश्यकात आहे. मूल्यांना आत्मसात केल्यास मानवी व सामाजिक तसेच सांस्कृतिक प्रगती होणे अपरिहार्य आहे. या बाबत प्रा. डॉ. एकनाथ गावंडे म्हणतात ''समाज हा परिवर्तनशील असून बदलत्या राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रवाहात जी नवीन मूल्ये निर्माण होतात ती त्या परिस्थितीला धरून असतात. या मूल्यांना आत्मसात केल्यास व्यक्ती व समाज टिकून राहू शकतो. एवढेच नव्हे तर तो गतीमान होऊ शकतो.''[३५] यामुळे वृत्तपत्रातील मूल्यांचे स्थान लक्षात घेत वृत्तपत्र सृष्टीस यावर चिंतन करीत आली आहेत. मूल्यांवर स्पष्ट चिंतन जरी झाले नसले तरी मूल्यांचा विचार वृत्तपत्रसृष्टीस झाल्याचे वृत्तपत्रीय इतिहासातून लक्षात येते. मूल्य स्पष्टीकरणारेच काम वृत्तपत्राने करण्याची अपेक्षा तज्ञांनी मांडली आहे. ''समाजाची ध्येये आणि मूल्ये प्रकट करून त्यांच्या स्पष्टीकरणाचे कार्य वृत्तपत्रांनी करावे.''[३६] वृत्तपत्राचा वाचक हा समाजातील प्रत्येक घटकांचे प्रतिनिधीत्व करीत असतो. वृत्तपत्राचा वाचक हा मुलभूत घटक आहे. ''वृत्तपत्राचे अस्तित्वच मुळी वाचकावर अवलंबून असते. वृत्तपत्राचा खप किंवा वितरण ही मूलभूत गोष्ट होय. जर वाचक नसतील तर वृत्तपत्राचे कार्य चालू शकणार नाही.''[३७] ही बाब लक्षात घेणे आवश्यक ठरते. यामुळे वाचकांना काय हवे याचाही विचार करावा लागातो. सध्याचा वाचक हा धकाधकीचे दगदगीचे जीवन जगत आहे. मोठमोठे लेख वाचण्याऐवजी छोटासा संदेश वाचणे व संदशाव्दारे प्रसारित मूल्य लक्षात घेणे वाचकांना आवडते. व्यंगचित्र हे वृत्तपत्रामध्ये अगदी थोडीशी जागा घेते. पण वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी तेवढी जागा व्यंगचित्र सदराला पुरेशी असते. त्यामुळे वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या व्यंगचित्र सदरातून प्रसारित मूल्य वाचकांपर्यंत पोहचून त्यांचा परिणाम वाचकांवर हातो काय? याचा शोध घेणे व त्या परिणामांची पडताळणी करणे ह्या प्रमुख उद्देशांसह प्रस्तुत संशोधन केले आहे.

१.०२ संशोधन समस्या विधान :

''मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.''

१.०२.०१ संशोधन समस्या विधानाची कार्यात्मक व्याख्या

१. **मराठी भाषिक वृत्तपत्र :** मराठी भाषेत प्रसिध्द होणारे व शब्द, चित्र, रंग, रिकामी जागा यांच्या माध्यमातून संदेश, माहिती विश्लेषण, विवेचन,मनोरंजन, मूल्ये, वैचारिक ज्ञान पुरविणारे पत्र म्हणजे वृत्तपत्र होय.

२. **प्रकाशित होणारे :** वाचकांना वाचावयास उपलब्ध असणारे म्हणजे प्रकाशित होणारे होय.

३. **व्यंगचित्र :** वाचकांचे मोजक्या शब्दात मनोरंजन करत प्रभाविपणे संदेश पोहचविणारे व्यंगात्मचित्र म्हणजे व्यंगचित्र होय.

४. **सदर :** दररोज वृत्तपत्रांमध्ये ठराविक ठिकाणी एकाच नावाने विशिष्ट माहिती पुरविणारा छापील भाग म्हणजे सदर होय.

५. **संदेश :** एखाद्या विषयावर चित्र व शब्दांच्या वापरातून मूल्यांच्या आधारे टिप्पणी करत सांगितला गेलेला गर्भितार्थ म्हणजे संदेश होय.

६. **प्रसारित होणारी मूल्ये :** वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरण रक्षण, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी ही मूल्ये प्रसारित होणारी मूल्ये.

७. **वाचक :** वृत्तपत्र वाचनातून मजकूर समजून घेत तो आत्मसात करणारे म्हणजे वाचक होय.

८. **होणारा परिणाम :** मिळालेल्या संदेशावर वाचकांचा मानसिक, भावनात्मक व क्रियात्मक बदल म्हणजे परिणाम होय.

९. **अभ्यास :** व्यासंग व सखोल ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया म्हणजे अभ्यास होय.

१.०३ संशोधनाची गरज व महत्त्व

संवाद ही मानवी गरज आहे. संवाद ही मानसिक प्रक्रिया आहे. संवादात असणारे वेगवेगळे घटक या प्रक्रियेत काम करतात. मानसाच्या उत्क्रांतीमध्ये प्रगत होत गेलेली ही संवादाची गरज, प्रेरणा व प्रक्रिया या बाबी कारणीभूत ठरतात. तसचे संप्रेषण करताना मनोवैज्ञानिक कारणे हे देखील आवश्यक ठरतात ''संप्रेषण में एक व्यक्ति के मनोभाव को भी समझना पड़ता है । हम किसी की तारीफ कर रहे हैं या शिकायत कर रहे हैं इस समझे बिना हम संप्रेषण के अर्थ को नहीं समझ पाते। ...प्रेम, घृणा, ईर्ष्या, अच्छाई, बुराई, संवेग, जैस मनोवैज्ञानिक कारक संप्रेषण में विघ्न उत्पन्न करते हैं।''[३८] त्यामुळ सदर संशोधनामध्ये वाचकांच्या भावनीक कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्याठी बनवलेल्या प्रश्नावली साधनामध्ये भावना व कृती या कारकांचा विचार केला आहे. संवाद प्रक्रियेत मनौवैज्ञानिक संप्रेषणाची भूमिका काय आहे हे पाहणे सुध्दा आवश्यक आहे. संप्रेषणामुळेच विविध मानवी भावनांची निर्मिती होत असते. मानसिक तत्त्वांचा विकास होणे ही उत्क्रांतिक बाब यामुळे पुढे जात असते. मनौवैज्ञानिक संप्रेषणाची भूमिका काय? आहे हे पाहिले पहिजे. गया पाण्डेय म्हणतात, ''संप्रेषण के कारण दया, सहानुभूति, करूणा, ईर्ष्या, घृणा, प्रतियोगिता, प्रेम, सहयोग, मनोभावना, संवेग जैसे मनौवैज्ञानिक तत्वों का विकास होता है। संप्रेषण के माध्यम से भय दूर किया जाता है। अंधविश्वासों को खतम किया जाता है। इस तरह हम पाते हैं कि संप्रेषण कई तरह के मनोवैज्ञानिक करता है।''[३९] संवादामध्ये आवाज, हावभाव, भावमुद्रा, दृक–श्राव्य, शिल्प, संगित, चित्र, शब्द यांचा प्रभावी वापर केला जात असतो. वृत्तपत्रामध्ये शब्द, चित्र, रंग यांची संगत साधून वृत्तपत्र प्रभावी बनवलेले आपण पाहतोच. संवादाची प्रक्रिया पुर्ण होताना माध्यमांची आवश्यकता असते. माध्यम किती प्रभावी आहे यावरून संवाद साधला जातो तसा तो प्रेषक कोण आहे? यावरून ही संवाद साधण्याची प्रक्रिया मजबूत व पूर्ण होत असते. शब्द हे साक्षरांसाठींचे माध्यम होऊ शकते. परंतु दृक–श्राव्य माध्यम, भावमुद्रा, हावभाव, आवाज, शिल्प, संगित, चित्र हे अशिक्षितांसाठीचे माध्यम होऊ शकते. ''संप्रेषण के दृश्ये माध्यम में एक संप्रेषक प्रापक के साथ संप्रेषण शब्दों, चित्रों, सारणियां, ग्राफों या इनके मिश्रण से करता है। यहां शब्दों, चित्रों या दोनों को प्रापक को

दर्शाया जाता है । प्रापक उन शब्दों और चित्रों को देखकर यूचनाओं को ग्रहण करता है तथा जरूरी होने पर अपनी प्रतिक्रिया उसी माध्यम से भेजता है ।

संप्रेषण के दृश्य माध्यम का उपयोग निम्नलिखित ढंग से हो सकता है– चित्र, रेखाचित्र, चित्रांकन, हस्ताक्षर, चार्ट, सारणी, मानचित्र, प्रारूप, प्रदर्शन, स्लाइड, पोस्टर, फ्लिप कार्ड, बिना मल्टी मीडिया के इंटरनेट, होर्डिंग, कवर पेज।''[४०]

आपल्या भारत देशाने लोकशाही राज्यव्यवस्था स्विकारलेली आहे. लोकशाही मध्ये लोकांना अनन्यसाधारण असे महत्त्व असते. लोकांचे जसे महत्त्व असते तसेच लोकशाही मध्ये मूल्यांचेही महत्त्व असते. वाचक असेल तरच वृत्तपत्र अथवा कोणतेही माध्यम टिकू शकते. वृत्तपत्राचा आत्मा वाचक असे म्हणले तर वावगे ठरू नये. लोकशाही व वृत्तपत्र हे एकमेंकास पुरक असे नाते आहे. लोकशाही व वृत्तपत्र या दोन्हींनाही लोक आवश्यक आहेत. लोकांवाचून म्हणजेच वाचकांवाचून वृत्तपत्र जिवंत राहू शकत नाही. ''लोकशाहीमध्ये आणि सर्वसाधारण सामान्य स्थितीमध्ये वृत्तपत्राच्या वाचकांवरच वृत्तपत्राचे जिवित अवलंबून आहे. एका दृष्टीने वाचकांना वृत्तपत्रांनी खास हक्क प्रदान केला आहे असे म्हटले पाहिजे.''[४१] २१ व्या शतकात प्रसारमाध्यमांमुळे माहितीचा स्फोट झाला आहे. गेल्या वीस ते पंचेवीस वर्षापासून जगाने माहितीच्या युगात प्रवेश केल्याचे आणि माहितीच्या माहामार्गावर दमदार आगेकुच केल्याचे आपल्या कानावर पडले आहेच. ही आगेकुच करताना तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच त्याला मिळालेल्या इंटरनेटच्या जोडीने आनखीच प्रसारमाध्यमांनी प्रगति केली आहे. विविध इलेकट्रॉनिक माध्यमांचा इंटरनेच्या उपलब्धतेमुळे प्रचार व प्रसार होताना दिसतो आहे. आजकाल सर्व वृत्तपत्रे आपली आवृत्ती ही इंटरनेटचा वापर करत वेबसाईटवर उलब्ध करून देत आहे. तरूणांच्या वाढत्या इंटनेटच्या वापराचा परिणाम माध्यमांच्या रचनेवर होताना दिसत आहे. ही सर्व प्रगति होत असताना वृत्तपत्रांनी उच्च नितिमूल्ये जपली पाहिजेत असे वाचकांना वाटते. व्यावसाय करत हे करणे अवघड असेले तरीही, ''व्यवसाय करत असताना उच्च निर्मितिमूल्यं, वाचकांच्या अभिरूचीची गंभीर दखल, लोकशिक्षणाचा नियोजनबध्द कार्यक्रम वृत्तपत्रांनी हाती घ्यावा– असं प्रत्येक संवेदनशील नागरिकाला वाटते.''[४२] संवेदशील वाचक जसा असतो तसा पत्रकार असावा

लागतो व संवेदशीलता हीच पत्रकारितेचा कणा आहे. समाजात घडणाऱ्या विविध बाबींवर पत्रकारांनी प्रतिक्रीया द्यावी, वृत्तपत्राने व प्रसारमाध्यमांनी प्रतिक्रिया द्यावी असे साधारण मत वाचकांचे असते. ते वावगे ही नाही. त्यामुळे समाजातील प्रश्न मांडण्याची जबाबदारी पत्रकारावर येते. समाजात दुःख आहे, परंतु त्यावर पत्रकारांना व प्रसारमाध्यमांनी गप्प बसून जमत नाही. दुःखी लोकांची संख्या जगात जास्त आहे. त्यामुळे हा दुःखी असणऱ्या वाचकांवर वाच्यता करणे अपरिहार्य आहे. '' मुळात जगात (किंवा वाचकांमध्ये) दुःखितांची संख्या अधिक की सुखी जीवन जगणाऱ्यांची? हा प्रश्न आजच्या पत्रकारितेच्या मुळाशी आहे... पत्रकार म्हणतात, दुःखितांची संख्या अमाप आहे, त्यामुळे त्यांना उपेक्षून कसे चालेल?''[४३] वृत्तपत्रामध्ये फक्त बातम्या देणे, वाचकांना वृत्त देणे ऐवढेच काम वृत्तपत्राचे असू शकत नाही. आपण जाणतोच वृत्तपत्र ही पूर्वी मतपत्र होती, आजही ती आहेत, परंतु वृत्तपत्रामध्ये सध्या सर्वसमावेशक बाजू मांडण्याचा प्रयत्न केला जातो, किंवा तो किमान भासवण्यचा प्रयत्न तरी होतोच. परंतु वृत्तपत्रे आजही मतपत्रेच आहेत. काही भूमिका घेवून समाजात घडणाऱ्या बाबींवर मत मांडणे आवश्यक असते, तेच काम वृत्तपत्र करत असते. वृत्तपत्रामध्ये वृत्ता शिवाय इतर बऱ्याच बाबी असतात. सर्वसमावेशकता साधण्याचा तो प्रयत्न असतो. वृत्तपत्राचा वाचक हे वयस्क, तरूण, विद्यार्थी, गृहिणी, महिला, तरूणी, लहान मुले, नोकरदार, व्यापारी, विचारवंत असे एक ना अनेक समाजातील स्तरातील घटक असतात. या सर्वांचा वृत्तपत्रकार विचार करत असतात. त्यामुळे वृत्तपत्रामध्ये वृत्ता शिवाय इतरही बाबी असतात. त्यामुळे '' 'वृत्त देते ते वृत्तपत्र' असे आपण म्हणतो खरे. परंतु येथे फक्त आपण समास सोडवतो; कारण वृत्तपत्रात केवळ वृत्तच असते असे नाही. वृत्तपत्रात वृत्ताप्रमाणे वाचकांचा पत्रव्यवहार, त्याव्दारे मांडली जाणारी गाऱ्हाणी, इत्यादी उपयुक्त माहिती, छायाचित्रे, व्यंगचित्रे, सूचना आणि जाहिराती देखील असतात. यासर्वांमुळे एकसंघ व्यक्तिमत्व प्राप्त करून घेणारे व छापले जाणारे म्हणजे वृत्तपत्र असे म्हणावे लागेल.''[४४] वृत्तपत्राचा व्यवसाय हा मनुष्यकेंद्री आहे. माणसांना जे काही हवे तेते देण्याचा प्रयत्न एक नितीमत्तेची मार्यादा लक्षात घेत केला गेलेला असतो. विचार करावयास लावणे तसेच वाचकांची विवेकशक्ती जागी करणे अशी कामे वृत्तपत्र करते. एक प्रकारचे लोकशिक्षण व लोकजागृतीचे कामच वृत्तपत्रे करतात. वृत्तपत्राची विविध सदरे यासाठीच चालवली जातात. काही सदरातून लहानांना माहिती देणे, काही

सदरातून आरोग्यांची माहिती देणे, सामान्य ज्ञानात भर घारणे, गृहोउपयोगी माहिती, शिक्षणांची माहिती देणारी सदरे, सांस्कृतिक संदर्भ असणारे सदर, आर्थिक गुंतवणूकी व त्यासंदर्भातील होत असणारे आर्थिक बदल, धार्मिक आध्यात्मिक बाबींची महिती देणारी सदरे अशा स्वरूपाची सदरे जशी चालवली जातात तसेच संपादकीय पानावर विचार करावयास लावनारे स्तंभलेख व विचारप्रर्वतक लेखांची मालिकाही चालवली जात असते. हे सर्व लोकशिक्षण, प्रबोधन, उद्‌बोधन यांसाठीच केले जात असते. आपल्या वृत्तपत्रातून जास्तीत जास्त वाचक जोडले जावे यासाठी यासाठी केला गेलेला हा प्रयत्न असतो. जसे वाचकांना विविध माहिती देऊन परिपूर्ण केले जाते, त्यांना विचार देण्याचे काम केले जाते तसेच मनोरंजनातून शिक्षण व्हावा यासाठी ही व्यंगचित्र सदरासारखे लहानसे परंतु महत्त्वाचे सदर चालवले जात असते. ''लोकशिक्षण आणि लोकजागृती या उद्दिष्टाने वृत्तपत्रे कार्य करीत असतात. त्यांच्या या कार्यातून लोकक्षोभ निर्माण होऊ न सत्तांतरे घडून येतात. वृत्तपत्रे ही एकप्रकारे राष्ट्रसेवा व समाजसेवाच करीत असतात.

भारतीय वृत्तपत्रांचा इतिहास पाहिल्यास गेल्या सव्वादोनशे वर्षात वृत्तपत्रांनी प्रबोधन, सामाजिक सुधारणा, राजकीय जागृती, सामान्य माणासाला हक्क मिळवून देण्यासाठी केलेला संघर्ष, नवीन नवीन विषयासंबंधीची माहिती देणे आणि मनोरंजन करणे अशा प्रकारे समाजसेवेचे कार्य केलेले दिसते.''[४५] वृत्तपत्रे वाचकांना नवनवी महिती मिळावी अथवा वृत्तपत्रांचे झालेले बाजारू स्वरूपामुळे वृत्तपत्र वृत्तपत्रामध्ये लागलेली स्पर्धा यामुळे वाचकांना विविध अंगाने परिपूर्ण असे पत्र देण्याचा प्रयत्न सर्व वृत्तपत्रे करीत असतात. यामुळेच वृत्तपत्रांच्या रचनेत त्यांच्या बाह्य अंगावरही बरेच लक्ष्य केंद्रित होत आहे. वृत्तपत्र जास्तीत जास्त आकर्षक व्हावे यासाठी सतत हालचाली होत असतात. बदलता वाचक लक्षात घेत त्यांना काय हवे नको? याचा विचार सर्वच वृत्तपत्रांत होताना दिसतो आहे. एकूणच काय वाचकांची अभिरूची बदलत आहे, त्या अनुषंगाने वृत्तपत्रे आपले जुने स्वरूप बदलण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. या सर्व बदलाला प्रगत तंत्रज्ञानाची साथ मिळत आहे. दळणवळणाची साधने व संपर्काची साधने यांचा परिणाम स्वरूप हे बदल तीव्रतेने व गतिशिल होत आहेत. ''वृत्तसंकलन, मांडणी, सजावट इत्यादी दृष्टिंनी मात्र मराठी वृत्तपत्रांचे स्वरूप बरेच सुधारले आहे. मराठी वृत्तपत्रे आता खऱ्या अर्थाने 'वृत्त' देणारी पत्रे झाली आहेत.

त्यांतील बातम्यांचा एकसुरीपणा कमी झाला असून त्यात विविधता आली आहे. राजकारण व राजकारणी व्यक्ती यांना अद्यापही प्राधान्य मिळते हे खरे, पण हा दोष एकूणच भारतीय वृत्तपत्रांत आढळतो. राजकीय बातम्यांबरोबरच आता व्यापार, उद्योग, देशी व विदेशी खेळ या संबंधातील बातम्या, तसेच चित्रपट व नाटके यांची विस्तृत परीक्षणे व वर्णने योग्य त्या परिभाषेसहित मराठी वृत्तपत्रांत येऊ लागली आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनवरील कार्यक्रमांच्या सापेक्षी परिक्षणांना वृत्तपत्रात स्थान देण्याचा आवर्जून प्रयत्न होतो. संगीत, नृत्य आणि चित्रपट दर्शने इत्यादी कला–उपक्रमांची दखल घेतली जाऊ लागली आहे. शेती, उद्योगधंदे, सहकार, ग्रामीण अर्थव्यस्था व व्यवहार इत्यादींबाबत विस्तृत वृत्त व शास्त्रीय विवेचनाची बैठक असलेले चर्चात्मक लेख यांनाही वृत्तपत्रांत स्थान मिळू लागले आहे. विज्ञानविषयक लेखनाबाबतही आस्था वाढत आहे. काही प्रमुख दैनिकांनी आठवड्यातून एक दिवस खास विज्ञानपुरवणी देण्यास सुरूवात केली आहे. यामुळे मराठी वृत्तपत्रे राजकारणालाच प्राधान्य देतात, असा जो त्यांचा बरावाईट पण सार्थ लौकिक एक वेळ होता, तो आता पुष्कळ कमी झाला आहे. काळ झपाट्याने बदलत असून वाचकांची अभिरूचीही बदलली आहे. वृत्तपत्रांच्या स्वरूपात हा जो बदल होत आहे त्याला वाचकांची अभिरूची व त्यानुसार अपेक्षा या गोष्टी कारणीभूत होत आहे.''[४६] हे सर्व बदल होत असताना लोकशाहीचे भान पत्रकारितेला ठेवावेच लागेल. समाजात निर्माण होणारे प्रश्न हे जवळ जवळ ऐंशी ते नव्वद टक्के लोकांचे आहेत. ते संविधानिक मार्गाने सुटावेत यासाठीचा प्रयत्न वृत्तपत्र चालवत असतात. यामुळ सामाजिक, आर्थिक न्याय मिळावा यासाठी रस्त्यावरचे लढे लढले जाता असतात. परंतु रस्त्यावरच्या लढ्यात पत्रकाराला सहभागी होणे शक्य नसते. परंतु ह्या लढ्याची धार तिव्र करण्याचे महत्त्वाचे काम तो करू शकतो. त्यासाठीच त्याची जडणघडण पुरोगामी विचारांच्या अंगाने व्हायला हवी. सर्जनशील व्यक्ती सर्जनशील पत्रकारिता निर्माण करू शकतो. महाविर जोंधळे म्हणतात, ''लोकशाही व सामाजिक, आर्थिक न्याय प्रत्यक्षात आणण्यासाठी एक नवी सर्जनशील पत्रकारिता निर्माण करावयाची गरज भासते. ही गरज लक्षात घेऊ न आपल्या लेखणीव्दारे जबरदस्त ताकद उभी करावी लागेल.''[४७] समाज हा एकसंघ रहावा, समाज जाणीवप्रधान व्हावा, समाजघडण व्हावी, समाजाची प्रगती व्हावी, वाचकांचे सामान्य नागरिकांचे भले व्हावे, मूल्याधिष्ठीत समाज निर्माण व्हावा यासाठी वृत्तपत्रे काम करीत असतात. याकामी

प्रत्येक सदर उपयोगाचे ठरत असते. एकूणच समाजाच्या सुसंस्कृती बांधणीचे कामच वृत्तपत्राला व पत्रकारितेला करावे लगत असते. माध्यमे किती नितीवान आहेत? यावरच पुढे समाजामध्ये नितीमत्ता रूजवली जात असते. माध्यमे किती नीतीमूल्ये पाळतात? त्यावर समाज संस्कारीत होत असतो. समाजाला निर्णय घेण्याचे बळ, विचार करण्यासाठी प्रवृत्त करणे, समाजाप्रती संवेदनशीलता जपणे, समाजातील विविध नितीमूल्ये यांची पाठराखण करणे, आपल्या वृत्ती, प्रवृत्ती यांवरही वृत्तपत्रांचा प्रभाव पडत असतो. वाचक हा रोज आपला मार्गदर्शक, ज्ञानदाता, माहितीचा संग्राहक, दिशादर्शक या नजरेने वृत्तपत्राकडे पाहत असतो. त्यामुळे वृत्तपत्राची, माध्यमांची नितीमत्ता काय आहे? हे पाहणे महत्त्वाचे ठरत आहे. याबाबत जागतिक पातळीवरही विचार मंथन, संशोधन होत आहे. ''आज आपल्या वेदना, संवेदना, निवड, पर्याय, अग्रक्रम, वृत्ती, प्रवृत्ती, श्रध्दा, मते, निर्णय हे सारे काही माध्यमांनी संस्कारित संस्कृतीच्या निर्देशानुसार ठरू लागले आहे. मॅक–लहूनच्या म्हणण्याप्रमाणे जनमाध्यमे ही आज आपल्या संवेदनांचाच विस्तार असलेल्या स्वरूपात आपल्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग झालेली आहेत. त्यामुळे माध्यमांकडून या संस्कारात आपल्याला नीतीमत्तेचा संस्कार किती पुरवला जातो हा पर्यायाने माध्यमे स्वतःच किती नीतीमत्ता पाळतात हा संशोधनाचाच विषय झालेला आहे.''[४८] नीतीमत्ता अभ्यासाचा विषय पहिल्या पासूनच राहिला आहे. नैतिकता, मूल्ये, विचार यांवर समाजाला दिशा दिली जात असते. समाज हा मूल्ये, नैतिक, नितीमत्ता, विचार आचार यांवर पुढे जात असतो. समाजात एकप्रकारची शिस्त असते. कायद्याचे राज्य लोकशाही मध्ये मान्य केलेले असते. परंतु कायद्याच्या वर्तनाची अंमलबजावणी व्हावी यासाठी जी नीतीमूल्ये समाजात गृहित धरली जात असतात. तर काही मूल्ये, नीती, तत्त्वे विचार यांची जाणूनबुजून समाजात रूजवली जावी लागतात. वृत्तपत्रांवर याचा परिणाम व प्रभाव असणे साहजिकच आहे. वृत्तपत्र हे समाजाचा आरसाच असते. त्यामुळे समाजाचा वृत्तपत्रावर व वृत्तपत्राचा समाजावर असा एकमेकांचा एकमेकांवर प्रभाव पडला जात असतो. समाजातील घटकच वृत्तपत्र चालवत असतात. समाज ज्या नितीतत्त्वाची, मूल्ये, विचार यांची जोपासणा करतो, ज्या नितीतत्त्वानी, मूल्ये, विचार यांचे आचरण करतो त्याचा प्रभाव वृत्तपत्रावर पडलेला असतो. त्यामुळे एकप्रकारे समाजाची नितीमत्ता हीच वृत्तपत्राची नितीमत्ता असते. तत्त्वज्ञावर जगभर विचार केला गेला आहे. तत्त्वज्ञानावर अभ्यास व संशोधने झाली आहेत. म्हणजेच

नितीतत्त्वांवर, मूल्यांवर अभ्यास, संशोधन झाली आहेत. परंतु वृत्तपत्राची नीतीमूल्ये, मूल्ये यावर संशोधन खूप कमी झाली आहेत. स्थानिक बाबींचा विचार करून भारताच्या परिप्रेक्षात वृत्तपत्रांतून, वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या सदराच्या माध्यमातून प्रसारीत होणाऱ्या मूल्यांवर संशोधन होणे आवश्यक आहे. माध्यमांच्या संदर्भात विविध विषयांवर संशोधने झाली मात्र भारतात स्थानिक संदर्भात ती झाली नाहीत. याबाबत संशोधक डॉ. श्रीपाद जोशी म्हणतात, ''गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळात अनेक प्रकारांनी अनेक प्रकारची संशोधन जनसंवाद व माध्यमांच्या क्षेत्रात करण्यात आली आहेत. लोकांच्या वागणुकीतील प्रत्यक्षातील बदल, हिंसात्मकता, माध्यम आणि माध्यमातील जाहिराती, नीती व मूल्ये, माध्यमांचा पलायनवाद, माध्यमांचा मुलांवरील, युवकांवरील, कुटुंब संस्थेवर शिक्षणव्यवस्थेवरील, सर्जनशीलतेवरील परिणाम, या व अशा कितीतरी विषयांवर अध्ययन–संशोधनाचे मोठे काम या क्षेत्रात झाले. मात्र ते सारे प्रचंड मोठ्या प्रमाणावर केवळ युरोप–अमेरिकेत, तुलनेने अन्य राष्ट्रांमध्ये– अन्य समाजांमध्ये स्वतंत्रपणे या क्षेत्रात स्थानिक संदर्भात अध्ययन, संशोधन कार्याची गरज भागविण्याकडे लक्षच पुरविले पाहिजे.''[४९] वृत्तपत्रामध्ये वेगवेगळ्या विषयावर सदर प्रकाशित होतात. ह्या सदरांना कोणताही विषय व्यर्ज असू शकत नाही. शिक्षण, राजकारण, समाजकारण, संस्कृतिक, धार्मिक, घरगुती, माहितीपर, मनोरंज अशा एक ना विविध आशयाची सदरे वृत्तपत्र प्रकाशित करते. या सदरांचा वेगवेगळ्या वयोगटाचा, शिक्षणाचा, समाजिक स्तराचा, लिंगाचा वाचक असतो. याबाबी ध्यनात घेतच ही सदरे चालवली जातात. सदरांना जास्तीतजास्त वाचक मिळावेत यासाठी ती सर्वसमावेशक बनवण्याचा वृत्तपत्रकारांचा प्रयत्न असतो. संपादक यासाठी लक्ष देत असतात. त्यासाठी वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांमध्ये बैठका देखील घेतल्या जातात. जास्तीत वैविध्य जपत वाचकांना आपलेसे करण्याचे व वाचकांना त्या सदराची आवडीत अडकवण्याचे काम ही सदरे करतात. ''वृत्तपत्रात इतक्या विविध प्रकारचा मजकूर येत असतो. या सर्व मजकुराला शंभर टक्के वाचक असतो असे मात्र नाही. प्रत्येकाच्या आवडीनुसार प्रत्येक जण आणास वृत्तपत्रात हवे ते पाहत असतो. परदेशात शंभरपेक्षा जास्ती पृष्ठांचे अंक निघतात. त्यातील विशिष्ट विषयांची पृष्ठे तेवढी वाचक वाचतात. संपूर्ण अंक वाचायची त्यांची पध्दत नाही आपल्याकडे त्या पध्दतीने वृत्तपत्र निघत नसले तरी वेगवेगळ्या सदरांचा, विषयांचा, वाचकांचा वेगवेगळा वाचक वर्ग मात्र आढळून येतो.

या संबंधात १९८१-८२ या वर्षात देशातील महानगरातील वाचकांची पाहणी करण्यात आली. तिचे निष्कर्ष उद्‌बोधक आहेत.''[५०] वृत्तपत्रातील सदरे ही फक्त करमणुकीचे साधन नाहीत तर करमणुकीतूनही लोकशिक्षण हाच उद्देश वृत्तपत्रीय सदरांचा असतो. वृत्तपत्रांत प्रकाशित होत असलेले व्यंगचित्रांचे सदर वाचकांपर्यंत चित्र व मोजक्या शब्दांच्या माध्यमातून संदेशाद्वारे विचारांचे प्रसारण करीत असतात. एका चिनी म्हणीनुसार एखादा संबोध समजून सांगण्यासाठी एक हजार शब्दांचा वापर करावा लागतो. तर तेच काम एक चित्र करू शकते आणि त्याच चित्राला मोजक्या शब्दांची जोड मिळाली तर तो संदेश आणखीन्‌च अचूक होतो आणि अगदी त्याचप्रमाणे वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर काम करीत असते. वृत्तपत्रे ही वेगवेगळ्या सदराच्या संदेशातून मूल्ये, विचार प्रसारि करतात त्यामुळे वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून मूल्याची पेरणी करण्याचे काम होतच असते. जीवन जगत असताना मनुष्य बरे ते घेतो आणि वाईट ते सोडून देतो. प्रिय अथिवा अप्रिय, चांगले अथवा वाईट हे मूल्यांचे स्वरूप आहे. माणसांपासून समाज निर्माण होतो. समाजातून मूल्यांची निर्मिती झाल्याचे आपण पाहत आलो आहोत. त्यामुळे जगाच्यापाठि वरील सर्वच लोकशाही व पुरोगामी विचारांच्या देशात मूल्यांचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. ''कामोत्तेजकता, हिंसा, अश्लीलता, गुन्हेगारी, हितसंबंधीयांचा प्रभाव, इ. चे जे दर्शन माध्यमांमधून घडविले जाते त्याच्या परिणामांबाबतची चर्चा तर सतत चाललेलीच असते. साऱ्याच पवित्र व उदात्त अशा अनेक बाबींचे स्थान माध्यमातील या प्रकारच्या दर्शनाने डळमळीत करून टाकले आहे अशी चर्चाही सतत सुरू असतेच. माध्यमांमध्ये नीतीमत्तेचा आज दुष्काळ पडला असून युनिस्कोतर्फे प्रकाशित 'मिडीया एथिक्स' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत, माध्यमांचा प्रांत हा नीतीमत्तेच्या संदर्भात असा रानटी प्रांत झलेला आहे की जिथे प्रॅगमॅटिझम हा शासन व सर्वमान्य अशा तत्त्वांच्या अभावी अवतीभवती सारे अराजकच असून अभिमान बाळगणारे त्यात काही आहेतच असे उद्‌गार संपादकांनीच काढले आहेत.''[५१] मूल्यांमुळे मानवप्राण्याच्या प्रगतमानव होण्यास महत्त्वाची भूमिका राहिली आहे. मूल्ये नसतील तर माणूस व समाज ध्येयनिष्ठ व सुसंस्कृत समाज निर्मितीस अडचणी निर्माण होतील. मूल्यविरहीत समाजात माणसाबद्दलचा आदर संपून समाज विघटनाकडे जाईल व मानवी समाजाचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. समाजात घडणाऱ्या गुन्ह्यांमागे जशी समाज व्यवस्था कारणीभूत असते. तशीच मूल्यांची कमतरताही कारणीभूत

असते. मूल्यांची कमतरता होताच समाजात गुन्हे घडतात. गुन्ह्यात वाढ होते. एकूणच मूल्यांची कमतरता ही समाजाच्या नुकसानीस कारणीभूत ठरते. म्हणजेच समाजात मूल्ये, विचार या आवश्यक अशा बाबी आहेत. मूल्यातून व्यक्ती, समाज, राष्ट्र व आंतराष्ट्रीय सामंजस्य यांचा ज्ञानात्मक, भावानात्मक व क्रियात्मक पातळीवर विकास होत असतो. मूल्यशिक्षण हे विकासात्मक असते; ते मानवाचा विचार करते; मूल्यांना शास्त्रीय आधार असतो व मूल्ये ही व्यक्ती, समाज, राष्ट्र, पर्यावरण इत्यादी सर्व घटकांसाठी लागू पडतात. नैतिक जाणीव वाढवणे सर्वात महत्त्वाचे आहे. '' 'Media Ethics' या ग्रंथात क्लिफॅर्ड ख्रिसतियन यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस व त्याचे कल्याण हे केंद्रस्थानी राखले जाईल अशा रितीने नैतिकतेला अवाहन केले गेले पाहिजे. त्यांच्या मते नैतिक जाणीव वाढवणे हे त्योच विश्लेषण करण्याची कौशले आत्मसात करण्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक महत्त्वाचे आहे.''[५२] मूल्यांतून चारीत्र्यसंपन्न, जबाबदार व संवेदनशील व्यक्तिमत्त्व निर्माण करता येते. मूल्याधिष्ठित अशी व्यक्ती हक्क आणि कर्तव्य दोन्हीही जबाबदारीने पार पाडीत असतात. मूल्यांना आत्मसात केल्यास व्यक्ती व समाज टिकून राहतो एवढेच नव्हे तर तो गतीमानही होतो. मूल्यांना मानवी ज्ञानावर, भावनांवर व क्रियांवर प्रभाव पडून विकास होत असतो. भावनात्मक विकास हा मानवी मूल्य निर्धारण व त्याचे जतन या प्रक्रियेशी संबंधीत आहे. भावनेतून क्रिया घडत असतात. क्रियेतून बदल घडतो. असे असताना वृत्तपत्रातील व्यंगचित्र या महत्त्वाच्या सदराद्वारे मूल्ये प्रसारित होतात काय व त्याचा वाचकांवर भावनात्मक व क्रियात्मक काय प्रभाव म्हणजेच परिणाम होतो काय हे पाहणे अत्यंत गरजेचे ठरते. माध्यमांची नितीमत्ता तपासणे आवश्यक का झाले आहे? ''संस्कृती अथवा नीतीमत्तेकडे आधुनिक काळात अभिजनवादी दृष्टिकोनातून बघितले जाते. माध्यमांच्या नीतीमत्तेच्या समस्येकडे देखील त्यामुळे अभिजनवर्गाची समस्या म्हणूनच बघितले गेले तर आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही.

मात्र या समस्येकडे त्यापलीकडे जाऊन बघणे व बहुसंख्य लोकांच्या संदर्भात जगभरात उद्‌भवलेल्या सुरक्षेच्या समस्येच्या, व्यक्तीत्वविहीनतेच्या, संवेदनविहीनतेच्या माणसाच्या वाट्याला येणाऱ्या एकाकीपणाच्या, सपकपणाच्या, गुन्हेगारी वर्तनाच्या, हिंसात्मक प्रदर्शनांच्या, विविध प्रकारे शोषण करून आपलीच तुंबडी भरण्याच्या वृत्तीच्या अशा विविध प्रकारच्या

समस्यांच्या संदर्भात माध्यमांचे वर्तन व नीतीमत्ता तपासली जाणे आज आवश्यक आहे.''[५३] म्हणजेच माध्यमांच्या नितीमत्तेचा प्रश्न वाचक व जनेतेशी जोडला गेला आहे. वाचकांमध्ये असणारा एकाकीपणाच्या, सपकपणा, आत्मकेंद्रीत्व, समाजात वाढणारे गुन्हेगारी वर्तन, हिंसा, विविध प्रकारे शोषण या बाबींचा अंत होण्याची पुर्व अट म्हणजे मूल्यांचे माणसांकडून वर्तन व्हावे लागेल. परंतु हे आचरण वाचक अथवा लोक लगेल करतील का तर याचे उत्तर नाही हेच असेल. मूल्यांबाबत समाजात चर्चा होणे आवश्यक आहे. त्यावर वाच्यता होणे आवश्यक आहे. मूल्ये रूजवण्याचे मार्ग धुंडाळणे गरजेच आहे. त्यासाठी वृत्तपत्रासारखे महत्त्वाचे संवाद साधन प्रयत्न करत असते. विविध सदरे देण्यामागील ते देखील कारण असतेच.

आगामी काळात लोकांच्या धावपळीमध्ये मोठ्या वैचारिक लेखांचे महत्त्व कमी होईल. अशावेळी व्यंगचित्र सदरासारख्या छोट्याशा सदरातून वाचकांपर्यंत संदेश विचार पोहचविण्याचे काम पुढे वाढण्याची शक्यता आहे. व्यंगचित्र सदर हे असेच छोटेखानी सदर आहे, ज्या सदरामधून विविध प्रश्नांवर मांडणी केलेली असते. व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाजातील होत असणाऱ्या वाईट बाबींवर हे सदर वाच्यता करते. तर चांगल्या बाबींसाठी शबासकीही देते. चित्र हे भावना आणि विचार व्यक्त यांना व्यक्त करणारे प्रभावी माध्यम असे वक्तव्य जेष्ठ चित्रकार व पत्रकार प्रकाश जोशी यांचे प्रतिपादन २६ जानेवारी २०१७ रोजी जातीमुक्ती आंदोलनाच्यावतीने आयोजित जाती तोडो..चित्रप्रदर्शन व समता मेळाव्यात ते बोलत होते. ''प्रत्येकाच्या मनात विचार चालू असतो. चित्रातून तो प्रभाविपणे मांडता येतो, चित्रातील विचार समजून घेण्यात भाषा, प्रदेश असे कसलेही अडसर येत नाहीत.''[५४] माणसांच्या मनात असणारे विचार प्रगट करण्याचे साधन म्हणून वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून काम करीत असतात. त्यामुळे व्यंगचित्र सदराला खास असा वाचक लाभलेला आहे. या सदराचे वाचक विविध गटातील, स्थरातील, वयातील आहेत. न्यूयॉर्कमध्ये झालेल्या एक संशोधनाच्या मते, व्यंगचित्रमालेचे ७ टक्क वाचक. या बाबत प्रा.डॉ. सुधाकर पवार यांनी मांडलेला पुढील उतारा पाहणे महत्त्वाचे ठरेल. ''१९७८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये झालेल्या मोठ्या संपाच्यावेळी ९० वाचकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि त्यांना वृत्तपत्र न निघाल्याने नेमकी कशाची खंत वा कमतरता वाटत आहे असे विचारण्यात आले. त्यातील ११ टक्के वाचकांनी पहिल्या पानावरच्या बातम्या वाचायला मिळाल्या नाहीत, म्हणून रूखरूख

वाटते असे सांगितले, तर २१ टक्के वाचकांनी इतर पानांवरच्या बातम्या वाचायला मिळाल्या नाहीत असे सांगितले. १२ टक्के वाचकांनी अग्रलेख वाचायल मिळाला नाही. ८ टक्के वाचकांनी अर्थिक बातम्या समजल्या नाहीत अशी कारणे दिली. २३ टक्के वाचकांनी क्रीडावार्ता समजल्या नाहीत असे सांगितले. १३ टक्के वाचकांनी किरकोळ जाहिराती वाचायला मिळाल्या नाहीत, ७ टक्के वाचकांनी वर्गीकृत जाहिराती वाचायला मिळाल्या नाहीत असे सांगितले. ९ टक्के वाचकांनी आपला नेहमीचा स्तंभ वाचायला मिळाला नाही असे सांगितले आणि ७ टक्के वाचकांनी आपल्या आवडीची व्यंगचित्रमाला (कॉमिक्स) वाचायला मिळाली नाही अशी खंत व्यक्त केली. ७ टक्के स्त्रियांनी महिलांचे पान वाचायला मिळाली नाही, असे सांगितले. यावरून वर्तमानपत्रातील पारंपारिक सदरेही वाचायला न मिळाल्यामुळे वाचकांना वृत्तपत्राच्या संपाचे दुःख झाले असे लक्षात येते.''[५५] व्यंगचित्र सदराला खास असा वाचक आहे हेच यावरून स्पष्ट होते. वाचकांचा विचार वृत्तपत्रे करीत असतात. वाचकांसाठी कित्येक सदरे चालू करावी लागतात. वाचकांची मागणी, त्यांची अभिरूची, आवड ही बदलत असते. त्याप्रमाणेही वृत्तपत्रे आपली धोरणे बदल असते. त्याचा परिणाम हा वेगवेगळी सदरे वाढवण्यावर व बंद करण्यावर होत असतो. वृत्तपत्राचा वाचक कोण आहे यावर ही बऱ्याच बाबी अवलंबून असतात. प्रत्येक सदराचे खास असे वैशिष्ट असते. प्रत्येक सदराचे महत्त्वही असते. एखाद्या दिवशी काही कारणाने विशिष्ट ठिकाणी प्रसिध्द होणारे सदर प्रकाशित झाले नाही तर वाचक ते का प्रकाशित झाले नाही याची चौकशी वृत्तपत्राच्या कचेरित करतात. ऐवढी आवड वाचक त्यांना आवडणाऱ्या सदरावर दाखवतात. सदराचे महत्व व त्याची लोकप्रियता असते. ''कित्येकदा काही वर्तमानपत्रे वाचकांना प्रत्यक्ष 'हे आवडले का, ते आवडले' असे न विचारता विशिष्ट सदरे अचानकपणे बंद करणार. ज्याला 'ड्रॉपऑऊ ट' पध्दत असे म्हणतात. अमेरिकेतील शिकागोच्या एका वर्तमानपत्राने 'लिटल ऑर्फन चाइल्ड' या नावाची एक चित्रमाला चालू केली होती. ती अचानक लागोपाठ तीन दिवस दिली गेली नाही, तेव्हा जवळजवळ ५० हजार वाचकांनी पत्र पाठवून अथवा दूरध्वनीवरून तर काहींनी समक्ष भेटून हे सदर का आले नाही, अशी चौकशी केली. तेव्हा संपादकांच्या लक्षात आले की, हे सदर लोकप्रिय आहे.''[५६] आपल्या भारतीय समाजव्यवस्थेत वाचक जरी ऐवढ्या संख्येने जरी प्रकट झाले नाहीत अथवा व्यक्त झाले नाहीत तरी वाचकांना एखाद्या सदराची किती

गोडी वाटू शकते याचे भान आणून देणारा वरील उतारा म्हणावा लागेल. व्यंगचित्र सदराचे ही असेच महत्त्व आहे. व्यंगचित्रातून विविध विषयांना हात घातल्याने राजकारणी, अर्थकारणी, समाजकारणी, सांस्कृतिक व्यववहाराचा संबध असणारे नगरिक व्यंगचित्रांमध्ये मांडलेल्या विषयाची दखल घेतात. त्यामुळे प्रकाशित झालेल्या व्यंगचित्रातून प्रसारित संदेशावर चर्चा होताना दिसते. व्यंगचित्रातून प्रसारित संदेशाची दखल राजकारणी, प्रशासनसेवा, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, सामजिक कार्यकर्ते, नागरिक यांना घ्यावी लागते. व्यंगचित्र सदरातून टिका करत विषय मांडलेला असतो. परंतु ही टिका ही बोचरी नसते, हसवत, हसवत कानटोचण्या करण्याचा हा प्रकार असतो. उपरोधात्म पध्दतीचा वापर या व्यंगचित्र सदरासाठी कलाकार करीत असतात. चीनचा कष्टकरी वर्गाचा नेता मावो–त्से म्हणतात, ''कलात्मक आणि साहित्यिक जगातील लढ्याच्या मुख्य पद्धत म्हणजे टिका. कला नि साहित्यविषयक टीकेची प्रगती झाली पाहिजे.''[५७] व्यंगचित्रे ही भाषेच्या मार्यादा ओलांडून संदेशाद्वारे मूल्ये, विचार, पोहचवितात. व्यंगचित्रे मोठ्या प्रश्नांवर छोट्या शब्दांच्या व चिन्हांच्या माध्यमांव्दारे संदेशातून विचार पोहचवितात. व्यंगचित्रे मोठ्या प्रश्नांवर कमी शब्दांच्या व चिन्हांच्या माध्यमांव्दारे संदेशातून विचार देतात. म्हणजेच मनोरंजनातून विचार वाचकांपर्यंत पोहचत असल्याने व्यंगचित्र सदराचे महत्त्व देखील वाढतच राहील. व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशावर विचार केला जातो, संदेशातून काही मूल्ये प्रसारित केली जातात यांवर विचार करण्यास हे सदर भाग पाडते. माणूस हा प्राणी भावनाप्रधान आहे. मानवाच्या विविध भावना आहेत, दुःख, राग, लोभ, आत्मीयता, भीती, प्रेम इत्यादी भावनांनी या माणसांचे संबंधबध्द आहेत. ''जगातील सर्व माणसे ही भावनांच्या बंधनांनी बध्द त्याप्रमाणे बुध्दीने विचारशील असतात. त्यांना स्वतःच्या संबंधात असणारी आस्था आणि समाजाविषयी वाटणारी भीती आणि प्रेम अशा भावनांनी या माणसांचे संबंध बध्द झालेले असतात.''[५८] मानव हा समाजाविषयी भिती बाळगणारा व प्रेम करणारा असा प्राणी आहे. मानवी मूल्ये, नैतिकता, तत्त्वे यांचा सतत मानव विचार करत असतो. आपल्या प्रत्येक आचरणाचा चांगला अथवा वाईट परिणाम होईल काय याचा विचार केल्यानेच त्याच्या मनात समाजाबद्दल विचार करतो. माणसाची धारणशक्ती याचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच मानवाचे आकलन याचा विचार यावेळी करणे आवश्यक आहे. मिळालेल्या माहिती, ज्ञान यांचा तो विचार करतो. वृत्तपत्रातून मिळालेली माहिती,

ज्ञान, मूल्ये, तत्त्वे, विचार यांचा तो विचार करतो. व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशावर व संदेशातून मिळालेल्या मूल्यांवर वाचक विचार करतो. वाचकाच्या मेंदूमध्ये प्रक्रिया चालू असते. ''आपण जे ऐकतो किंवा जे पाहतो ते तंतोतंत तसेच्यातसे लक्षात राहतेच असे नाही. असा सर्वसाधारण अनुभव आहे. ज्या ज्ञानेंद्रियांमार्फत हे ज्ञान आपल्याला प्राप्त होते ती ज्ञानेंद्रिये सारख्याच तऱ्हेची सक्षम असली तरीही सुमारे पन्नास टक्के भाग विसरला जातो किंवा फारसा लक्षात राहत नाही. याबाबत मानसशास्त्रीय संशोधन करून अनेक निष्कर्ष काढलेले आहेत. जे आपणास मासशास्त्राच्या अभ्यासात आढळतात. अशाच एका अभ्यासानुसार असे दिसते की कोणताही संदेश ग्रहण केल्यानंतर पहिल्या वीस मिनिटांत पंचेचाळीस टक्के भाग विसरला जातो. आणि एक तासानंतर साठ टक्के भाग विसरला जातो. जितके आपण ऐकतो किंवा पाहतो तितके सगळे सर्वांशाने स्मरणात राहतेच असे नाही. हे धारणशक्तीमुळे (Retention) घडते. जितके अधिक लक्षात राहील तितका अधिक चांगला संवाद, असे म्हणतात.

...मानसशास्त्रज्ञांनी भावनात्मकदृष्ट्या गुंतलेले स्पष्ट, ठसठशीत, अनुबंध (Retention) दर्शविणाऱ्या घटना किंवा गोष्टी या लक्षात राहणाऱ्या असतात असे दाखवून दिले आहे. आपल्या वर्तमान गरजांशी सुसंबध्द अशा जुन्या गोष्टीच तेवढ्या लक्षात राहतात. आपली स्मरणशक्ती काही ठराविक गोष्टींचीच निवड (Selective) करते, तीच गोष्ट आपल्या आकलनाचीही.''[५९] वाचकांना व्यंगचित्र सदरातून मिळणारे ज्ञान, माहिती, तसेच व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशातून मिळणारी मूल्ये यांचा भावनात्मक परिणाम होण्याची शक्यता जास्त आहे. वाचक हा व्यंगचित्र सदरातून हसत हसत विविध विषयांवर मांडलेल्या मूल्यांचा विचार करतो. तो त्यावर विचार करतो, विचार करून तो त्याप्रमाणे अचरणही करतो. नव्या पध्दतीने पत्रकारिता सामोरे जाताना दिसते आहे. पत्रकारितेमध्ये बदल होत आहे याची जाणीव आपणाला आहेच. समाजात घडणाऱ्या घटनांवर व्यंगचित्र सदरातून फक्त माहितीचे गठ्ठे देण्याचे काम नाहीतर विचारे साधन दिले जात आहे. दिल्या गेलेल्या संदेशामधून प्रसारित होणारी मूल्ये मानवाला मार्गदर्शक ठरत आहेत. ''वाचकांना केवळ नानाविध माहितीचे गठ्ठे किंवा पुढेही नको आहेत तर त्यांना सरकारी, आंतराष्ट्रीय आणि अन्य सामाजिक घटनांविषयी

सर्व काही कळायला हवे आहे. भावनेचा ओलावा नसेलेले थंड लिखाण आता वाचकांना नको आहे. पारंपारिक पध्दतीने चालत आलेली संपादक आणि वाचक यांच्यातील दुराव्याची पध्दत सोडून द्यावी आणि नव्या पत्रकारितेने अधिक सापेक्ष बनावे असे या वाचकांना वाटते आहे.''[६०] वाचकांना हवे असणाऱ्या बाबींचा खास विचार व्यंगचित्रा सारख्या सदरातून होताना दिसतो. व्यंगचित्रातून प्रसारित संदेशातून मिळालेल्या मूल्यांवर वाचक विचार करता. व त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर होणे साहजिक आहे. जनसंवादाचा परिणाम व प्रभाव होत असतोच. वृत्तपत्रातून प्रसारित होणाऱ्या बातम्या, लेखमाला, आग्रलेख, स्तंभलेख, सदरे यांचा प्रभाव वाचकांवर असतो. वाचक सदरांच्या बाबतील किती प्रभावीत होतात हे आपण वरती पाहिले आहे. ''जनसांवदाची लक्षणे, जनसांवादाच्या परिणामांचा प्रश्न, माध्यम परिणाम आणि समाज व वृत्तपत्रांचा प्रभाव, जनतेचे माध्यम रेडिओ, विकासासाठी दुरचित्रवाणीचा वापर, दुरचित्रवाणीचा प्रभाव, उपग्रहाव्दारे प्रसारण, व्हिडिओ आणि केबल टी.व्ही., राजकीय प्रचारासाठी केबलचा वापर, माध्यम परिणामाच्या दृष्टीने संवाद क्षेत्रातील धोके वगैरे प्रमुख विषयांची चर्चा या प्रकरणात करावी लागेल. संवाद क्षेत्रात चित्रपट हेही लोकप्रिय आणि सबंध भारतभर वापरात येणारे महत्त्वाचे माध्यम आहे. त्याचा वाढता प्रसार आणि त्याचा परिणाम यांचाही विचार या अुनषंगाने आपणाला करावा लागणार आहे.''[६१] प्रसारमाध्यमांचा होणारा परिणाम हा आता संशोधनाचा विषय होत आहे. वृत्तपत्राचे वाचक हे खास संशोधनाचा विषय होत आहेत. वृत्तपत्र व वाचक हे अतूट नाते आहे. वाचकांशिवाय वृत्तपत्र असू शकत नाही. त्यामुळे वाचकांना काय हवे, काय नको याचा विचार केला जातो. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराचाही असाच प्रभाव व परिणाम होत असतो. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदशातून मिळणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर परिणाम होतो काय हे पाहण्याचे संशोधन क्षेत्रात भर घालणारे ठरेल. व्यंगचित्र या सदराचे पुढील काळात महत्त्व वाढत जाणार आहेच. माध्यमांच्या परिणामांवर समाजात माध्यमांची स्विकार्हता वाढते.

महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त मराठी या भाषेतून वृत्तपत्रे प्रसिध्द होतात व ती वाचलीही जातात. मराठी भाषिक वृत्तपत्राचा इतिहासही स्वातंत्र्यपूर्व असा दैदिप्यमान असा आहे. स्वातंत्र संग्रामात व त्यांनतर संयुक्त महारष्ट्राच्या संग्रामात मराठी भाषिक वृत्तपत्राने अनमोल असे काम केलेले आहे. महाराष्ट्रातील जनमाणसात मराठी भाषिक वृत्तपत्राचे मानाचे स्थान

आहे. मराठी भाषीक वृत्तपत्रे आजही इतर भाषेपेक्षा जास्त प्रभावीपणे महाराष्ट्र व देशातील प्रश्नांवर आवाज उठवताना दिसतात. म्हणूनच सदर संशोधनामध्ये मराठी भाषेतील दैदिप्यमान इतिहास असणारी तसेच महाराष्ट्राच्या शहरी तसेच शहरालगतील भागात पाहेाचणारी दै. केसरी, दै. सकाळ व दै. लोकमत या वृत्तपत्रांची निवड केली आहे. ही तीन वृत्तपत्रे सोलापूर जिल्ह्यात असणाऱ्या वेगवेगळ्या मुक्तव्दार वाचनालये, ग्रंथालये, संस्था, संघटना तसेच राजकीय पक्ष यांची कार्यालये, घरात तसेच समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती इतर वृत्तपत्रांच्या तुलनेत मुख्यतः वाचकांना उपलब्ध होतात अशी ही वृत्तपत्रे आहेत. म्हणूनच मराठी भाषिक दै. केसरी, दै. सकाळ, दै. लोकमत या वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणारे हे संशोधन केले आहे. ''जनसंवादविषयक संशोधनाचे मूळ उद्दिष्ट हे वास्तवाची तापासणी करण्याचे आहे. या प्रकारच्या संशोधनात त्यामुळे आपल्याला जे महत्वाचे वाटते वा जी समस्या जाणवते त्याचे सूचन प्रश्नरूपाने केले जाते. हे प्रश्न प्रामुख्याने अग्रक्रम, मूल्य व ज्या समस्येसंबंधाने अध्ययन असेल त्या बाबतचे असतात.''[६२] हे संशोधन मानवाच्या, समाजाच्या व मराठी भाषिक वृत्तपत्रीय सृष्टीच्या नैतिक विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरणार आहे. वृत्तपत्रविद्या विभागासाठी हे संशोधन म्हणजे उपयोजित संशोधन ठरेल. उपयोजित संशोधन मिळालेले निष्कर्ष दैनंदिन व्यवहारात उपयुक्त ठरतात. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे मराठी भाषिक वृत्तपत्रीय व्यंगचित्र सृष्टिस व वृत्तपत्रीय मूल्य सृष्टिस उपयुक्त ठरू शकतील; त्यामुळेच या संशोधनाची गरज व महत्त्व आहे.

१.०४ मूल्ये व वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर

प्रस्तुत संशोधनामध्ये मूल्ये व वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराचा संयुक्त विचार करून संशोधाची रूपरेषा ठरवली असली आहे. यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरण रक्षण, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा विचार केला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये व्यंगचित्र सदरातून मूल्ये प्रसारित होतात काय याचा शोध घ्यावयाचा असल्याने वरील मूल्यांची माहिती करून घेणे देखील तितकेच महत्त्वाचे काम आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील मूल्यां बाबत देखील विचार केला आहे.

१.०४.०१ वैज्ञानिक दृष्टिकोन

विज्ञान ही मानवी जीवनाला मिळालेली देणगी आहे. मानवाने विज्ञानाच्या आधारे असाधारण अशी प्रगती केली. मानवी जीवन सुकर, समृध्द, वैभवशाली, बनविले. विज्ञानामूळे वेगवेगळे शोध मानवाने लावले त्याचा फायदा मानवी जीवनास झाला. मानवाला सुखी बनवण्याचे मोठे काम विज्ञानाच्या आधाराव पार पडले. वाफेच्या इंजिनाचा शोधा हा या विज्ञान युगातील अत्यंत महत्त्वाचा शोध मानला गेला आहे. विज्ञान हे शास्त्र आहे. सर्व जगात एकाच पध्दतीने विज्ञान काम करते. त्याची पध्दती ही सर्व जगात समान आहे. बल्ब हा भारतात चमकतो तोच बल्ब अमेरिकेतही तशाच पध्दतीने चमकने हा त्याचा नियम आहे. त्यामुळे विज्ञानाचा नियम हा वैश्विक असतो. त्यामुळच विज्ञान ही पध्दती बनली आहे. विज्ञानाचा आपण वापर करत असूत तर विज्ञानाच्या आधारे विचार करण्याची पध्दती म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन होय.

वैज्ञानिक दृष्टिकोन हे एक प्रकारचे मूल्य आहे. या मूल्याच्या आधारे जीवन जगण्याची पध्दतीचा अवलंब केल्यास जीवन जगणे सोपे होते. ''विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या या युगामध्ये जीवन जगताना आपल्याला हरघडी नवनवीन ज्ञानाचा, कल्पनांचा, तंत्रज्ञानाचा स्वीकार कारावा लागतो. नवनवीन समस्यांना तोंड द्यावे लागते. या गोष्टी आपल्याला सहजतेने करावयच्या प्रवास असतील तर वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याखेरीज आपल्याला पर्याय नाही.

भारत हा विकसनशील आणि परंपरानिष्ठ देश आहे. विकसीत देशांच्या प्रगतीला विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या विकासाबरोबरच त्यांनी स्विकारलेला वैज्ञानिक दृष्टिकोन कारणीभूत आहे. विकसनशील देश आणि विकसीत देश यांच्यातील विकासाची ही दरी कमी करण्यासाठी विकसनशील देशांना वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरणे अपरिहार्य आहे.''[६३] मानवाला विज्ञानाने मदतीचा हात दिला आहे परंतु मणूस हा परंपरांच्या जास्तीच आहारी जात विज्ञानाची कास सोडतो. विज्ञानाची नजर माणसास असेल तर असे होत नाही. कार्यकारण सिध्दांत हेच सांगतो की, कारणा शिवाय कोणतीही बाब घडत नाही. विज्ञानाचा कार्यकारण सिध्दांत हा पायाच म्हणावा लागेल तरी देखील माणूस हा नसलेल्या अवैज्ञानिक बाबींवर विश्वास ठेवून आपल्या जीवनातील ताकद घालवतो. मानवाची विकास व उत्क्रांती ही सुध्दा विज्ञानाचीच देन

आहे. या विज्ञानाच्या आधारे मानवाचा विकास झालेला आहे. ''जीवनरक्षण आणि स्वास्थ्य यांच्या संपादनासाठी आपल्या भोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीविषयी विश्वसनीय ज्ञान संपादन करणे ही मानवी जीवनाची स्वाभाविक गरज आहे. तिच्या समाधानासाठी आवश्यक ती जिज्ञासा व ज्ञानेंद्रियांची मज्जासंस्थेची कार्यक्षमताही मानवाजवळ आहे. या साधनांचा उपयोग करून, निरीक्षण–प्रयोग व तर्कशुध्द अनुमान यासारख्या ज्ञानप्रमाणांचा सहाय्याने मानवी जीवनाच्या परिस्थितीविषयी विश्वनीय ज्ञान संपादन करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करणे होय.

१६ व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच हा वैज्ञानिक दृष्टीकोन मानवी जीवनात व विचारात प्रभावी ठरला. तत्पूर्वीच्या काळामध्ये अंधश्रध्दा व पारंपारिक पारलौकिक कल्याणाबाबतचे विचार यांचेच प्राबल्य असल्याने मानवी स्वतंत्र विचारशक्ती जखडली गेली होती. स्वतंत्र विचार करण्याची कुवत असूनसुध्दा धर्मसंस्थेच्या दडपणामुळे व पारंपारिक अंधश्रध्देमुळे तसे करावयास मानव धजत नव्हता. १४ व्या शतकापासून मानवतावादी विचारांचा प्रचार व स्वीकार होऊ लागला, आर्थिक भरभराट सर्वत्र स्वीकार करण्याच्या प्रयत्नात झाले. वैज्ञानिक क्रांतीला सुरूवात १६ व्या शतकात झाली. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोन ही प्रवृत्ती आहे ती मात्र मंद वेगाने पसरत आहे हे नाकारता येत नाही.''[६४] मानसाने विज्ञानाचा वापर करणे सुरू केले परंतु विज्ञानावादाची प्रवृत्ती जपने नाकारले. वैज्ञानिकदृष्टिकोनाचा अभाव मानवी जीवनात राहिला. विज्ञानाच्या आधारे जग चालते तरी देखील जगात अशी कोणती तरी शक्ती आहे की जी हे जग चालवते आहे हा अवैज्ञानिक विचार जपलाच जात आहे. याला छेद देण्याचे काम विज्ञानावादी दृष्टिने करता येते. अभ्यासाची विविध शास्त्रे निघाली आहेत. याचे मुळे हे विज्ञान हेच आहे. मानवाने विज्ञानावर विविध भौतिक बाबींचा स्वीकार केला परंतु भौतिकवादी विचार बाजूला ठेवले. तर्कशास्त्र हे असेच एक शास्त्र आहे जे विज्ञानाच्या दृष्टिला विकसीत करू शकते. आपल्या विवेकाच्या आधारे प्रश्न विचारने ही विज्ञानाची जिज्ञासा आहे. ती जिज्ञासा विवेकाच्या आधारे पूर्ण करता येऊ शकते. ''विवेकाधारित नीतिमूल्यांपेक्षा बुवा, बाबा यांच्या आज्ञा महत्त्वाच्या ठरतात. कारण अश्या आज्ञा ईश्वरप्रेरित असतात असा धार्मिक लोकांचा विश्वास असतो. आणि ईश्वर हा विवेकबुध्दीच्याही पलीकडे असल्यामुळे या धर्माज्ञा विवेकापेक्षा वरचढ ठरणे स्वाभाविक ठरते. बुवा–बाबा यांच्या आज्ञेपुढे सत्य, प्रमाणिकपणा,

सहानुभूती, समता, बंधुता, माणुसकी, न्याय अशा मूल्यांची मातब्बरीही धार्मिकांना वाटत नाही. एकदा बाबा–बुवा–बापू संतुष्ट झाले की मग अप्रमाणिकपणा, भ्रष्टाचार, स्वार्थीपणा, संवेदनशून्यता, श्रेष्ठत्वाचा अहंकार, इतरांना तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती यांसारख्या बाबीही पाप ठरत नाहीत.''[६५] भौतिकवाद व आध्यात्मवाद हे दोन वाद कित्येक वर्षे वादाचे विषय राहिले आहे. भौतिकवाद्यांवर दैववादी शक्तींवर विश्वासन ठेवणारे म्हणून त्यांना हीणवून अपमानीत करण्याचे कांड कित्येक वर्षे जगभर धर्मवाद्यांनी, अध्यात्मवाद्यांनी केलेले आपण पाहिले आहे. भौतिकवादी, विज्ञानवादी दृष्टिकोनाने विचार करणारी व्यक्ती तसेच विचारधारा ह्या मानवतावादी विचारधारेच्या समर्थक राहिलेल्या जगभराचा अनुभव राहिला आहे. तर उलट मानवाला संपवन्याची, अध्यात्मवादाला विवकेवादी प्रश्नांनी सतावून सोडणाऱ्या विचारांना संपण्याचे खून पाडण्याचे काम करताना जगाने अनुभवले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा मानवाच्या विकासाचा व त्याच्या फ ायद्याचा असा आहे. शास्त्रज्ञ, वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे जगात स्वातंत्र्याची स्थापना झाल्याची उदाहरणे देखील आहेत. विज्ञानवाद्यांनी या अंध्दश्रध्द लोकांना पळो की साळो करून सोडले होते असा इतिहास आहे. ''रोजन बेकन (१२१४–९४) और लिनार्दो द विन्सी (१४५२–१५१९) ने इन मान्यताओं की जड़े हिल दीं, इन्हं उखाड़ फें कने का कार्य प्रसिध्द वैज्ञानिक कॉपर निकस (१४७४–१५४३) ने किया। उसने सिध्द किया कि पृथ्वी न तो सृष्टि का केन्द्र है और न सूर्य पृथ्वी की और घूमता है; अपितु, सृष्टि को केंन्द्र है सूर्य और यह पृथ्वी ही, जो गोल है, सूर्य के चारों ओर घूमती है । गैलेलियो (१५६४–१६४२) और केपलर (१५७१–१६३०) के गणित और जोतिष के अनुसंधानों से कोपर निकस का मत समर्थित हुआ। वैज्ञानिक दृष्टिकोन अपनाने के कारण मानव बुध्दि का क्षेत्र व्यापक हुआ, व्यक्तिवाद को प्रश्रय मिला तथा स्वतन्त्रता की स्थपना हुई।''[६६] मानवाने स्विकालेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवाचा विकास होत गेला. विज्ञानाचा वापर करायचा असेल तर तशी दृष्टि असावयास हवी. तसे न केले तर नकळत आपण आपली फ सवणूक करून घेतो. विज्ञानाचे जग निर्माण होण्यासाठी विज्ञानाला खूप कस्ता खाव्या लागल्या आहेत. कित्येक त्रास सहन करून विज्ञान पुढे गेले आहे. कित्येक शास्त्रज्ञांना आपले कुटूंब उद्वस्त करून विज्ञानाचा विकास केला. हे करीत असतानाच समाजात असणाऱ्या तात्कालीन धर्मश्रध्द, आध्यात्मवादी विचारधारा ह्या या शास्त्रज्ञांच्या

जिवावर उठलेल्या होत्या. ''१६ व्या शतकाच्या उत्तरार्धात साहित्य अगर कला त्यांच्या उदात्त कृती अभावानेच चमकत होत्या. पण याचकाळात विज्ञानाची वाटचाल धिमेपणाने चालू होती. बौध्दिक कर्तृत्वाचे नवे युग अवतरले होते. १६ वे शतक संपण्यापूर्वीच सूर्याला केंद्रस्थानी मानणाऱ्या खगोलशास्त्राची निश्चितपणे स्थापना झाली होती. त्यामुळे विचाराच्या इतिहासाने एक महत्वाचा पुढचा टप्पा गाठला. कोपरनिकस, टायकोब्रही, केप्लर हे आधुनिक विज्ञानाचे संस्थापक १६ व्या शतकामध्येच होऊ न गेले. १७ व्या शतकाच्या आरंभी लिप्पेर्श या डच नेत्र–विशारदाने पहिली दूरदर्शिका तयार केली. या यंत्राचे महत्व गॅलिलिओने तात्काळ ओळखले. त्याने स्वत:हूनही अधिक चांगली दूरदर्शिका तयार केली. ती जरी प्राथमिक स्वरूपाची होती तरी आकाशाचे निरीक्षण करून अंतराळातील भ्रमणांचा शोध त्याला घेता आला. त्यामुळे सूर्यकेंद्रवादी खगोलशास्त्र भक्कम पायावर उभे राहिले. गॅलिलिओच्या शोधाचा परिणाम धक्का देणारा होता. त्याच्या शोधाने ॲरिस्टॉटलच्या प्रामाणाच्या परंपरेला हादरा बसला. गॅलिलिओने जगाला दोन पध्दतीविषयी प्रबंध या प्रसिध्द ग्रंथात सूर्यकेंद्रवाद मोठ्या समर्पक रीतीने मांडला आहे. या ग्रंथामुळे त्या वृध्द व्युत्पन्न मतीला मरेपर्यंत बंदिवास भोगण्याची पाळी आली. त्याच्या या ग्रंथामुळे टॉलेमीच्या भूकेंद्रमताचे समर्थन करणारा सिप्लिसिओ हा ॲरिस्टॉटलच्या पंथातील तत्वज्ञानी मूर्खात गणला जाऊ लागला. गॅलिलिओने आधुनिक खगोल शास्त्राची स्थापना केली, इतकेच नव्हे तर आधुनिक वास्तू व शास्त्राचा पायाही त्याने घातला. या पायावरच देकार्त आणि न्युटन यांनी वास्तुशास्त्र वाढविले. अमेरिकेचा शोध ही महत्वपूर्ण घटना होती. तिच्या मागोमाग मॅगेलनने पृथ्वीपद्रक्षिणा पूर्ण केली. त्यामुळे पृथ्वी गोल आहे हे प्रत्यक्षपणे सिध्द झाले. बायबलच्या पुराणकथेवर हा आणखी एक मर्मी घाव होता. तसेच शतकानुशतके शास्त्रांची राणी म्हणून गणल्या गेलेल्या ईश्वरविज्ञानाच्या भव्य मंदिरावर आघात होते क्रमप्राप्त होते. शेवटी, पंधराव्या शतकाच्या सुरवातीला गटनर्बच्या मुद्रणकलेचा शोध लागला. त्याचे दुरगामी क्रांतीकारक परिणाम घडून आले. मुद्रणकलेतील आरंभीच्या तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर ज्ञान आणि विद्या यांच्या प्रसाराचे प्रभावी साधन म्हणून मुद्रणक लेचा प्रचार साऱ्या युरोपभर झाला. युरोपच्या सर्व पुढारलेल्या देशात सोळाव्या शतकात पुस्तके छापण्याचा धंदा हा एक नियमित व्यवसाय झाला.''[६७] गॅलीलोने शोधलेल्या दुर्बीनीने जगाच्या विचार करण्याची पध्दती बदलून गेली असे म्हणले तरी वावगे ठरू नेये. ज्या

दुर्बीनीने त्याने पृथ्वी ही सुर्याच्या कडेने फिरते आहे हे सत्य जगासमोर मांडले. त्याची त्याला फार मोठी शिक्षा भोगावी लागली परंतु तो मागे सरला नाही. तो त्याच्या मतावर ठाम राहिला. त्यामुळे विज्ञानाचा विकास व समृध्द वाटचाल होऊ शकली. अध्यात्मवादी ज्या संकल्पनांवर आधारीत होते त्या संकल्पनांना धक्के देण्याचे काम आधीपासून सुरूच होते परंतु हा धक्का धर्मवादाचे, अध्यात्मवादाचे व अंधश्रध्द विचारांचाच पाया उध्दवस्त करणारे ठरले. यातूनच पुढे डार्वीनच्या उत्क्रांतीवाद्याच्या सिध्दांताने तर विज्ञानाच्या सिरपेचात मानाचा तूरा खोवला. यानंतर माणूस हा देवाने निर्माण केला नसून तो माकडाचा वंशज आहे हा विचार जड असला तरी विज्ञानाला मूलभूत भौतिकवादी विचारांच्या दिशेने नेहणारा ठरला. धर्मग्रंथात मानव हा देवाची निर्मिती आहे हे मानावे की माकडाचा वंशज मानावे या वादाने जगात काहूर माजले परंतु विज्ञान हे पुरावे मागते. धर्माला पूराव्याची गरज नसते. त्याप्रमाणे विज्ञानाने हाजारो पुरावे देत मानवी विज्ञानवादी दृष्टि मजबूत केला. विज्ञानाचा जसा विकास होत गेला तसा तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील विचार करण्याची रीत बदलून गेली. ''मनुष्याच्या प्रत्यक्ष जीवनावर व प्रत्येक, क्षेत्रातील मूलभूत चिंतनावर विज्ञानाचा जो स्पष्ट प्रभाव पडलेला आहे तो मागील तीनशे वर्षांतील आहे. परंतु आपण ज्याला वैज्ञानिक म्हणून संबोधितो तो विश्याच्या स्वरूपाविषयीचा विचार प्राचीन काळापासून होत आलेला आहे. अशा विचाराचा अंतर्भाव अगदी अलिकडील काळापर्यंत तत्वज्ञानातच होत असे. न्यूटनचा क्रांतिकारक ग्रंथ ८ मे १६८६ या दिवशी प्रसिध्द झाला. त्या ग्रंथाचे नाव Philosophiae Naturalis Principle Mathematica (Mathematical princiaples of natural philosophy) असे आहे. विज्ञान व तत्त्वज्ञान हे परस्परांपासून अद्यापि पूर्णतया विभक्त झालेले नव्हते. हे न्यूटनच्या ग्रंथनामावरून हे दिसून येते.''[६८] विज्ञानाचा प्रभाव समाजमानाव वाढत चालला होता. शास्त्रज्ञ विचारवंत विज्ञानाची प्रगती करीत होते. नव नव्या शोधांना जन्माला घातले जात होते. विज्ञानाला विरोध जरी होत असला तरी विज्ञानातून विकसीत झालेल्या शोधांना मानवी समाज स्वीकारत होता त्यामुळे विज्ञानवादी दृष्टि जरी बंद करण्यासाठी काही विचारधारा काम करीत असल्या तरी विज्ञान पुढे जात होते. ''सतराव्या शतकापासून वेगाने विकसित होणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानाने विसाव्या शातकात प्रगतीचे शिखर गाठलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून मूल्यव्यवस्थेसहित समाजाच्यासर्वच अंगात मूलभूत परिवर्तन घडून आलेले आहे. कुटुंब-

व्यवस्था व अर्थव्यवस्था यांतही मोठे बदल घडून आलेले आपण पाहतो. सामाजिक धारणा, सामाजिक आवश्यकता यांतही मोठे परिवर्तन झालेले आहे. विज्ञानाच्या अल्पशा प्रगतीमुळे जगातले फ ार मोठे अज्ञान नाहीसे झाले असून जगात घडणाऱ्या विविध घटनांमागील कार्यकारणभावाचे ज्ञान माणसाला होऊ लागलेले आहे. माणूस आधिकाधिक विचार करू लागला आहे व त्याच्यापरिणामी समाजात उत्तरोत्तर बुध्दिवादाचा प्रभाव वाढत आहे.''[६९] जगच प्रकाश किरणांनी उजळून निघाले होते. सूर्याचा खरा प्रकाश हा विज्ञानामुळेच मानवापर्यंत पोहचण्याचे काम झाले. नव्या नव्या विचारांचा प्रवाह वाढत जाण्याचे स्वातंत्र, समता, बंधूता ही मूल्ये वाढत जाण्याचे कामही विज्ञानानेच केले. अज्ञानाच्या काळ्या जगाचे अस्तित्व संपले. समाजावर, अर्थव्यवस्थेवर, राजकीय, सांस्कृतिक जगावर विज्ञानाने प्रभुत्व गाजवण्यास सुरूवात केली होती. भौतिकवादी विचार व कृतिने सर्व जागाला सुखी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते यात विविध सामाजिक संस्थाचा उदय होत गेला. ''मानवी समाजाच्या विकासाबरोबर त्यात नवीन सामाजिक संस्थांची भर पडत गेली. त्यांच्या नियमनाचीही आवश्यकता निर्माण झाली. अर्थव्यवस्थेच्या विकासामुळे माणसाच्या प्राथमिक गरजा भागविण्याचे चांगले मार्ग उपलब्ध झाले. माणसाला थोडी फुरसतही मिळाली. आता तो निसर्गाचे अधिक सजगतेने निरीक्षण करू लागला. निसर्गाची भीती व त्याविषयीचे त्याचे अज्ञान बऱ्याच प्रमाणात कमी झाले. काही कटु वास्तवांचा स्वीकार करण्यात मने तयार झाली. आता माणूस निसर्ग व त्यात घडणाऱ्या घटना, मानवी जीवन व एकंदर सृष्टिजीवन यांच्याकडे डोळसपणे बघू लागला. त्याला आपल्या सभोवतालच्या जगातील नियमितता, उदात्तता, सुंदरता, विशालता, रहस्यमयता यांच्याविषयी कुतूहल व प्रेम वाटण्यास सुरूवात झाली. मानव व निसर्ग यांच्यातील परस्परसंबंध, माणसाचे निसर्गावरील अवलंबन यामुळे मानवाला निसर्गाबद्दल आदर व आत्मीयता वाटू लागली. मानवाच्या या नवीन दृष्टिकोनानुसार संचलन करणारा आहे, तो लहरी नाही. अखिल सृष्टीविषयी त्याला प्रेम आहे, सर्व मानवजात त्याची लेकरे आहेत. तो सर्वशक्तिमान, सर्वज्ञ व संपूर्ण आहे. त्याला आकार नाही. प्रसंगवशात तो अनेक रूपांत अवतरतो किंवा आपले प्रेषित पाठवितो. या विश्वात 'धर्म' अर्थात 'नियमितता' प्रस्थापित करणे हे या अवतारांचे किंवा प्रेषितांचे प्रयोजन असते. या परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे प्रत्येक मानवाचे धर्म आचरला पाहिजे. धर्माचे पालन करणाऱ्यांचे तो संरक्षण करतो व

धर्मभंजकांना तो नष्ट करतो, अशी धार्मिक माणसाची प्रामाणिक भावना असते. अशा ईश्वराची भक्ती किंवा उपासना करण्यामागे भीती नसते. त्यामागे असतो आदर, प्रेम व कृतज्ञता. या धर्मांत विधीबरोबरच सदाचरण, कर्तव्यपालन अशा नैतिक जीवनाला अधिक महत्व प्राप्त होते.''[७०] मानवाला निसर्गात घडणाऱ्या घटना या अनाहूत पणे घडणाऱ्या घटना वाटत होत्या त्या विज्ञानामूळे तसे वाटणे बंद झाले. प्रत्येक घटनेमागे काही कार्यकारण असते हा विज्ञानवादी विचार समाजमनाने स्विकारण्यास सुरूवात झाली. निसर्गनियमांची जाणीव मानवास होऊ लागली ती देखील विज्ञानामूळेचे. या सर्व बाबींचा परिणाम असा झाला की, मानवाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनात विकास होत गेला. भौतिक आधि की चेतना आधी असा संघर्ष जो आहे. त्या विज्ञानाने भौतिक आधिक व त्यांनतर चेतना अशी सुंदर भर घातली. यामुळे धर्मवादी शक्तींना चेतना आधिपासून आहे या विचार धारेला मागे सरावे लागले. सृष्टी कशी निर्माण झाली तर ती विज्ञानाच्या नियमांनी तयार झालेली आहे. हेच विज्ञानाने मानवास सांगितले. सृष्टीतली निर्मितीची कोणती चार अंगे असतात या बाबत ॲरिस्टॉटलचे तात्त्विक मत पुढील प्रमाणे आहे. ''द्रव्यात सुप्तपणे वसत आसणाऱ्या आकारचे प्रकटीकरण होत असताना जे परिवर्तन घडून येते त्याला तो गती (motion) असे म्हणतो. झाडाचे हिरवे पान पिवळे होणे ही या आर्थाने गतिमानताच आहे. परिवर्तन जेवढ्या प्रकारांनी संभवते ते सर्व प्रकार म्हणजे गुणात्मक (qualitative); संख्यात्मक किंवा परिमाणात्मक (quantititative) व स्थलांतर (locomation) होते.

या गतिसिध्दांताचा उपयोग करून ॲरिस्टॉटलने भौतिक विश्वाचे सुसंगत असे वैज्ञानिक वर्णन देण्याचा प्रयत्न केला. विश्व ही त्याच्या दृष्टीने अनेक खगोलांची परिपूर्ण व व व्यवस्थित अशी रचना आहे. पृथ्वी मध्यस्थानी आहे. हे विश्व बाहेरच्या बाजूने दिव्य गोलकाने (Celestial sphere) सीमित झाले आहे. ही बाह्य मर्यादा व पृथ्वी यांच्यामध्ये सर्व ग्रह, सूर्य, तारांगण पसरलेले आहे. सर्व ग्रह वर्तुळाकार कक्षेत पृथ्वीभोवती फिरतात, सूर्यही फिरतो. पृथ्वीमध्यसिध्दांत तो हाच होय. ब्रह्मांडात पृथ्वी, आप, तेज, वायू ही चार मूलतत्त्वे किंव महाभूते आहेत. याशिवायअत्यंत तरल असे इथर नावाचे पाचवे तत्त्व आहे. विश्वात पोकळी (vacuum) कोठेही नाही. निसर्गाला शून्यवत् असणारी पोकळी खपत

नाही (Nature abhors vacuum). ॲरिस्टॉटलने दिलेले आतापर्यंतचे वर्णन पुराणासारखे वाटते. तेव्हा त्याचे त्याकाळचे निसर्गविज्ञान म्हणून काय होते? कोणत्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्याने वरील वर्णन दिले? आपल्या लक्षात येईल की उपलब्ध निरीक्षणाच्या आधारे तो त्यांची उत्तरे देण्यासाठी त्याने वरील वर्णन दिले? आपल्या लक्षात येईल की उपलब्ध निरीक्षणााच्या अधारे तो त्यांची उत्तरे शोधत होता. भौतिक विश्वाचा विचार करित असताना त्याला ग्रहताऱ्यांचा विचार करावा लागला. तसेच सृष्टीत जड पदार्थ व सजीव यांच्या ज्या हालचाली होतात त्यांचाही विचार करणे त्यला क्रमप्राप्त होते. On the heavens व Physics हे ग्रंथ तत्कालीन वैज्ञानिक चिंतनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत विश्वरचना व तिच्या मुळाशी असलेल्या नियमांचा तो शोध घेत होता

...विज्ञानाचा खरा क्रांतिकारक बदल सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात कोपर्निकसने घडवून आणला. त्याने पृथ्वीमध्य सिध्दांत दुरूस्त केला असे नव्हे तर तो पूर्णतया विज्ञानाविचारातून निष्कासित केला व एक नवे प्रस्थान निर्माण केले. खगोलशास्त्राला त्याने नव्या वैचारिक दिशेकडे नेले. कोपर्निकस व नंतर गॅलिलिओ यांनी ॲरिस्टॉटलने विचारविश्व बाधित ठरवून नवे आणले.

...ॲरिस्टॉटलच्या विज्ञानविचार अनेक त्रुटी होत्या हे आत सर्वज्ञात आहे. विज्ञानविचार क्रमशः बदलत जाऊन प्रगत होत जाते हे विज्ञानाच्या विचारावरून स्वच्छ दिसते.''[७१] ॲरिस्टॉटलने मांडलेला गतिचा परिवर्तनाचा सिध्दांत हा विज्ञानाचा पूर्वइतिहास होय. कणांनी बनलेले जग हा देखील असाच विज्ञानाची मांडणी करतो. भौतिकात असणारे मूलद्रव्य हे बदलते आहे. त्याचा वेग आहे. त्यात असणारा जिवंतपणा हा विज्ञानाच्या सृष्टीच्या नियमांनी बध्द असा आहे. या बदलाला ठराविक वेग आहे. याचे मापन संख्यात्मक, गुणात्मक, परिणामात्मक करता येऊ शकते. अशीच मांडणी ॲरिस्टॉटलने केल्याचे दिसते. पृथ्वी, आप, तेज, वायू या चार मूलद्रव्यांनी जग बनलेले आहे ही त्याची विज्ञानवादी दृष्टी ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची जननीच म्हणावी लागेल. विज्ञानाने विचारवंताचे जग विस्तारित केले. विचारांचे अंगाने विज्ञानवादी विचार प्रगत होत गेले आहेत. नैतिकवादी विचार हे विज्ञानवादी दृष्टिकोनात पुढे आलेले विचार आहेत. नैतिकवादी मूल्यांची उभारणी करण्याचे कामही

वैज्ञानिक दृष्टिकोनातून झालेले आहे. नैतिक मूल्यांच्या उभारणीत वैज्ञानिक दृष्टीकोणाचा हात आहे. विज्ञान हे प्रगतिशील मानले जाते. नैतिकावादी मनुष्य हाच प्रगतीशील असतो. ''परिष्कृत आत्म प्रेम को प्रायः भूल से नैतिकता समझ लिया जात है, किन्तु उच्चतम आदर्श मानकर अन्य सभी नियमों को–जिनमें आत्मप्रेम का नियम भी सम्मिलित है– इस आदर्श के अधीन मानता है। वह उसी सीमा तक अपने सुख की इच्छा करता है जहाँ से यह सुख नैतिक नियम के अनुसार है । नैतिकता का उद्देश मेरा सुख, मेरा लाभ अथवा मेरा हित नहीं अपितु सामान्य शुभ या सामाजिक कल्याण है और यह सामाजिक कल्याण मेरी पसंद अथवा मेरी इच्छाओं की अधिकतम तृप्ति व्दारा निर्धारित नहीं होता। मनुष्य का नैतिक दृष्टि से श्रेष्ठ होना इस बात पर निर्भर नहीं है कि वह अपने हित के लिए प्रयास करता है, किसी उच्चतर शुभ अथवा सामाजिक कल्याण के लिए अपने सुख का ही नहीं, अपितु अपने जीवन का परित्याग करना भी श्रेष्ठ मनुष्य अपना कर्त्तव्य मान सकता है । इस प्रकार यदि कोई मनुष्य न्यायशील, संयमी, ईमानदार, कर्त्तव्यनिष्ट, सहनशील, दयालु तथा उदार हे तो यह निश्चयपूर्वक कहा जा सकता है कि वह नैतिक दृष्टि से वहुत उन्नत अथवा प्रगतिशील है।''[७२] वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या व्यक्तीं हा सदाचारी, सद्गुणी, उच्च सामाजिक कल्याणकारी, न्यायी, ईमानदार, कर्तव्यनिष्ठ, दयाळू असू शकतो. विचार करताना विज्ञानवादी पध्दतीने केल्याने बेईमानी लबाडी अशा विचारांना नाकारणारा होऊ शकतो. विज्ञानाने नैतिक प्रगती देखील साधलेली आहे. ''आजच्या विज्ञान युगामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बनविणे ही सुखकर जीवन जगण्यासाठी पूर्वावश्यक अट आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विज्ञानाने निर्माण केलेल्या भौतिक सुविधांचा लाभ योग्य प्रकारे घेऊन जीवन खऱ्या अर्थाने समृध्द करावये असेल तर वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. विशेषतः आधुनिकीकरणासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरणे आवश्यक आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन हा केवळ विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नसून ती एक व्यापक संकल्पना आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन ही व्यक्तीने आपले आचार व विचार यांना लावलेली एक विशिष्ट प्रकारची शिस्त आहे.''[७३] शास्त्रज्ञांनी लावलेले शोध हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपाक आहे. बुध्दीच्या जोरावर विज्ञानाने मानवी जीवनाला सुखकारक बनवण्यासाठी लहान

मुले, तरूण, महिला, वयस्कर या सर्वांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अवलंबल्यास समाजाची व एकूणच देशाची प्रगती होऊ शकते. समाजात असणाऱ्या मूल्यांचा विकास व एकूणच समृध्दी होऊ शकते. ''बुध्दीचा उपयोग करून आधिकाअधिक ज्ञान व विद्या मिळविताना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून केवळ तंत्र, यंत्र, विज्ञानाच्या सर्व शाखांमध्येच नव्हे तर दैनंदिन जीवनात सुध्दा बुध्दीप्रामण्य आधारित वर्तन करण्याची गरज अलिकडे भासत आहे. विद्येमुळेच निसर्गाचे मानवाचे सर्वात जास्त प्रगती केली. विद्येने ज्ञानाने केवळ माहितीचे संकलन करण्याची दृष्टी दिली असे नाही तर सत्य पारखून घेण्याचेही महत्त्व जाणवून दिले. त्याच वैज्ञानिक वृत्तीमुळे अनेक शास्त्रज्ञांना संशोधनास चालना मिळाली. शास्त्रज्ञांनी लावलेले शोध हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपाक म्हणावा लागेल.''[७४]

१.०४.०२ पर्यावरणरक्षण

पर्यावरणरक्षण ही मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्वाचे मूल्य बनत चालले आहे. पर्यावरणरक्षण केल्या शिवाय मानवी व इतर प्रजाती ह्या जिवंत राहू शकतील की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही २० व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असल्यापासून तिव्रतेने जाणवू लागली आहे. जगातिक तापमान वाढ होण्याचे प्रमाण वाढू लागले व निसर्गाने आपला समतोल बिघडवून टाकण्यास सूरूवात केल्यावर पर्यावरणरक्षणाची गरज मानवी जीवनास निर्माण झाली. ''मानव हा पर्यावरणातील अतिशय महत्त्वाचा घटक होय. पर्यावरण संरक्षणाचीही जबाबदारी त्याचेवर येऊ न पडते. बिघडलेल्या पर्यावरणाचा समातोल राखण्यासाठी प्रदूषणाची दाहकता व त्याचे दूष्परिणाम याची जाणीव करून देणे हे मूल्यशिक्षणाचे महत्त्वाचे काम आहे. मानवाच्या व सजिवांच्या वंशवृध्दिसाठी व संवर्धनासाठी पर्यावरणाच्या समतोलाची आवश्यकता आहे. कारण मानव पर्यावरणाशी जेवढ्या प्रमाणात समायोजित होऊ शकतील तेवढ्याच प्रमाणात वंशवृध्दी व संवर्धन होऊ शकेल. पर्यावरणाशी समायोजित होण्याकरिता सजिवांना आनुवांशिक देणगी मिळालेली असते. ही देणगी त्याला विश्वाच्या उत्क्रांतिसोबत मिळाली आहे. मानव नैसर्गिक संपत्तीचा अतिरेकी उपयोग स्वतःच्या व्यवहाराकरिता करतो व त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. या बिघडीलेल्या पर्यावरणाशी मात्र तो मानव समायोजित होऊ शकत नाही, त्यामुळे व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय

संकटाची श्रृंखला तयार होते.''[७५] व्यक्ती, समाज व राष्ट्र व त्या अनुशंगाने जागावरील संकट हे मानवानेचे उभे केलेले संकट आहे. हे संकट दूर लोटायचा मार्ग ही मानवाकडेच आहे हे लक्षात घ्यावे लागेल. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने निसर्गात असणारी एक प्रकारची नियोजित साखळी विस्कळीत होत आहे. याचा परिणाम इतर सजीवांवर जास्त होत आहे. मानवाने बिघडवलेल्या पर्यावरणाचा परिणाम हा इतर सजीवांना आपला जीव गमवून द्यावा लागत आहे. तत्वज्ञान व पर्यावरण या बाबत तत्त्वज्ञानाची भूमिका मांडताना प्रकाश सोमण हे लेखक म्हणतात ''मुळातच या क्षेत्रात तत्त्वचिंतकालाकाही जागा आहे का अशी शंका येऊ शकते. माझ्या मते इथे तत्त्वचिंतक महत्वाची भूमिका बजाऊ शकतो. त्याची कारणे तीन – एक म्हणजे तत्त्वचिंतनाला कोणताचा विषय वर्ज्य नसल्याने पर्यावरणाचाही विचार त्यात येऊ शकतो.''[७६] त्यामुळे पर्यावरणावर विचार करण्यासाठी तत्वज्ञ पुढे सरसावले आहेत. कारण तत्वज्ञच मानवी जीवन कसे जगावे याची आजपर्यंत मांडणी करीत आले आहेत. त्यामुळे तत्वज्ञानालाही हा विषय वर्ज राहिलेला नाही. विज्ञान देखील पर्यावरणरक्षाणाच्या बाबतीत आज पुढे येत आहे. वेगवेगळ्या पध्दतींचा अवलंब करून पर्यावरण रक्षाणाची चर्चा केली जात आहे. तशी अंमलबजावणी करणे हा त्या चर्चेचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे या विषयावर मूळातून चर्चा होणे गरजेचे आहे. त्यामुळे पर्यावरणरक्षण या मूल्याचा विचार करताना पर्यावरण निती म्हणजे काय ''पर्यावरण नीती म्हणजे मानव आणि निसर्ग यांच असलेले सौदार्हपूर्ण वर्तणुकीचे नियम असे म्हणता येईल. हे नियम अर्थातच निसर्गाने केलेले नियम नव्हे तर मानवानेच केलेले नियम होय. पर्यावरण नीतीचे महत्त्वाचे घटक म्हणजे रॉबर्ट गुडीन म्हणतात तसे निसर्ग हा पर्याय विहीन आहे, म्हणजेच निसर्ग/पृथ्वी ही एकमेवाव्दितीय अशी आहे, तिची मानवाच्या भरणपोषणाची साधन संपत्ती अमर्याद नाही याची जाणीव ठेवणे, म्हणूनच भविष्यकालीन जीवसृष्टी व मानवी पिढ्या याची काळजी करणे होय.''[७७] निसर्गाचे असे खास नियम आहेत ह्या नियमांनी निसर्ग पुढे जात असतो. कित्येक वर्षे कोणाही हस्तक्षेपाशिवाय हे नियम पूढे जात आले आहेत. परंतु मानवाने त्याच्या भरणपोषण व सुखाच्या शोधात निसर्गाचे नियम मोडण्यास सुरूवात केली आहे. यामध्ये सर्वसामान्य मानवाचा हस्तक्षेप कमी आहे. कारखानदार, उद्योगपती, भांडवलदार, नफाखोरउत्पादक हे आपल्या फायद्यासाठी उत्पादनांची निर्मिती करतात. यामध्ये त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा हा मुख्य उद्देश डोळ्या समोर

असल्याने मानवी श्रम चोरणे तसेच सत्तेचा वापर करत नैसर्गिक साधन संपतींचा वापर करणे अशा प्रकारे स्वार्थी मार्गाचा अवलंब केला जातो. निसर्गातून जीतके घेतले त्यातील थोडे देखील निसर्गाच्या रक्षणासाठी केले जात नाही. जास्तीत जास्त नुकसान हे कारखानदारी व त्यातून निर्माण झालेल्या टाकावू पदार्थातून झालेले समोर आले आहे. नफा कमावरणारे भांडवलदार निसर्गाच्या रक्षणासाठी कोणताही प्रकारे मदत करताना दिसत नाहीत ही बाब देखील समोर आलेली आहे. आता आपण पर्यावरण नीतीची शक्यता कशी आहे ते पाहू, ''ही नीती सहजशक्य आहे. आता, हे खरे की, 'नीती' संकल्पना निसर्ग स्वतः कधी बनवित नाही. निसर्ग स्वयंसिध्द असला तरी तो नै–नैतिक असतो. तटस्थ असतो. नीतीची शक्यता मानवी अस्तित्वाशी निगडित असते. किंबहुना मानवी अस्तित्वाचे सातत्य हेच नैतिकतेच गमक असते. म्हणून नीती शक्य होते. कोणती कृती मी स्वायंत्त कर्ता म्हणून केली असतात ती उचित, योग्य व हितकारक ठरेल? हा नीतिशास्त्राचा मध्यवर्ती प्रश्न असतो. याच प्रश्नाचे रूपांतर 'स्वायत्त कर्ता म्हणून निसर्गाशी मी कसे हितकारक वागू शकेन? त्या वर्तनाचा आकृतीबंध कसा असेल?' या प्रश्नांमध्ये करता येते. त्यांच्या उत्तरामधून पर्यावरणीय नीतीची शक्यता व्यक्त होते.''[७८] निसर्गाशी हितकार वागणे. निसर्गाकडे जे काही ते अमर्यादित ओरबाडण्याची प्रवृत्ती याची जाणीव करून देणे व त्यावर बंधने आनणे. त्यासाठी केले जाणारे प्रबोधन, उद्‌बोधन, कृतिचा मार्ग अवलंबने हे आले. कृतीशी संबंधीत अशी पर्यावरणाची नीती शक्य आहे. शेवटी नीती चा मार्ग हा अंमलबजावणीतून जातो हे विसरता कामा नये. पर्यावरण रक्षाणाच्या मूल्याचा विचार करता अंमलबाजावणी ही यातील महत्त्वाचा घटक आहे. पर्यावरण संरक्षणाता महत्वाचा घटक असंघटित माणूस हे स्पष्ट करताना–प्रकाश सोमन हे लेखक म्हणतात, ''पर्यावरण संरक्षणात सर्वात महत्त्वाची भूमिका बजाऊ शकेल तो सामान्य माणूसच असे मला वाटते. तो एकेक, असंघटित असल्यामुळे दुबळा आहे असे वाटते. पण त्याचे योग्य प्रकारे प्रबोधन केल्यास तोच एक समर्थ शक्ती म्हणून उभा राहू शकेल. एक म्हणजे तो उपभोक्ता आहे. शेवटी सर्व उद्योग त्याच्यासाठी चालतात. कोणत्या व किती वस्तूंचा उपभोग घ्यायचा याविषयी तो जागरूक झाल्यास अनिष्ट उत्पादने व उत्पादनपध्दती यांना आपोआपच आळा बसू शकतो. असे होऊ नये म्हणूनच प्रचलित व्यवस्थेत भडक व प्रभावी जाहिरातींनी त्याचा बुध्दिभ्रंश करण्याचे कार्य जोमाने चालू असते.

दुसरे म्हणजे उपभोक्ता म्हणून वस्तुंचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेतून तो अप्रत्यक्षपणे प्रदूषणाला हातभारच लावत असतो. या ठिकाणीही 'मी कोणत्या वस्तू वापराव्यात' याविषयी प्रत्येकाने विवेकाने घेतलेला व स्वेच्छेने अमलात आणलेला निर्णय फार मोलाचा ठरेल.''[७९] पुढील विचार हा पचणी पडणारा असला तरी देखील कृतीच्या मार्गातील अघड उपाय आहे. कारण उत्पादक हा आपल्या ग्राहकांना बाजारपेठेत पहिल्यांदा चटक लावतो. परत त्या उत्पादनाची सवय झाली की, त्यावर त्याचे षडयंत्र काम करू लागते व तो ग्राहकाला आपल्या उत्पादनाचे व्यसन लावून आपल्या जाळ्यात ओढत आसतो. हे कोणत्या आर्थिक व्यवस्थेत हे काम चालू आहे यावर पर्यावरणाच्या रक्षणाचा मार्ग दिसतो. पर्यावरणाविषयी ॲरिस्टॉटलची मध्यमार्गी निती काय म्हणते ते पाहू, ''ख्यातकीर्ती ग्रीक तत्त्वज्ञानी ॲरिस्टॉटटल यांच्या मते, समान गोष्टींना समानतेची वागणूक देण्यात 'न्याय' असतो. समान गोष्टींना असमानतेची वागणूक देण्यात 'अन्याय' असतो. तसेच, असमान गोष्टींना समानतेची वागणूक देण्यात 'अन्याय' असतो. म्हणजेच न्यायाच्या तत्त्वाशी समानतेचे तत्त्व संलग्न असते. म्हणजेच, निसर्ग–मानव–संबंधात जी नियमानुसारी 'न्याय' प्रवण देवाण घेवाण अभिप्रेत असते तिच्यात निसर्गाला (पशू, पक्षी, वृक्ष, वल्ली इत्यादींना) निव्वळ जघन्य स्थान देणे उचित नव्हे. सद्यःकालीन पर्यावणवाद्यांचे म्हणणे असेच आहे.''[८०] ॲरिस्टॉटल या तत्वज्ञाने मांडलेल मत पर्यावरणरक्षणाच्या नीती विचारासाठी अत्यंत आवश्यक आहे. निसर्गातील मानव, पशू, पक्षी, वृक्ष, वल्ली ही समान देन असेल तर त्यांना समान न्याय करावा लागेल. अर्थात निसर्गात असणारी प्रत्येक बाब ही समान आहे. त्यांना समान वागणूक देऊन पर्यावरणाचे रक्षण करता येऊ शकते हा सोपा न्याय आहे. मानवी जागात असे होते का हा मोठा प्रश्न आहे. माणसा माणसात असमानता आणुन पर्यावरणाचेरक्षण करणे अवघड आहे. पर्यावरणाच्या रक्षासाठी मानवी समान न्यायाची अंमलबजावणी करावी लागेल. आर्थिक, सामाजिक दृष्ट्या असमता पर्यावरणाच्या रक्षणात समानतेची वागणूक देण्यास पुरेशी नाही अशी या वरील विचारांची व्यापकता आपणास पाहता येऊ शकते. मानवी प्रत्येक कृती हि निसर्गापासीच जाऊन थांबते या बाबत कार्ल मार्क्स विचार पुढील आहेत, ''मार्क्सने निसर्गाला मानवाचे 'निरिन्द्रिय शरीर' (Inorganic body) असे संबोधिले आहे. मानवाला निसर्गापासून वेगळे करता येतच नाही. मानव हे निसर्गाचे अपत्य आहे, तर निसर्ग हा मानवाचा विस्तार आहे– या निसर्गावर

मानवाचे संस्कार होत असतात, आणि त्या संस्कारांचे मानवाच्या मनावर संस्कार होत असतात. निसर्गाचे परिवर्तन होताहोताच मानवाचे परिवर्तन होत असते. म्हणून मानवाची कृती (praxis), मानवाची कोणतीही कृती, अखेरीस निसर्गालाच भिडते–त्याची कृती मानवी जीवनाची नस बनते.''[८१] निसर्गातील शिकवण ही मानवी शिकवण बनल्यास मानवास त्याचा फायदाच आहे. कारण निसर्गाचाच एक भाग हा मानूस आहे. ॲरिस्टॉटलने मांडलेली समानास समान असा न्याय ही बाब लक्षात घेतल्यास मार्क्सचा विचार आनखी स्पष्ट होतो. मानवी प्रत्येक बाब ही निसर्गाशी संबंधीत असेल तर मानवाचा प्रत्येक विचार हा पर्यावरणाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. भारतीय भौतिकवादी तत्वज्ञ सांख्य मौलिक शिकवण ही पर्यावरणाच्या रक्षणाचे धडे देणारी आहे. ''विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, सांख्यमताप्रमाणे प्रकृतीची साम्यावस्था ढासळण्यात पुरूषच कारणीभूत आहे. तो निसर्गात ढवळाढवळ करतो. त्यामुळे वैषम्यावस्था निर्माण होते. मनुष्याची बुध्दी आणि अहंकार हेच दोषाला कारणीभूत होतात. ह्यावरून हेच सिध्द होते की, भारतीय दार्शनिकांनी त्यांच्या कुवतीप्रमाणे हे मूलभूत पर्यावणदूषणाचे रहस्य उलगडून दाखविले आहे.''[८२] अर्थात पर्यावरणात कसलीही ढवळा ढवळ करायची नाही याचा अर्थ मानवाच्या विकासात बाधा आणणे नव्हे तर निसर्गाला सुसंगत असा विचार व कृती स्विकारून पुढे जाने होय. यासाठी थोडा त्रास सहन करण्याची गरज मानवाला आहे. परंतु मानवासकट सर्व जीवसृष्टीस हे उपयोगी आहे. मानवाचा हस्तक्षेपाशिवाय निसर्गात कोणीही इतर जीव निसर्गाच्या चक्रात बाधा येत नाही. त्यामुळे निसर्गाच्या लोपाचे कारण हा माणूस आहे हे संख्यांचे म्हणणे योग्य आहे. एक प्रकारे हे सुचित करून निसर्गाशी मानवाने दोस्ती करणे आवश्यक असल्याचेच सांख्यांना सांगावयाचे आहे. पर्यावरण रक्षणाचा विचार करताना प्रदुषणाचा विचार करावा लागेल. परंतु काही दशकापूर्वी प्रदुषणाची संज्ञा देखील अस्तित्वात नव्हती. ''१९६० च्या दशकात जीवशास्त्रज्ञ राशेल कार्सन याच्या 'सायलेंट स्प्रिंग' ग्रंथाने पर्यावरणाच्या नाशाकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. त्याआधी २० वर्षांपूर्वी म्हणजे १९३९ साली पॉल म्युलर ह्या रसायनशास्त्रज्ञांनी स्विल्झर्लंडमध्ये डी.डी.टी. ची (डायक्लोरी डायफिनइनल ट्रायक्लोरोइथेन) भुकटी तयार केली. दुसऱ्या महायुध्दात डास, जळवांच्या उच्चाटनासाठी डी.डी.टी. वापरल्याने हिवताव इतर संसगेजन्य रोग रेाखले गेले. हे लक्षात येताच डी.डी.टी. चा पिकावरील कीड नष्ट करण्यासाठी वापर सुरू झाला. अनेक

प्रकारच्या किडीला नाहीसे करण्यासाठी डी.डी.टी. उपयोग ठरली. त्यामुळेच १९४८ साली पॉल म्युलर यांना रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार बहाल करण्यात आला. त्यापाठोपाठ रयायनशास्त्रज्ञ कृत्रिम कीटकनाशके तयार करण्यासाठी प्रयत्न करू लागले. डाइमफ ॅक्स, टेट्राईथाईल फ ॅस्फे ट ही संयुगे किडीवर फ वारल गेली. त्यानंतर मॅल्थिऑन, बी.एच.सी. (बेंझिन हेक्झॅ कलोराईड), आली. तोपर्यंत प्रदूषण ही संज्ञाच अस्तिवात नव्हती.

कीटकनाशकातील रसायनांमुळे कीड मरते. परंतु ते विष पक्ष्यांना घातक आहे, याची जाणीव जगाला सर्वप्रथम राशेल कर्सनबाईंनी करून दिली. कीटकनाशकांची बलर्सने हेच त्यांचे दुर्गुण ठरू लागले. डी.डी.टी. फ वारल्यानंतर त्याचे विघटन होत नाही. धान्यावाटे क्लोरिनचे अंश आढळल्यावर डी.डी.टी. वर जगभर बंदी आली. नोबेल पुरस्काराने सन्मानित होण्यापासून ते समूळ उच्चाटन होण्यापर्यंतची डी.डी.टी. ची ही वाटचाल जगाच्या बदललेल्या दृष्टीची साक्ष आहे.''[८३] मानवाने आपल्या प्रगती साठी व एकूण सुखाचा मार्ग शोधताना उचलेली पावले, व त्याअनुषंगाने शोधलेली संशोधने देखील त्रासदायक ठरली आहेत असे दिसते. पर्यावरणाचे नुकसान होत असताना मानवाच्या नुकसानास सुरूवात अटळ आहे. याचीच प्रचीती डी.टी.टी. च्या बाबतीत येते. डी.टी.टी. चा वापर हा एक प्रकारचा अतिरेक ठरला. काही आजार हे विषाणुमुळे पसरतात, काही आजार हे किटाणूमूळे पसरतात. त्यामुळे त्यांवर नियंत्रण मिळवण्याच्या हेतून केलेल्या उपाययोजनांना हे विषाणू व किटाणू काही काळानंतर पचवण्यास सुरूवात करीत असल्याचे दिसले आहे. यातून विषाणू व किटक अधिक ताकवाद झाल्याचे दिसले आहे. त्यामुळे एक प्रकारे निसर्ग विरूध्द माणूस असे चित्र दिसत असले तरी ते गुंतागुंतीचे असे आहे. यातील तिढा काढत असताना लोकसंख्यावाढीवर देखील लक्ष देणे आवश्यक आहे. भारतामध्ये पर्यावरणरक्षण चळवळीची सुरूवात सायलेंट व्हॅली पासून झाली आहे. ''भारतामध्ये १९७० च्या दशकात केरळमधील 'सायलेंट व्हॅली' आंदोलनाने पर्यावरण चळवळीचा आरंभ झाला. केरळच्या नीलगिरी रांगांमध्ये नव्वद चौरस किलोमिटर पसरलेले 'सायलेंट व्हॅली'चे सदाहरित, घनदाट जंगल धोक्यात आले होते. जीवसृष्टीचा अनमोल ठेवा कैक वर्षांपासून जपणाऱ्या या जंगालात वनस्पती व प्राण्यांच्या कित्येक दुर्मिळ जाती आजही सुखाने नांदत आहेत. तापमान कधीही वीस अंश सेल्सिअसपेक्षा वर जात नाही. दरवर्षी सरासरी पाऊ स तीन हजार मिलीमीटर होतो. १९२४

साली ब्रिटिशांनी तिथे जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु जंगलात जाणेच अवघड असल्यामुळे पुढे हालचाल झाली नाही. जंगलात येऊन सर्वेक्षण करायला १९५० साल उजाडावे लागले. १९७३ साली दोनशे चाळीस मेगॅवॅट वीज तयार करण्यासाठी पंचवीस कोटींचा 'सायलेंट व्हॅली' प्रकल्प केंद्राने मंजूर केला. 'सायलेंट व्हॅली'मधील जैविक समृध्दीची सरकारी संस्थांना अजिबात कल्पना नव्हती. परंतु जंगलभृमण करणारे वनस्पतीशास्त्रज्ञ व जीवशास्त्राचे अभ्यासक वीज प्रकल्पामुळे होऊ घातलेल्या निसर्गाच्या विनाशामुळे हादरले. ते उत्स्फुर्तपणे 'सायलेंट व्हॅली' वाचवण्याच्या प्रयत्नाला लागले. केरळ साहित्यशास्त्र परिषदेने पर्यावरण ब्रिगेड तयार केली. एम.के. प्रसाद, चंद्रन नायर, एम.पी. परमेश्वर चळवळीच्या अग्रभागी होते. त्यांनी केरळ व तामिळनाडूमधील सर्व वैज्ञानिक संस्थांना ही माहिती दिली. केरळ साहित्य-शास्त्र परिषदेची पत्रके वाचून साहित्यिकही चिंतेने ग्रासले. वैज्ञानिकांच्या साथीला साहित्यिक आले. कवी, लेखक, कादंबरीकार निसर्ग वाचवायला सरसावले. वायकोम मोहम्मद बशीर, ओ.एन.व्ही. कुरूप, एम.व्ही. कृष्णा वॉरियर हे 'सायलेंट व्हॅली'च्या संरक्षण मोहिमेत सामील झाले. माध्यामांनी प्रसिध्दी दिली. देशातील निसर्गप्रेमींनी पाठिंबा दिला. डॉ. सलीम अली. डॉ. माधव गाडगीळ, एम.ए. पार्थसारथी आदींनी देशभरातील निसर्गमित्रांना साथ देण्याचे अवाहन केले. निसर्ग संरक्षकांचे जाळे देशभर निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय संघटनांनी भारत सरकारला 'सायलेंट व्हॅली'तील जलविद्युत प्रकल्प रोखण्याची विनंती केली. केंद्र सरकारने डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांना 'सायलेंट व्हॅली' ला भेट देऊन प्रत्यक्ष स्थितीचा अहवाल सादर करायला सांगितले. स्वामीनाथनांनी 'सायलेंट व्हॅली' जपण्यासाठी वीज प्रकल्प रद्द करण्याची सूचना केली. इंदिरा गांधी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ एम.जी.के.मेनन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून सविस्तर अहवाल मागितला. डॉ.मेनन यांनीदेखील स्वामीनाथनांप्रमाणेच मत व्यक्त केले. त्यानंतर मोरारजी देसाई, चरणसिंग सरकार येऊन गेले. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्यावर त्यांनी १९८३ साली मेनन समितीच्या अहवालाचा निष्कर्ष स्विकारून वीज प्रेकल्प रद्द केला. त्यानंतर १८८५ साली राजीव गांधींनी 'सायलेंट व्हॅली'ला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित केले. भारतातील पहिल्या पर्यावरणचळवळीच्या लढ्याला ऐतिहासिक यश मिळाले.''[८४] पर्यावरणरक्षणाची खास अशी चळवळ उभा राहण्यापेक्षा वेगवेगळ्या ठिकाणी होत गेलेले उठाव पर्यावरण रक्षणाच्या

चळवळीची बांधणी भारतात करीत गेल्याचे दिसते. सरकारवर पर्यावरण रक्षणासाठी दबाव आणण्यासाठी लोकशाही मागाने जाण्याने काय साध्य होऊ शकते हे वरील सायलेन्ट व्हॅली चळवळीवरून दिसू शकते. पर्यावरण रक्षणाबाबत सरकारणे काही एक भूमिका घ्यावी असा विचार समोर येणे गरजेचे आहे. कारण जंगल रक्षण, जमिनीवर सामाजिक वनीकरण करून वन्य जिवांचे रक्षण करून अन्न साखळीला जिवंत ठेवण्याचे मोठे कार्य हे सरकारी पातळीवर नियोजन बध्द केले जाऊ शकते. त्यासाठी लोकसहभागाची गरज आहे, ती सरकारला सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमातून करता येऊ शकते. याच पध्दतीचा विचार हा वेगळ्या पध्दतीने केल्यास असे लक्षात येते की, मोठे कारखानदार हे निसर्गास बाधा आणणारे असतील तर त्यांना चाप बसवण्याचे काम सरकारी पातळीवरच होऊ शकते. पर्यावरण रक्षासाठी झालेल्या वेगवेगळ्या अंदोलनात चिपको अंदोलन हे देखील भारतभर गाजलेले अंदोलन ठरले. पर्यावरण रक्षणासाठीची ही प्रत्यक्ष अटीतटीची लढाई मानावयास हवी. भारतामध्ये पर्यावरणरक्षण चिपको अंदोलन कसे झाले हे पुढील संदर्भावरून लक्षात येईल. ''१९६४ साली चमोली जिल्ह्यातील गोपेश्वरमध्ये गांधीवादी कार्यकर्ते चंडिप्रसाद भट यांनी 'दशौली ग्राम स्वराज्य मंडळा'ची स्थापना केली होती. हे मंडळ गावाला स्वावलंबी करण्यासाठी ग्रामोद्योग व शिक्षण असे कार्यक्रम राबवत होते. मध्य हिमालयातील अलकनंदेस मिळणाऱ्या मंदाकिनी, पिंडारी, नंदाकिनी, धौलिगंगा या उपनद्यांच्या उगमाचे टोक म्हणजे चिमोली जिल्हा. बर्फाने माखलेली शिखरे, भूर्जपत्र, अक्रोड, देवदार, अंगू, ओक, शिसव, पांगर अशा वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतींनी नटलेल्या जंगलातून या नद्या निघतात. जळण, झोपडी, शेतीची अवजारे, उदरनिर्वाह असे सर्व काही पुरवनारे श्रीमंत जंगल इथे आहे. साहजिकच सगळे पर्वतीय रहिवासी त्या जंगलावर अवलंबून असतात. जिवंत वृक्षांना धारदार करवत लावून, गाड्या भरतभरत शहर दाखवणारे कंत्राटदारी डोळे इकडे वळलेच. राजकीय लागेबांधे व त्यामुळे मिळणाऱ्या शासकीय अनुमतीने त्यांना सरकारी परवाने मिळतात, शेकडो वर्षांची अजस्त्र झाडं क्षणार्धात धरणीवर पडायला लागली. त्यांचे छिन्नविच्छिन्न अवशेष ट्रकमधून जाऊ लागले. मौल्यवान जंगल झपाट्याने नष्ट होऊ लागले. नद्यांच्या जवळील वृक्षराजी पाण्याच्या प्रवाहाला अटकाव करीत असते. त्यामुळे पुरापासून रक्षण होते. हे वृक्ष नाहीसे झाल्याने पाण्याला शोषणारी ववनस्पतींची मुळव्यवस्था नष्ट झाली. पाण्यासोबत माती वाहून जाण्याचे प्रमाण

वाढले. गावांमध्ये नद्यांचे पाणी सैरावैरा घुसू लागले. कधीही पाहिला नव्हता असा पूर १९७० साली या भागाला सहन करावा लागला. पर्वत उघडे पडल्याने दरडी कोसळण्याच्या संख्येत वाढ झाली...पर्वत उघडे झाल्याने यापुढे वाढत जाणारा अनर्थ चंडिप्रसादांनी वेळीच ओळखला. त्यांनी रीतसर तालुका, जिल्हा व राज्य प्रशासनाकडे वेळोवेळी अर्ज–विनंतत्या केल्या. जंगलतोडीमुळे होऊ घातलेल्या भयवह परिणाम झाला नाही. वनस्पती नष्ट होण्यानेच पूर येत आहेत, दरडी कोसळताहेत, रहिवाशांचे जगणे असह्य होतेय, हे दशौली ग्राम स्वराज्य मंडळाने गावोगाव हिंडून सांगायला सुरूवात केली. महिलाही त्यामध्ये सहभागी झाल्या. महिलांचे मंगल दल उभे राहिले. त्या आपल्या भाषेत एकमेकींना सांगू लागल्या. रोजच्या जागण्याचा एक भाग असणाऱ्या वनस्पती व प्राण्यांचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नव्हती. वृक्षतोड थांबवणे हे सगळ्यांना महत्त्वाचे कर्तव्य वाटू लागलं. ग्रामस्थ आता वृक्ष तोडताना विरोध करू लागले.

...त्या दिवशी रेणी गावातील बहुतेक पुरूष मंडळी खरेदीसाठी बाजाराच्या गावाला गेली होती. एकाएकी झाडे तोडण्याचा आवाज जंगलभर घुमू लागला, तशा महिला एके ठिकाणी जमल्या. कुऱ्हाडींना अडवणार कोण? 'झाडं कापल्यावर बोलून काही उपयोग नाही जंगल ही तर माता आहे. तिला संपवणाऱ्यांना रोखलंच पाहिजे.' महिला मंगल दलाच्या गोरादेवी, कलावतीदेवी, सावित्रीदेवी बोलत होत्या. त्यांनी घराघरात जाऊ न दोनशे महिलांना गोळा केले. त्या सगळ्या मिळून जंगलात घुसल्या. जंगलामध्ये कुऱ्हाडी, करवती निर्धोकपणे चालूच होत्या. काहीही न बोलात महिला मंगल दल करवती चालणाऱ्या झाडांपर्यंत पोहचले. तोडणाऱ्यांनी त्या बायकांची दखलही घेतली नाही. बुंधे, फांद्यांची तोड चालूच ठेवली. आणि पुढच्याच क्षणी प्रत्येक क्षणी प्रत्येक महिला एकेका वृक्षाला मिठी मारू लागली. 'माँ का घर उजडने नही देगे' घोषणा दुमदुमली. पाहता पाहता साऱ्या महिला वृक्षांच्या बुंध्याला बिलगलेल्या दिसू लागल्या. कुऱ्हाड धरलेले हात हवेत वरचेवर थबकले. कुऱ्हाडी, करवती गळून पडल्या. वृक्षांची तोड करणारे आवाक झाले. आजवर असा प्रकार कधीच घडला नव्हता काही काळ थांबून राहिले. महिला हटायला तयार नव्हत्या. झाडे तोडणाऱ्या पुरूषांची महिला मंगल दलावर हात उगारण्याची हिंमतही होत नव्हती. परत फिरवण्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. गावातील जागरूक महिलांनी जंगलाच्या ठेकेदारांना हाकलले, ही खबर एक पुरूषाने बाजारात पोचवली. चिपको अंदालनाची ही ठिणगी होती ...कुऱ्हाडीचा आवाज येताच

वाद्ये वाजवून गावकरी एकमेकांना व बाजूच्या गावांना गोळा करू लागले. आबालवृध्द झाडांना मिठी मारून जंगलतोड रोखू लागले, वाढत्या प्रतिसादामुळे 'चिपको' हे भारतातील ऐतिहासिक जनआंदोलन ठरले. पत्रकारांनी या लढ्याला जोरदार प्रसिध्दी दिली. निसर्गाशिवाय गरिबांजवळ गमावण्यासारखे दुसरे असते तरी काय? एकदा ती मालमत्ता हडपली गेली की दारिद्र्यातून सुटका होत नाही. निसर्ग नष्ट होणे म्हणजे भीषण दुष्टचक्राचा प्रवास याची जाणीव झाल्यामुळे साध्या माणसांनी चिपकोचे यशस्वी अंदोलन केले.''[८५] सर्वसामान्यांना पर्यावरण रक्षणाचे महत्व कळल्यानंतर काय होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे चिपको अंदोलन. यासाठी लोकशाहीने दिलेल्या मार्यदित उपायांचा उपयोग करत केले गेलेले चिकाटी, नियोजन व संवेदनाशीलता याच्या मिश्रणातून निर्माण झालेले हे अंदोलन यशस्वी न झाले तरच नवल. पैसेवाल्यांच्या विरोधातील, भांडवलदारांच्या विरोधातील साध्या सामान्य नागरिकांची ही चळवळ पैसा, सत्ता, शस्त्रे यांना नेस्तनाभूत करत पर्यावरण रक्षणासाठी जिवाची बाजी लावणारी ठरली आहे. त्यामुळे देशाभरात या अंदोलनाला प्रसिध्दी मिळत गेली. निसर्ग रक्षणाच्या उद्दिष्टाने प्रेरीत झालेल्या कित्येक व्यक्ती, संस्था, संघटना यांना हे चिपको अंदोलन प्रेरीत करीत राहणारे असे आहे. महाराष्ट्रात देखील पर्यावरण रक्षणाच्या चळवळी उभ्या राहिल्या आहेत. त्यात गाजलेली चळवळ ही नर्मदा बचावो अंदोलन हे होय. ''१९९७ सालचा पावसाळा. महाराष्ट्रातील नर्मदा नदीच्या काठावरील मणिबेली हे गाव कार्यकर्त्यांनी फुलून गेले होते. 'नर्मदा बचाओ आंदोलना'च्या 'डुबेंगे पर नाही हटेंगे' ह्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. 'सरदार सरोवर धरण प्रकल्पा' मध्ये मणिबेली हे गाव पाण्याखाली जाणार होते. हा प्रसंग रोखण्यासाठी नर्मदा बचाओ आंदोलनाचे कोर्यकर्ते तेथे तळ ठोकून होते. मणिबेली गावातील शेतकऱ्यांच्या अस्तित्वाच्या हक्काचाच हा लढा होता. पिढ्यान्पिढ्यांनी आयुष्य काढलं ते गाव क्षणार्धात जलसमाधी घेणार होते. कुठे जायचे, कसे जगायचे, हे अक्राळविक्राळ प्रश्न समोर होते. कुठे स्थलांतर ही मरण यातना देणारी कल्पनाच प्रत्यक्षात उतरणार होती. भारताच्या इतिहासात धरण, कारखाने अशा अनेक विकास (?) कामांसाठी सामान्य जनतेचे स्थलांतर ही नेहमीचीच बाब आहे. परंतु स्थळ बदलल्यावर पुनर्वसनाकडे डूंकून पाहायचं नाही, हा अनुभव स्वातंत्र्यापासून गरिब जनता घेत आली आहे. केवळ जागेचा तुकडा देणे म्हणजे पुर्नवसन नव्हे! घर, शेती, इतर सुविधा देऊ अशी आदर्श पुनर्वसनाची स्वप्ने

दाखवायची. प्रत्यक्ष स्थलांतर झाले की यथेच्छ शासकीय उपेक्षा! हाच अनुभव असंख्य पुनर्वसितांनी पुनःपुन्हा घेतला होता. त्यामुळे मणिबेलावासीयांचा स्थलांतराला ठाम नकार होता. पाणी सोड्याचे आदेश दिले की कार्यकर्ते व शेतकरी आपसूक निघून जातील असा सरकारचा अंदाज होता. पण भविष्यात अंधकार दाटून आलेला दिसत असल्यामुळे गाव रिकामे करण्याचा सरकारचा हुकूम न जुमानता शेतकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी सत्याग्रह सुरू कला. तो पुढे अनेक दिवस चालू राहिला. खरोखरीच मणिबेली हटत नव्हती. कोंडी फुटत नव्हती. अखेर शासनाने नेहमीप्रमाणे दंडुका हातात घेतला. मोठ्या संख्येने पोलीस आणले. लोकशाहीमधील दडपशाहीने सत्याग्रहींना घालवण्यात आले. या चळवळीने पर्यावरण चळवळ ही भारतीय राजकारणाच्या विषयपत्रिकेवर आली. पर्यावरणाचा नाश न करता कमी खर्चात पाण्याचा प्रश्न कसा सोडवता येईल? याचा विचार चालू झाला. मोठ्या धरणांमुळे होणाऱ्या पर्यावरण विनाशाकडे जागचे लक्ष वेधले. सिंचनाकरता, वीजनिर्मितीसाठी धरण बांधून होते पण धरणक्षेत्रातील पाण्यामधे ज्या लोकांची गावे, घरे, शेती समाधी घेतात त्या लोकांनी पूर्ण हयात विस्थापित म्हणून जाते. आंदोलनाच्या पाठपुराव्यामुळेच न्यायालयाने पुनर्वसनाच्या समस्यांची दखल घेतली. जागतिक बैंकेने धरणाचे अर्थसाहाय्य थांबवले.''[८६] मानवी विकास करीत असताना मानवाला उध्दवस्त करीत केला गेलेला विकास हा कुचकामी ठरत असतो. असेच काहीसे नर्मदा बचावो अंदोलनादरम्यान झाल्याचे दिसते. धरण बांधून जो विकास साधला जातो त्यात जमीनदार, भांडवलदार, उद्योगपती यांचा विकास होत असतो त्यातून देशाचा विकास साधता येऊ शकतो, उत्पादन वाढून देशविकास होऊ शकतो असा तो विचार आहे. परंतु त्यात होणारी आहूती ही सर्वसामान्य नागरिक, गरीब, कष्टकरी वर्गाची असते. या आहूतीमध्ये कित्येकांची संसार उदवस्थ झालेले दिसले आहेत. कोणत्याही विकास कामात मानवाला लक्ष केंद्रीत करून केला तरच तो खरा विकास होय. देशात कित्येक ठिकाणी जी धरणे बांधली गेली आहेत त्यात सर्वसमान्य कष्टकरी वर्गाचे पूर्नवसन नीट झालेले नाही. कित्येक पिढ्या जपलेली शेती, घरे ही धरणाच्या पाण्यात गेल्याचे दिसले आहे. हे एक प्रकारचे मानवाने मानवापुढे उभे केलेले संकट होते. या संकटावर मात करण्यासाठी पर्यावरण रक्षणावादी कार्यकर्ते पुढे सरसावले व त्यांनी अशी अंदोलने उभी केली. ''पर्यावरण हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास हा त्या भागातील लोकांचे आयुष्य

धोक्यात आणतो. याचे भान पर्यावरण चळवळींनी आणले.''[८७] पर्यावरण रक्षण या मूल्याचा विकास कसा होत गेला? याचे आपण काही टप्पे पाहिले. या टप्प्यांवर चळवळी या महत्वाच्या भुमीका बजावताना दिसल्या आहेत. एक मानूस हा पर्यावरण रक्षणाचे काम करू शकत नाही तर त्याचे रूपांत चळवळीत झाले तर नक्कीच फ ायदा होऊ शकतो. पर्यावरण रक्षण व आधुनिक औद्योगीक जीवनपध्दतीचा परिणाम या बाबत पुढील संदर्भ पाहावा लागेल, ''इसवी सनाच्या सतराच्या शतकापासून पाश्यात्य देशांत विज्ञाननिष्ठेने मानवाच्या विचारसरणी हळूहळू आपले स्थान आधिका अधिक बळकट केले आणि धर्मांधतेला अधिकाधिक बाजूला सारले.

औद्योगिक क्रांतीमुळे अठराव्या आणि ऐकोणीसाव्या शतकात, बलवत्तर झालेल्या पाश्यात्य राष्ट्रांनी पृथ्वीतलावरील अन्य भुप्रदेशांवर आपले राजकीय प्रभुत्व प्रस्थापित केले. ऐतदेशीयांनी आपापली शिस्तबध्द सैन्ये उभारली आणि त्याचा सैनिकी पेशातील शिस्त त्यांनी गिरण्या–कारखान्यातील काम, या दाहोमधला भेद त्यांनी दुर्लक्षिला. त्यात माणसांचे आतोनात हाल झाले.

निव्वळ आर्थिक फ ायद्याकडे डोळे लावून बसलेल्या कारखानदार–मालकांच्या मनमानी विरूध्द ही माणसे बंड करून उठली. जागोजाग 'वर्गयुध्य' उद्‌भवली.

यंत्रयुगीन मानवाच्या जीवनात यांत्रिकता बळावली. उत्पादन–प्रक्रियेत व्यक्तिगत कौशल्यास वाव राहिला नाही. दैनंदिन कामात आपुलकीची भावना नष्ट झाली. वेतनप्रियता वाढली. वेड्यावाकड्या वाढलेल्या बकाली शहरांतल्या गलिच्छ वातावरणामुळे जीवनरहाटीत उद्विग्नता वाढली. व्यक्तीच्या वागणुकीत औपचारिकता, नीरसता, कंटाळवाणेपणा, कडवटपणा वाढीस लागला. माणसामाणसांमधील स्नेहसंबंधांची जवळीक कमी होत गेली.

कुंटुंबसंस्था, शिक्षणसंस्था आदी सामाजिक संस्थांमध्ये कामकाज औपचारिकरीत्या होऊ लागले. परंपरागत जीवनोपकारक 'मूल्ये' ढासळली. जीवनांतली अर्थपूर्णताच नष्ट झाली.

आजच्या मानवाची ही एकाकीपणाकडे झुकलेली उद्विग्न, त्रस्त, भ्रान्त स्थिती त्याला पर्यावरणीय संकटास तोंड द्यावयस कितपत प्रेरणादायी ठरेल? हा प्रश्न नक्क्कीच चिंतनीय आहे.

पृथ्वीतलावरले पर्यावरण म्हणजे निव्वळ अचेतन, जड द्रव्यांचा पसारा नव्हे. तेथे लहान, मोठ्या, सूक्ष्म, सूक्ष्मतर जीवजीवाणूंचे अविरत जीवननाट्य चालू असते. त्यांच्या जीवननाट्यावर मानवाच्या प्रचंड विष–वमनकारी औद्योगिक घडामोडींमुळे तसेच स्वार्थान्ध चैनबाजीमुळे विपरित परिणाम घडत आहे.

त्यांच्यामुळे पर्यावरणातील घटकांचे परपस्परांशी असलेले संतुलन–रक्षक संबंध बिघडत आहेत. निसर्गातल्या परस्परावलंबी प्रक्रियांत बेहद्द ढवळाढवळ होत आहे. सर्वत्र वाढत्या प्रमाणात 'प्रदुषण'ची लागण परस्पर आहे.

मुंग्या, मधमाश्या आदी कीटकांमधली सामाजिक ऐक्यभावना आणि समष्टीखातर व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याची तत्परता विस्मयजनकच आहे. पण हे सारे निसर्गदत्त, पिंडगत यंत्रणेन यंत्रवत घडून येते. तेथे व्यक्तीगत बुध्दीचा यत्किंचितही वापर होत नसतो.

पण मानवाची पिंडरचना या कीटकांच्या पिंडरचनेहून निश्चतच भिन्न आहे. मानवाला बऱ्यावाईट विवेक करता येता; अनिष्ट गोष्टींचा त्याग करून इष्ट गोष्टींची निवड करता येते. हे निवडीचे स्वातंत्र्य, हे नैतिकतेचे बख, त्यास सद्यःकालीन पर्यावरणसंकटात कितपत साह्य करील, यावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे, यात शंका नाही.''[८] आधुनिक जीवनप्रणाली ही देखील कशाप्रकारे निसर्गाच्या उदवस्थीकरणाकडे घेवून गेली याची माहिती देणारा वरील उतारा आहे. आधुनिक जीवनप्रणाली पुढे जात असताना वर्ग निर्माण होतात. कारखानदार, भांडवलदारी वर्ग हा आपल्या अधिकच्या नफ्याच्या खातर निसर्गाची हानी करून टाकतो. याचा परिणाम आपल्या संपूर्ण जिवनमानावर होताना दिसतो. मानवाच्या आधुनिक जिवनप्रणालीचा परिणाम स्वरूप पर्यावरण रक्षण हे मूल्य नव्हे तर इतर ही मानवी मूल्ये यात ऱ्हास पावत गेली आहेत. आधुनीक जीवनप्रणालीत असणाऱ्या आर्थिक रचनेचा पर्यावरणरक्षण या मूल्यावरही परिणाम होत असतो. भांडवली जग हे नफ्यावर आधारीत असते. ते नफ्यासाठी उत्पादनाची निर्मिती करते. यात प्रदुषण वाढले तरी भांडवलदारांना त्याची पर्वा नसते. ''आधुनिक

विज्ञानात या विश्वाचे सखोल, नियमबध्द, कार्यकारणात्मक ज्ञान शक्य झाले. मुख्यतः पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांमधील ज्ञानाने माणसाची निसर्गात गुणात्मक परिवर्तन करण्याची क्षमता वाढली. अमर खय्यामचे

To grasp this sorry Scheme of Things entire,

……shatter it to bits-and then

Re-mould it nearer to the Heart's Desire.

हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार असेच जणू माणसाला वाटू लागले. सेंद्रिय रयायनशास्त्राने तर कृत्रिम, अभुतपूर्व पदार्थ निर्माण करण्याच्या किल्लीने प्रतिसृष्टी निर्माण करण्याचे दालनच उघडले. खनिज तेल सापडल्यावर असे पदार्थ निर्माण करायला आवश्यक कच्चा माल स्वस्तात व भरपूर उपलब्ध झाला आणि मग या प्रतिसृष्टीला सीमाच नाही असे भासू लागले.

अर्थात वैज्ञानिक ज्ञान हे केवळ ज्ञान व राहता त्याचा सर्वांच्या जीवनात उपयोग व्हावा अशी खटपट सुरू झाली. इथे आधुनिक तंत्रज्ञानाचा जन्म झाला. हे अत्यंत खर्चिक असल्यामुळे त्याच सुमारास जी राजकीय–सामाजिक स्थित्यंतरे घडत होती त्यात आधीच्या व्यवस्थेत प्रस्थापित असलेला वर्गच नवीन भांडवलदारांची ही गरज भागवायला पुढे आला. अर्थातच नवीन व्यवस्थेत नफ्याला सर्वोच्च प्राधान्य असणार हे उघड आहे.

म्हणजे जुन्या व्यवस्थेतील वैयक्तिक सुखकारक अस्तित्वासाठी परिवर्तन याऐवजी आत्ता नफ्यासाठी परिवर्तन असा बदल घडून आला. मग अधिक नफ्यासाठी मोठ्या प्रमाणावर उत्पादन हवे, ते खपायला मोठ्या प्रमाणावर उपभोग हवा, त्यासाठी गरजा वाढायला हव्यात, नसलेल्या निर्माण करायला हव्यात, या सर्व गोष्टी ओघानेच आल्या.

महत्वाचे म्हणजे ही नवी अर्थव्यवस्था केवळ स्वतःला टिकवणारी नाही तर वाढवणारी आहे...आपल्याकडे हवे तसे जग झटपट व स्वस्तात निर्माण करण्याच्या मागे लागून त्याचे अशा परिणामांकडे दुर्लक्ष झालेले आहे. कारण नव्या उत्पादक व्यवस्थेमुळे होणारे प्रदूषण गुणात्मक व परिमाणात्मक अशा दोन्ही प्रकारचे आहे. 'गुणात्मक' याचा अर्थ मानवाने नव्याने तयार

केलेले पदर्थ निसर्गचक्राशी समरस होऊन शकणारे (उदा. प्लॉस्टीक) किंवा घातकही आहेत. (उदा. सी.एफ .सी.) जे पदार्थ या दोहोतही येत नाहीत ते वाढती लोकसंख्या व प्रत्येक व्यक्तीच्या वाढत्या गरजा यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापरले जातात की ते पचवण्याची निसर्गाची क्षमताच नाही. मग प्रदुषण न झाले तर नवल! ''[८९] समाजाने कोणती अर्थव्यवस्था आपल्या राष्ट्रात स्विकारली आहे यावरही मूल्य जोपासणेचा मूद्दा उभा रहतो. स्वार्थी, आत्मकेंद्री, नफ्यासाठी उभा राहिलेली अर्थव्यवस्था ही इतर बाबींचा व चांगल्या वाईटा परिणाम पाहणे शक्य नाही. त्यामुळे भांडवली जग हे निसर्गाच्या रक्षणाची जबाबदारी ही सर्व सामान्यांच्या खांद्यावर देऊन मोकळी होते. परंतु त्यांनी त्यांच्या स्वार्थासाठी व नफ्यासाठी केलेले निसर्गाचे नुकसान हे त्यांच्या नफ्यातून भरूण काढले पाहिजे. एखाद्या कारख्याण्याचे पाणी जर नदीपात्रात सोडले जात असेल तर ते सोडले जाऊनये ते शुध्द करून अथवा त्यावर प्रक्रिया करून ते नदिपात्रात सोडावे लागले त्यासाठी लागणार खर्च हा कारखानदार अथवा त्या उत्पादकाकडून वसूल केला जावा. समाजाच्या पैशातून हे काम करणे म्हणजे नफा एकाला व त्याचा तोटा दुसऱ्याला असे होण्याची शक्यता आहे. काही वेळेस कट्टर पर्यावरणवादी विरोधी कट्टर विकासवादी असा संघर्ष पाहावयास मिळतो, यातील संमजसवादी विज्ञानवादी मार्ग घेवून पर्यावरणरक्षण शक्य आहे. '''निसर्गाला अंकित करा. निसर्गाला ताब्यात न ठेवल्यास माणूस प्रगती करू शकणार नाही' हे विकास करणाऱ्यांचे एक टोक होते. त्याला उत्तर म्हणून 'निसर्गात अजिबात ढवळाढवळ करू नका.' असे म्हणून पर्यावरणवाद्यांनी दुसरे टोक गाठले. या दाने ध्रुवांमध्ये राहून निसर्ग जपत विकास साधणे हे आपले कर्तव्य आहे. याबाबतीत कार्ल मार्क्स यांची सिध्दांत किंवा मंडण (थिसिस), प्रतिसिध्दान्त वा खंडन (अँटि थिसिस) आणि संश्लेषण (सिन्थेसिस) ही संकल्पना लावता येते. विकासाच्या एका टप्प्यावर पर्यावरणाची हानी होते, हे काही अंशी अटळ आहे. परंतु पुढील टप्प्यावर पर्यावरण जपणारा विकास साधता येणे शक्य आहे. विज्ञानाच्या प्रगतिमुळे उपलब्ध होणारे नवे तंत्रज्ञान ऊर्जा वाचवनारे, निसर्ग जपणारे, असू शकते. विज्ञान उत्क्रांत होत आहे. यावर विश्वास असेल आणि दृष्टी खुली असेल तर याची प्रचिती येते. पर्यावरण आणि विकास यांच्यामध्ये अव्दैत साधेल असा व्यापक विचारच पर्यावरणवादातील तिसरी लाट आणू शकेल. ती यावी अशी समाजमनाची इच्छा आहे.''[९०] पर्यावरणरक्षणाचा हटवाद करणे हे मानवास त्रासदायक ठरू शकते. परंतु

पर्यावरण रक्षणाची काहीएक बाजू ओढायची नाही असे होऊ शकत नाही. यातील समतोल भूमिका घेत मानवाच्या विकासाचा मार्ग दाखवता येतो. निसर्गाला निसर्गाच्या पध्दतीने वळवणे हे विज्ञानाचे काम आहे. त्यासाठी विज्ञानाने जास्तीत संशोधन पुढे आणणे आवशक आहे. ऊर्जा अक्षयतेचा नियम हा मानवाच्या उत्क्रांतिमधील महत्त्वाच्या नियमाचा शोध लागलेला आहे. परंतु हा नियम योग्य रितीने वापरून सूध्दा पर्यावरणाचे रक्षण करणे शक्य आहे. पर्यावरणरक्षणाचा विचार करणारे विकासाचे निकष कसे असावे याचा विचार मांडणारे श्रीनिवास हेमाडे म्हणतात, ''पर्यावरणाच्या विचार करणाऱ्या 'विकास' संकल्पनेची रचना करताना मूल्य म्हणजे काय? आणि किंमत म्हणजे काय? (Value and Price) यांचा एकत्रित विचार आवश्यक ठरतो. कारण सर्वांगिण सांस्कृतिक विकास हे तत्त्वज्ञानाचे कार्यक्षेत्र ठरते व त्याचा कार्यक्रम (प्रोजेक्ट) ठरतो. तर 'किंमत' निश्चती ही अर्थशास्त्राची चिंतनाची बाब बनते. 'मूल्य' या तात्त्विक संकल्पनेचा संदिग्धपणे वापर करून अर्थशास्त्रज्ञ 'मूल्य=किंमत' असे समिकरण मांडतो आणि आर्थिक विकासाचे घोडे दामटतो. थोडक्यात अर्थशास्त्रज्ञ मूल्यविषयक प्रश्नाला तत्त्वज्ञानात्मक कलाटणी मिळू नये, याचा प्रयत्न करतो. या संदर्भात राबर्ट गुडीन या ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीमधील तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापक महोदयांनी मांडलेली 'हरित राजकीय सिध्दान्त' (ग्रीन पोलिटिकल थिअरी) मला महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या या प्रस्तुत पुस्तकात गुडीन मूल्य व किंमत या संकल्पनांमधील म्हणजे पर्यायाने तत्त्वज्ञ व अर्थशास्त्रज्ञामधील संकल्पनायुध्दाचे सविस्तर विवरण करतात. हे पुस्तक म्हणजे हरित विचारांचे राजकीय भाष्य नाही तर हरित दृष्टिकोन, परिप्रेक्ष्य आणि हरित चळवळ यासंबंधीचा राजकीय सिध्दांत आहे. थोडक्यात हरित राजकीय सिध्दान्ताचे ते व्याकरण आहे. त्यात त्यांनी तत्त्वज्ञानाची लढाई खरी सत्ताधीशाबरोबर नसून ती अर्थशास्त्रज्ञाशी कशी आहे, याची मांडणी केली आहे.

हरित राजकीय सिध्दान्तानुसार निसर्ग ही स्वयंसिध्द अस्तित्वाची प्रणाली असून निसर्गाला पर्याय उपलब्ध नाही. याची भरपाई होऊ शकत नाही. म्हणून निसर्गाचा वापर काळजीपूर्वक केला जावा. त्यामुळे गुडीन पर्यावरणनीतीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून दूरगामी भविष्याविषयीची आस्था, याकडे लक्ष देण्यास सांगतात. भावी काळातील निसर्ग, सृष्टी, जीवसृष्टी व पिढ्या याविषयीची काळजी व कर्तव्यबुध्दी आपणास महत्त्वाची वाटते की नाही,

ही पर्यावरणनीतीची कसोटी आहे. अर्थशास्त्रज्ञ उपयोगितावादीची कास धरून भविष्याबद्दल बेफिक्रीर राहतो. म्हणून गुडीन यांच्या मते अर्थशास्त्रज्ञ शह देण्यासाठी निसर्गाची पर्यायविहीनता लक्षात घेतलीच पाहिजे. त्याचप्रमाणे स्त्री–मुक्ती, भांडवलशाही–मुक्ती, व्यसन–मुक्ती या मागण्यांमागे असलेले समान सूत्रही लक्षात घेतले पाहिजे असेही ते बजावतात.''[९१] एकूण काय तर पर्यावरणरक्षणासाठी होणाऱ्या चळवळी या देखील समाजवादी, डाव्या अंगाच्या असल्या तरी देखील त्या महत्वाच्या आहेत. डाव्या विचारांचा द्वेष म्हणून आपण ते नाकारत बसलो तर निसर्गाशी दोन हात करत मानवी अस्तित्व धोक्यात येणे साहजिक आहे. पर्यावरण रक्षणाबाबत अमेरिकेची शोषणकारी अर्थव्यवस्थेचा रणनिती काय? हे पाहणे देखील महत्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीनंतर जग पर्यावरण रक्षणाच्या नावाने एकत्र येताना दिसत आहे. परंतु यामागे असणारा विचार व राजकारण पर्यावरण रक्षण मूल्याचा अभ्यास करताना लक्षात घेणे आवश्यक आहे. ''दुसऱ्या महायुध्दानंतर २० जानेवारी १९४९ रोजी अमेरिकन काँग्रेसपुढे उद्घाटनाचे भाषण करताना अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी ट्रूमर यांनी आर्थिक विकासाचे उदात्तीकरण करून स्पर्धेचे युग सुरू केले. जगातील फ ार मोठ्या भागाचे वर्णन त्यांनी 'अविकसित भाग' असे केले. अशा तऱ्हेने नवा व सोयीचा जागतिक दृष्टिकोन जन्माला आला अन् सर्वच लोक एकरूप मार्गाने व उद्दिष्टाने प्रेरित झाले. तो म्हणजे 'विकास'. अन् विकासाची व्याख्या ठरली 'संपन्नता' आणि शांततेची गुरूकिल्ली म्हणजे अधिकाधिक उत्पादन. परिणामी गेल्या ४० वर्षात जगातील अन्नधान्यापासून अणुउर्जेपर्यंत सर्वच उत्पादन चौपट झाले. ते उपभागणारा समाज म्हणजे 'ग्राहक समाज' (कन्झ्मुर सोसायटी) होय! या व्याख्यप्रमाणे ग्राहक समाज चंगळवादाकडे झुकला आणि त्यानुसार विकासाची व्याख्या झाली. १) सृष्टी ही विक्रयवस्तूचे आगार आहे. २) समाज फक्त मानवांचाच असतो, प्राण्यांचा नव्हे. परिणामी निसर्गाचे शोषण वाढले, समाजाचे शोषण वाढले. यातून जमीन निरूपयोगी होते, प्रदूषण, शोषण, श्रीमंत व गरीब राष्ट्रांमधील दरी वाढणे, स्वावलंबी आदिवासी जमाती नष्ट होणे, ही व इतर दुरिते वाढली.''[९२] शोषणकारी व्यवस्था संपणे हे देखील पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक अट आहे. शोषण टिकवून आपण पर्यावरण रक्षणाचे काम करू शकत नाही. जागतीक पातळीवर होणारे आर्थिक बदल हे अमेरिकेच्या पथ्यावर पडणारे असावेत यासाठी अमेरिकेसारखा भांडवली देश प्रयत्न करीत आहे. अशा वेळी विकसनशील देशांनी व भारताने

यासाठी खास अशी अलिप्तवादी भूमिका घेत राष्ट्रीय पर्यावरण रक्षणाच्या खास उपाययोजना आखने व तशी कडक अंमलबाजवणी करणे आवश्यक आहे. पर्यावरणरक्षणासाठी आंतराष्ट्रीय प्रयत्न झाले आहेत. ''विकसित व विकसनशील राष्ट्राची परिषद १९७२ साली स्टॉकहोम येथे झाली. यात अमेरिका, रशिया, इंग्लंड, जर्मनी, जपान व भारत या शिवाय अनेक देशांनी भाग घेतला. पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी स्विकारली त्यात प्रत्येक देशाने स्वतंत्रपणे कार्यक्रम राबवावा असे ठरले. आंतराष्ट्रीय संघटनेतर्फे देखील पर्यावरण रंरक्षण संवर्धनाची जबाबदारी (UNESCO, UNICEF, WHO, FAO, UNDO, IBRD) या संस्थांनी स्विकारली व त्याच्या माध्यमातून प्रचार व प्रसार यावर भर देण्याचा प्रयत्न दिसतो.''[९३]

१.०४.०३ संवेदनशीलता

माणूस, माकड अवस्थेकडून माणूस होण्याच्या अवस्थेत जेव्हा गेलो, त्याचा उत्क्रांतीतला हा टप्पाच त्याच्या संवेदनशील मनाच्या जडणघडणीचा बनत गेला. आलिकडे आपल्याला माणसाच्या संवदेना बोथट झाल्याचे दिसत आहे. एखाद्या ठिकाणी काही वेगळी अनपेक्षित घटना घडत असते त्यावेळी त्या बाबीकडे दूर्लक्ष केले जाते. त्या घटनेत आपल्यास काही त्रास होईल म्हणून त्यात माणसे पडत नाहीत ते संवेदनाशून्य मनाचे लक्षण आहे. आजचे जग हे तंत्रज्ञानाने युक्त आहे, धावपळीने भरलेले आहे. अशात आत्मकेंद्रीपणा वाढत जाऊन संवेदना बोथट होण्याकडे वाटचाल होते. संवेनशीलता ही एक मानसीक प्रक्रिया आहे. तसेच त्यातून केल्या जाणाऱ्या क्रिया ही क्रियात्मक प्रतिक्रीया आहे. संवेदनाशीलता याबाबत संवेदनावादाची तात्वीक बाजू पाहूयात, ''संवेदनवाद (Senstionalism) म्हणजे माणसाला होणाऱ्या सगळ्या ज्ञानाचा उगम संवेदनात किंवा इंद्रियांच्या प्रतिबोधनात असतो असे सांगणारा वाद. या वादाचे मूळ माग सॅफिस्ट, एपिक्युरिअन आणि स्टोईक यांच्यापर्यंत शोधता यते; तीर हॉब्ज हा आधुनिक संवेदनवादाचा संस्थापक समजला जातो. त्यांच्यानंतर लॉक आणि कँदिलॅक हे प्रमुख संवेदनवादी होऊ गेले. लॉकचे इंद्रियावर प्रतिबिंबनाने होणाऱ्या कल्पनावर भर दिला. कॉंदिलॅक माणसाची सगळी संज्ञा हे रूपांतरित संवेदन आहे असे समजतो.''[९४] तत्त्ववेत्यांच्या मताप्रमाणे सर्व ज्ञान हे संवेदनांमूळेच निर्माण होते. इंद्रियांचे प्रतिबोधन होणे,

इंद्रियाला ज्ञान होने यात संवेदनादची निर्मिती होते. मानसाच्या मनात अनेक विचार चालू असतात. संवेदशील मनाचा मानूस अचूक विचार करू शकतो. तसेच त्याप्रमाणे कृती करू शकतो. नवनवीन बाबी शोधन्यासाठी सूध्दा संवेदना जाग्या असणेच आवश्यक आहे. जाग्या संवेदनशील मनातूनच नव्या ज्ञानाची निर्मीती होते. तसेच समाजात असणाऱ्या प्रश्नांवर या ज्ञानाचा विचारांचा उपयोग होतो. समाजाता अनेक अनिष्ठ बाबीं चालू असतात. त्याविरोधात काम करणे म्हणजेच शोषित जनतेला साथ देणे हे देखील संवेदनशील मनाचेच काम आहे. ''काँदिलॅक हा लॉकच्याही पुढे गेला आणि ज्ञानाचे मूळ प्रतिक्षिप्त क्रियेत (Reflexion) असते हे त्याने अमान्य केले. सगळ्या ज्ञानाचे मूळ एकच असते असे त्याने सांगितले. त्याची पध्दती म्हणजे सुधारलेला आणि विस्तारित केलेला संवेदनावाद होता. तिचे उद्दिष्ट आमचे सगळे ज्ञान आणि सगळ्या कार्यप्रवृत्ती संवेदनांपासून कशा उद्भवतात हे दाखविणे हे हो. कल्पना या उपजत असताता या देकार्ताच्या मताविषयी लॉकचे संशय व्यक्त केला. पण त्याने ज्ञानाचा उगम प्रतिक्षिप्त क्रियांत मानल्यामुळे त्याच्या ज्ञानाच्या सिध्दान्ताचे वेगळेपण स्पष्ट होत नव्हते. या संदिग्ध अवस्थेतून काँदिलॅकने संवेदनवादाची मुक्तता केली. मन हे जडनिरपेक्ष असते हे मत त्याने टाकून दिले, आणि मन हे संवेदन कार्याशिवाय दुसरे काहीही नसते असे सांगितले. इंद्रियावर होणाऱ्या बाह्य पदार्थाच्या समाघाताचे परिणाम म्हणून सर्व कार्यप्रवृत्ती संवेदनातून उद्भवतात असे त्याचे मत होते. गॅसेंडी आणि हॉब्ज यांचे अनुकरण करून त्याने ज्ञान आणि संवेदन ही एकरूप मानली. मानवेतर प्राण्यांच्या तपासणीवरून जी अनुमाने निघतात ती मानवी मनालाही लागू पडतात असे त्याने प्रतिपादन केले.''[९५] बाहेर घडणाऱ्या क्रिया प्रतिक्रियांचा परिणाम हा मनावर होत असतो. त्यातून कार्यप्रवृत्ती ही संवेदनातून जन्मला येते. मानवाने केलेले कोणतेही कार्य हे संवदेनशील मनाने केले कार्य होय असेच म्हणावे लागेल. संदेनशीलता ही फ क्त माणसासाठीच असते असे नव्हे तर ती पर्यावरण, प्राणी, निसर्ग या विषयी असू शकते. संवेदनशीलते बद्दल बा. र. सुंठवणे यांच्या पुस्तकात पुढील उतारा मिळतो. ''संवेद्यता (Sensibility) म्हणजे काय हे निश्चित करण्याची मूलभूत गरज पटल्यामुळे कॅबानीने आपल्या चिकित्सेला प्रारंभ करताना प्रश्न उपस्थित केले ते असे– संवेद्यता ही नेहमी संज्ञा आणि स्पष्ट प्रतिबोधन (Perception) यांना पूर्वगृहीत धरते काय? आणि ज्यात इच्छेचा भाग नाही असे सगळे अप्रतिबोधित ठसे

आणि हालचाली यांचा संदर्भ सजीव पदार्थाच्या दुसऱ्या कोणत्या तरी गुणधर्मात आम्ही शोधला पाहिजे काय? या चिकित्सेतून कॅबानीने असा निष्कर्ष काढला की प्रत्यक्ष आणि तात्कालिक संवेदनांच्या जोडीने मानसिक घटनांचा उगम सहजात सहजप्रवृत्तीत (connae instincts) होतो हे मान्य केले पाहिजे. या सहजप्रवृत्ती प्रतिमा किंवा कल्पना असतात आणि मेंदूमध्ये ठशांच्या प्रतिक्रिया म्हणून त्या तयार होतात पण त्या तात्ककालिक किंवा प्रत्यक्षपणे होत नसतात. त्या पुन्हा तयार झालेल्या असतात आणि मेंदूत व मज्जातंतूच्या इतर केंद्रात आधीच्या अनुभवांच्या फलांचा समुच्चय म्हणून साठविल्या जातात. अशाप्रकारे कॅबानीने मन हे जीवाचेच एक कार्य आहे असे दाखवून जीव आणि मन यांच्यातील अनिष्ट भेद नाहीसा करून टाकला.''[९६] संवेदनशीलता ही मानसिक प्रक्रिया आहे. यात मानवी मेंदूचा मोठा वाटा आहे. मानसाची मानुषता जेव्हा मानवी उत्क्रांतिमध्ये तयार झाली. तेथून च पुढे विचार, आचार, पध्दती, संस्कृति यांचा जन्म झालेला आहे. मानवी मानुषता याचा केंद्र आहे. शेजाऱ्या विषयी मानवी कनव असने हेच मानुषतेचे पहिले लक्षण होय. त्यानंतर त्याचे स्वातंत्र्य अबाधीत राहत त्याच्या स्वाभीमानाचा विचार केला जाऊ लागला. मानुषता यामध्ये समतेचा विचार करणारी असते हे यावेळी लक्षात येते. ''आजच्या यंत्रयुगात संगणकादी साधनांचा वरचष्मा असल्याने भावनांचा कळत-नकळत कोंडमारा होतो, संवेदना बोथट होतात. अनेक कारणांनी मनुष्य स्वभाव आत्मकेंद्रित झालेला दिसतो. 'मला काय त्याचे?' ही वृत्तीही दिसते. यास पायबंध घालण्यासाठी संवदेनशीलता जोपासली पाहिजे. ...शेजारी-पाजारी, अनाथ-अपंग यांचे जीवन समजून घेण्याची उदारता हवी- मानवी जीवनातील सुखदुःखे, यशापयश यांच्याकडे पाहण्याची समतोल वृत्ती हवी. मानवतेवर सृष्टीतील निसर्गातील भावभावनासुध्दा समजून घेण्याची कविवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी, हे संवेदनशीलता मूल्य संक्रमित करण्याचे अंतिम उद्दिष्ट असावे.''[९७] मानवाने निर्माण केलेल्या यंत्रात मानव आडकत चालला आहे. समतेची रचना असल्यानंतर मानवी तंत्रज्ञानाचा परिणाम मानुषतेवर अथवा संवेदनशीलतेवर होत नाहीत परंतु शोषणकारी यंत्रणा चालू असताना मानवी तंत्रज्ञानाचा परिणाम होतो. माणूस आत्मकेंद्री होत जाने यात असते. माणुस स्वतः पूरता विचार करतो. त्यामुळे त्याला कडेच्या बाबींकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही अशी भावना तयार होते. ही भावना परात्मभावाची भावना आहे. संवेदनशील हे मूल्य आपल्या कडेला चाललेल्या परस्थितीची

जाणीव करून देणारे मूल्य आहे. मानवी मनात चालणारी ही प्रक्रिया समजून घेणे आहे. ''आपल्या आजूबाजूच्या जगात माणुसकीपेक्षा व्यवहारवाद बोकाळत चालला आहे. स्वार्थीवृत्तीचे आकर्षण वाढले आहे. गतिमान जीवनात आपण आपला माणूसपणा हरवत चाललो आहोत असे वाटते. यंत्रयुगाच्या प्रभावामुळे आपणही यंत्राचाच एकभाग बनण्यात माणसास धन्यता वाटू लागली आहे. नाट्य, काव्य, संगीत, नृत्य, चित्र आदी कलांमधील आनंद टिपण्याची रसिकता आपण गमावत आहोत की काय अशी शंका येते. या पार्श्वभूमीवर संवदेनशीलता हे मूल्य जागविण्याची नितांत आवश्यकता जाणवत आहे.

...आजचा जीवनकलह तीव्र व दुःखसह होत आहे. तो सुसह्य होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी संवेदनशीलता हे मूल्य उपकारक होऊ शकेल. आपल्या समाजात दुदैवाने विषमता पदोपदी अनुभवावयास येते. गरीब–श्रीमंत, ग्रामीण–शहरी इत्यादी रूपात ती दिसते. अनेकदा आपले अन्यायपीडित बांधव, दलित बांधव यांच्या जीवनातील दुःखेही आपणास स्पर्शून जातात. त्यांच्या दुःखासह, परिस्थितीसह त्यांना आपले म्हणण्यासाठी संवदेनशीलतेची जरूरी आहे.''[९८] मानवी प्रश्न तिव्र बनत चालले आहेत. या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी माणूसच पुढे येऊ शकतो. मानवा पुढे असणारे तंत्रज्ञानाचे जग हे मानूषता संपते असे नव्हे तर मानवाच्या संवेदना कमी होत गेल्यानंतर मानूषता, मानवता कमी पडायला लागते. त्यासाठी लाहान वयापासूनच या जाणीवा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तरूण पिढीपुढे विचारवंत, महापुरूष, तत्त्ववेत्ते यांचे विचार पुढे ठेवून तशी ध्येयवादी वाटचाल तंत्रज्ञानाच्या व धकाधकीच्या जीवनात करणे शक्य आहे. मानवाने मानवाचे चालवलेले शोषण बंदे करणे हा उद्देश समोर ठेवून वाटचाल सुरू केल्यास संवेदनशीलता मूल्याची जोपासणूक होणे शक्य आहे.

१.०४.०४ सामाजिक बांधिलकी

सामाजिक बांधिलकी हे मूल्ये समाजाप्रति प्रत्येक नागरिकांची काहीएक जबाबदारी आहे याची जाणीव करून देणारे हे मूल्ये आहे. समजात विविध प्रश्न असतात. त्यावर बोलणे, लिहणे, आवाज उठवणे, त्या विरूध्द लढा देणे या बाबी कराव्या लागतात. यासाठी नेतृत्त्व करणारा व्यक्ती या त्याचा प्रत्यक्ष काही फायदा काहीएक होत नसतो, परंतु तो जे काही करीत असतो ते सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून करीत असतो. सामाजिक बांधिलकी ची जणीव

मानवी मनावर निर्माण होणे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची गरज आहे. घरचे खावून सैनिकाच्या भाकरी भाजणे अशी म्हण आपल्या व्यवहारी जीवनात वापरली जाते. म्हणजेच घराला त्रासात टाकून, आपले आर्थिक नुकसान सहन करून काही व्यक्ती या समाजात काम करीत असतात. त्या व्यक्ती ह्या सामजिक बांधिलकी या मूल्याची जपणूक करीत असतात. ''आपले जीवन हे काही सामाजिक मूल्यांवर आधरलेले आहे असा आपला समज रूढ आहे खरे तर ही मूल्ये नसल्यासरखी भासतात. दररोज जीवन जगताना आपणास त्याची आठवण येण्याचे कारणही नाही. नैसर्गिक कलाक्रमणा हीच मोठी गोष्ट असताना आपणास नैतिक मूल्यांची आठवण येण्याची खरी गरज नाही. परंतु एखादी जीवघेणी समस्या निर्माण झाल्यावर आपण उत्तराची शोधांशोध सुरू करतो त्यासंबंधीचे काही नियम अपणास सापडल्यास जीवन जगण्यास, समस्या सोडविण्यास त्याचे सहाय्य होते. हे आपण पाहिले आहे. त्या नियमांच्या नीट जाणिवेने जीवन सुखकर होऊ शकते. हे सामाजिक वर्तणुकीविषयीचे नियम सामाजिक मूल्ये सजवली जातात. आपली दृष्टी त्या मूल्यांमध्ये रूळली जाते. ज्यांना आपण सामाजिक मूल्ये म्हणतो ती मूल्ये दीर्घकालीन चलनाने समाजात खूप खोल गेलेली असतात. ही मूल्ये जीवनाला मार्गदर्शक ठरतील, या मूल्यांच्या पालनाने सुख मिळते, जीवन सुसह्य होते, मानवामानवातील संबंध सुदृढ होऊ शकतात.

रोजच्या जीवनामध्ये मूल्यांच काही स्थान दृगोचर होत नसल्यामुळे किंबहूना मूल्यांचे स्वरूप कित्येक वेळा व्यवस्थित न मांडले गेल्यामुळे मूल्यांवरील श्रध्दा उडते. त्याची काही गरज असण्याचे कारण नाही असे वाटते. जीवनातील प्रश्न, समस्या यांना सामावून घेणारे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नात अनेक जण दिसतात. मूल्यांचा शोध चालूच राहतो. त्याचे स्वरूप समजून घेऊन त्यांना व्यवस्थित रूप देण्याची शक्यता निर्माण करेण हेच महत्त्वाचे काम आहे. शहाणीसुरती मंडळी समाजाची दिशा आधीच हेरू शकतात. मूल्याचे ज्ञान होण्यासाठी समाजात कोंडीच निर्माण झाली पाहिजे असे नाही, ज्ञानाची शक्यता हाही ऐक मनुष्याचा स्वाभावच आहे. भोवतीच्या समाजाचे योग्य नियमन होणे म्हणजेच चांगला समाज निर्माण करणे या सर्व प्रक्रियामध्ये सामाजिक परिवर्तनाची आवर्तने टिपून घेणे हे अत्यंत महत्वाचे आहे. सामाजपरिर्तन ही सत्य घटना आहे व तिचे यथोचित ज्ञान व्हावयास पाहिजे हे कित्येकास भान नसते तरी परिवर्तनाची नोंद न झाल्यास नैतिकमूल्ये शुष्क ठरतील.

मूल्यशिक्षण ही काळाची गरज असूनती जीवनप्रणाली व्हावी अशी अपेक्षा आहे. भारतीय संस्कृती, इतिहास, समजासुधारक व तत्त्वज्ञ यांचे विचार हा मूल्यशिक्षणाचा ठेवा आहे तो जोपासून संक्रमित करणे म्हणजे मूल्य शिक्षण होय.''[९९] म्हणजे सामाजिक जाणिवेशिवाय मूल्यांची जपणूक होण शक्य नाही. समाजाचा प्रत्येक नागरिक हा घटक आहे. व्यक्ती, व्यक्तींनी समाज बनतो. व्यक्तींवर जसा समाज अवलंबून असतो, तसेच समाजावर ही व्यक्ती अवलंबून असते. त्यामुळे ही क्रिया प्रतिक्रिया या प्रक्रियेसारखे याचे स्वरूप आहे. मूल्यांचे स्थान हे आचानक प्रश्न निर्माण झाल्यानंतर लक्षात येते. परंतु इतर वेळी त्यावर काहीही चर्चा अथवा, त्यांच्या जपणुकीसाठी काही प्रयत्न न केल्यास त्याचा समाजावर परिणाम होतो. सामाजिक बांधिलकीतून कित्येक व्यक्ती या मूल्य जोपासणुकीचे काम करीत असतात. संविधानिक पध्दतीने केलेले सामजिक काम हे सामाजिक बांधिलकी या मूल्याची निर्मिती करणारे असते.

वरिल मूल्यांबाबत माहिती जाणून घेतल्यानंतर मूल्यांचे महत्त्व लक्षात येते. मूल्ये ही जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्याचप्रमाणे कोणाताही विचार मांडताना अथवा तो पुढे घेऊन जाताना त्याला मूल्यांची जोड द्यावीच लागते. समाज, संस्था, व्यक्ती यांच्या उपयोगी असणारी मूल्ये ही मार्गदर्शक व प्रेरक शक्ती असतात. व्यंगचित्र सदर हे मूल्यांची मांडणी आपल्या संदेशातून करीत असतात. व्यंगचित्र सदर हे मूल्य विरहीत असूच शकत नाहीत असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. मूल्यांचा आधार घेत व्यंगचित्रे निर्मिली जातात. व्यंगचित्रे ही जरी टीकात्मक, खोचक, खिल्ली उडवणारी, आडबाजूने आपली मते मांडणारी असली तरी एक विशिष्ट मूल्यांची पेरणी ती करीत राहतात. त्यामुळे व्यंगचित्र सदर व मूल्यांचा सोबत विचार होतो.

१.०५ मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा अल्प परिचय

हिंदू पंच हे मराठी वृत्तपत्र आहे तर हिंदी पंच हे मराठी प्रांतात छापले जाणारे पत्र ही दोन्ही पत्रे वेगवेगळी आहेत, हिंदी पंचा नंतर मराठीत छापले जाणारे पत्र म्हणून हिंदू पंच पुढे आले. मराठी भाषेत छापले जाणारे हिंदू पंच हे वृत्तपत्र पहिले व्यंगचित्र छापणारे पत्र आहे. व्यंगचित्र छापण्याची परंपरा पत्रांनी सुरू केली ही वेगळीच व अजब कथा म्हणावी लागेल. व्यंगचित्रांनी त्या काळापासनू आपले स्थान निश्चीत केले. ते स्थान आजही पत्रांना बंद करता आले नाही. उलटआंशी व्यंगचित्रांचा वापर जास्तीचा होऊ लागला. व्यंगचित्रांनी आपले स्थान पहिल्या पानापर्यंत निश्चित करून ठेवले. याचे कारण असे की, मानवी स्वभाव हा कलासक्त आहे. मानव हा



व्यंगचित्रे देणारे पहिले मराठी वृत्तपत्र– 'हिंदूपंच'

चित्र क्रमांक १

पहिले मराठी भाषिक व्यंगचित्रपत्र

कलाप्रिय आहे. त्यातच मानवाला हास्य व आनंद हा प्रिय आहे. असा एकही दिवस नसेल की जागच्या पाठीवर एकही माणूस हसण्यावाचून राहिला असेल. कोणतीही परस्थिती असो त्यात एखादा असा क्षण असतो तो व्यंगाने भरलेला असतो. त्या व्यंगाचा परिणाम अथवा परिपाक हा व्यंगचित्र निर्मितीवर झाला. व्यंगचित्र पत्रांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्या पत्रांनी आपला असा खास वाचक मिळू शकतो हे ध्यानात घेतले होते. त्यामुळे मराठी भाषिक पत्रांमध्ये व्यंगचित्रांचा

शिरकाव होणे किंवा व्यंगचित्रांना पत्रात महत्वाचे स्थान मिळणे किंवा व्यंगचित्र हेच त्या पत्राचे प्रमुख आकर्षण ठरावे अशी परिस्थीती निर्माण झाली. त्याचा परिणाम हिंदू पंच हे मराठीतील पहिले व्यंगचित्र छापणारे पत्रक निघाले. ''व्यंगचित्र पत्रांच्या क्षेत्रातील या विविध पत्रांप्रमाणेच ठाण्याच्या 'हिंदुपंच' पत्रानेही आपल्यापरी आपली कारकीर्द गाजविली. 'हिंदुपंच' गोपाळ गोविंद दाबक यांनी सुरू केले असले, तरी त्यांना या कामात 'लोकहितवादी' सरदार गोपाळराव हरी देशमुख यांचे लेखक व चिटणीस म्हणून काम पाहणारे वामन बाळकृष्ण रानडे (१८५४–१८९९) यांचे विशेष साहाय्य असे. परंतु मराठीत व्यंगचित्र पत्र काढण्याचा पहिला मान दाबक यांच्याकडे जातो. इंग्रजी 'इंडियन पंच' १८५९ मध्ये निघाला. पण देशी भाषेत प्रथमच 'हिंदुपंच' १८७२ साली सुरू झाला. दाबक यांना मदत करणारे रानडे हे हारहुन्नरी गृहस्थ होते. 'हिंदुपंचा' च्या अंकात त्यांचा मधुनमधुन उल्लेख आढळतो. इतरही काही लोकांचे साहाय्य पत्राच्या कामात मिळत असले पाहिजे. १८९२ पर्यंत दाबक यांच्यात हाती पत्र होते. त्या साली वृध्दत्वामुळे सगळा व्याप सोडून ते पेणला (त्या वेळच्या कुलाबा जिल्ह्यात) आताच्या रायगड जिल्ह्यात राहावयास गेले. आपली पत्रे दाबक यांनी गणेश कृष्ण शहाणे व आपाजी गोपाळ गुप्ते यांच्याकडे दिली. १९०४ पर्येत त्या दोघांनी 'हिंदुपंच' पत्र चालविले. दाबक यांच्या निवृत्तीनंतरही 'हिंदुपंच' मूळच्या स्वरूपात चालू राहिले. यावरून त्यात लेखन करणाऱ्यांचे साहाय्य नंतरही चालू राहिले असावे, असे दिसते. 'हिंदुपंचा'चे स्वरूप लक्षात घेता अनेकांचे साहाय्य मिळाल्याशिवाय ते त्या स्वरूपात सातत्याने चालविणे सोपे नव्हते. कदाचित दाबक यांनीच तशी व्यवस्था करून ठेवली असली पाहिजे. परंतु साहाय्य करणारांची नावे मात्र आज दुर्दैवाने उपलब्ध नाहीत.

निश्चत कोणत्या कारणाने ते स्पष्ट होत नाही, पण १९०४ च्या सुमारास 'सूर्योदय' व 'हिंदुपंच' यांची मालकी , 'सुर्योदया'चे ठाण्यातल्या ज्या पत्राशी सतत शत्रुत्व चालू हाते त्या 'लंगडा अरूण' म्हणजे 'अरूणोदय' पत्राचे फडके यांच्याकडे गेली. 'अरूणोदय' पत्राचे संस्थापक काशिनाथ विष्णू फडके यांचे एक चिरंजीव धोंडोपंत हे 'अरूणोदया'चे संपादक असल्याने, 'हिंदुपंच' फडके यांच्याकडे आल्यावर त्यांचे दुसरे चिरंजीव कृष्णाजी काशिनाथ ऊर्फ तात्या फडके यांच्याकडे 'हिंदुपंचा'चे संपादकपद गेले. या हस्तांतरापूर्वी 'सुर्योदय' पत्र बंद होऊन 'हिंदुपंच' पत्रात समाविष्ट करण्यात आले होते. तात्या फडके यांनी, १९०९ साली नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या फिर्यादीमुळे बंद पडेपर्येत 'हिंदुपंच' पत्र मोठ्या तडफेने चालवून खूप लोकप्रिय कले होते. फडके यांच्या संपादक–कर्तत्वाचे आजही स्मरण पुसले गेलेले नाही.''[१००] दाबक यांनी सुरू केलेले हे पत्र मराठी

वृत्तपत्र सृष्टीत वेगळाच दबदबा निर्माण करीत राहिले. त्यातील लिखाणाची पध्दती ही हास्यनिर्माण करणारी असल्याने त्या लिखानाचा वेगळाच प्रभाव पडत होता. टोचून बोलण्याची जी पध्दती असते तशा स्वरूपात हे लिखाण केले जात होते. अशा प्रकारचे लिखाण करणे ही तशी अवघड बाब आहे. 'हिंदुपंच' परंपरेतील 'विदुषक' हे पत्र 'हिंदुपंचा'चेच संपादक कृष्णाजी काशिनाथ उर्फ तात्या फडके यांनी १९१९ च्या अखेरीस सुरू केले. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या फिर्यादीने 'हिंदुपंच' बुडाला, पण संपादक तात्या फडके मात्र आपत्ती कोसळूनही स्वस्थ बसले नाहीत, ते निष्क्रिय बसूच शकत नव्हते. त्यांच्या लेखणीला निरूपयोगी राहणे आवडत नव्हते. काही काळ त्यांनी १९१३ साली सुरू झालेल्या 'विनोद' पत्रात आपली लेखणी चालविली. ३० अंक निघाल्यावर 'केसरी'ने त्याची जी दखल घेतली तीत 'लबाडीची तिरपीट उडविणारे यारखे दुसरे पत्र नाही,' असे म्हटले होते. (केसरी, १३ जानेवारी १९१४) पण फडके यांचा या विनोद पत्राशी फार काळ संबंध राहिला नाही. पुढे त्यांची लेखणी 'विक्षिप्त' पत्रात चमकू लागली. हे पत्र १९१५ साली निघाले. त्याआधी याच नावाचे एक पत्र मुंबईत १८९२ साली निघाले होते. नवे 'विक्षिप्त' पत्र गुरूवारी 'चालू सामाजिक, धार्मिक, नैतिक, औद्योगिक विषयांवर मर्दानी विनोदी भाषेत या हेतूनेच सदरहू वर्तमानपत्र प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच हास्यकारक व उपरोधिक चित्रांच्याव्दारे विषयांची चटकन फोड व्हावी म्हणून याचबरोबर चित्रेही देण्यात येतील,' असे जाहीर करण्यात आले होते. फडके यांनी या पत्राशीही लेखणी–संबंध जुळविला पण तो फार काळ टिकला नाही. दैव जणू तात्या फडके यांच्या पाठीमागे हात धुऊन लागले होते. त्यानंतर त्यांच्या लेखणीच्या चमत्काराचे वाचकांनी अधून मधून दर्शन घडे, परंतु त्यांना स्थिर व स्वतंत्र अवसर मिळत नव्हता. अखेरीस लो. टिळकांच्या प्रभावळीतील बॅ. बॅप्टिस्टा यांच्या मदतीने 'विदुषक' साप्ताहिक स्वतःच्या नावाने सुरू करण्यात फडके यशस्वी झाले. या पत्राचे तेरा अंक फडके यांनी व्यवस्थित काढले. चौदाव्या अंकाची तयारी करून फडके पुण्यास लोकमान्य टिळकांच्या भेटीसाठी गेले असता, त्यांचे आकस्मिक निधन झाले व साराच कारभार आटोपला.''[१०१] 'विदुषक'पत्र 'हिंदूपंच' पत्राच्याच धर्तीचे होते. फडके यांच्या निधनानंतरही तो चालू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे 'संदेश' मधील नोंदीवरून आढळते. ''विदुषक– 'कै. तात्या फडके यांच्या मृत्यूमुळे बंद पडलेले हे वर्तमानपत्र कालपासून पुनः सुरू झाले असून त्याचा नवीन अंक काल बाहेर पडलेला आहे. कालच्या आंकवरून तात्या फडक्यांची हिंदुपंचातील परंपरा पुढे चालवून याचा कसून प्रयत्न झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.' (संदेश, २ मार्च १९२०)''[१०२] मराठी वृत्तपत्र सृष्टी ही समृध्द मानली जाते. मराठी वृत्तपत्रसृष्टीचा अनन्यसाधारण असा एक दैदिप्यमना असा इतिहास आहे. पुण्यात १८८३ पासून 'पूणे पंच' 'मुंबई पंच' नावाने २०

जुलै १८७९ हे गमतीदार लेख व चित्रे छापणारे पत्र, मुंबईत सूरू झालेले 'तेलगू पंच', म्हासे येथे १८८७ ला सूरू झालेले 'गोवा पंच' अशी पत्रे व्यंगचित्रे, विनोदी लिखाण यातून बहरत गेली. त्याच धरतीवर मराठी भाषिक व्यंगचित्र वृत्तपत्राचांही इतिहास आहे. हा दैदिप्मान इतिहास पुढे नेहण्याचे काम अशा ही पत्रांनी केल्याचे दिसते. त्यातील आनखी चार चमत्कृतिपूर्ण पत्रे होत. ''या कालखंडाच्या पहिल्या दहा बारा वर्षाच्या अवधीत, नावातही चमत्कृती, प्रकट करणारी वृत्तपत्रे मुंबईत निघाल्याचे आढळते. 'अरण्यपंडित', 'विक्षिप्त', 'भूत', 'नारद' ही ती चार पत्रे होत. व्यंगचित्राच्या स्वरूपाची चित्रे देण्याचाही त्यांपैकी काहींनी प्रयत्न केला होता.''[१०३] या चार पत्रांची माहिती घेणे येथे आवश्यक आहे. अरण्यपंडित हे असेच व्यंगचित्रे पसिध्द करणारे हास्य पत्र होते. या पत्राच्या संपादकांचे नाव उपलब्ध होऊ शकले नाही तरी ते कोण प्रसिध्द करीत होते व कोठे छापले जात होते याची माहिती मिळते, 'अरण्यपंडित' हे पाक्षिक पत्र १५ नोव्हेंबर १८८१ रोजी सुरू झाले. पत्रावर शेवटी, 'हे पत्र बाबाजी पांडू मोरे याने मालकाकरिता रघुनाथ कृष्णाजी यांच्या छापखान्यात छापून प्रसिध्द केले. घर नं. ४९ उंबरवाडी', असा मजूकूर असे. पण संपादकाचे नाव उपलब्ध झाले नाही. व्यंगचित्र प्रसिध्द करणारी व हास्यनिर्माण करणारी पत्रे ही समाजप्रबोधनाला किती महत्व देणारी होती हे पुढील संदार्भावरून लक्षात येते. फक्त मनोरंज करणे व वाचकांना गुदगुल्या करणे, त्यांना हासवणे येवढाच हेतू असता तर वाचकांनीही अशा पत्रांना साथ दिली नसती परंतु समाजातील प्रत्येक घटकास ते उपयोगी व्हावे यासाठी हास्यपत्रे व्यंगचित्रपत्रे काम करीत होती. जनतेचे समाजाचे हित पहावे असाचे या पत्रांचाही हेतू असल्याचे दिसते. आपल्याजवळ असणारे साधेपण तसेच व्याकरणातील कमतरता याची माहिती संपादक देतात. त्यामुळे साधेपणा, खुलेपणा व असाणाऱ्या ज्ञानावरचा विश्वासाने वाचकांची मने जिंकण्याचे काम ही पत्रे करीत होती. हा व्यवहाराच्या पलीकडे जाऊन वाचकांवर प्रेम करण्याचा व विश्वास टाकण्याचा भाग होता. पहिल्याच अरण्यपंडितच्या पहिल्या अंकातील प्रस्तावणेत हेतू दिला होता. समाजात असणारा रूढ विचार अथवा त्याचा विरोधक यांचा प्रभाव पत्राच्या संपादक व लेखकांवर पडलेला दिसतो. विक्षिप्त हे देखिल असेच विनोदी पत्र होते. विक्षिप्त व विक्षिप्त कामगार विरोधी भूमिका घेणारे वृत्तपत्र होते. '''गुराखी' या सरकारी रोषास बळी पडलेल्या पत्राचे चालक विनायक नारायण भाट्ये यांनी हे 'विक्षिप्त' पत्र चालविले होते. पत्र साप्ताहिक होते व त्याचा पहिला अंक शनिवार दि. ७ ऑक्टोबर १८९२ रोजी प्रसिध्द झाला. पत्राला एक वर्ष पूर्ण झाल्यावर वर्षातील कामगिरीचा आढावा पत्रात घेण्यात आला होता. पहिल्या वर्षी राजकीय, सामाजिक, आचार–नीतीसंबंधी लेखांप्रमाणेच 'खांद्यावर पळभ कलिथा' टाकून स्वयंपाकाचा धंदा करणारे व विद्येत मागासलेले देवरूखे ब्राह्मण, गोरगरिबांना

नाडणारे 'तीन शेंडे मारवाडी', त्वष्टा कासार, असे ज्ञातिविषयक लेखही पत्रात प्रसिध्द झाले होते. परंतु या पत्राची जी थोडीबहुत माहिती उपलब्ध झाली आहे ती वरून नाटकांचा विशेष परामर्श हे पत्र घेत असे, असे दिसते. नाटक कंपन्या, त्यांच्या नाटकांचे प्रयोग, इत्यादीविषयी पत्रात सतत माहिती प्रसिध्द होत असे.''[१०४] विविध अयामी लेखन करणारे परंतु व्यंगचित्रांचा वापर करणारी ही पत्रे होती. व्यंगात्म लिखाण हा मूळ हेतू व संपादकांना अभिप्रेत असणारी विचारसरणी समाजात रूजवणे हा हेतू या पत्रामागे असल्याचे दिसते. तसेच काहीसे भूताच्या संपादकांचे होताना दिसते. त्यामुळे उलाढाली होत असे रा. गो. कानडे म्हणतात, ''अनेक वृत्तपत्रांच्या उलाढालीत पुढाकार घेणारे मागे उल्लेख केलेले फ ाटक काका यांनीच 'भूत' या चमत्कारिक नावाचे, एक व्यंगचित्रात्मक पाक्षिक काढण्यात पुढाकार घेतला होता. रविवार ता. १ जुलै १८९४ रोजी यापत्राचा पहिला अंक बाहेर पडला. पाक्षिक असल्यामुळे, नावाला साजेशा अवधीने म्हणजे 'अवसे-पुनवे'ला हे पत्र अवतरत असे. पत्रात चित्रे असत व ती व्यंगावर प्रहार करणारी असत. आनंदराव रामचंद्र धरावधर नावाचे गृहस्थ पत्राचे संपादक होते, व पत्र १९०४ पर्येत चालू होते.''[१०५] नियतकालीके कधी प्रसिध्द करावीत हे त्या त्या संपादकांच्यावर अवलंबून आहे. भूत हे असेच आमावस्या व पोर्णिमेला प्रकाशीत होणारे पत्र होते. व्यंगचित्र चित्रांचा वापर करणारे हे पत्र आधीच निराळे त्यात त्याचा प्रसिध्दीचा काळ त्या काळी समाजात असणाऱ्या चालीरिती परंपरा व अंधश्रध्दा यांना लक्षात घेत एका विशिष्ट काळात प्रसिध्द केला जात असे. पोर्णिमा व आमावस्येला भूते निघतात असा समाज त्या काळी जास्त रूढ होता. व इतर वेळी ही भूते गायब होतात असा ही समाज होता. त्या समजाला एक हस्यविनोदाचे वळण देत भूत हे पत्राचे नामकरण केले असल्याचे दिसते त्या काळी प्रसिध्द होणारी समाजात व वाचकांमध्ये आपले नाव कमावरणारी वृत्तपत्रे कमी असत. व्यंगचित्र पत्रांनी त्या काळी आपले स्थान निर्माण केले होते. त्यामागे हिंदू पंचाचे बलिदान द्यावे लागले होते असे म्हणले तर वावगे ठरू नये. या नावाचा दबदबा निर्माण झालेला होता. वाचक हे नाव विसरण्यास तयार नव्हते. त्यामुळे या नावाने ठाणे जिल्ह्यात पत्र सुरू झाले. ठाणे जिल्ह्यातले हिंदुपंच या सचित्र पत्राने खळबख उडवून दिली होती. या पत्राने आपले स्थान निर्माण केले होते. त्या काळी मुंबई प्रांत व पुणे प्रांतात प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रांची चर्चा होत असे. पुणे व मुंबई ही राजकीय दृष्ट्या महत्वाची शहरे मानली जात होती. वृत्तपत्रातमध्ये राजकीय मतमतांतरे व भूमिका मांडलेली असे. समाज प्रबोधन उद्‌बोधन केलेले असे. त्यातच व्यंगचित्रांचा वापर केल्याने ही मते उठून दिसत असत. हिंदूपंचा सोबत अरूणोदय, सुर्योदय सारखी पत्रे ही प्रकाशित होत होती. देश स्वातंत्र्यापुर्वी पासून ही व्यंगचित्रे कित्येक वृत्तपत्रात छापली जात होती. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर व्यंगचित्रांचा खास वापर

करणारे पत्र म्हणून मार्मिक या नियतकाळीकाकडे मार्मिकचे बाळासाहेब ठाकरे हे एक दोन्ही एकमेकांना प्रभावीत करणारे घटक ठरले होते. मार्मिक या नियतकालिकाने व्यंगचित्राचे पत्र असे नाव ठसठसीत पणे निर्माण केले त्याचा स्वतंत्र असा इतिहास आहे. स्वातंत्र काळातील व्यंगचित्रांना खास स्थान देणारे पत्र म्हणून मार्मिककडे पाहिले जाते. बाळासाहेब ठाकरेंच्या मार्मिक चा सुरूवातीचा टप्पा काय आहे? ते पाहणे गरजेचे ठरते. '''लोकमान्य' दैनिकात बापट यांच्याखेरीज जे नामवंत पत्रकार होते त्यांपैकी र.ना. लाटे पुढे 'लोकसत्ता' दैनिकाचे संपादक झाले. चन्द्रकान्त ताम्हाणे 'महाराष्ट्र टाइम्स' चे प्रथम प्रमुख वार्ताहर व नंतर सहसंपादक झाले. रामकृष्ण (तात्या) बाके यांनी संगीतविषयक खोल जाणकारीचे लेखन म्हणून नाव मिळविले, तर अंबादास आग्निहोत्री यांना कथालेखन म्हणून विशेष कीर्ती मिळाली. जयवंत दळवी कादंबरी, विनोद, नाटक इ. क्षेत्रात आज आघाडीवर आहेत. अलीकडेच ६ ऑगस्ट १९८३ रोजी निधन झालेले द.पां. खांबेटे हेही 'लोकमान्या'त आले व १९५८ साली पत्र बंद होपर्येत तेथेच राहिले. पुढे १९६०-६५ या काळात त्यांनी ठाकरे यांच्या 'मार्मिक'चे काम पहिले.''[१०६] वृत्तपत्रांचा तगडा इतिहास मराठी भाषिक वृत्तपत्रसृष्टीकडे आहे. स्वातंत्र्यसंग्रामत बाजावलेली महत्वाची भूमिका यामुळे वृत्तपत्रांसाठी हा सुवर्ण काळ होता. संपादकांनी व वृत्तपत्र सृष्टीने त्या काळी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला, साहित्य, अंदोलने, शोषितांच्या चळवळी, कष्टकरी व डाव्या विचरांच्या चळवळी यांना आपल्या वृत्तपत्रात स्थान व खंबीर साथ दिली होती. यामुळे वृत्तपत्राचा दैदिप्यमान असा इतिहास असणारे पत्रात वेगवेगळे प्रयोग होत राहिले आहेत. त्यातच नियतकालिक हा प्रकार निघाला होता. एकच एकच विषय घेऊन नियतकालिके निघत असत. हास्य, विनोदी, वैचारिक, चिंतनपर, वाङ्.मयीन, कलाविषयक, खाद्य, निसर्ग विषयक, तत्त्वज्ञान विषयक, भाषा विषयक असे निरनिराळे प्रकारे या नियतकालिकांनी जन्माला घातले होते. यामध्ये साप्ताहिकांचे महत्व वाढले. स्वतः बाळासाहेब ठाकरे हे पट्टीचे व्यंगचित्रकार असल्याने त्यांनी व्यंगचित्रांवर अधारित असे साप्ताहिक नियतकालिक चालू केले. त्याचा प्रभाव वाचकांवर पडणे साहिजक होते. व्यंगचित्रांना वाहिलेले असे त्याकाळी व आजही असे कोणतेही साप्ताहिक अथवा दैनिक वृत्तपत्र छापले जात नव्हते. त्यातच मार्मिक हे स्वतंत्र व्यंगचित्र साप्ताहिक चालू झाले, त्याकाळी व्यंगचित्रांवर आधारित असे कोणतेही वृत्तपत्र नव्हते. त्यामुळे वाचकांनमध्ये या पत्राचे महत्व वाढले. राजकीय व्यंगचित्रे ही वाचकांना जास्त भावतात. स्वतः बाळासाहेब ठाकरे हे राजकीय व्यक्तिमत्व होते. त्यांनी काही एक राजकीय भूमिका स्वीकारलेली होती. त्यामुळे त्यांनी काढलेल्या मार्मिकमध्ये राजकीय व्यंगचित्रे छापली जाणे साहजिक होते. त्यामुळे व्यंगचित्रांना महत्व देणारे असे व्यंगचित्र पत्र असल्याने मार्मिकला व्यंगचित्र पत्र हा मान

मिळला पाहिजे याबाबत लेले म्हणतात, '''मार्मिक' हे (१९६० च्या) कालखंडातील एक वैशिष्टपूर्ण साप्ताहिक होय. 'व्यंगचित्र साप्ताहिक' असे बिरूद मिरवीत हे साप्ताहिक जन्माला आले असल्याने व्यंगचित्रांना व व्यंगात्मक लेखनाला त्यात प्राधान्य राहात आले आहे. व्यंगचित्रकार म्हणून प्रसिध्द पावलेले बाळासाहेब ठाकरे यांनी हे साप्ताहिक युरू केले. त्याचा पहिला अंक १४ ऑगस्ट १९६० रोजी प्रसिध्द झाला.''[१०७]

वृत्तपत्रीय व्यंगचित्र कलेचा इतिहास पाहताना बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबतच उठून दिसणारे नाव हे आर. के. लक्ष्मण यांचे दिसते. आर. के. लक्ष्मण यांनी लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, केसरी, सकाळ अशा मराठी भाषिक मोठ्या वृत्तपत्रामध्ये काम केले आहे. आर. के. लक्ष्मण ज्या कालखंडात व्यंगचित्र पत्रकारिता करत होते त्या काळात व्यंगचित्रे पहिल्या पानावर छापली जायची प्रत्येक रविवारी ''रविवारी दैनिकांच्या पहिल्या पानांवर व्यंगचित्राची एक चौकट प्रसिध्द व्हायची. एकात चार चित्रं असत. नाही तर एकच मोठं म्हणजे तीन कॉलमी छापून येई. लक्ष्मण, सबनीस हे म.टा. लोकसत्ता यांच्या प्रथम पृष्टावर असतच. त्याचे अनुकरण अगदी जिल्हा वा प्रादेशिक पत्रांच्या पहिल्या पानावर होई. रविवार पुरवणीइतकंच या पत्रांच्या पानावरच्या तीन कॉलमी व्यंगचित्रांचं आवर्जून वाचन होई.''[१०८] आर. के. लक्ष्मण यांनी व्यंगचित्रांचे महत्व कायम तर ठेवलेच परंतु ते जास्तीच वाढवल्याचे दिसते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जनतेला वेगवगळ्या प्रश्नांचा सामना करावा लागत होता. यांची वाच्यता आर. के. लंक्ष्मण यांनी आपल्या व्यंगचित्रांच्या माध्यमातून करून सरकार, प्रशासन यांना जाणीव करून दिली. हे करीत असताना वचकांना नागरिक म्हणून काही जबाबदाऱ्या असतात याचेही भान आणून दिलेले दिसते. कोणत्याही विचारांचे सरकार असले तरी त्यांनी आपल्या व्यंगचित्रांच्या माध्यतून सरकारला गूदगूल्या केल्या नाहीत तर त्यांनी फक्त जनतेची बाजू घेत आपली मते मांडली. इंधीरा गांधी या सर्वात गाजलेल्या पंतप्रधान राहिल्या आहेत परंतु त्यांच्या हूकूमशाही वागण्यावरही त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून न भिता टिका केलेली होती. आर. के. लक्ष्मण यांनी अर्धांगवायूचा आजार झाल्यावर ही आपली व्यंगचित्र पत्रकारिता बंद केली नाही किंवा त्याची धार कमी झाली नाही. आर. के. लक्ष्मण यांची निधन झाल्यानंतर त्यांचे प्रसिध्द असणारे कॉमन मॅनचे व्यंगचित्र याचा पुतळा महाराष्ट्र राज्यातील पूणे येथील सिमबॉयसि युनिव्हरसिटी येथे उभारण्यात आला आहे, या पुतळ्याला सलाम कराणारा पोलीस हवालदार याचा पुतळा निर्माण करण्यात आला आहे. वृत्तपत्रीय व्यंगचित्रकाराने निर्माण केलेल्या

व्यंगचित्रांचा पुतळा उभा केला जाणे ही साधी बाब नाही, तर तो वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारितेचा गौरवच केला आहे.


आपल्या देशातील वृत्तपत्रीय व्यंगचित्र कलेची खूप मोठी परंपरा आहे. तात्या फडकेपासून ते आजपर्यंतच्या स्व. बाळासाहेब ठाकरे, आर के लक्ष्मण , अबू अब्राहम, सुधीर तेलंग, उन्नी अशी मोठी परंपरा आहे. मराठीत श्रीकांत ठाकरे , मंगेश तेंडुलकर विकास सबनीस , जगदीश कुटे, राज ठाकरे, प्रशांत कुलकर्णी, विवेक मेहेत्रे, श्रीनिवास प्रभुदेसाई, सुरेश क्षीरसागर, वसंत विटणकर, सुरेश सावंत, वैजनाथ दुलंगे, संजय मिस्त्री, अनिल झा, आलोक निरंतरें, गजानन मर्इं, महेंद्र आवसार, यशवंत सरदेसाई, ब्रीजेश मोगरे, गणेश जोशी, गणेश काटकर, बाबू गंजेवार, विनय चाणोकर, राहुल तुपे, भरतकुमार उदावंत, रवी भागवत, भगवान क्षीरसागर , संतोष घोंगडे आदींची नावे घेणे शक्य आहे. ग्रामीण संस्कृतीवर व्यंगचित्रकार म्हणून रवींद्र बाळापुरे , प्रभाकर दिघेवार , लहू काळे , गजानन धोंगडे दिवाळी अंकासाठी शि. द. फडणीस ज्ञानेश सोनार, चंद्रशेखर पत्की, हरिश्चंद्र लचके, प्रभाकर झळके, वसंत हळबे, श्याम जोशी, गवाणकर, विकास सबनीस, विवेक म्हेत्रे, खलील खान आदींनी एक काळ गाजवून सोडला. बापू घावरे, चिंतामण ग. मनोहर, प्रकाश वर्मा, अजय सावजी, अरविंद गाडेकर, धनंजय गाडेकर, दिनेश धनगव्हाळ, ज्ञानेश शेलेकर, चारुहास पंडित, घनश्याम देशमुख, जय जाधव, जयवंत काकडे, कंदीकटला, महेंद्र पंडित, मनोहर सप्रे, पोरे ब्रदर्स, प्रभाकर ठोकळ, प्रभाकर वाईरकर, प्रदीप साठे, प्रकाश बनगे, प्रशांत आष्टीकर, राजेंद्र सरग, रामचंद्र राजे, एस. ए. मुलानी, संजय मिस्त्री, संतोष मोहिते, श्रीकांत कोरान्ने, सुयोग चौधरी, धनंजय एकबोटे, भरत घटे, शशिकांत गद्रे , दिवाकर शेडगे, बळी लवंगारे, सुरेश सावंत, सुरेश राऊत, शिवाजी गावडे, शिराज मुजावर, सुरेश सावंत, सुरेश राऊत, शिवाजी गावडे, शिराज मुजावर, सुरेश लोटलीकर, वसंत मयेकर, विजय परांडकर, प्रकाश चव्हाण, बी. गणेश, दीपक महाले, नीलेश कानकिरड, प्रदीप म्हापसेकर, सुहास पालीमकर, विवेक प्रभुकेळुस्कर, अशोक बुलबुले, अशोक सुतार, किशोर शितोळे, राम मांडुरके प्रकाश घादगिने आदींची नावे वृत्तपत्रीय व्यंगचित्र कलेसाठी घेतली जातात.

१.०६ प्रकरणीकरण

सदर संशोधनामध्ये पुढील प्रमाणे प्रकरणीकरण करण्यात आले आहे.

प्रकरण क्रमांक १ – संशोधन विषयाची ओळख
प्रकरण क्रमांक २ – संशोधन विषयाशी संबंधीत सहित्याचा आढावा
प्रकरण क्रमांक ३ – संशोधनाची कार्यपध्दती
प्रकरण क्रमांक ४ – माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन
प्रकरण क्रमांक ५ – संशोधनाचा सारंश, निष्कर्ष आणि शिफारशी

१.०६.०१ संशोधन अहवालाचे विविध विभाग



१.०७ प्रकरणाचा समारोप

प्रस्तुत ''मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.'' या संशोधनाच्या प्रथम प्रकरणात संशोधन समस्येशी संबंधीत बाबींचा उहापोह व्हावा या उद्देशाने तसेच वृत्तपत्रीय व्यंगचित्र क्षेत्रात तसेच कला, मूल्ये, तत्त्वज्ञान या संबंधी काय घडले याचा अंदाज घेतला आहे. हा अंदाज घेतल्यानेचे आज आपण संशोधनाच्या अंगाने कोठे आहोत हे कळते. यासाठीच पुढील बाबींवर चर्चा केली आहे.

संशोधन विधानांच्या कायात्कम व्याख्या देणे संशोधनामध्ये आवश्यक असते. त्यामुळे संशोधन कार्य करताना संशोधन विधानाच्या प्रत्येक शब्दांचा अर्थ हा संशोधक काय लावतो आहे? हे समजते. सदर प्रकरणामध्ये संशोधन विधान व कार्यात्मक व्याख्या मांडल्या आहेत.

संशोधनाची गरज असल्या शिवाय संशोधन करणे योग्य नाही. गरजेच्या भागाकडे संशोधकाने पाहूनच त्या भागामध्ये भर घातल्या इतपत त्या संशोधनाचे महत्व असावे लागते. त्यामुळे सदर संशोधनाची गरज व महत्त्व या प्रकरणामध्ये मांडली आहे

संशोधन ज्या उद्दिष्टामुळे निष्कर्ष साध्य होणार आहेत, त्यासाठी उद्दिष्टे मांडण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे संशोधनाची मर्यादा, कार्यक्षेत्र व प्रकरणीकरण कशाप्रकारे असेल याची मांडणी सदर प्रकरणामध्ये केली आहे. त्याचप्रमाणे ज्या दैनिकांतील व्यंगचित्र सदरावर संशाधन केले आहे त्या दैनिकांची नावे, व्यंगचित्र सदराचे नाव, व्यंगचित्रकाराचे नाव यांचा तक्ता देखील या प्रकरणामध्ये आहे.

पुढील प्रकरण दोन मध्ये संशोधन विषयाशी संबंधीत सहित्याचा आढावा घेऊन त्याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

२.०१ प्रास्ताविक

२.०२ संबंधित साहित्याचा आढावा अर्थ

२.०३ संबंधित साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्टे

२.०४ संबंधित साहित्याच्या आढाव्याचे महत्व

२.०५ संबंधित ग्रंथांचा आढावा.

२.०६ संबंधित नियतकालिकाचा आढावा

२.०७ संबंधित वृत्तपत्रांचा आढावा.

२.०८ संबंधित संशोधनांचा आढावा.

२.०९. ई–स्त्रोताव्दारे घेतलेला पीएच. डी. स्तरांवर झालेल्या संशोधनांचा आढावा.

२.१० संबंधित साहित्याच्या आढाव्यातून प्राप्त झालेले सामान्य निष्कर्ष.

२.११ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण.

२.१२ संशोधनास मिळालेली दिशा.

२.१३ प्रकरणाचा समारोप.

प्रकरण दुसरे

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

२.०१. प्रास्ताविक

''मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.'' या विषयी संशोधनास सुरूवात करण्यापूर्वी संशोधकाने समस्येला अनुसरून जे साहित्य वाचले, तसेच जे संदर्भ पाहिले त्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

संशोधनकाने वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिता संदर्भात ग्रंथालयातील अनेक पुस्तकांमधून वृत्तपत्रीय व्यंगचित्राच्या संबंधीच्या महत्वाच्या बाबींचे थोडक्यात लेखन केले आहे. त्यामध्ये वृत्तपत्रीय व्यंगचित्रा संदर्भात माहिती, व्यंगचित्रांचे प्रकार या मुद्याबरोबरच संबंधित विषयाबाबत जे जे संशोधन झाले आहे त्यातील निवडक संशोधनाचा उल्लेखही साहित्याचा आढावा घेत असताना केला आहे. त्यापैकी संशोधनाच्या समस्या, संशोधन पध्दती, संशोधनाची उद्दिष्टे, निष्कर्ष इत्यादी बाबींसह सदर प्रकरणात संशोधन विषय व पूर्वीचे संशोधन याची तुलना, साम्य, फरक या गोष्टींचा विचार केला आहे. संशोधन करीत असताना संबंधित साहित्याचा आढवा घेताना तंत्रज्ञानाचा वापर ही वाढत आहे. त्यामुळे आंतराष्ट्रीय पातळीवर आपण हाती घेतलेल्या संशोधन समस्या संदर्भात माहिती संगणकासारख्या इलेक्ट्रॉनिक साहित्याचा वापर करून इंटरनेटच्या माध्यमातून व संकेतस्थळांच्या मदतीने आपल्या संबंधित समस्येशी माहिती घेता येते ही माहिती देखील माहिती साहित्याचा आढावा या प्रकरणामध्ये घेतली आहे. वृत्तपत्रांमध्ये जी काही माहिती मिळते तिचाही विचार समावेश या प्रकरणामध्ये केला आहे. संबंधित संशोधकाने या विषयाच्या संदर्भात जे जे साहित्य, संशोधन अहवाल वाचलेले होते ते सर्व संबंधित साहित्याचा उल्लेख ग्रंथसूची व संकेतस्थळसूची मध्ये केला आहे. सद्यःस्थितीतील वृत्तपत्रातील व्यंगचित्राच्या संदर्भात तसेच त्यातील मूल्यांबाबत खूप कमी संशोधन झाल्याचे दिसून आले. ही उणीव दूर करण्यासाठी या संदर्भात संशोधनासाठी विचार होऊ लागला आहे. वृत्तपत्र सृष्टीमध्ये वृत्तपत्राचा वाचक हा सर्वांत महत्वाचा घटक आहे, त्याच्यावर वृत्तपत्र अवलंबून आहे. अशा वाचकांवर व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित मूल्यांचा होणारा परिणामांचा अभ्यास होणे महत्वाचे आहे.

हे संशोधन करीत असताना साहित्याचा आढावा घेताना संबंधित समस्येशी निगडित समस्यांचे चार प्रकार करण्यात आले ते पुढील प्रमाणे.

२.०२ संबंधित साहित्याचा आढावा अर्थ

संशोधन करताना संशोधकाला संबंधित साहित्याचा आढावा घ्यावा लागतो. संशोधनाचा आढावा घेण्याचा अर्थ संशोधक जी संशोधन समस्या निवडतो त्या संबंधी उपलब्ध असलेले साहित्य, संशोधन, नियतकालिके, वृत्तपत्रे या ठिकाणी मिळालेल्या साहित्याचा, माहितीचा, संशोधनाचा अधिका–अधिक अभ्यास करणे होय. त्याचप्रमाणे संशोधकाने त्याच्या समस्येसंबंधी मिळालेल्या साहित्याचा संपूर्ण सखोल व व्यवस्थित अभ्यास करणे होय.

२.०३ संबंधित साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्टे

संबंधित साहित्याचा आढावा घेताना काही उद्दिष्टे संशोधकाला समोर ठेवावी लागतात. संशोधन करताना संशोधकाला संबंधित आढावा घेताना नविन सिध्दांत, कल्पना, स्पष्टीकरण मिळतात. त्यासोबतच परिकल्पना मांडणीसाठी स्त्रोत मिळतात. संशोधकाने संबंधित साहित्याचा आढावा घेतल्याने मुख्यतः संशोधनाची पुनरावृत्तीचा दोष टाळता येतो. झालेल्या संशोधनाची आवश्यक पध्दती, प्रक्रिया, माहितीचे स्त्रोत आणि तंत्रे मिळतात. यामुळे संशोधकाला आपले संशोधन करताना अधिकाधिक शास्त्रीय पध्दतीने मांडणी करणे सोपे जाते. तसेच अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढण्यासाठी उपयुक्त पध्दतींची माहिती मिळते. संशोधकाला संबंधीत साहित्याचा आढावा या संशोधनाच्या प्रक्रियेमधून गेल्यानंतर संशोधनाची दिशा निश्चित करण्यास मदत होते. त्यासोबतच संशोधकाने निवडलेले संशोधन समस्या झालेल्या संशोधनापेक्षा, अभ्यासापेक्षा वेगळी आहे हे स्पष्ट करता येते. संशोधकाला निष्कर्ष काढण्यासाठी अगोदरच्या संशोधकाने केलेल्या प्रश्नांची माहिती मिळाल्याने नव्या संशोधनाचे निष्कर्ष शास्त्रीय पध्दतीने मांडता येतात.

२.०४ संबंधित साहित्याच्या आढाव्याचे महत्व

संबंधित साहित्याचा आढावा घेण्याचे महत्त्व पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

१. इतर संशोधन विषयांशी तुलना करता येते.

२. पुनरावृत्तीचा दोष टाळता येतो.

३. वेगवेगळ्या पध्दतींची व तंत्रांची माहिती मिळते.

४. नवनवीन साधन सामग्रींची माहिती मिळते.

५. नविन संकल्पनांची माहिती मिळते.

६. असामान्य व्यक्तीच्या कार्याचा परिचय करून देता येतो.

७. अहवाल कसा लिहावा याची माहिती मिळते.

८. संशोधन करताना संशोधकाला आत्मविश्वास निर्माण होतो.

२.०५ संबंधित ग्रंथांचा आढावा.

ग्रंथ स्वरूपात प्रकाशित झालेले माहितीवजा व सैध्दांतिक स्वरूपातील वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिता, मूल्ये, कला या संदर्भातील माहिती मिळणारी पुस्तके व संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या पुस्तकांचा समावेश करण्यात आला आहे.

२.०५.०१ महाराष्ट्र शब्दकोश

लेखक : दाते–कर्वे

प्रकाशन : वरदा बुक्स, पुणे ४११ ०१६

आवृत्ती : १९९७

या शब्दकोशामध्ये पान नंबर २८९३ वर व्यंगचित्र या शब्दाची फोड करून दाखवली आहे व्यंग या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे. यामध्ये आड पडद्याने अप्रत्यक्षपणे, अलंकारिकपणे, दिग्दर्शित करण्याचे, सूचक, हाव–भावाने तसेच कृतीने गुप्त बाबी स्पष्ट करणारे व्यंजन, गर्भित अशी माहिती या पुस्तकामध्ये उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे चित्र या शब्दाचा अर्थ थोड्या रेषांनी मुळ वस्तूचे वैशिष्ट्य दाखविणारे चित्र म्हणून कार्टून, टीकात्मक चित्र असते अशी माहिती मिळते. महाराष्ट्र शब्दकोश या पुस्तकात विविध शब्दांची उकल करणारे अर्थ सांगितले आहेत.

या विश्वकोशात व्यंगचित्र या शब्दांची फोड करून दाखवली आहे. यामुळे ही माहिती संशोधनाच्या पहिल्या प्रकरणातील व्यंगचित्राची पारिभाषिक व्याख्या करताना उपयोगी आली.

२.०५.०२ लक्ष्मणरेषा

(आत्मचरित्र)

लेखक : आर. के. लक्ष्मण

अनुवाद : अशोक जैन

प्रकाशन : राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

आवृत्ती : दुसरी, २६ जानेवारी १९९९, प्रथम, ११ ऑक्टोबर १९९८

पाने : १८७

या आत्मचरित्रात आर. के. लक्ष्मण या प्रसिध्द व्यंगचित्रकारने आपली खालीलप्रमाणे मते नोंदवली आहेत. आर. के लक्ष्मण हे मोठे वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार असल्याने त्यांना त्यांच्या कार्यकाळात काय चांगले व वाईट अनुभव आले याची नोंद त्यांनी या आत्मचारित्रात घेतली आहे. त्यांनी आपल्या वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातमधून सर्व सामान्य माणसांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता याची मांडणी केली आहे. तसेच या पुस्तकात त्यांनी वृत्तपत्रीय व्यंगचित्रांचा कसा प्रभाव व परिणाम प्रशासनावर तसेच मानवी मनावर पडतो याचे अनुभव दिले आहेत. वृत्तपत्रीय व्यंगचित्रे कशी असावी? व ती कशाप्रकारची असतात? याची माहिती ते त्या पुस्तकांत मांडतात. वृत्तपत्रीय व्यंगचित्र लोकशाहीतील मोठे हत्यार असल्याचेही ते सांगतात. राजकारण, समाजकारण यामध्ये काम करणाऱ्या विविध समाजमनावर प्रभाव टाकणाऱ्या नेत्यांचे व्यंगचित्र काढणे ही मोठी कसब असल्याचे ते सांगतात. वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरासाठी व्यंगचित्रे वेळेवर पाठवण्याची तारेवरील कसरत, नवनव्या धोरण तसेच कार्यक्रम यांचा परिणाम कसा होतो? हे त्यांनी आपल्या व्यंगचित्राव्दारे मांडले होते याची मांडणी त्यांनी आपल्या आत्मचारित्रातून केली आहे. परदेशी व्यंगचित्रे कशी असतात? व्यंगचित्रकारांवर ते ज्या देशात राहतात तेथील राजकीय विचारसरणीचा कसा परिणाम असतो? याची माहिती ते या पुस्तकात देतात.

या पुस्तकात संशोधनासाठी उपयोगी पडणारी माहिती आहे. लेखकाने व्यंगचित्र सदराचा वापर ज्या समाजिक, राजकीय अंगाने केला आहे त्याची माहिती या पुस्तकात दिल्याने ही माहिती संशोधनासाठी उपयोगी ठरणारी आहे. संशोधनाची

प्रश्नावाली तयार करताना या पुस्तकात दिलेल्या बाबींच्या अनुषंगाने प्रश्न निर्माण करता आले.

२.०५.०३ मराठी कुमारभारती इयत्ता नववी.

निमंत्रक : प्रा. वसंत अबाजी डहाके

पाठाचे लेखक : जयदेव डोळे

प्रकाशन : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

प्रथम आवृत्ती : २०१२

पुनर्मुद्रण : २०१६

या पुस्तकातील पान नंबर ११६, ११७, ११८ वर जयदेव डोळे यांनी व्यंगचित्रे आणि वृत्तपत्रे हा पाठ लिहिला आहे. हे पुस्तक नववीच्या मुलासांठी क्रमिक अभ्यासक्रमाचे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी जयदेव डोळे लिहलेल्या पाठात वृत्तत्रीय व्यंगचित्रांचा माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने हा पाठ लिहला आहे. या पाठामध्ये वृत्तपत्रामध्ये व्यंगचित्री कशी प्रकाशित केली जात होती? ती आत सध्या कोठे प्रकाशीत होतात? याची माहिती सदर पाठात दिली आहे. वृत्तपत्राचे बदलते तंत्रज्ञान वृत्तपत्रीय व्यंगचित्र कलेवर कसे परिणाम करणारे ठरत आहे याची माहिती त्यांनी दिली आहे. व्यंगचित्र सदराने वृत्तपत्रावरील पहिल्या पानावरील स्थान कसे निश्चित केले याची माहिती ते या पाठात देतात. वृत्तपत्रात होणारे बदल तसेच कॉमिक्स मुळे होणारे वृत्तपत्रीय व्यंगचित्रावर होणारे परिणाम त्यांचा दर्जा यावर त्यांनी या लेखात चर्चा केली आहे. इलेक्ट्रानिक्स मिडियाचा होणारा व्यंगचित्रावरील परिणाम याचाही त्यांनी उहापोह या लेखात केला आहे. वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर काय काम करते त्याचा प्रभाव व परिणाम काय होते याची माहिती विद्यार्थ्यांना लेखक करून देतात. व्यंगचित्र ही राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक अशा विविध पैलूंवर भाष्य करणारी असतात ती जशी निरूपद्रवी असतात तशी ती वाचकांना अंर्तमुख करावयास लावणारी असतात याची माहिती लेखक या पाठात करून देतात. व्यंग कसे असते याची माहिती लेखक करून देतात. वाचक व समाजाला दिशा देणारे असे साधन

म्हणून वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर आहे याची जाणीव त्यांनी आपल्या लेखात करून दिली आहे. राजकीय व्यंगचित्रामुळे काय होते तसेच विविध देशातील सांस्कृतिक राजकीय वातावरण काय याची माहिती हवी असेल तर तेथील वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरे अभ्यासावीत अशी माहिती त्यांनी आपल्या पाठात करून दिली आहे. लोकशाही मजबूत करावयाची असेल तर तरूणांनी व्यंगचित्रांची निर्मीती करण्याचा सल्ला आपल्या पाठात करून देतात.

या पुस्तकात लिहिलेल्या लेखात संशोधनास व्यंगचित्रांच्या बाबत मार्गदर्शक माहिती मिळाली आहे.

२.०५.०४ बौध्दिक, सामाजिक, भावनिक व नैतिक विकास

लेखक : सुधा कुळकर्णी, जयश्री गोडसे, शरद कुलकर्णी.

प्रकाशन : य.च.म. मु. विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

आवृत्ती : प्रथम प्रकाशन फेब्रुवारी २००१

पाने : ६५

या पुस्तकातील पान नंबर ३२, ३३ वर प्रसारमाध्यमांचा प्रभाव या मथळ्याखाली लिखाण केले आहे. या पुस्तकातून मुलांवर होणारा प्रसारमाध्यमांचा परिणाम यावर चर्चा केली आहे.

या पुस्तकातून माध्यम परिणामाबाबतची मिळणारी माहिती संशोधनासाठी उपयोगी ठरणारी आहे.

संशोधकास समजते. व्यंगचित्र सदर च्या संवाद प्रक्रियेसाठी हे सिध्दांत कसे उपयोगी ठरू शकतात? अशा दृष्टीने या पुस्तकातील माहिती संशोधकास उपयोगी ठरते.

२.०५.०५ छायाचित्र पत्रकारिता

लेखक : प्रा. शरद आगटे

प्रकाशन : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

पाने : ३२

सदर पुस्तकात लेखकाने छायाचित्र पत्रकारतेचा अभ्यास आढावा घेतला आहे. ही पुस्तिका विद्यार्थ्यांसाठी लिहीली गेल्याने या पुस्तकातील भाषा साधी व सोपी समजविण्याच्या सुरातील आहे. या पुस्तकात छायाचित्र कलेतील क्षेत्रे, मुक्त छायाचित्र पत्रकारिता, स्थानिक छायाचित्रकार यांची माहिती दिली आहे. या पुस्तकात छायाचित्र पत्रकारितेसाठी लागणाऱ्या कॅमेरा व त्याची रचना तसेच वापरण्याची पध्दती यांची मांडणी केली आहे. या सोबतच लेखकाने छायाचित्रपत्रकाराने पाळावयाच्या नैतिक, आचारण, मूल्ये, यांचा आढावा घेतला आहे. सदर पुस्तकात वृत्तपत्रीय लेख या विभागामध्ये लेखक निखिल गजेंद्रगडकर यांनी वृत्तपत्रीय लीखान कशा स्वरूपाचे असते? लेखात कोणकोणत्या बाबी पाळाव्यात? तसेच कोणत्या बाजू येवू नयेत? याची मुद्देसूद माहिती दिली आहे.

या पुस्तकातून संशोधकास छायाचित्र पत्रकारिता करताना पाळावळायाची नैतिकता, मूल्ये यांची माहिती मिळते. मूल्यांबाबत संशोधन करताना ही माहिती संशोधकास उपयोगी ठरणारी आहे.

२.०५.०६ जनसंवाद आणि जनमाध्यम : सैध्दांतिक संकल्पन.

लेखक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.

प्रकाशन : श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर ४४० ०१०.

प्रथमावृत्ती : २०००.

पाने : २५२

जनसंवाद आणि जनमाध्यमः सैध्दांतिक संकल्पन या पुस्तकात लेखकाने जनसंवादाचे स्वरूप, वेगळेपण व वैशिष्ठ्ये विशद केली आहेत. जनमाध्यामाचे कार्य काय असत? याची खोलवर जीवन चर्चा केली आहे. या पुस्तकात एकूण १४ प्रकरणे आहेत. या पुस्तकात जनसंवादाची कार्ये, संवादाची पध्दती व त्या संदर्भातल्या सर्व अंगाने चर्चा केली आहे. जगातील वेगवेगळ्या सिध्दांतकारांचे, संशोधकांचे, अभ्यासकांचे जनसंवादाबाबतचे सिध्दांत मांडले आहेत. त्यांची सखोल माहिती देऊन त्या सिध्दांतावर चर्चा केली आहे. विविध पैलूंच्या तांत्रिक बाबी कळाव्यात व सिध्दांत लक्षात यावेत, समजावेत, सोपे व्हावेत यासाठी आकृत्या देऊन जनसंवादाची सैध्दांतिक मांडणी केली आहे. संवादाबाबत भारतीय प्राचीन दृष्टीकोन

काय आहे याची चर्चा पुस्तकात केली आहे. सांस्कृतिक क्षेत्रात असणारी जनसंवादाची , संवादाची भूमिका व मानवी विकासात संस्कृतिचे महत्त्व व त्या अंगाने संवाद, जनसंवाद, जनमाध्यमे यांचे महत्त्व या पुस्तकात विशद केले आहे. संवाद क्षेत्रामध्ये सैध्दांतिक मांडणी करणारे मराठी भाषेतले अत्यंत महत्त्वाचे पुस्तक आहे.

या पुस्तकांत संवाद विषय व जनसंवाद विषयक सैध्दांतिक मांडणी केली आहे. याचा संशोधन करीत असताना उपयोगी झाला आहे. व्यंगचित्रातून प्रसारित होणाऱ्या संदेशातून मिळणारी मूल्ये ही वाचकांशी संवाद साधत असतात त्या अंगाने संवादाचे ज्ञान या पुस्तकातून झाले आहे.

२.०५.०७ मूल्यशिक्षण

लेखक : डॉ. कृ.प. देशपांडे.

प्रकाशन : सूहेलदेव प्रकाशन, बदलापूर, ठाणे.

प्रथमावृत्ती :

पाने : १५९

लेखकाने हे पुस्तक समाजामध्ये मूल्यांचे स्थान प्रस्तापित व्हावे या उद्देशाने लिहले आहे. समाजामध्ये होणारी अधोगती व मूल्यऱ्हास थांबवण्यासाठी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याचे त्यांनी आपल्या पुस्तकात मांडणी केली आहे. पुस्तकात मूल्यशिक्षणाचे महत्त्व वाढावे यासाठी काय करता येवू शेकते या बाबत चर्चा केली आहे. शिक्षक व विद्यार्थी या दोन्ही घटकांना उपयोगी व्हावे असे हे पुस्तक आहे. पुस्तकात मूल्यशिक्षणची संकल्पना स्पष्ट केली आहे. यामध्ये धार्मिक अंगाने मूल्यशिक्षण, प्राचीन शिक्षणपध्दती, विविध शिक्षण आयोग त्यांच्या शिफारशी, माध्यमिक शिक्षण आयोग, मूल्यांबाबत अभ्यास करणाऱ्या व शिफारशी करणाऱ्या समित्या यांची माहिती करून दिली आहे. मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे व यामूळे सामाजिक व सांस्कृतिक तसेच राष्ट्रीय अंगाने काय बदल होईल? याची मांडणी केली आहे. मूल्यांचे वर्गीकरण करून राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसहिष्णूता, स्त्री–पूरूष समानता, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशिलता, संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा या मूल्यांची चर्चा केली आहे. यामध्ये मूल्याचे स्वरूप कार्यात्मक

व्याख्या व अपेक्षित वर्तन बदल असे घटक मांडून मूल्यशिक्षण कसे करता येईल याची मांडणी केली आहे. मूल्यशिक्षण करताना वापरात येणारी साधने कोणकोणती असू शकतात? यावर अध्यपनासाठी उपयोगात येणारी साधने त्यांनी आपल्या पुस्तकात मांडली आहेत. त्यासोबतच शिक्षक पालकांची भूमिका कशी असावी याचीही चर्चा या पुस्तकात केली आहे. मूल्यवर्तन तपासण्यासाठी असणाऱ्या संशोधित साधने यांची ओळखही लेखकाने पुस्तकात करून दिली आहे. 'प्रवाहाविरूध्द पोहणे' हे प्रकरण निर्माण करून मूल्यांसाठी सोसावा लागणारा त्रास या बाबत लेखक मांडणी करतात. मूल्यशिक्षण करताना वापरण्यात येणाऱ्या प्रार्थना गिते देखील पुस्तकात दिली आहेत. सोबतच विविध धर्म–सण, उत्सव, दिनविशेष, विशेषदिन, संस्कृत सुभाषिते, मराठी, हिंदी इंग्रजी सुविचार पुस्तकात देउन मूल्यशिक्षणासाठी उपयोगी पडणाऱ्या बाबी मांडल्या आहेत.

हे पुस्तक मूल्य शिक्षणाच्या अंगाने माहिती पुरवते. प्रस्तुत संशोधन मूल्यांशी संबंधीत संशोधन करणारे असल्याने हे पुस्तक संशोधकासाठी उपयोगी ठरते.

२.०५.०८ मूल्यधिष्ठित शिक्षण–प्रक्रिया आणि उपचार.

लेखक : प्रा. डॉ. एकनाथ गावंडे.

प्रकाशन : निर्मल प्रकाशन, अमरावती.

प्रथमावृत्ती : २०००.

पाने : १४०

मूल्य शिक्षण हे शैक्षणिक क्षेत्राला उपयेागी असणारे पुस्तक लेखकाने लिहले आहे. या पुस्तकात दहा मूल्यांवर चर्चा केली आहे. मूल्य अध्यपनाची भूमिका स्पष्ट करून मूल्य अध्यपनाचे महत्त्व या पुस्तकात सांगितले आहे. श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रभक्ती, स्त्री–पूरूष समानता, सर्वधर्म सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सौजन्यशिलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, या मूल्यांचे सर्वसाधारण स्वरूप, आवश्यकता, कार्यात्मक व्याख्या, अपेक्षित वर्तनबदल अशा अंगाने चर्चा करून मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. मूल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मूल्यशिक्षणाबाबत स्थापित झालेल्या आयोगांची माहिती, मूल्यशिक्षणाची संकल्पना, मूल्यशिक्षण व

पर्यावरण यांची चर्चा केली आहे. त्यासोबतच राष्ट्रीय संविधानिक मूल्यांबाबतही चर्चा केली आहे. लेखकाने लोकसंख्या शिक्षण व मूल्यशिक्षण याबाबतही चर्चा केली आहे. योगशिक्षण हा पाठही या पुस्तकात निर्माण करून सूदृढतेचा मूल्याशी व मूल्यांचा सूदृढतेशी असणारा सहसंबंध स्पष्ट केला आहे. अध्यापनासाठी मूल्यशिक्षणाचे पाठ नियोजन कसे करता येवू शेकते याची मांडणी करून मूल्यधिष्ठित सहशालेय कार्यक्रम पुस्तकात मांडला आहे.

या पुस्तकातून मूल्याबाबत माहिती मिळते. प्रस्तुत संशोधन हे मूल्यांशी संबंधीत असल्याने या पुस्तकातील माहिती संशोधकास उपयोगी ठरते.

२.०५.०९ मूल्य शिक्षण विचारधन

लेखिका : प्रा. डॉ. लीला पाटील.

प्रकाशन : ऋचा प्रकाशन, नागपूर १५.

प्रथमावृत्ती : २६ जानेवारी १९९८.

पाने : १८४

ISBN- 8186461833

लेखिकेने या पुस्तकात मूल्यशिक्षणाचे महत्त्व सांगून ते शैक्षणिक क्षेत्रात कसे महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे. मूल्यशिक्षणाचा अर्थ, वैशिष्टे, शिक्षणामध्ये मूल्यशिक्षणाची असणारी भूमिका, मूल्यशिक्षणाबाबत शासनाने घेतलेले निर्णय, वेगळे आयोग, समित्या अशा तांत्रीक बाबींचीही माहिती दिली आहे. या पुस्तकात राष्ट्र भक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसहिष्णुता, स्त्री–पुरूष समानता, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशिलता, संवेदनशीलता, वक्तीशीरपणा, नीटनेटकेपणा या मूल्यांचा अर्थ स्पष्ट करणारी माहिती दिली आहे. मूल्यांबाबत महापूरूषांचे म्हणणे अवतरणे स्वरूपात देऊन मूल्यांना समाजात असणारे अनन्य साधारण महत्त्व स्पष्ट केले आहे. मूल्य शिक्षण विद्यार्थ्यांना उपयेागी व्हावे तसे अनुकरण करावे, विद्यार्थ्यांमध्ये ते रूजावे यासाठी प्रत्येक मूल्याच्याशेवटच्या समारोपाच्या भागात 'उपक्रम' देऊन लेखिकेने शैक्षणिक क्षेत्रात कृती करण्यासाठी प्रेरणा दिली आहे.

प्रस्तुत संशोधन हे मूल्यशी निगडीत आहे. या पुस्तकातून मूलभूत अशी महिती संशोधनासाठी मिळते आहे.

२.०५.१० पर्यावरणशास्त्र

संपादक : डॉ. बसवराज सी कोनापुरे.

प्रकाशन : सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २००६.

पाने : १३८.

सदर पुस्तकात पर्यावरण संबंधी लिखाण केले आहे. यामध्ये पर्यावरणाच्या शास्त्रीय व्याख्या, स्वरूप, व्याप्ती, महत्त्व व जनजागृतीची गरज सांगण्यात आली आहे. पर्यावरणाचे महत्त्व विशद करत पर्यावर रक्षणासाठी काय उपाययोजना आहेत. नैसर्गिक साधन संपत्तीचा होत असणारा मानवी हस्तक्षेप व त्यामुळे होत असणारा ऱ्हास यांची मांडणी पुस्तकात केली आहे. यामध्ये नैसर्गिक संपदा आणि संलग्न समस्या, परिसंस्था, जैवविविधता, पर्यावरण प्रदूषण, सामाजिक प्रश्न व पर्यावरण, पर्यावरण रक्षण व कार्यानुभव अशी मांडणी पुस्तकात करून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाचे महत्त्व कळावे व तशी कृती विद्यार्थ्यांनी करावी यासाठी या पुस्तकाची निर्मिती केल्याचे दिसते.

या पुस्तकातून संशोधनासाठी पर्यावरण रक्षण या मूल्याची खोलवर माहिती मिळाली जी संशोधकास उपयोगी ठरली आहे.

२.०५.११ पत्रकारिता और जनसंचार के माध्यम

लेखक : डॉ. आर. एम. जाधव, डॉ. एस.एल. मुनेश्वर, डॉ संगीता शुक्ला, प्रा. अर्चना पत्की.

प्रकाशन : क्रियेटिव्ह पब्लिकेशन, नांदेड ४३१ ६०५.

प्रथमावृत्ती :

पाने : २६४

ISBN-9789380745091

हे हिंदी भाषेतल पत्रकारिता आणि जनसंवादाची माध्यमांची माहिती करून देणारे पुस्तक आहे. या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आले आहेत. या पुस्तकात ९ प्रकरणे असून विविध पत्रकारितेची माहिती या पुस्तकात करून देण्यात आली आहे. पहिल्या विभागात पत्रकारिता व दुसरा विभाग जनसंचार माध्यम पहिल्या विभागात पत्रकारितेत वेगवेगळ्या अंगाने केले जाणारे लिखाण त्यांचे प्रकार व हे लिखाण कसे असते याची माहिती या पुस्तकात करून देण्यात आली आहे. तसेच पत्रकारितेच्या संदर्भात असणारे कायदे आचारसंहिता यांची माहिती करून दिली आहे. तसेच संविधानाने दिलेल्या अभिव्यक्तीच्या संदर्भातील मौलिक अधिकारांची चर्चा केली आहे. हिंदी पत्रकारिता उदय आणि विकास यांची चर्चा या पुस्तकात करून देऊन ऐतिहासिक माहिती देण्यात आली आहे व हिंदी पत्रकारिता कशी विकसीत होत गेली आहे याची चर्चा केली आहे. बातमीचे विविध स्त्रोत कोणते? बातमी कशी मिळवली जाते याची चर्चाही या पुस्तकात करण्यात आली आहे.

विभाग दोन मध्ये ९ प्रकरणे आहेत या विभागात जनसंवादाचा अर्थ, स्वरूप, परिभाषा, प्रकार, जनसंवादाची भाषा, जनसंवादाची जबाबदारी यांची चर्चा या पुस्तकात करण्यात आली आहे. जनसंवाद व जाहिरात याचे प्रकरण पुस्तकात दिले असून जाहिरातीचे प्रकार, त्याचा परिचय यांची चर्चा करण्यात आली आहे. जनसंवादात केली जाणारी चर्चा आली आहे. जनसंवादाचे लेखन पध्दती, प्रकार, कौशल्ये या बाबत पुस्तकात माहिती आहे. मुद्रित माध्यमांसाठी केले जाणारे लेखन त्याची पध्दती, प्रकार, शीर्षक यांवर चर्चा करून विविध लेखन पध्दती सांगण्यात आल्या आहेत. रेडिओसाठी कसे लेखन केले जाते याची ही माहिती पुस्तकात दिली आहे. तसेच दूरदर्शनसाठी कसे लिखाण केले जाते याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे चित्रपटांसाठी केले जाणारे लिखाण याची खोलवर माहिती करून दिली आहे. पत्रकारिता व जनसंवाद क्षेत्राच्या विविध छोट्या मोठ्या पैलूंवर हे पुस्तक प्रकाश टाकते.

या पुस्तकातून संशोधनासाठी लागणारी पत्रकारिते बाबतची माहिती मिळते. पत्रकरितेतील लिखाण कौशल्ये कशी अवगत करता येतात तसेच जनसंवादाची असणारी माध्यमे कोणती याची माहिती मिळाली आहे ती संशोधनासाठी उपयोगी आहे.

२.०५.१२ हिंदी पत्रकारिता विविध आयाम

संपादक : डॉ. वैदिक वेदप्रताप

प्रकाशन : नैशनल पब्लिशिंग हाऊस, २३ दरियागंज, नई दिल्ली.

आवृत्ती : १९७६

पाने : ९७४

वरील पुस्तकात हिंदी पत्रकारितेचा आढावा घेताना पान नंबर ३५८ येथे अगदी थोडी माहिती मिळते. बनासर हास्य रस या पत्रकांची माहिती दिली आहे. यामध्ये 'अजगर', 'करेला', 'भूत', 'बेढब' ही वृत्तपत्रे निघत असल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर मोठी व्यंगचित्रे छापली जात असल्याची माहिती आहे.

या पुस्तकातून संशोधनासाठी असणारी ऐतिहासिक वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिता या बाबत माहिती मिळाली आहे. ही माहिती संशोधनासाठी उपयोगी आहे.

२.०५.१३ हिंदी–पत्रकारिता स्वरूप एवं प्रकार

लेखक : डॉ. सिंह अनुज प्रताप

प्रकाशन : ग्रंथनिकेतन, दिल्ली ३२

आवृत्ती : २००९

पाने : १७५

हे हिंदी भाषिक पुस्तक आहे. या पुस्तकात पत्रकारितेच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली आहे. तसेच व्यंगचित्रांवरही चर्चा करण्यात आली आहे. या पुस्तकातील पान नंबर २९,३०,३१ वर वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिते बाबत चर्चा केली आहे. यामध्ये व्यंगचित्राचा ऐतिहासिक माहिती सांगत व्यंगचित्रांचे प्रकार व त्यांचे महत्त्व विषद करून. हास्य व्यंग पत्रकारितेचे महत्त्व देखील सांगण्यात आले आहे.

या पुस्तकातून संशोधनासाठी व्यंगचित्र पत्रकारिता या क्षेत्राची माहिती मिळाली आहे. याचा उपयोग संशोधनासाठी आहे.

२.०५.१४ हिंदी–पत्रकारिता इतिहास एवं स्वरूप

लेखक : शिव कुमार दुबे

प्रकाशन : परिमल प्रकाशन, इलाहाबाद २११ ००

आवृत्ती : प्रथम १९९२

पाने : १६४

या पुस्तकात पत्रकारितेचे विविध आयम काय असतात याची माहिती दिली आहे. हिंदी पत्रकारितेचा इतिहास या पुस्तकात मांडला आहे. या पुस्तकातील पान नंबर १३३, १३४, १३५ वर वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिते विशेष नोंद घेतली आहे. हास्य–व्यंग चित्रांकन पत्रकारिता काय आहे याची माहिती लेखकाने करून दिली आहे. अभिव्यक्ती सशक्त बनवण्याचे साधन म्हणून वृत्तपत्रीय व्यंगचित्रकले पाहिले जाते असे लेखक मत मांडतात. हास्य व्यंग पत्रकारिता ही स्वतंत्र पत्रकारिता म्हणून जन्माला येत असल्याचे लेखक सांगतात. हे बौध्दिक काम आहे, रसिकांना वाचकांना विविध समस्या असतात त्या हसत हसत मांडणे ही अवघड कला आहे असे लेखक मांडतात. तो बौध्दिक चमत्कार आहे असे लेखक लिहितात. व्यंगचित्रांच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक बाबींवर भाष्य करता येते असे या पुस्तकात म्हणले आहे. भारत देश या कलेमध्ये आता पारंगत होत असल्याची नोंद या पुस्तकात आहे. भारतातील वृत्तपत्रीय व्यंगचित्र व वृत्तपत्रीय हास्य व्यंग कले बाबत ऐतिहासिक नोंदी मांडल्याचे दिसते.

या पुस्तकातून हास्य व्यंग पत्रकारिता व व्यंगचित्र पत्रकारिता या बाबत संशोधकास उपयोगी माहिती मिळली आहे.

२.०५.१५ कार्टून कौतुक

लेखक : देवेंद्र

प्रकाशन : हिंदी साहित्य निकेतन, १६ साहित्य विहार, बिजनौर, उ.प्र.

आवृत्ती : प्रथम २०००

पाने : १६४

हे पुस्तक हिंदी भाषिक आहे, या पुस्तकात लेखकाने वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरे काय करू शकतात याची माहिती दिली आहे. व्यंगचित्र जीवनाचा एक अविभाज्य भाग

आहेत, सशक्त अशी भूमिका घेऊन ती विरोधी पक्ष म्हणून काम करतात. लोकशाही व्यवस्थे ह वृत्तपत्रीय व्यंगचित्रे ही अत्यंत महत्वाचे काम करतात. या पुस्तक कार्टून : जीवन की मूक आलोचना. असे सांगत लेखक व्यंगचित्रांचे दोन हजार वर्ष जूनी व्यंगचित्रांचे उदाहरहण म्हणून अंजठा गुफे तील मुर्तीकाम पहावे असे ही ते सांगतात. भृगु संहितेत व्यंगचित्रांचा उल्लेख आहे. अशी ऐतिहासिक माहिती देत व्यंगचिचे इतिहासातही महत्व असे सांगतात. व्यंगचित्रांनी परिपूर्ण असे सर्वप्रथम पत्र फ्रान्स मध्ये प्रसारित झाले त्याचे नाव 'चारी–बारी' हे होते. भारतामध्ये १९ व्या शतकाच्या २० व्या शतकाच्या प्रारंभी व्यंगचित्रांची सुरूवात झाल्याची माहिती देतात. व्यंगचित्रे ही राजनितिक व सामाजिक स्वरूपाची असतात अशीही माहिती लेखक देतात. राजकीय व्यंगचित्रे ही नेहमी व्यापक प्रभाव व परिणाम पाडणारे विषय निवडतात तर सामाजिक व्यंगचित्रांमध्ये समाजाची उपरोहात्म विवेचन केलेले असते असे लेखक मांडणी करतात.

या पुस्तकातून वृत्तपत्रीय व्यंगचित्र संशोधनासाठी उपयोगी असणारी माहिती मिळाली आहे.

२.०५.१६ हिंदी सिनेमा में चित्रित पत्नी उत्पीडन

लेखक : डॉ. चंद्रकांत मिसाल

प्रकाशन : ॐ व्हिजन अॅकॅडमी, सदाशिव पेठ, पुणे ३०.

आवृत्ती : प्रथमावृत्ती २०१३

पाने : ७६

या पुस्तकातील पान नंबर ४, ५, ६, ७ व ८ वर सिनेमा या माध्यमाचा समाजावर व समाजाचा सिनेमा या माध्यमावर पडलेला प्रभाव पडत असल्याचे लेखक सांगतात. चित्रपटांवर समाजाचा परिणाम होत असतो. समाजामध्ये जे घडत आहे जे दिसते आहे ज्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अंगाने प्रभाव आहे त्याचा परिणाम चित्रपटांवर होत असतो अशी मांडणी लेखक करतात. त्यासोबतच चित्रपटाचाही समाजावर प्रभाव व परिणाम होत असतो असे लेखक मांडतात.

या पुस्तकत चित्रपटांचा परिणाम यावर चर्चा करण्यात आली आहे. माध्यमांचा होणारा परिणाम कसा होतो याची माहिती मिळाली. ही माहिती संशोधकास उपयोगी आहे.

२.०५.१७ सामाजिक नियंत्रण एवं परिवर्तन

लेखक : डॉ. हरिश्चद्र श्रीवास्तव एवं डॉ. चन्द्रिका प्रसाद श्रीवास्तव

प्रकाशन : अरविन्द विवेक प्रकाशन, आगरा २८२ ००२

आवृत्ती : १९८०

या पुस्तकामध्ये सामाजिक नियंत्रण कसे करावे याची समाजशास्त्रीय पध्दतीने मांडणी केली आहे. या पुस्तकामध्ये कला व संप्रेषणा बाबत पान नंबर ९५ ते १०३ या पानांवर खालील कलेची सामाजिक भूमिका काय असावी? याची माहिती दिली आहे. कलेच्या माध्यमातून विचार स्विकारले जातात याची असे लेखक मत मांडतात. कला हे संप्रेषणाचे महत्वाचे माध्यम असल्याचेही लेखक सांगतात. तत्त्वे, विचार, आचार, सांस्कृतीक हे सर्व कलेद्वारे समाजपर्यंत नेता येते असे लेखक मांडतात. चित्र, कविता, उपन्यास, नाटक, शिल्प, नृत्य, संगीत इत्यादी या कला आहेत याची माहिती लेखक करून देतात. सामाजिक विचार लोकांपर्यंत नेण्यासाठी कलेचा उपयोग होवू शकतो याची माहिती लेखक आपल्या लेखनातून करून देतात. सहज साध्या पध्दतीने रूजेल पचेल अशा पध्दतीने कला काम करते लेखक मांडणी करतात. समाजाचे मत प्रकट करणे हे कलेचे काम असल्याचे लेखक सांगतात. कलेद्वारे तत्त्वज्ञानाचा प्रसार होतो. हास्यव्यंग कला ही समाजात कशी उपयोगाची आहे? तिचे महत्व काय आहे? याची माहिती या पुस्तकात आहे.

या पुस्तकातून संशोधकास संवादाची वेगवेगळी माध्यमे कोणती याची जाणीव झाली. कला हे संप्रेषणाचे महत्त्वाचे माध्यम आहे त्यामुळे व्यंगचित्र सदरासाठी वापरली जणारी कला ही संवादाचे माध्यम आहे याची माहिती संशोधनासाठी मिळते ही माहिती संशोधनासाठी उपयोगी आहे.

२.०५.१८ Everymana´s Encyclopedia

Ediated by- Girailing D.A.

J.M. Dent and Sons Ltd., London.

Vol No.2 L.A. BARTER

Melourne Toran 1978.

या पुस्तकात जागतिक पातळीवरील विविध बाबीची माहिती पुरवली आहे. या पुस्तकात पान नंबर ४४ वर कार्टून बाबत माहिती मिळते कार्टून काय आहेत. कार्टूनचे काम काय आहे. वृत्तपत्रात त्याचा वापर केल्याने काय होते. त्याला इतर कोणत्या नावाने संबोधले जाते याची माहिती मिळते. तसेच कार्टून हे कसे असते ते कसे वापरले जाते याची माहिती या पुस्तकात आहे.

या विश्वकोशातून संशोधनासाठी व्यंगचित्राबाबतची माहिती मिळाली. व्यंगचित्र या शब्दांचे स्पष्टीकरण लक्षात आले. संशोधनसाठी ही माहिती उपयोगी ठरते.

२.०५.१९ The art of contemporary caricature

Heller S.

New Yourk, 1992.

या पुस्तकात व्यंगचित्र हे संवादाचे महत्वाचे साधन आहे. त्याचे वृत्तपत्रामध्ये अनन्यसाधारण असे महत्व आहे याची माहिती लेखकाने दिली आहे. व्यंगचित्रकला ही वाचकांना आवडणारी व त्यांच्यावर जबरदस्त असा प्रभाव पाडणारी कला आहे असे लेखकाने मांडणी केली आहे. व्यंगचित्र वाचकांचा असा स्वतंत्र वर्ग असल्यानी नोंद घेतो.

या पुस्तकातून संशोधकाला व्यंगचित्रसदराचे महत्त्व समजले. संशोधनासाठी व्यंगचित्राचे महत्त्व आहे हे या पुस्तकातून संशोधकास कळाले.

२.०६ संबंधीत नियतकालिकाचा आढावा

नियतकालिकात प्रकाशित झालेले माहितीवजा व सैध्दांतिक स्वरूपातील वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिता, मूल्ये, कला या संदर्भातील माहिती यांचा समावेश करण्यात आला आहे.

२.०६.०१. नियतकालीकाचे नाव : साप्ताहिक युगांतर

लेखक : राहु वैद्य.

लेखाचे नाव : कला आणि ऑक्टोबर क्रांती !

संपादक : डॉ. भालचंद्र कानगो.

प्रकाशन : गोविंद आनंद पाटकर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिल, मुंबई ४०० ००४.

अंक : १७ व १८, २६ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१७.

पाने : १६.

या नियतकालिकात पान नंबर ३, ४, ५, ६ व ७ वर कला आणि ऑक्टोबर क्रांती याबाबत 'रस्ते आमचे कुंचले आहेत, आणि चौक हे रंगमिरणासाठीचे पॅलेट–ब्लादिमीर मायकोव्हस्की यांचा अनुवादित लेख दिला आहे. ऑक्टोबर क्रांती ही रशियातील मार्क्सवादी विचारांच्या आधाराने कामगार व शेतकरी यांनी केलेली क्रांती होती ही क्रांती करती असताना मार्क्सवाद कला कशी उपयोगी आली. मार्क्सवादी कलेचे ध्येय काय असते तिची उद्दिष्टे काय आहेत याची माहिती दिली आहे. तसेच मार्क्सवादी कलाकार व आधुनिक कलाकार कसे गुंतागुंतीचे समीकरण होत आहे याचा आढावा घेतला आहे.

मार्क्सवाद आणि आधुनिक कलाकार–एक गुंतागुंतीचे समीकरण मांडतो. लेखकाने भांडवली देशाने केलेल्या आर्थिक रचनेचा पर्यावरण, समाज व कष्टकरी जनता यावर होणारा परिणाम काय आहे याचा आढावा आपल्या लेखात घेतला आहे. हा आढावा रशियन क्रांतिला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने घेतला आहे. हे भांडवली आर्थिक आरिष्ट संपवाचे ध्येय बाळगून रशियात क्रांति झाली यावेळी वापरण्यात आलेल्या क्रांती दरम्यानच्या कलेचा आढावा लेखकाने घेतला आहे. लेखक ऑक्टोबर क्रांती आणि सोविएत कला यांचा या व्यापक पटलावर आभ्यास करणे गरजेचे असल्याची मांडणी करतात. 'युरोपातील प्रस्थापित–विरोधी सोशल डेमोक्रॅट आणि ही सांस्कृतिक बंडखोरी, बाहेमियन कलावत हे तर दोन्ही 'आऊ टसायडर' होते, बूर्ज्वा प्रस्थापिततेच्या विरोधात होते, वयाने तरूण होते, आणि बंडखोर, बोहेमियन कलावंत हे तर बहुधा गरीबच असत'. अशी मांडणी त्यांनी आपल्या लेखात करून कष्टकरी वर्ग कशी कला सादर करू शकतो याची मांडणी केली आहे. डाव्या आणि आधुनिक कला–चळवळी यांच्यात अनेक साम्यस्थळे असल्याचे मांडणीही लेखक आपल्या लेखात करतात. मार्क्सवादी कलाकरांनी दृश्यकलांना अधिक महत्त्व दिले तसेच कलाकारांवर मार्क्सवादाचा प्रभाव होता याची मांडणी करतात. कलाकाराला मजूर म्हणून बघणारा भांडवली कलाकार या काळात बंड करत असल्याची माहिती त्यांनी आपल्या लेखात करून दिली आहे.

स्थापत्यकलेवर मार्क्सवादाचा प्रभाव पडला होता याची ही माहिती ते आपल्या लेखात करून देतात. थोर चित्रकार पिकासो हा स्पेनमधील यादवी युध्द आणि फॅसिस्टविरोधी लढ्यातील कम्युनिस्ट योगदानाने प्रभावित होऊन फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य बनला याची माहिती देऊन साम्यवादी–मार्क्सवादी कलेचे महत्व त्यांनी आपल्या लेखात स्पष्ट केले आहे. चार्ली चॅप्लिन, सार्त्र, ब्रेटन हे कम्युनिस्ट पक्षसदस्य देखील होते याची माहिती या लेखात करून देऊन मार्क्सवादी कलेचे महत्व ते या लेखातून सांगतात. प्रागतिक आणि प्रस्थापितांच्या विरूध्द उभी ठाकलेली आधुनिक कला आणि मार्क्सवाद यांच्यातील ही देवाणघेवाण आधुनिक संस्कृती समृध्द करणारी ठरली असे त्यांनी आपल्या लेखाच्या माध्यमातून मांडले आहे. १८९० ते १९३० ह्या काळात रशियन अवांड–गार्ड कला बहरल '१९१५ ते १९३२ ह्या काळात मॉस्को आणि पेट्रोग्राड (१९२४ नंतर लेनिनग्राड) या शहरांत घडून आलेल्या कला आणि राजकीय क्रांत्यांमुळे आधुनिक कला आणि इतिहास यांचा प्रवाहच बदलला असल्याचे ते सांगतात. कष्टकरी कला सौंदर्यशास्त्र बदलून गेले असल्याची माहिती ते आपल्या लेखनातून दाखवून देतात. रशियन चित्रपट तसेच इतर कला तसेच रशियन भित्तीपत्रके यांची माहिती देतात. भित्तीपत्रकाव्दारे श्रमिकांना ऑक्टोबर क्रांतिचा अर्थ सममाजून सांगण्याचे काम झाले असे लेखक सांगतात. केवळ प्रचार करणे हा उद्देश या भित्तीपत्रकांचा नव्हता तर श्रमिक वर्गाला सोबत घेवून जाण्याची जबाबदारी या पत्रकांनी स्विकारलेली वेगळी मार्क्सवादी कलाकारी सादर केली होती असे लेखक मांडतात. स्त्रीमुक्तीचे गीत सांगणारी कला म्हणजे मार्क्सवादी कला असे लेखक मांडणी करतात. तसेच आजच्या भांडवली साम्राज्यवादी आत्मकेंद्री व स्वार्थी वातावरणात मार्क्सवादी कला हीच मानवतेकडे घेवून जाईल असा विश्वास आपल्या लेखनातून व्यक्त करतात.

सदर पुस्तकात संशोधनासाठी कला या माध्यमाचे महत्त्व कळते. साम्यवादी कलेची मांडणी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणारी असते. विचारप्रवर्तक असते हे संशोधकास कळाले. ही माहिती संशोधनसाठी उपयोगी आहे.

२.०६.०२. नियतकालीकाचे नाव : साप्ताहिक युगांतर

अग्रलेखाचा मथळा : भारतीय प्रजासत्ताक व कॉमन मॅन.

संपादक : डॉ. भालचंद्र कानगो.

प्रकाशन : गोविंद आनंद पाटकर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिल, मुंबई ४०० ००४.

अंक : ३२, २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०१५

पाने : १६

या साप्ताहिकामध्ये आर. के. लक्ष्मण यांच्या जाण्यानंतर त्यांना आदरांजलीपर लिखाणातून त्यांनी व्यंगचित्रातून सर्वसमान्यांच्या मांडलेल्या व्यथांची दखल पुढील संपादक आपल्या संपादकीमधून घेतात ते म्हणतात, ''२०१४ च्या लोकसभा निवडणूकीने भारतीय राजकारणातील व समाजातील महत्त्वाचा बदल समोर आणला आहे. सामान्य माणसांची पिछेहाट, कॉपोरेट जगताचा बोलबाला सांगणारे हे बदल आहेत याच काळात भारतीय सामान्य माणसांच्या व्यथा, वेदना व अपेक्षा मांडणारा 'कॉमन मॅन म्हणजे सामान्य मनुष्य' आपल्या व्यंगचित्रातून अजराम करणारे आर. के. लक्ष्मण पडद्याआड गेले आहेत. भारतीय राजकारणातून सामान्य माणसाच्या हद्दपारीचे दु:ख यापुढे समर्थपणे कोण मांडणार? हा प्रश्न त्यामुळे पडला आहे. या महान व्यंगचित्रकाराला युगांतरची विनम्र आदरांजली.

आम्ही या कॉमन मॅनच्या समस्या व व्यथा आणि आपेक्षा यांना सदैव डोळ्यापुढे ठेवून समाज बदलण्याचा आमचा संकल्प जारी ठेवू हाच संकल्प या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आम्ही करीत आहोत''[१]

साप्ताहिक युगांतर या नियतकालिकामध्ये वरील माहिती मिळाली. २६ जानेवारी २०१५ रोजी भारतातील नामवंत जेष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण हे गेल्यानंतर त्यांच्या व्यंगचित्र केलेचा सर्वसामान्य नागरिकांना काय फायदा झाला आहे. याची मांडणी सदर अग्रलेखात करण्यात आली आहे. त्यासोबतच या व्यंगचिकाराच्या जाण्याचे दु:ख मनात बाळगत सर्वसामान्यांच्या व्यथा, दु:ख मांडणाऱ्या व्यंगचित्रकराला डोळ्यासमोर ठेवूत असा संकल्पही संपादक आपल्या अग्रलेखात करतात.

प्रस्तुत संशोधनासाठी व्यंगचित्रकार कशा प्रकारे व्यंगचित्रातून सर्वसामान्यांच्या व्यथा, त्यांचे प्रश्न मांडतात याची माहिती मिळते ही माहिती सदर संशोधनासाठी मूलभूत स्वरूपाची व उपयोगाची आहे.

२.०६.०३. नियतकालिकाचे नाव : साप्ताहिक युगांतर.

व्यंगचित्राचा मथळा : सामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या व्यंग चित्रकारास भाकप व युगांतर कडून भावपूर्ण श्रध्दांजली.

संपादक : डॉ. भालचंद्र कानगो.

प्रकाशन : गोविंद आनंद पाटकर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिल, मुंबई ४०० ००४.

अंक : ३२, २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०१५

पाने : १६

पान नंबर : १

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलच्या मालकीचे असणारे व डॉ. भालचंद्र कानगो हे संपादक असणाऱ्या साप्ताहिक युगांतर या नियतकालीकाने आर. के. लक्ष्मण यांच्या निधनानंतर त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी खालील व्यंगचित्र मुखपृष्ठावर छापले होते. ते पुढील प्रमाणे आहे,



२.०६.०४. नियतकालिकाचे नाव : मासिक प्रबोधन प्रकाशन ज्योती.

प्रकाशन : प्रसाद माधव कुलकर्णी, समाजवादी प्रबोधिनीच, इचलकरंजी, ४१३ ११५.

अंक : ३२७, फेब्रुवारी २०१५

पाने : १६

पान नंबर : १

समाजवादी प्रबोधिनीचे व प्रसाद कुलकर्णी हे संपादक असणाऱ्या मासिक प्रबोधन प्रकाशन ज्योती या नियतकालीकाने आर. के. लक्ष्मण यांच्या निधनानंतर त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी खालील व्यंगचित्र मुखपृष्ठावर छापले होते. ते पुढील प्रमाणे आहे,



२.०७ संबंधित वृत्तपत्रांचा आढावा.

वेगवेगळ्या वृत्तपत्रातून व्यंगचित्रे, मूल्ये तसेच पत्रकारिते बाबत प्रकट झालेली मते, लेख, मुलाखती यांचा विचार या विभागात करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी लागणाऱ्या संबधित वृत्तपत्रांचा आढावा घेण्यात आला आहे.

२.०७.०१ प्रकाशन : दैनिक महाराष्ट्र टाईम्स

प्रकाशन दिनांक : ४ जानेवरी, १९९९.

सदर वृत्तपत्रामध्ये व्यंगचित्रकार राज ठाकरे यांची मुलाखत सुरेश लोटलीकर यांनी घेतली होती. ही मुलाखत पान नंबर १० वर राज ठाकरे यांच्या कुंचल्यातील व्यंगचित्राबाबत माहिती मिळते.

''**राज ठाकरे यांच्या कुंचल्यातील व्यंगचित्रे**

कुठल्याही व्यक्तित्वाचे धागेदोरे काक दृष्टिने पिंजून-पिंजून अशा रेषा निवडल्या जातात. ज्या बोलतात मग ते रेषांचं तंतूचित्र ताणलं की, त्या अधिकच उत्कट होतात, भरभरून बोलतात, ते बघणे बोलणाऱ्याला कळले तर अर्कचित्रं जमलं...

● व्यंगचित्रकारितेकडे कसे वळलात?

घरात काका म्हणजे बाळासाहेब आणि वडिल श्रीकांत ठाकरे दोन्ही उत्कृष्ठ व्यंगचित्रकार असल्यामुळे चित्रकलेचे संस्कार लहानपणापासूनच मनात रूजले. शाळेतही बापट नावाच्या चित्रकलेच्या शिक्षिका होत्या त्यांनीही चित्रकलेसाठी बरचं प्रोत्साहन दिलं.

● त्याचवेळेस नंतर चित्रकार व्हायचं असं ठरवलं होतं का?

तसा कांही विचार तेव्हा केलेला नव्हता. त्याच सुमारास एकदा बाळासाहेबांनी मला मार्मिकसाठी स्केचिंग आणि इंफिं ग करून देण्यासाठी काही व्यंगचित्र दिली होती. मला ते 'टिन्या' म्हणतात. आमच्या टिन्याने चितारलेलं उदयाचे चित्र या मथळ्याखाली ते मार्मिकमध्ये प्रसिध्द ही झाले होते. तेव्हा मी सहावीत असेल. पुढ चित्रकलेएवढा कोणताच विषय चांगला वाटला नाही आणि इतरांना बऱ्याचदा असतो तसा कला महाविद्यालयात जाण्यास मला घरून विरोधही झाला नाही.

● मग कला शिक्षण चौथ्या वर्षात अर्धवट का सोडलं?

मुळात ओढा होता तो व्यंगचित्रकलेकडे, खास करून राजकीय व्यंगचित्राकडे, याच विषयात करियर करायचं होतं आणि ज्या विषयात करियर करायचं त्या विषयातला बादशाह घरातच असतांना मग कला महाविद्यालयात का जाता? हा प्रश्न पडला आणि आपल्याकडे कला महाविद्यालयात व्यंगचित्र हा विषय म्हणून शिकविला जात नाही. याच सुमारास बाळासाहेबांनी ८५ साली व्यंगचित्र काढणं बंद केलं आणि त्यानंतर मार्मिकसाठी व्यंगचित्र काढण्यास मी सुरूवात केली.

● व्यंगचित्रकार म्हणून खरी मान्यता कधी मिळाली?

८८ साली मे महिन्यात माझं पहिलं व्यंगचित्र प्रसिध्द झालं. तेव्हा लोकसत्ताचा वाचक वर्ग खूप मोठा असल्याने व्यंगचित्रकार म्हणून मराठी माणसाच्या मनात घर करण्यास संधी मिळाली.

● अर्कचित्रात एखादी व्यक्तीत्व आव्हानात्मक वाटलं का?

अर्कचित्रात नेहमी रेषा जमणं हेच महत्त्वाच असतं, एखादी रेषा चुकली तर आचार्य अत्र्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा नाना पाटेकरांचा व्हिवियर रिचर्डस होऊ शकतो.

● व्यंगचित्रकारावर वृत्तपत्राच्या धोरणाचा काही परिणाम होतो का?

हो नक्की होतोच..! वृत्तपत्राच्या धोरणाबाहेरील किंवा हितसंबंधी यांच्या विरूध्दची व्यंगचित्र संपादकीय विभाग छापण्यास नकार देत. माझ्या बाबतीत लोकसत्तात असं घडलं आणि तेथून मी लोकसत्तात व्यंगचित्र काढणे थांबवले.

● राजकारणाच्या गदारोळात छंद हरवल्या सारखा वाटतो का?

हो तसा विशेष वेळ दिला जात नाही, पण राजकारणात वावरत असल्याने राजकीय व्यंगचित्र काढतांना मला फायदाच झाला. राजकीय व्यक्तिच्या व्यक्तिरेखा आणि स्वभाव या दोघांना जवळून पहायला मिळालं. त्यामुळे व्यक्तींची अर्कचित्रे काढणं सोपं झालं.

● व्यंगचित्र काढतांना ॲनिमेशनकडे वळावं असं कधी वाटलं का?

हो आगोदर डिस्नेनस जाऊ न आपण काम करावं अस वाटायचं पण राजकारणात पडल्याने ते शक्य नव्हत आता स्वतःच ॲनिमेशन स्टुडिओ टाकायचा विचार करतोय, पुढील वर्षात त्यावर काम सुरू झालेलं असेल.

● मराठी वृत्तपत्रीय व्यंगचित्रांबाबत तुमचं मत काय?

साधारण सर्वच मराठी वृत्तपत्रातून व्यंगचित्र आपल्याला पहायला मिळतात. मुळात मराठी व्यंगचित्रकला ही भारतात महाराष्ट्रात सर्वात आगोदर काळत विकसित झाली. परंतु योग्य रेषा आणि विनोद, करूणा यांचा मेळ मात्र आजच्या व्यंगचित्रांमध्ये विकसित झालेला दिसत नाही.''[२]

वृत्तपत्रात छापलेल्या या मुलाखतीतून व्यंगचित्राचे महत्त्व लक्षात येते. व्यंगचित्र काढताना व ती छापताना घ्यावयाची काळजी याची माहिती मिळते. व्यंगचित्राबाबत संशोधन करीत असताना ही मुलाखत मार्गदर्शक ठरते.

२.०७.०२ प्रकाशन : पुढारी पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटड

वृत्तपत्र पुरवणीचे नाव : अंकुर

प्रकाशन दिनांक : ६ नोव्हेंबर, २०१०.

सदर वृत्तपत्रामध्ये प्रश्न–उत्तर ह्या स्वरूपात वृत्तपत्रीय व्यंगचित्राबाबत पान नंबर ०१ वर पुढील माहिती मिळते.

''**व्यंगचित्रे आणि चित्रपट्टे**

- कार्टूनची सुरूवात केव्हा झाली?

व्यंगचित्रांची सुरूवात नक्की केव्हा झाली? हे सांगणे कठीण आहे. परंतु १७५० च्या सुमारास व्यंगचित्रे लोकांच्या नजरेला यायला लागली. कार्टून्स चित्रपट्टे १९०० च्या पहिल्या दशकात सुरू झाले.

- प्रारंभीचे व्यंगचित्रकार कोण?

पहिले व्यंगचित्र अमेरिकेच्या ९ मे १७५४ च्या वृत्तपत्रात आल्याचे आढळते. ते बेंजामिन फ्रँकलिनने काढले होते. त्या काळातील या इतर व्यंगचित्रकारांची नावे हागार्थ, गोया आणि जेमियर.

- जुन्या काळातले रंजक चित्रपट्टे कोणते?

बस्टर ब्राउन (१९०२) हा पहिला रंजक चित्रपट नंतरचे पट्टे म्हणजे मट्ट अँड जेफ, ब्रिगींग अप फादर (१९१२) हा चित्रपट्टा अजून लोकप्रिय आहे. मिकी माऊस चा जन्म १९२८ मध्ये झाला.''[३]

वृत्तपत्रात छापलेली ही माहिती संशोधकास मूलभूत माहिती पुरवीते. संशोधन करीत असताना ही माहिती मार्गदर्शक व उपयोगी ठरली आहे.

२.०७.०३ प्रकाशन : दैनिक लोकमत

लेखाचे नाव : कॉमन मॅननेच मला शोधले

लेखकाचे नाव : गिरीश मिश्र

प्रकाशन दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१२.

पान नंबर : ४

सदर वृत्तपत्रामध्ये गिरीश मिश्र यांनी आर. के. लक्ष्मण यांच्या वाढदिवसा निमित्ताने संपादकीय पान नंबर ४ वर 'कॉमन मॅननेच मला शोधले' या मथळ्याखाली लेख लिहिला होता. त्या लेखातून आर. के. लक्ष्मण या प्रसिध्द वृत्तपत्रीय व्यंगचित्रकराच्या व्यंगचित्रकारीतेबद्दल माहिती मिळते.

''● लक्ष्मण स्वतःला आम आदमी समजतात. ''हा आदमी सदैव त्यांची साथ करीत असतो.'' असे त्यांचे म्हणणे असते. त्यांनी आम आदमीचा शोध घेतला नाही, तर आम आदमीने त्यांचा शोध घेतला आहे. हा आम आदमी लाखो मूक लोकांच्या भावना बोलत असतो. तो जगातील अशा सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करीत असतो. जे पुढे सरकणाऱ्या काळाकडे शांततेने बघत असतात. त्यांच्या या भावना आहेत, कारण आम आदमीला समजून घेण्यासाठी त्यांची वैशिष्ट्ये जाणून घेत त्यांच्याशी समरस व्हावे लागते. तेव्हा कुठे 'आम आदमी' त्यांना भेटतो.

● लक्ष्मण यांनी सर्वप्रथम कार्टूनचे स्वतंत्र दालन निर्माण केले. एवढे महान कार्टूनिस्ट असतानाही त्यांचा ब्रश घाणेरड्या नाल्या, बाथरूमचे तुटलेले नळ व त्यातून टपकणारे पाणी, रस्त्यातल खड्डे, ट्रॅफिक जॅम, झोपडपट्टीतील नरकतुल्य जीवन, नेत्यांची खोटी आश्वासने व त्या दडलेला अंतिर्विरोध, राजकारण, समाज व आम आदमी यांच्यातील विसंगती रेखांकित करीत राहीला. कधीच न बदलणारे चुरगळेलेले धोतर, त्यावर रेघांचा कोट असलेल्या आम आदमीच्या डोक्यावर टी.व्ही. च्या ॲन्टेनासारखे दिसणारे तुरळक केस त्यातून ते व्यंग दाखवितात.

● कधी कधी ओठावर तरंगणारे हास्य असते. गंमत म्हणजे त्यांच्या व्यंगचित्रात कुत्रा, मांत्रर आणि उंदीर हे प्राणी कधी ना कधी आढळतात. पक्ष्यांमध्ये लोकांना न आवडणारा कोवळा हा पक्षी त्यांचे आकर्षणारे स्थान आहे.

● लक्षात ठेवण्यासरखी बाब म्हणजे त्यांच्या कार्टूनमध्ये भविष्याविषयीचे कोणतेच आश्वासन नसते, कोणता संदेश नसतो. केवळ वर्तमानस्थितीचे दर्शन असते, त्या वर्तमानाला ते व्यंगाच्या माध्यमातून अभिव्यक्त करतात. ही अभिव्यक्ति कॉमन मॅनच्या मूकपणातून व्यक्त होते.

● त्यांच्या व्यंगचित्रात त्यांच्या अध्ययनाची झलक पहायला मिळते. तसेच कधीच न बदलणारा जीवनातील कडवट सच्चेपणाही पहायला मिळतो. तो वाईटाकडून अधिक वाईटाकडे जात असतो. भ्रष्टाचार, अपराध, अशिक्षितपणा, घाण या सर्वांनी त्रस्त झालेला 'आम आदमी' सगळे ऐकत असतो. पण, बोलत मात्र काहीच नाही. त्यांची नाराजी, त्यांचे दु:ख, त्याची असहाय्यता हे सर्व त्यांच्या ऐकण्यातूनच अभिव्यक्त होते. तो अनेक वर्षांपासून हेच पाहत आला आहे. ऐकत आला आहे.

● त्यांनी कार्टून या माध्यमाच्या दुरान्वयानेही उपयोग केला नाही. आम आदमी केवळ समाजातील विसंगती, अंर्तविरोध, भोंदूपणा तसेच राजकारण, समाजकारण, अर्थव्यवस्था आणि जीवनातील मूलभूत प्रश्न कार्टूनच्या माध्यमातून व बघत असतो. तेही अत्यंत शांत आणि सभ्यपणा बाळगीत. ते स्वत:च एक न संपणारे आंदोलन आहेत. असे आंदोलन ज्यात कोणतीही आरडाओरड नाही, मोर्चे नाही, आहे फ क्त बौध्दिक प्रखरता, शंकराप्रमाणे जे सगळे विष प्राशन करून पचवीत असतात. ''[४]

वृत्तपत्रात छापलेला लेख हा प्रसिध्द व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या वृत्तपत्रीय व्यंगचित्र कलेबाबत माहिती देणारा आहे. व्यंगचित्रावर संशोधन करीत असताना हा लेख अत्यंत उपयोगी ठरला आहे.

२.०७.०४ वृत्तपत्राचे नाव: दैनिक केसरी, सोलापूर आवृत्ती.

व्यंगचित्राचा मथळा : सामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या व्यंग चित्रकारास भाकप व युगांतर कडून भावपूर्ण श्रध्दांजली.

लेखाचे नाव: 'कॉमन मॅन' चा अंकुश कायम राहिल.

लेखक: डॉ. शां. ब. मुजुमदार.

दिनांक: २८ जानेवारी २०१५.

पान नंबर: १.

आर. के. लक्ष्मण हे भारतातील वृत्तपत्रीय व्यंगचित्रकारीतेतील प्रसिध्द व्यक्ती होते. व्यंगचित्रातून सामान्य माणसांच्या व्यथा, गाथा ते मांडत राहिले. त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून मध्यमवर्गीय असा 'कॉमन मॅन' साकारला होता. त्यांच्या व्यंगचित्रात हा कॉमन मॅन सारखा दिसत असे. व्यंगचित्रात असणरा कॉमन मॅन सर्वसामान्यांच्या व्यथा मांडत प्रशासन व्यवस्थेवर

अंकुश ठेवणारे व्यंगचित्र अशी त्याची प्रतिमा निर्माण झाली होती. या बाबत माहिती देणारा लेख 'सिबॉयसिस इंटरनॅशनल यून्हसिटी' चे कूलगूरू डॉ. शां. ब. मुजुमदार आपल्या लेखात म्हणतात. ''आर . के . लक्ष्मण आपल्यातून निघून गेले असले तरी त्यांचा 'कॉमन मॅन' वाईट प्रवृत्तींवर कायमच अंकुश ठेवेल , अशा भावना सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी व्यक्त केल्या. आर. के. लक्ष्मण यांच्याशी फार वर्षे घरगुती संबंध होता. या घरोब्यातून त्यांच्या पत्नीने सिंबायोसिस मध्ये आर. के. यांनी 'कॉमन मॅन' चा पुतळा व्हावा अशी इच्छा व्यक्त केली त्यातून नऊ फुटी ब्रॉन्झचा पुतळा सिंबायोसिस महाविद्यालयात उभा करण्यात आला. त्याचे उद्घघाटन आर. के. यांचे ज्येष्ठ बंधु प्रसिद्ध लेखक आर. के. नारायण यांच्या हस्ते करण्यात आले होते. आर. के. अनिष्ट परंपरांच्या विरोधात होते त्यामुळेच त्यांचे पार्थिव रुग्णालयातून थेट सिंबायोसिस येथे अत्यदर्शनासाठी आणण्यात आले. आर. के. आणि कॉमन मॅनचे नाते इतके गहिरे होते की, त्यांचे निधन झाल्यावर कॉमन मॅनबरोबर ताटातूट होऊ नये म्हणून सिंबायोसिस येथील कॉमन मॅनच्या पुतळ्याशेजारीच त्यांना ठेवण्यात यावे अशी इच्छा त्यांच्या पत्नी कमला लक्ष्मण यांनी व्यक्त केली. अनेकदा आर. के. यांच्याबरोबर भेटी झाल्या . त्यापैकी एक आठवण कायम लक्षात राहिली. एकदा मी आर. के यांना विचारले, 'तुमचा देवावर विश्वास आहे का?' तर त्यांनी मला, म्हटले, तर त्यावर मी हो म्हटले. तर त्यावर तुमचा देवावर विश्वास आहे ठीक आहे, पण देवाचा तुमच्यावर विश्वास आहे का? असा प्रश्न त्यांनी मला केला. तो प्रश्न मला अंतर्मुख करुन गेला. अशा अनेक आठवणी आर. के. यांच्या बद्दलच्या आहेत. आर. के. आणि त्यांचा कॉमन मॅन पुण्याला व समस्त पुणेकरांना कायम लक्षात राहील. त्यांचा कॉमन मॅन समाजातील वाईट प्रवृत्तींवर कायम अंकुश ठेवेल. पुणे व पुणेकरांना वेगळी ओळख देणाऱ्या आर. के. यांची व्यंग्यचित्रे, सत्ता कोणाची येवो , राजकारण्यांवर कायमच अंकुश ठेवण्याचे काम करतील यात शंका नाही.''[५]

२.०७.०५ वृत्तपत्राचे नाव: दैनिक केसरी, सोलापूर आवृत्ती.

लेखाचे नाव: आर. के. लक्ष्मण यांचा जीवन प्रवास.

दिनांक: २८ जानेवारी २०१५.

पान नंबर: २.

आर. के. लक्ष्मण हे देशातील सुप्रसिध्द असे वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार होते. त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून अनेक राजकीय, सामाजिक अंगावर रेखाटने काढली. समाजात घडणाऱ्या घटनेवर सर्व सामान्यांच्या नजरेतून अचूक बोट ठेवले. त्यांचे निधन २६ जानेवारी २०१५ रोजी झाले. त्यांनतर दैनिक केसरी या मराठी भाषिक वृत्तपत्रामध्ये त्यांच्या जीवनावर पुढील लेखतून मांडला आहे. ''सुप्रसिद्ध लेखक आर. के. नारायण यांचे लहान भाऊ आणि सुप्रसिद्ध ज्येष्ठ व्यंग्यचित्रकार रासीपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण म्हणजेच आर. के. लक्ष्मण यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९२१ या देवशी म्हैसूर येथे झाला . वडील म्हैसूर येथील शाळेत मुख्याध्यापक होते. वडिलांच्या शाळेसाठी अनेक नियतकालिके त्यांच्या घरी येत असत. 'हार्पर्स' , 'पंच' , 'ऑन पेपर', 'बॉइज' , 'ॲटलांटिक' , 'अमेरिकन मक्युरी' , 'मेरी मॅगझिन' , 'स्टॅन्ड मॅगझिन' अशी मासिके त्यांना तिथे पाहायला वाचायला मिळत असत. लक्ष्मण यांना त्यांतील विविध विषयांवरील चित्रे पाहण्यात रस होता. तशी चित्रे आपणही काढून पाहावी असे त्यांना वाटू लागल्याने लक्ष्मण चित्रे काढू लागले.

कारकीर्द : अगदी सुरुवातीच्या काळात लक्ष्मण यांची चित्रे स्थानिक वर्तमानपत्रातून छापून येऊ लागली. मुंबईमधील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस येथे शिकण्यासाठी लक्ष्मण यांनी अर्ज केला होता, पण तेथे त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. मग आर. के. नी म्हैसूरच्या विद्यापीठातून बी. ए. ची पदवी संपादन केली. पुढे लक्ष्मण पदवीधर झाल्यावर नोकरी मिळविण्यासाठी दिल्लीला गेले. हिंदुस्थान टाइम्स या वृत्तपत्राने लक्ष्मण यांचे वय कमी असल्याचे कारण पुढे करून नोकरी नाकारली. मग काही काळ ब्लिट्झ मध्ये आणि नंतर फ्री प्रेस जर्नल मध्ये लक्ष्मण यांनी काम केले . त्यावेळी बाळासाहेब ठाकरे देखील तेथेच काम करीत असत. मात्र कम्युनिस्टांची टवाळी करायची नाही असा फ्री प्रेसच्या मालकांचा दंडक होता. म्हणून त्यांनी 'फ्री प्रेस' ची नोकरी सोडली त्यानंतर अर्ध शतकभर ते व्यंग्यचित्रे काढत राहिले. 'यू सेड इट' नावाने त्यांनी फक्त व्यंग्यचित्र असलेले एक सदर सुरू केले. दैनिकाच्या मुखपृष्ठावर आजतागायत नियमितपणे प्रकाशित होत असलेले हे सदर लोकांना खूप आवडले .

इतका दीर्घकाळ व्यंग्यचित्रे काढणारा हा बहुधा एकमेव व्यंग्यचित्रकार असावा. त्यांचा 'कॉमन मॅन' गेल्या पन्नास वर्षातील देशातील राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक घडामोडींचा – उलथापालथीचा साक्षीदार आहे. चौकटीचा कोट आणि धोतर अशा पेहरावातील त्यांची छबी

सतत कायमच राहिली आहे. जवाहरलाल नेहरु, महात्मा गांधीपासून अटल बिहारी वाजपेयी , सोनिया गांधीपर्यंत राजकीय व्यक्तींच्या अनेक पिढया त्यांनी रेखाटल्या आहेत एका साध्या रेषेतून या नेत्याचे व्यक्तिवैशिष्ट्य स्पष्ट करण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती.

लक्ष्मण यांची राजकीय व्यंग्यचित्रेसुद्धा बहारदार असतात . राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडीवर त्यांत बोचक टीका असते. पूर्वी जवाहरलाल नेहरूंचे ते बोलके व्यंग्यचित्र काढीत असत. तीच गोष्ट भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची. व्यंग्यचित्राप्रमाणेच विडंबनचित्र काढणे हाही लक्ष्मण यांचा हातखंडा होता. एरवी त्यांच्या राजकीय व्यंग्यचित्रांत ताज्या घटनांवर औपरोधिक भाष्य असे.

आर. के. लक्ष्मण यांची प्रकाशित पुस्तके – आयडल अवर्स आर. के. लक्ष्मणः अनकॉमन मॅन : कलेक्शन ऑफ वर्क्स फ्रॉम १९४८ ते २००८, द इलोक्वेन्ट ब्रश (व्यंग्यचित्रसंग्रह), द टनेल ऑफ टाईम (आत्मचरित्र; मराठीतमध्ये – लक्ष्मणरेषा), अ डोज ऑफ लाफ्टर (विनोदी अर्कचित्रे), दि डिस्टॉर्टेड मिरर (कथा , निबंध , प्रवासवर्णने २००३), फिफ्टी इयर्स ऑफ इन्डिपेन्डन्स थ्रू आईज ऑफ लक्ष्मण (व्यंग्यचित्रसंग्रह) , बेस्ट ऑफ लक्ष्मण (व्यंग्यचित्रसंग्रहांची मालिका , चार पुस्तके) , द मेसेंजर कादंबरी १९९३), अ व्होट ऑफ लाफ्टर (विनोदी अर्कचित्रे), द हॉटेल रिव्हिएरा (कादंबरी – १९८९).''[६]

२.०७.०६ वृत्तपत्राचे नाव : दैनिक केसरी.

लेखाचे नाव : सामान्य माणसाला वाली उरला नाही, आर. के. लक्ष्मण यांच्या निधनावर जेष्ठांची भावना.

पृष्ठ क्रमांक : २.

दिनांक : २८ जानेवारी २०१५.

आर. के. लक्ष्मण हे देशातील वरिष्ठ वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार होते. इंग्रजी, मराठी, हिंदी वृत्तपत्रामध्ये त्यांनी व्यंगचित्रे काढून सर्व सामान्यांची बाजू मांडली. त्यांची व्यंगचित्रे राजकीय, सामाजिक अंगाने भाष्य करणारी असत. त्यांच्या निधनानंतर समाजिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवून त्यांना आदरांजली दिली होती. या प्रतिक्रियातून व्यंगचित्रकार व त्यांची व्यंगचित्र पत्रकारिता किती प्रभावी असू शकते याची प्रचिती येते. ती पुढील प्रमाणे,

''सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर . के . लक्ष्मण यांच्या निधनाने एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सामान्य माणसांच्या मनातील भावना व्यंग्यचित्रांच्या माध्यमातून गेली पन्नास वर्षे सातत्याने मांडणारे आर. के. लक्ष्मण यांच्या निधनाने सामान्य माणसाला वाली उरला नाही, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली आहे.

देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) – कॉमन मॅन समाजात अंकुशाप्रमाणे कार्यरत राहीले आर. के. देशाचे वैभव होते. त्यांच्या जाण्याने एक प्रकारची पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी तयार केलेला कॉमन मॅन भारतातच नव्हे, तर जगात जिवंत राहिला. हा कॉमन मॅन सामाजिक राजकीय क्षेत्रात अंकुशाप्रमाणे कार्यरत राहील व समाजाला पथदर्शक असेल, आर. के. यांच्या आठवणी जीवंत राहतील, अशा प्रकारचे स्मारक राज्य सरकार तयार करेल.

प्रकाश जावडेकर (केंद्रीय मंत्री) – सकाळचे हसणे हरवले आहे. रोज सकाळी वृत्तपत्र उघडल्यानंतर आर. के. यांनी व्यंग्यचित्रांमधून मार्मिक टिप्पणी करुन हसवायचे. सर्वांची सकाळ चांगली करणारी व्यक्ती हरपली आहे. अग्रलेखाएवढेच प्रभावी व्यंगचित्र ते काढत असत. त्यांच्या जाण्याने सकाळचे हसणेच हरवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना ही बातमी समजल्यावर शोक संदेश व्यक्त केला व केंद्रातर्फे उपस्थित राहिलो आहे,

उद्धव ठाकरे (शिवसेनाओळख पक्षप्रमुख) – कुंचल्याचा शेवटचा सम्राट गेला – बाळासाहेब व आर. के. यांचे ऋणानुबंध सर्वज्ञात आहेत तीन–चार वर्षांपूर्वी बाळासाहेब व आर. के. यांची भेट एक हृदयस्पर्शी क्षण होता. त्यांच्यासारखा व्यंगचित्रकार आता होणे नाही. कुचल्याचा अखेरचा सम्राट आपल्यातून हरपला आहे.

गिरीश बापट (पालकमंत्री) – कुंचल्यातून समर्पित भावनेने समाजाची सेवा केली. ते जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार होते. आपल्या व्यंगचित्रांमधून हसत–हसत राजकीय पुढाऱ्यांना चिमटे घेऊन योग्य मार्गावर आणण्याचे काम केले. त्यांनी स्वतःचे विचार व्यंगचित्रांच्या माध्यमातून व्यक्त केले. कुंचल्यातून समर्पित भावनेने त्यांनी समाजाची सेवा केली.

विनोद तावडे (शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यमंत्री) – कॉमन मॅन पोरका झाला राजकीय लोकांना त्यांची व्यंगचित्र म्हणजे लक्ष्मण रेषा असायची. त्यामुळे पुढाऱ्यांनी ती रेषा कधीच ओलांडली नाही. पुढच्या पिढीला स्मरण राहिल, असे त्यांचे स्मारक तसेच त्यांचा जीवनपट राज्य सरकातर्फे उभा करू.

नीलम गोऱ्हे (आमदार) – शब्द व भाषेच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्यांची संवाद साधण्याची ताकद त्यांच्यात होती. बाळासाहेब व आर. के. याचे विशेष ऋणानुबंध होते. बाळासाहेब आजारी असतानाही त्यांनी आर. के. यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी पुण्यात आले होते,

श्रीनिवास लक्ष्मण (आर. के. लक्ष्मण यांचे सुपुत्र) – अनिष्ट परंपरेविरुद्ध बंड पुकारले – अनिष्ट परंपरेच्या नेहमी विरुद्ध त्याचे वागणे असायचे. त्यातूनच कॉमन मॅन आकाराला आला. भारताचे मंगळयान मंगळावर पोहोचल्यानंतर त्यांनी काढलेले ते व्यंगचित्र मला विशेष आवडले. बाळासाहेब ठाकरेंशी त्यांची जुनी मैत्री होती दोघांनीही अनिष्ट परंपरेविरुद्ध आपल्या व्यंग्यचित्रांमधून बंड पुकारले.

रवी परांजपे (ज्येष्ठ चित्रकार) – राजकीय मर्म उलगडण्याची रेषा पुसली गेली– व्यंगचित्रकार व चित्रकार यात त्यांनी कधीच फरक केला नाही. व्यंगचित्रकाराचे सर्व गुण त्यांच्यात होते. राजकीय पटलाला अत्यंत भावस्पर्शी दिशा देणारे खूप कमी आहेत. त्यापैकी एक आर. के. होते. त्यांची आनखी चांगल्या प्रकारे दखल घ्यायला हवी होती. त्यांच्या जाण्याने राजकीय मर्म उलगडणारी , 'रेषा' पुसली गेली आहे.

चारुहास पंडित (व्यंग्यचित्रकार) – वृत्तपत्रांमधून त्यांची व्यंगचित्रे पाहून त्यांच्याशी लहानपणीच ओळख झाली. विनोदी, राजकीय व्यंगचित्रांबरोबरच त्यांनी विज्ञान तंत्रज्ञान, व्यवस्थापन, व्यवसाय, लहान मुलांवरील चित्रेदेखील काढली.

विकास सबनीस (व्यंग्यचित्रकार) – माझी शाळा हरवली – आजच्या काळात आर. के. यांची जास्त गरज होती. आर. के. यांच्या जाण्याने सध्या व्यंग्यचित्रकारांची जबाबदारी वाढली आहे आर. के. लक्ष्मण, बाळासाहेब ठाकरे यांसारख्या व्यंग्यचित्रकारांची उज्वल परंपरा कायम ठेवण्याचे आव्हान आहे. माझ्या पिढीतील अनेक व्यंग्यचित्रकारांनी आर. के. यांची व्यंग्यचित्रे पाहून शिकत गेलो. त्यामुळे मी माझी शाळा हवेली आहे.

विवेक म्हेत्रे – (व्यंग्यचित्रकार) ...ती इच्छा अपुरीच राहिली – आर . के . यांची व्यंग्यचित्रे कालातीत आहेत. त्यांची सामाजिक व्यंग्यचित्रांवर मालिका निघालेली आहे. तशीच मालिका मराठीत यावी अशी इच्छा आर. के. यांच्याकडे बोलूनही दाखवली होती. परंतु त्यांच्या जाण्याने ती इच्छा अपुरीच राहिली आहे.''[७]

२.०७.०७ वृत्तपत्राचे नाव : दैनिक केसरी.

लेखाचे नाव : 'अनकॉमन मॅनची' एक्झिट.

लेखक : कैलास भिंगारे

दिनांक : २८ जानेवारी २०१५.

पान नंबर : ४.



''अनकॉमन' मॅनची एक्झीट' या मथळ्याचा दैनिक केसरी या मराठी भाषीक वृत्तपत्रामध्ये संपादकीय छापण्यात आले होते. हे संपादकीय जेष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या निधनानंतर छापण्यात आले होते. त्यांनी आयुष्यभर वृत्तपत्रीय व्यंगचित्रांच्या माध्यमातून पत्रकारिता केली. नव्या पध्दतीची ही पत्रकारिता समाजमनावर प्रभुत्व गाजवत राहिली. त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर वृत्तपत्रीय व्यंगचित्रांच्या माध्यमातून केलेली टिपणी ही महत्त्वाची भूमिका बाजवत राहिली. लोकशाहीमध्ये व्यंगचित्रांच्या साहय्याने अंकूश ठेवण्याचे काम केले जावू शकते हे आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्र कलेने सिध्द करून दाखविले मराठी भाषीक वृत्तपत्रीय व्यंगचित्रांचा दैदिप्यमान इतिहास त्यांनी उजळून टाकला. त्यांच्या कलेची व व्यंगचित्रांची दखल घेणारा तसेच त्यांच्या चारित्र्यात्मक बाजू मांडणारा हा लेख वाचनीय व वाचकांना त्यांच्या चारित्र्यात्मक बाजू स्पष्ट करणारा आहे. लेखात म्हणले आहे, ''व्यंग्यचित्राच्या क्षेत्रात आर. के. लक्ष्मण यांनी केलेले कार्य मोलाचे आहे. आपल्या

व्यंगचित्रातून त्यांनी सामन्यांच्या प्रश्नांना हात घातला. त्यांना वाचनाचा मोठा छंद होता. पुस्तकांबरोबरच ते माणसांचे चेहरे वाचायचे. त्यातून त्यांना इतरांच्या वेदना, दुख, आनंद कळत असे. मग त्या जाणिवा आपल्या व्यंग्यचित्रातून रेखाटल्या जात. सामान्य माणसांवर मनापासून प्रेम करणारा हा कलावंत होता आणि म्हणूनच त्यांनी 'कॉमन मॅन' चिरंतन केला.

आर. के. लक्ष्यमण यांच्या जाण्याने आपण सारेच एका थोर , व्यासंगी व्यंगचित्रकाराला मुकलो आहोत, त्याच बरोबर त्याच्या जाण्याने वैचारिकरित्याही मोठी हानी झाली आहे. आज त्यांच्या विषयीच्या अनेक आठवणी मनात दाटून आल्या आहेत. आर. के. आणि त्यांच्या पत्नी हे दोघेही मला मानसपुत्र मानत, १९९४ मी सतत आर. के. लक्ष्मण यांच्या सहवासात होतो. १९९४ पासून मी सतत आर. के. लक्ष्मण यांच्या सहवासात होतो. १९९४ मध्ये त्यांना अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संमेलनाच्या अद्घाटनाचे निमंत्रण देण्यासाठी गेलो होतो. त्याच बरोबर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनाही उद्घाटनाचे निमंत्रण दिले होते. परंतु निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीमुळे या संमेलनाच्या उद्घाटनासाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे बाळासाहेबांनी कळवले. अर्थात उद्घाटनपर भाषणाची ध्वनिचित्रफित त्यांनी पाठवली होती. त्यात त्यांचा व्यंगचित्रकार म्हणून प्रवास सांगितला होता.

आर. के. आणि बाळासाहेब ठाकरे हे दोघे १९४९ मध्ये 'फ्री प्रेस जर्नल' मध्ये स्टाफ कार्टुनिस्ट म्हणून कार्यरत होते. एके दिवशी आर. के. यांनी बाळासाहेबांना विचारले, 'तुम्ही कोण?' त्यावर बाळासाहेबांनी उत्तर दिले, 'मी व्यंगचित्रकार आहे'. त्यानंतर लगेच आर. के. लक्ष्मण म्हणाले, 'मी पण व्यंगचित्रकार आहे'. या परिचयाचे पुढे घट्ट मैत्रीत रूपांतर झाले आणि ती अखेरपर्यंत कायम राहिली. २०११ मध्ये बाळासाहेब ठाकरे आणि आर. के. लक्ष्मण यांची झालेली भेट अखेरची ठरली. तेव्हा बाळासाहेब हे आर. के. यांना भेटण्यासाठी घरी आले होते. दारातून बाळासाहेबांना आत येताना पाहताच आर. के. यांच्या मनावर जुन्या आठवणी जाग्या झाल्या. आणि त्याना अश्रु आनावर झाले. अखेर बाळासाहेबांनी त्यांना शांत केले. इतक्या घट्ट मैत्रीचे उदाहरण पहायला मिळणे कठीण आहे. कधी कधी बाळासाहेबांच राजकीय विचार आर. के. लक्ष्मण यांना मान्य नसत. परंतु त्याचा दोघांच्या मैत्रीवर कोणताही परिणाम झाला नाही. वैचारिक मतभेद आणि मैत्री, यांचा योग्य ताळमेळ दोघांनीही राखला होता. हे सुद्धा लक्षात घेण्यासारखे आहे. आर. के. लक्ष्मण हे १९५० च्या सुमारास विविध

प्रांतोप्रांतीचे वेगवेगळे कॉमन मॅन चितारत होते. म्हणजे पंजाबी, शीख, गुजराती, महाराष्ट्रीयन, तेलगु अशा पद्धतीने दहा कॉमन मॅन ते काढत असत. मात्र, त्यावर काही प्रांतातून नाराजी व्यक्त होऊ लागली. ती लक्षात घेऊन आर. के. यांनी १९६० मध्ये एकच कॉमन मॅन तयार केला आणि तोच पुढे कायम राहिला. त्यांची चांगले काम करणाऱ्यांची कौतुक करण्याची, इतरांना शाबासकी देण्याची पध्दती अनोखी होती. ते हाताच्या अंगठ्याच्या शेजारची दोन बोटे वर करून समोरच्याला शाबासकी देत. त्याच्या कार्याने आपल्याला समाधान झाल्याचे त्यातून प्रतीत करत. अशी शबासकी अनेकदा वाट्याला आली हे माठे भाग्यच म्हणायला हवे. एखाद्या नवोदित व्यंगचित्रकाराने काढलेले व्यंगचित्र आवडले तर त्याची थोडीशी नक्कल करत ते शाबासकी द्यायचे. त्यांच्यात एक कलाकारही दडला होता आणि त्याच वेळोवेळी दर्शन झाले.

रोज फिरायला जाणे हा आर. के. यांचा नेम होता. फिरायल गेल्यावर ते वाटेतील गणपती मंदिरातून रोज एक फूल आणत. ते कोणतेही असले तरी चालत असे. पण फूल आणण्याचा त्यांचा नियम होता. फिरून घरी आल्यानंतर ते फूल पत्नी कमलाबाईंना प्रसाद म्हणून देत असत. अशी कुटुंबत्सलता त्यांच्यामध्ये होती. आपल्या कुटुंबीयांवर, मित्रे परिवार, स्नेही तसेच संपर्कात आलेल्या साऱ्यांवर मनापासून प्रेम करणारा हा कलाकार होता. अतिशय साधे, शांत आणि संयमी असे हे व्यक्तिमत्व होते. त्यांच्यात एक निरागस मूलही लपले होते. त्यांना कॅडबरी चॉकलेट फार आवडत. त्यामुळे मी त्यांच्याकडे जाताना प्रत्येक वेळी आवर्जून ती चॉकलेट घेऊन जात असे आणि तेही ती मोठ्या आवडीने खात. परंतु एकदा घाईगडबडीत चॉकलेट न्यायचे विसरलो. तर गेल्याबरोबर त्यांनी प्रश्न केला, 'चॉकलेट कोठे आहे?' मी तसाच परत फिरलो आणि दुकानांतून चॉकलेट घेऊन आलो. त्यावेळी त्यांचा खुललेला चेहरा अजूनही, नजरेसमोर आहे. इतक्या मोठ्या व्यंगचित्रकाराचे हे रूप अश्चर्यचकीत करणारे होते. त्याचबरोबर त्यांच्यातील साधेपणाही प्रचीती देणारेही होते.

२०१२ मध्ये पुण्यातील सरस्वती लायब्ररी आणि साहित्यवेध प्रतिष्ठान यांच्या तर्फे आर. के. लक्ष्मण यांना 'भारत भुषण' हे पारितोषिक माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते देण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे जाहिर असे कार्यक्रमही झाले नाहीत. मात्र बालगंधर्व रंगमंदिरात झालेला हा सोहळा देखणा ठरला. आर. के. आणि त्यांच्या

चाहत्यांनी या कार्यक्रमाला तुडुंब गर्दी केली होती. त्यात तरूणाईचा भरणा मोठा होता. याकार्यक्रमाच्या निमित्ताने 'मिसाईल मॅन' आणि 'अनकॉमन मॅन' यांच्या भेटीचा सोहळा साऱ्यांना अनुभवता आला. या कार्यक्रमात केलेल्या भाषणात डॉ. कलाम व्यंगचित्रांविषयीचा जिव्हाळा आणि व्यंगचित्रांमुळे आयुष्यात घडलेल्या गमतीजमती सांगितल्या. ते म्हणाले की, 'मी एकदा आर. के. लक्ष्मण यांना राष्ट्रपती भवनात निमंत्रित केले होते. त्यावेळी तुमच्या आयुष्याचे ध्येय काय असा प्रश्न त्यांना विचारला त्यावर आर. के. यांनी मोठे मार्मिक उत्तर दिले, ते म्हणाले, 'जनता जनार्दनाला आयुष्यभर हसवणे हेच माझे ध्येय आहे'. या सांगण्याप्रमाणे आर. के. यांनी अखेरपर्यंत हे ध्येय समोर ठेवून च वाटचाल केली.

आर. के. लक्ष्मण नव्वद वर्षाचे झाल्यांनतर त्यांचा प्रत्येक वाढदिवस कुटुंबीय, स्नेही, शुभचिंतक यांच्या उपस्थितीत घरीच साजरा केला जात असे. त्या दिवशी ते फ ार खूश असत. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसत असे. आर. के. लक्ष्मण नवोदित व्यंगचित्रकांरांना नेहमी मार्गदर्शन करत. त्यांना प्रोत्साहन देत. नवोदितांना उपदेश करताना ते सांगत की, 'व्यंग्यचित्रकारांची चित्रकला उत्तम हवी, त्यांना देहबोली ओळखता यायला हवी. शिवाय अफ ाट कल्पनाशक्ती आणि निरीक्षणशक्ती हे मुख्य गुण असायला हवेत. हे सारे असेल तर तुम्ही उत्तम व्यंग्यचित्रकार होऊ शकता'. त्यांचा हा मंत्र लक्षात घेऊ न आज अनेक नवोदित व्यंग्यचित्रकारांची वाटचाल सुरू आहे. २००३ मध्ये अर्धांगवायूचा झटका येऊन गेल्यानंतर आर. के. यांचे व्यंग्यचित्र काढणे बरेच कमी झाले. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सहा तारखेला त्यांनी शेवटचा कॉमन मॅन चितारला. त्यानंतर ते आजारी पडले आणि आजारात चढ–उतार होत राहिले आणि अखेर त्यांनी निरोप घेतला.

व्यंग्यचित्राच्या क्षेत्रात आर . के . लक्ष्मण यांनी केलेले कार्य अतिशय मोठे आणि तितकेच मोलाचे आहे. आपल्या व्यंग्यचित्रातून त्यांनी सामान्यांच्या अनेक प्रश्नांना हात घातला. आर. के. यांना वाचनाचा मोठा छंद होता. पुस्तकांबरोबरच ते माणसांचे चेहरे वाचायचे. त्यातून त्यांना इतरांच्या वेदना, दु:ख, आनंद या जाणिवा कळत असत. मग त्या आपल्या व्यग्यचित्रातून रेखाटण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सामान्य माणसावर मनापासून प्रेम करणारा असा कलावंत होता आणि म्हणूनच त्यांनी 'कॉमन मॅन' चिरंतन केला, अशा या थोर

व्यंग्यचित्रकाराला विनम्र आदरांजली. (लेखक पुण्यातील सरस्वती लायब्ररीचे संस्थापक असून आर. के. लक्ष्मण यांचे अनेक वर्षाचे स्नेही आहेत.)''[८]

२.०७.०८ वृत्तपत्राचे नाव : दैनिक केसरी, सोलापूर जिल्हा आवृत्ती.

अग्रलेखाचे नाव : विसंगतीचा भाष्यकार.

दिनांक : २८ जानेवारी २०१५

पान नंबर : ४.

आर.के. लक्ष्मण यांचे निधन २६ जानेवारी २०१५ रोजी झाले. आर. के. लक्ष्मण हे वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार होते. त्यांनी आपल्या द्वेषरहित विनोदाने जीवनातील विसंगतींवर अचूक बोट ठेवले. त्यांच्या निधनानंतर दैनिक केसरी मधून 'मृतलेख' प्रकाशित करण्यात आला होता. या मृतलेखाचा मथळा हा 'विसंगतीचा भाष्यकार' असा होता. या अग्रलेखात म्हणले आहे, ''आर. के. लक्ष्मण यांना रूढार्थाने व्यंग्यचित्रकार म्हणायचे; पण ते होते २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील भारतीय समाज जीवनाचे सर्वश्रेष्ठ भाष्यकार, चिंतनशील आणि अफाट व्यासंग असलेली विद्वान व्यक्ती बोलण्यातून किंवा लेखनातून जे सांगण्यासाठी असंख्य शब्दांची मदत घेईल तेच सांगायला लक्ष्मण यांना कुंचल्याचे एक-दोन फटकारे आणि सात-आठ शब्द पुरत! त्यांच्या व्यंग्यचित्रांतून जो आशय व्यक्त होई त्याची बरोबरी क्वचित कोणाला करता आली. कला केवळ रंजन नव्हे, कला ही प्रबोधनाचेही माध्यम आहे हे भारतीय पटलावर कोणी ठळकपणे सिद्ध करून दाखविले असेल तर ते आर. के. लक्ष्मण यांनी, लक्ष्मण यांना कुंचल्याशिवाय अन्य साधनांची मदत घ्यावी लागली नाही, याचे कारण 'कॉमन मॅन' ही त्यांनी केलेली असामान्य निर्मिती. हा कॉमन मॅन काल सुसंगत होता, आज सुसंगत आहे आणि उद्याही राहणार आहे. काळ बदलत गेला, पण सामान्यांना काही 'अच्छे दिन' आलेच नाहीत. काळाशी सुसंगत राहिलेला लक्ष्मण यांचा कॉमन मॅन जीवनातील विसंगतीवर भेदक आणि मार्मिक भाष्य करीत राहिला. 'टाईम्स' मधील आर. के. लक्ष्मण यांची कॉमन मॅनची चौकट छोटी; पण कॅलिडोस्कोपप्रमाणे अनेक रूपे टिपणारी होती.



द्वेषरहित विनोद

जीवनातील विसंगती समजून सांगायची असेल तर तिच्या मूळ संगतीला तटस्थपणे पाहता आले पाहिजे. ते आव्हानात्मक असते. मात्र लक्ष्मण यांनी ते आव्हान लीलया पेलले. उंचीने छोट्या असलेल्या आपल्या 'कॉमन मॅन' द्वारे त्यांनी केलेले भाष्य उतुंग शिखराएवढे होते. स्वातंत्र्यानंतर सुराज्य येईल ही अपेक्षा होती. त्याऐवजी राजकरण हाच धंदा होऊन बसले. हजारोंच्या संख्येने यात सहभागी झालेल्या धंदेवाईकांच्या वर्तनातून, त्यांच्या निलाजऱ्या स्वभावातून आणि सामान्यांना वेठीला धरण्याच्या प्रवृत्तीतून व्यंग्यचित्रकारांना खाद्य मिळाले नसते तरच नवल. वर्षानुवर्षे धंदेवाईक राजकारणी मंडळी हे खाद्य पुरवत राहिली. त्यांचे ढोंग, सामान्य भारतीयांच्या प्रति वागण्याची त्यांची तऱ्हा, तोंडाने सदाचाराचा आणि लोककल्याणाचा गजर करीत त्यांनी मांडलेला बाजार हे सारे काही आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन' ने टिपले जेव्हा जेव्हा सत्ताधारी उन्मत्त झाले तेव्हा तेव्हा सुजाण भारतीयांनी मतपेटीतून उत्तर दिले आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन' ला निवडणुकांची वाट पाहण्याची गरज नव्हती सडेतोड उत्तर तो दररोज देत होता. विसंगतीवर कोरडे ओढत होता. आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन' ला भाष्य करण्यासाठी विषय सापडू नये असा दिवस येता तर ते देशासाठी भाग्य ठरले असते; पण आपल्या देशात राजकीय आणि सामाजीक जीवनातील ढोंग वर्षानुवर्षे केवळ कायम राहिले असे नव्हे तर हे ढोंग सुप्रतिष्ठित झाले. अर्थात 'कॉमन मॅन' चे अवतार कार्य चिरंतन ठरले. देशातील अनेक थोर व्यक्तिमत्त्वदेखील आर. के. लक्ष्मण यांच्या फटकाऱ्यातुन सुटली

नाहीत; पण एक विशेष म्हणजे लक्ष्मण यांच्या कुंचल्याला द्वेषाचा स्पर्श झाला नव्हता. इंदिरा गांधी यांच्यासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या नेतृत्वावर कधी व्यंग्यचित्रांतून बोचरे भाष्य करणारे आर. के. लक्ष्मण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कणखरपणा किंवा निग्रह दाखविण्यात कधीच उणे पडले नाहीत. म्हणूनच त्यांच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यात सापडलेल्यांनाही आर. के. लक्ष्मण यांचे कौतुक केल्याशिवाय राहता आले नाही. आर. के. लक्ष्मण भारतीय विवेकबुद्धीचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या व्यंग्यचित्रांतून कोट्यवधी भारतीयांचा विवेक जागा ठेवला. त्या अर्थाने त्यांची व्यंग्यचित्रे चळवळ होती. अभूतपूर्व अशा या चळवळीचे अध्वर्यु आर. के. लक्ष्मण आपल्यात नाहीत, ही वस्तुस्थिती वेदनादायी खरी, पण त्यांचा 'कॉमन मॅन' अमर आहे. दांभिकता, भंपकपणा याला 'कॉमन मॅन' ने दिलेल्या उत्तरासारखे दुसरे उत्तर कुठेही नव्हते. ते मोठेपण त्याच्या निर्मात्याचे !''[९]

२.०७.०९ वृत्तपत्रत्ताचे नाव : दैनिक सकाळ.

लेखाचे नाव : विसंगती हेरणारी दृष्टी.

वृत्तपत्रत्ताचे नाव : दैनिक सकाळ.

दिनांक : २८ जानेवारी २०१५.

पान नंबर : ६.

दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये जेष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या निधनानंतर संपादकीय पानावर त्यांना श्रध्दांजली वाहणारा लेख प्रकाशित करण्यात आला होता. यामध्ये त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून ज्या ज्या भूमिका मांडल्या, सर्व सामान्यांचे प्रश्न मांडले त्या सर्वांचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. 'विसंगती हेरणारी दृष्टी' या मथळ्याच्या लेखात म्हणले आहे, ''कोणे एके काळी छाप्यातल्या बातम्या हाच जगात काय घडते ते समजून घेण्याचा मुख्य आधार होता. त्या काळात तेव्हाच्या 'आम आदमी' ला वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर स्थान मिळवून देण्याचे मोठे का करणारा एक प्रख्यात व्यंगचित्रकार अखेर काळाच्या पडद्याआड निघून गेला आहे. जेव्हा रंगभूमिवरून 'एक्झिट' घेण्यासाठी त्याने निवडलेला दिवसही त्याच्या अर्धशतकी कारकीर्दीला साजेसाच होता! अवघा देश प्रजाताकदिन साजरा करत असताना प्रजेचा आवाज 'मूक' पणे उठवणारा हा व्यंग्यचित्रकार, भाष्यकार, लेखक आणि चित्रकार आपल्यातून निघून गेला; पण जातानाही तो 'आम आदमी'

चे प्रतिनिधित्व करणऱ्या आपल्या मानसपुत्राला म्हणजेच 'कॉमन मॅन' ला अजरामर करून गेला.

रासीपुत्र कृष्णस्वामी तथा 'आर.के.' लक्ष्मण यांनी हा सामन्य माणूस वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर आणला, तो काळ अगदीच वेगळा होता आणि राजकारणी, क्रीडापटू, उद्योगपती आणि असेच काही 'सेलिब्रेटी' वगळता 'आम आदमी' चा आवाज क्वचितच यातून उमटत असे. त्यातही उच्च इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये तो काय करतोय हे अगदी अपवादानेच पहायला मिळत असे. अशा काळात त्यांनी सामान्य माणासाला प्रतिष्ठा दिली आणि राष्ट्रपतींपासून ते थेट गावागावांत पुढाऱ्यात सारेच 'आरके चा कॉमन मॅन' काय म्हातोय ते कुतूहलाने बघू लागले. खरे तर 'आरकें'नी उभा केलेला चौकटांचा कोट घालणारा आणि धोतर नेसणारा हा 'कॉमन मॅन' आपल्या जवळपास सहा–सात दशकांच्या उन्यापूऱ्या आयुष्यात एक शब्दही बोलला नाही. पण न बोलताही लक्ष्मण यांनी चितारलेल्या भेदक वास्तवाकडे तो आपले कानावरचे चार, केस उभे करून, या निष्पाप आणि निरागस नजरेने बघत असे, ते पाहिल्यावर प्रथम आपल्याला हसू फुटत असे आणि आपल्याला त्या वास्तवातील व्यंग, विसंगती, त्रुटी लक्षात येत असे. लक्ष्मण यांचा हा 'कॉमन मॅन' खऱ्या अर्थाने भारतीय जनतेच्या, वाट्याला येईल ते निमूटपणे सहन करणारा प्रतिनिधी होता. तो सारे मूकपणे सहन करत असे आणि केवळ आपल्या नजरेतून सभोवतालच्या वास्तवावर भाष्य करत असे. व्यंगचित्रकाराला लाभणारे हे दुर्मिळ यश ही लक्ष्मण यांच्या कुंचल्याची करामत असे. असे मर्मभेदी भाष्य अर्धशतकाहून अधिक काळ करत राहणे ही सामान्य बाब खचितच नव्हती.

लक्ष्मण हे केवळ व्यंगचित्रकार व अर्कचित्रकार नव्हते. त्यांनी काढलेली अनेक नेत्याची वा सेलिब्रिटींची अर्कचित्रे व्यंग्यचित्रांएवढीच गाजली. त्या अर्कचित्रातून ते त्या व्यक्तींच्या लकबी आणि त्याचबरोबर स्वभाव यावरही नेमके बोट ठेवत. पण लक्ष्मण यांचे कार्यक्षेत्र या पुरते मर्यादित कधीच नव्हते. ते लेखक होते आणि कादंबरीकारही. त्यांच्या 'द हॉटेल रिव्हिएरा' आणि 'द मेसेंजर' या 'पेग्वीन' या सुप्रसिद्ध संस्थेने प्रकाशित केलेल्या कादंबऱ्यांवर एक नजर टाकली, तरी कुंचल्याएवढीच लेखणीवरही असलेली त्यांची हूकमत लक्षात येते. अर्थात, लेख असो की कथा वा कादंबरी, ते सारे लेखन लक्ष्मी यांच्या चित्रमय शैलीने नटलेले असे.

रुढार्थाने त्यांनी चित्रकलेचे शिक्षण कुठेच घेतलेले नव्हते आणि 'जे. जे. स्कूल ऑफ आर्टस' या मुंबईतील प्रख्यात संस्थेने तर त्यांना प्रवेश कसा आणि का नाकारला होता, ही कहाणी, तर आता दंतकथाच बनून गेली आहे. 'टनेल ऑफ टाइम' या आपल्या आत्मचरित्रात त्यांनी आपले बालपण आणि चित्रकलेचे वेड हा सारा प्रवास अत्यंत विलोभनीय पद्धतीने उभा केला आहे. सुरवातीचा 'फ्री प्रेस जर्नल' या दैनिकातील काही काळ वगळता, त्यांचे उभे आयुष्य 'टाइम ऑफ इंडियाच्या' मुंबईच्या त्या प्रख्यात वास्तूत गेले, तेथील त्यांचा दरारा हा भल्याभल्या संपादकांपेक्षा अधिक असे. संध्याकाळी पाचचे ठोके पडले की काळी पँट आणि पांढराफेक आर्ध्या बाह्यांचा बुशशर्ट घातलेली त्यांची मूर्ती 'टाइम्स' चे तीन जिने उतरत असे आणि काळी कुळकुळीत ॲम्बेसिडर मोटार त्यांच्या सज्ज असे! पंडित जवाहरलाल नेहरूंपासून इंदिरा गांधी–राजीव गांधी–नरसिंह राव– अटलबिहारी वाजपेयी यांच्यापर्यंत अनेक बलदंड नेते त्यांनी बघितले आणि त्यांच्या कारभारावर मार्मिक भाष्य आपल्या कुंचल्यान केले. एकेकाळी असे म्हटले जात होते, की टाइम्स काय म्हणतोय यापेक्षा लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' न बोलताही काय सांगून जातोय, याकडेच सत्ताधारी आणि विरोधक यांचेही लक्ष असे. पण त्यांच्या राजकीय व्यंग्यचित्रांइतकीच गाजली ती त्यांची 'कावळा' या त्यांच्या आवडत्या पक्ष्यांची रेखाचित्रे, ती 'काकदृष्टी' हेच त्यांचे वैशिष्ट्य होते आणि त्यांची तीच 'नजर' आता त्यांच्या चित्रांतून आपल्यासाठी उरली आहे !''[१०]

२.०७.१० वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी

लेखाचे नाव : ब्रसेल्ससाठी एकात्मतेची भावना.

प्रकाशन दिनांक : ३० मार्च, २०१६.

पान नंबर : ६

या वृत्तपत्रामध्ये पान नंबर ६ या संपादकीय पानावर जगभरातील व्यंगचित्रातून 'ब्रसेल्ससाठी एकात्मतेची भावना' या मथळ्याखाली व्यंगचित्रे व माहिती प्रकाशित झाली आहे. त्या म्हटले आहे, ''बेल्जियमची राजधानी ब्रेसल्सवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सोशल मिडीयात जगभरातील यूजरमध्ये ऐक्याची भावना दिसून आली. विशेषतः ट्विटरवर #preyferbrasells आणि #openhuse यारखे हॅशटॅग ट्रेंड करत होते. ब्रुसेल्समध्ये एकअरपोर्ट आणि सबवेस्टेशनवर बॉम्बस्फोट झाले यात अनेक माणसे ठार झाली. अशा वेळी

लोकांनी 'सेफ्टे चेक' फीचर चा वापर करून कोठे कशी परिस्थिती आहे हे जाणून घेतले. ट्विटरवर शेअर करता येणारे साहित्य म्हणजे व्यंगचित्र आहे. यात पॅरिस आणि ब्रुसेल्सला प्रतिकात्म रूपात त्यांच्या देशाच्या राष्ट्रध्वजावर जवळ जवळ दाखवले आहे. या व्यतिरिक्त एक चित्र विमानाचे असून यात बेल्जियमच्या राष्ट्रीय ध्वजाचा काळा, पिवळा आणि लाल रंग दिसून येतो आहे. यात शांततेचा संदेश देण्यात आला आहे. पॅरिसच्या ट्विटरवर पेजवर एक ट्विट ८५०० हून आधिक वेळा रिट्विट केले गेले. त्यात पॅरिसरच्या बरोबरीने ब्रुसेल्सच्या एकजुटीचा संदेश लिहिला गेला आहे. त्यात बेल्जियमचे काटूॅन कॅरॅक्टर टिन टिन यालही दाखवले आहे. त्याचबरोबर काही व्यंगचित्रकारांनी आपल्या कलाकृतीतून एक जुटीचा संदेश दिला आहे''[११] दहशतवादाचा सामना करायला एखादे राष्ट्र उभा करताना देखील व्यंगचित्रांचा वापर होवू शकतो. हे मोठे उदाहरण वरील माहितीतून समोर येते. व्यंगचित्रे ही फक्त हसवण्याचेच साधन नव्हे तर विचारांना प्रेरणा देणारी व मानवाच्या सोबत राहणारी, भावभावनांना साथ देणारी, सहानभूतिपूर्वक साथ देणारी कला आहे, हेच यातून समोर येते. याच लेखात पूढे वेगवेगळ्या व्यंगचित्रांची मते नोंदवली आहत. ती पुढील प्रमाणे आहेत, ''फ्रेंच कॉमिक कार्टूनिस्ट जोआर फाक यांनी त्यांच्या व्यंगचित्रासोबत लिहल की, मी
मनःपूर्वक ब्रुसेल्ससोबत आहे., हवॅ बाऊड्री यांनी अश्रु दाखवले असून बेल्जियमचा ध्वज उंच धरला आहे., पॅरिसचे इलेस्ट्रेटर नेवाक यांनी आपल्याचित्रात लिहले आहे की, बेल्जियमच्या सर्व मित्रांना माझा पाठिंबा असून फ्रान्स तुमच्या पाठीशी आहे., फ्रान्समधील वृत्तपत्र ली मोंदमध्ये प्लांटू यांचे मार्मिक चित्र प्रसिध्द केले असून यात फ्रांन्सच्या ध्वजात मानवी चेहरा दाखवला असून पॅरिसश हर ब्रुसेल्सचे धैर्य वाढवताना दर्शवले आहे., अल्जेरियन व्यंगचित्रकार ॲली दिलेम यांनी त्यांच्या व्यंगचित्रात या 'Terrorist strike again' बरोबरच 'Jesus Brusselse' असे लिहले आहे.''[१२] वरील माहिती ही व्यंगचित्रे कशा प्रकारे मानवाच्या सोबत आहेत याची जाणीव करून देतात. व्यंगचित्रातून वेगवेगळी मूल्ये, विचार, पध्दती, भावना व्यंगचित्रकार हे संवेदनशील मनाने आपल्या कलेतून जपतात व वाचकांपर्यंत नेतात हे लक्षात येते. व्यंगचित्रकार आपल्या व्यंगचित्रातून राष्ट्रीय एकात्मतेसाठीच्या मूल्यांना पुढे नेणारे कलाकार आहेत. अशा मूल्यांची जाणीव सदर माहितीतून समोर येते.

वृत्तपत्रातून मिळालेली माहिती ही संशोधनासाठी उपयोगी ठरणारी अशी तसेच राष्ट्रीय एकात्मता, संवेदनशीलता या मूल्यांचा पूरस्कार करणारी आहेत ती देखील संशोधनासाठी उपयोगी आहेत.







२.०७.११ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती.

पूरवणीचे नाव : हास्य सोलापूरी.

दिनांक : १ एप्रिल २०१६.









दैनिक दिव्य मराठी च्या सोलापूर आवृत्तीने दिनांक १ एप्रिल २०१६ वार रविवार हास्य पुरवणी काढली होती. या पुरवणीचे नाव 'हास्य सोलापूरी' असे होते. आठ पानाच्या या

पुरवणीमध्ये राजकीय, सामाजिक क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींच्या जीवनात घडलेल्या हास्य घटनांबाबतचे लेख घेण्यात आले होते. या लेखांना व्यंगचित्रांची जोड देण्यात आल्याने ही पुरवणी प्रभावी व वाचनीय ठरली. या पुरवणीच्या पहिल्या पानावर भारत देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा 'पंढरीत युगानुयुगे विठ्ठल उभा तसा मी ही यशवंतरावा बरोबर' या मथळ्याचा लेख छापण्यात आला होता. या लेखाच्या शेजारी सुशीलकुमार शिंदे यांचे व्यंगचित्र दाखवण्यात आले होते. या लेखात त्यांनी राजकीय गमतीजमती तसेच त्यांनी उपभोगलेले राजकीय व इतर काळ या काळत घडलेले विनोदी प्रसंग आपल्या लेखात त्यांनी मांडले आहेत.

या सोबतच सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्याचे आमदार दिलीप सोपल यांनी देखील 'तुला रे पाणक्या श्रीमंतांच्या शिरपेचाची काळजी कशाला?' या मथळ्याचा लेख लिहून महाराष्ट्राच्या मंत्रालयात व विधानसभेत घडलेले विनोदी प्रसंग मांडले आहेत. आमदार असताना केलेला बस प्रवास, अकलूज येथील लावणी मोहत्सावातील विनोदी किस्सा, वरिष्ठ राजकीय नेत्यांची उडवलेली खिल्ली, मंत्री करण्यासाठी यशवंत एकनाथ पाटील यांनी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेकडे केलेली लेखी मागणी या मागणी मंत्री या शब्दापुढे 'मुख्य' हा शब्द जोडून मंत्री या शब्दांचा मुख्यमंत्री बनवून त्या मागणीची खिल्ली उडवून दिली. अशाबाबीं या लेखात मांडल्या आहेत. तसेच दिलीप सोपल यांच्या व्यंगचित्रांची व हास्यप्रसंगावरून व्यंगचित्रांची जोड या लेखात देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे 'मुन्नसभाई शेख' या माजी आमदाराचा 'पंजाब तालीक कट्ट्या'वर जो विनोदी प्रसंग घडलेला त्यांचा अनुभव या लेखात करून देण्यात आला आहे.

डॉ. गो.म. पवार हे मराठी क्षेत्रातील जेष्ठ साहित्यिक व समिक्षक आहेत. त्यांनी 'गुदगुल्या करणारे किस्ये' या मथळ्याच्या लेखात त्यांच्या जीवनात घडलेले विनोदी किस्से मांडले आहेत. या लेखालाही व्यंगचित्राची जोड मिळाली आहे.

योगीराज वाघमारे हे मराठी कथाकार आहेत. त्यांनी 'नवोदित साहित्यिक प्रकाशन सोहळे अनं बिच्चारे रसिक' या मथळ्या खाली लेख लिहून पुस्तक प्रकाशन सोहळ्यात नवोदित साहित्यिकांची कशा प्रकारे गंमत होते, या बाबत लिखाण केले आहे. या लेखालाही व्यंगचित्राची जोड देण्यात आली आहे.

जागतीक मराठी अकादमीचे अध्यक्ष, जेष्ठ साहित्यिक व विनोदी लेखक रामदास फुटाणे यांनी 'साहित्य सांस्कृती मधील अस्सल सोलापुरी फुटाणे' या मथळ्याखाली साहित्य, संस्कृतीच्या क्षेत्रातील विनोदी घटना मांडल्या आहेत. या लेखालाही व्यंगचित्राची जोड देण्यात आली आहे.

सोबतच प्रा. डॉ. सुहाज पुजारी, ॲड. व्ही. डी. फताटे, जेष्ठ लेखक अच्युत गोडबोले, हरि गोडबोले, बाबुराव मैंदर्गीकर, सुरेखा शहा, डॉ. बाहूबली दोषी, अमोल अंकुलकर या लेखकांनी विनोदी लेख लिहले आहेत. या सर्व लेखांना फक्त व्यंगचित्रांची जोड देऊन त्यांना जास्तीतजास्त प्रभावी करून हे हास्य वृत्तपत्र पूरवणी बनवण्यात आली आहे. या पुरवणीमध्येच काळ्या पांढऱ्या रंगाची जुन्या प्रकारची वेगवेगळी व्यंगचित्रे देण्यात आली आहेत. मजेशीर, गमतीदार, विनोदी घटनांची नोंद घेणारी ही व्यंगचित्रे या पुरवणीला समृध्द करणारी आहेत.

२.०७.१२ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी

पुरवणीचे नाव : राष्ट्रनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त विशेष.

प्रकाशन दिनांक : १४ एप्रिल, २०१६.

पान नंबर : १

या वृत्तपत्रामधील पुरवणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री समतेच्या विषयी काय म्हणणे होते. त्यांनी काय काम केले आहे. त्यांचे स्त्री विषयक काय विचार आहेत याची माहिती देणारे अभ्यासू लेखकांचे लेख व मते पान नंबर १ वर प्रकाशित करण्यात आले आहेत. यामध्ये सुशिला आबुटे लिखीत 'बाबासाहेबांमुळे स्त्री समानतेचा कायदा', शारदा गायकवाड, यांचा 'स्त्री शिक्षणाची प्रेरणा बाबासाहेबांनी दिली', सौ. नरसूबाई गदवालकर, लिखित 'मुलीच्या शिक्षणाला आजही विरोध', प्रा. अंजना गायकवाड लिखित 'आरक्षण मिळाले पण, वाटा कमीच', ॲड. अंजली बाबरे लिखित 'स्त्री हक्काचा लढा', ॲड. सरोजनी तमशेट्टे, यांनी लिहलेला 'मानसिकतेत बदल हवा', डॉ. वर्षा पगारे यांचा 'महिलांसाठी अनेक कायदे', मनीषा साबळे लिखित 'शिक्षणाला मिळाली चालना', हे लेख प्रकाशित झाले आहेत. महिलांनी आपले म्हणणे या लेखात व्यक्त केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारांच्या अनुषंगाने हे लिखाण आहे.

प्रस्तुत संशोधनात स्त्री–पुरूष समनता या मूल्याशी संबंधीत व्यंगचित्रावर संशोधन केले जाणार आहे. यासाठी स्त्री–पूरूष समानते बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री समानतेवर काय मत होते व आजची परस्थिती काय असा समन्वय साधणारे लिखाण वृत्तपत्रामध्ये आहे. ही माहिती संशोधनसाठी उपयोगी व मार्गदर्शक आहे.

२.०७.१३ वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत.

लेखाचे नाव : कुंचल्यांना सलाम.

दिनांक ५ मे २०१६.

पान नंबर : १.

दैनिक लोकमत या मराठी भाषिक वृत्तपत्राने 'कुंचल्यांना सलाम!' या मथळ्यखाली व्यंगचित्रकार दिनाची कशी सुरूवात झाली याची माहिती दिली आहे. त्या सोबत या दिनाचे औचित्य साधून व्यंगचित्रकार दिनी विशेष वृत्तपत्राची निर्मिती केली होती. त्यासाठी विशेष अंकाचे अतिथी संपादक प्रख्यात व्यंगचित्रकार राज ठाकरे होते. त्यांनी निवडलेली खास व्यंगचित्रे या दैनिकाच्या मूखपृष्ठावर छापण्यात आली होती. यात म्हणले आहे,

''कुंचल्यांना सलाम !

जगभर ५ मे हा 'व्यंगचित्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. १८९५ मध्ये याच दिवशी जोसेफ पुलित्झर यांच्या न्यूयॉर्क वर्ल्डमध्ये हास्य आणि व्यंगाची उधळण असलेल्या 'द येलो कीड' या कॉमिकचे प्रकाशन झाले होते. निर्माते होते रिचर्ड एफआऊटकन्ट, 'द येलो कीड' ला वर्तमान युगातील काटूनचा प्रारंभ मानला जातो. त्यामुळेच आजचा दिवस व्यंगचित्रकारांच्या कुंचल्यातून रेखाटल्या गेलेल्या रेषांमधील व्यंगाच्या प्रखर, तितक्याच बोचऱ्या अभिव्यक्तीला सलाम करण्याचा दिवस आहे. लोकमत समूहाने व्यंगचित्रांची महती आणि त्याच्या शक्तीची नेहमीच प्रशंसा केली आहे. लोकमत समूह हा भारतातील असा एकमेव समूह आहे ज्याने महान कार्टूनिस्ट आर. के. लक्ष्मण यांची सदाबहार व्यक्तिरेखा 'कॉमन मॅन' ला एक दिवसासाठी आपल्या वृत्तपत्राचे 'गेस्ट एडिटर' बनविले होते. दिवस होता ५ फेब्रुवारी २०१२. आजच्या अंकाच्या आत संपादक प्रख्यात व्यंगचित्रकार आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडलेली काही व्यंगचित्रे अंकात देत आहोत.''[१३]

आर. के. लक्ष्मण




बाळासाहेब ठाकरे



डेव्हिड लो




मॉर्ट ड्रकर




जॅक डेव्हिस



लेस्ली इलिंग वर्थ
"OK MR PRESIDENT, LET'S TALK."


मॅक


शि. द. फडणीस







२.०७.१४ वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत, सोलापूर जिल्हा अवृत्ती.

लेखाचे नाव : कुचल्यांना सलाम.

पान नंबर : ७.

दिनांक : ५ मे २०१६.









दैनिक लोकमत, सोलपूर आवृत्तीने दिनांक ५ मे २०१६, गुरूवार रोजी व्यंगचित्र दिनानिमित्ताने विषेश अतिथी संपादक सह व्यंगचित्रां बाबत विशेष वृत्तपत्र काढले होते. त्या दिवशीचे अतिथी संपादक हे राज ठाकरे हे त्यांचे विशेष संपादकीय देखील मुखपृष्ठांवर छापले गेले होते. व्यंगचित्रांचे महत्त्व वृत्तपत्र सृष्टीत किती आहे याची जाणीव या विशेष व्यंगचित्र वृत्तपत्राने दाखवून दिले आहे. याव पानावर वरील बाजूला आर. के. लक्ष्मण यांचा कॉमन जागतीक व्यंगचित्रकार दिनाच्या शुभेच्छा देताना दाखवण्यात आला आहे. 'कुंचल्याचे फ टकारे ... ' या मथळ्याखाली पुढील माहिती व व्यंगचित्रे मिळतात, ''जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त लोकमत वृत्तपत्र समूहाने कलेल्या आवाहनाला भरघोस प्रतिसाद दत महाराष्ट्रतील

व्यंगचित्रकारांनी आपल्या कुचल्याने रेखाटलेले व्यंगचित्रांचा अक्षरशः वर्षाव केला. त्या व्यंगचित्रांमधून आजच्या अंकाचे अतिथी संपादक राज ठाकरे यांनी निवडलेली ही काही व्यंगचित्रे. आजच्या सामाजिक आणि राजकीय वर्तमानावर भाष्य करणारी ही व्यंगचित्रे बरे काही सांगून जातात.''[१४] या वृत्तपत्रात खालील प्रमाणे व्यंगचित्रे प्रसिध्द झाली आहेत जी विचारप्रवर्तक आहेत.











२.०७.१५ वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत.

अग्रलेखाचे नाव : ठोस भूमिकेचा अव्यंग कुंचला. (विशेष संपादकीय)

दिनांक : ५ मे २०१६

पृष्ठ क्रमांक : १

दैनिक लोकमत या मराठी भाषिक वृत्तपत्राने दिनांक ५ मे २०१६ रोजी व्यंगचित्रकार दिनाचे औचित्य साधून व्यंगचित्रांचे विशेष वृत्तपत्र निर्माण केले होते. या वृत्तपत्राचे अतिथी संपादक म्हणून व्यंगचित्रकार राज ठाकरे यांनी व्यंगचित्रकारांची काय ताकद असते यांची जाणिव करून देणारे विशेष संपादकीय लिहले होते. या संपादकीय मधून प्रसारमाध्यमामधील व्यंगचित्रांचे स्थान, व्यंगचित्रांची ठाम भूमिका व या कलेला अर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी जे काही करता येवू शकते याची नोंद या विषेश संपादकीय मध्ये घेण्यात आली आहे. राज ठाकरे 'ठोस भूमिकेचा अव्यंग कुंचला' मथळ्याच्या संपादकीय मध्ये म्हणतात,

'' रोज सकाळी वर्तमानपत्र वाचल्यावर इतके विषय दिसतात, की व्यंगचित्र काढण्यासाठी हात अक्षरशः शिवशिवतात. पण काढले तरी छापायचे कुठे? आजमितीस व्यंगचित्रकारांना म्हणावे तसे व्यासपीठ उपलब्ध नाही. म्हणूनच प्रसार माध्यमांचा व्यंगचित्र

आणि व्यंगचित्रकारांविषयीचा आदर हा एका दिवसापुरता मर्यादित नसावा. आज जागतिक व्यंगचित्रकार दिन आहे म्हणून दिवस साजरा करायचा आणि नंतर त्याकडे पाठ फिरवायची असे होता कामा नये. किंबहुना सामाजिक भूमिका घेण्याच्या बाबतीत वर्तमानपत्रांचे जे दायित्व आहे ते लक्षात घेता वर्तमानपत्रांनी प्रोत्साहन देऊन व्यंगचित्रकार उभे केले पाहिजेत. व्यंगचित्र ही कला आहे. ती आत्मसात करणे आणि तिची जोपासना करणे या दोन्ही गोष्टी कष्टसाध्य आहेत. म्हणूनच भराभर व्यंगचित्रकार निर्माण होत नाहीत. तशात आहेत त्यांना व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाले नाही तर या कलेचे आणि समाजाचेही नुकसान अटळ बनते, ज्याला आपण लौकिकार्थाने कार्टून म्हणतो तो या कलेचा गाभा. अनिमेशन, राजकीय व्यंगचित्र, सामाजिक आशयाची व्यंगचित्रे हे त्याचे बाकीचे पैलू. त्यातही राजकीय व्यंगचित्र आणि ॲनिमेशन यांचा समाजावरील प्रभाव जगभरात लक्षणीय राहिला आहे. दुर्दैवाने भारतात दर्जेदार राजकीय व्यंगचित्रे अभावाने पाहायला मिळतात. राजकीय व्यंगचित्रासाठी नुसता विनोद पुरत नाही. त्यासाठी व्यंगचित्रकाराला भूमिका घ्यावी लागते. पटो वा ना पटो, लोकांना भूमिका घेतलेले भाष्य जास्त भावते. भूमिका घेणाऱ्या व्यंगचित्रकारांना त्याची पावतीही मिळते. डेव्हीड सारख्या दिग्गजाच्या बाबतीतील उदाहरण बोलके आहे. जर्मनीच्या हुकुमशहाला आपल्या सकस व्यंगचित्रातील पात्र बनविणाऱ्या आणि त्याबाबत राजकीय भूमिका घेणाऱ्या लो यांना जिवंत पकडून तरी आना अन्यथा मेलेला तरी आना, असे फर्मान ॲडॉल्फ हिटलरने सोडले होते. विनोदाच्या, विशेषत: व्यंगचित्राच्या माध्यमातून भूमिका घेणाऱ्यांना प्रोत्साहन मिळणे अत्यावश्यक आहे . पण अशी भूमिका घेण्यासाठी काही पूर्वअटी आहेत. व्यंगावर बोट ठेवायचे नाही. राजकीय समज आणि हातातील कला यांचा संगम लीलया झाला पाहिजे. व्यंग दिसण्याची दृष्टी उपजत असावी लागते. व्यंगचित्र ही सर्व चित्रांमधील शेवटची पायरी ती गाठताना दृष्टी आणि सरावाच्या जोडीला आशय आणि भूमिकेची जोड लागते. व्यंगचित्रांच्या बाबतीत स्वतः चे स्थान निर्माण करताना जी राजकीय भूमिका घ्यावी लागते, त्यासाठी मुबलक वाचन आणि अफाट संदर्भ आवश्यक ठरतात. ते गाठीशी असतील तेव्हाच कल्पना सुचणे आणि तिचा नेमकेपणाने विस्तार करणे शक्य होते. त्यातून व्यंगचित्र जास्त प्रभावी बनते. व्यंगचित्रकार हा पूर्णवेळ पेशा बनविता येणे शक्य आहे. प्रबळ इच्छेची जोड त्याला मिळावी लागते. सौंदर्यदृष्टी शाळेच्या पातळीवरच निर्माण करून जोपासावी लागते. व्यंगचित्र कलेसाठी

पोषक वातावरण निर्माण करायचे असेल तर चित्रकला हा ऐच्छिक विषय ठेवून चालत नाही. सांस्कृतिक पुनरूत्थानासाठी गाजलेल्या युरोपात दिला हा ऐच्छिक विषय नाही. त्याचे अपेक्षित परिणाम युरोपात प्रकर्षाने जाणवतात. तेथे ही दीक्षा देणाऱ्या शिक्षकाला मान असतो. तेच शिक्षक मानवंत विद्यार्थी घडवू शकतात. पाश्चिमात्य जगात व्यंगचित्रांना पोषक अशी संस्कृती आहे. म्हणूनच जंगलबुक सारखा ॲनिमेशनपट तयार करताना तब्बल १३०० कोटी रुपये खर्च करताना त्यांचा हात आखडत नाही. मनही कचरत नाही. तसा संस्कार आपल्याकडेही होण्यासाठी या दिवसाचे निमित्त मिळाले तर ते हवे आहेच की !''[१५]

२.०७.१६ वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत.

लेखाचे नाव : सोशल मिडीयावर सत्ताधाऱ्यांची टोळी.

वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत.

दिनांक : ५ मे २०१६.

पान नंबर : ७.

व्यंगचित्रकार दिना निमित्ताने दैनिक लोकमतने व्यंगचित्रांचा खास अंक बनवला होता. त्यासाठी अतिथी संपादक म्हणून राज ठाकरे हे व्यंगचित्रकारांच्या बाबतची मते मांडली त्यांची टिपणे वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. यामध्ये इंदिरा गांधी या भारत देशाच्या पंतप्रधान होवून गेल्या त्या आगोदर त्या लाल बहादूर शास्त्री यांच्या मंत्रीमंडळाच्या नभोवानी मंत्री होत्या त्यावेळी त्यांच्यावर छापण्यात आलेल्या व्यंगचित्राबाबत राज ठाकरे म्हणतात, ''इंदिरा गांधी या लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रीमंडळात नभोवाणी मंत्री झाल्या त्यावेळी त्यांच्यावर व्यंगचित्रे काढणे सुरू झाले. एका व्यंगचित्रकाराने ट्रान्झिस्टरचे चित्र कढले आणि अँटेनाच्या तोंडावर इंदिरा गांधींचा चेहरा काढला. खाली फ क्त इंदिरा गांधी नभोवाणी मंत्री एवढेच लिहिले. ते चित्र खूप गाजले.''[१६]

२.०७.१७ वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत.

दिनांक ५ मे २०१६

पृष्ठ क्रमांक : ७.

दैनिक लोकमत या मराठी भाषिक वृत्तपत्राने व्यंगचित्रकारी दिनानिमित्ताने विशेष वृत्तपत्र काढले होते. या वृत्तपत्रामध्ये नामवंत व्यंगचित्रकारांची माहिती मिळाली. या माहिती मध्ये प्रसिध्द व्यंगचित्रकारांची छोटेखानी चारित्रात्मक माहिती मिळते ती पुढील प्रमाणे

''बाळासाहेब ठाकरे– २३ जानेवारी १९२६ रोजी जन्मलेले बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे संस्थापक. त्यांची प्रतिमा रोखठोक नेत्याची राहिली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर जबरदस्त पकड असलेले बाळासाहेब मुळात अतिशय कुशल आणि यशस्वी व्यंगचित्रकार होते. त्यांनी प्रारंभीच्या फ्री प्रेस जर्नलमध्ये आर. के. लक्ष्मण यांच्या खांद्याला खांदा भिडवत काम केले. त्यांच्यातील व्यंगचित्रकार भाषणांदरम्यान रोखठोक टिप्पणी, चुटकी आणि मथळ्यांमधून समोर येत राहिला. १९६० मध्ये त्यांनी काढलेले मार्मिक मासिक त्यांनी रेखाटलेल्या व्यंगचित्रांमुळे नेहमी चर्चेत राहिले होते. १९६६ मध्ये शिवसेनेच्या स्थापनेनंतर त्यांनी सामना (मराठी) आणि 'दोपहर का सामना' (हिंदी) ही दोन शिवसेनेची मुखपत्रे प्रकाशित केली, मात्र राजकीय व्यग्रतेमुळे त्यांचे व्यंगचित्र क्वचितच कागदावर उतरत होत १७ नोव्हेंबर २०१२ रोजी त्यांचे निधन झाल्यामुळे राजकारणासोबतच व्यंगचित्रांच्या जगाचे मोठे नुकसान झाले आहे.

आर. के. लक्ष्मण– भारतीय व्यंगचित्रांची ओळख असलेल्या प्रत्येक जण रासीपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण यांना आर . के . लक्ष्मण या नावानेच ओळखतो. १९५१ मध्ये द टाइम्स ऑफ इंडियात रुजू झालेल्या लक्ष्मण यांनी कॉमन मॅन आणि दैनंदिन 'यु सेड इट' हे व्यंगचित्र अजरामर केले. पद्मविभूषण, पद्मभूषण, रमण मॅगसेसे यासारख्या पुरस्कारांनी सन्मानित लक्ष्मण यांच्या स्केचिंगचा सफाईदारपणा अद्वितीय असा होता. विषयांची निवड, त्याची जाण आणि सादरीकरण अजोड असायचे. स्थानिक छोट्या–मोठ्या वृत्तपत्रांमध्ये काम केल्यानंतर त्यांनी थोरले बंधू आर. के. नारायणन यांच्या कथा द हिंदूमध्ये चित्रित करण्याचे काम केले. त्यांची द प्रेस जर्नलमध्ये राजकीय व्यंगचित्रकार म्हणून नियुक्ती होताच त्यांच्या व्यंगचित्रकार म्हणून पूर्णवेळ कारकीर्दीला प्रारंभ झाला, त्यावेळी बाळासाहेब ठाकरे हे त्यांचे सहकारी व्यंगचित्रकार म्हणून कार्यरत होते. आर. के. नंतर टाइम्स ऑफ इंडियाचे अविभाज्य अंग

बनले. प्रारंभी त्यांच्या व्यंगचित्रांवर ब्रिटिश व्यंगचित्रकार डेव्हिड लो यांचा प्रभाव राहिला. २६ जानेवारी २०१५ रोजी ९३ व्या वर्षी या महान व्यंगचित्रकाराने अखेरचा श्वास घेतला.

शि. द. फडणीस– शि. द . फडणीस यांची व्यंग्यचित्र बघत महाराष्ट्रातल्या अनेक पिढ्या मोठ्या झाल्या. त्यांच्या व्यंग्यचित्रांमुळे चित्रकला सामान्यांपर्यंत पोहोचली. आपल्या ठसठशीत आणि लयबद्ध शैलीने फडणीस यांनी पाच दशकांहून अधिक वर्षे वाचकांना हसवले आहे. व्यंग्यचित्रे ही नेहमी वेडीवाकडी असतात, त्यांत नेहमी बोचरी टीका असते, असे समज़ फडणिसांच्या चित्रांनी खोटे ठरले. विसंगती टिपणारे अनेक प्रसंग यांनी आपल्या व्यंग्यचित्रांतून रेखाटले आणि विसंगतीतून किती निर्विष, सुखावणारा विनोद निर्माण करता येतो, याचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या शब्दविरहित चित्रांनी अनेक नियतकालिकांची, पुस्तकांची मुखपृष्ठे सजली. पु. ल. देशपांडे, चिं. वि. जोशी यांच्यासारख्या दिग्गज लेखकांच्या पुस्तकांची लज्जतही त्यांच्या चित्रांनी वाढवली.

वसंत सरवटे – वसंत सरवटे वयाच्या १७ वर्षापासून व्यंगचित्र रेखाटने करत आहेत, पुलं देशपांडे, वि. दा. करंदीकर, विजय तेंडुलकर या दिगज़ लेखकांच्या पुस्तकांसाठी वसंत सरवटे यांनी अव्याहत मुखपृष्ठ रेखाटली . . . ललित मासिकात ठणपाळ या जयवंत दळवींच्या लेख मालिकेसाठी सरवटेंनी काढलेली चित्र खुप गाजली. २००९ साली सरवटेंना इंडियन इस्टीट्युट ऑफ कार्टूनिस्टच्या वतीनं जीवन गौरव देऊन सन्मानित करण्यात आले. नुकत्यात मुंबईत पार पडलेल्या कार्टुनिस्ट कंबाईनच्या व्यंगचित्रकार सम्मेलनातही त्यांना जीवन गौरव पुरस्कारनं गौरवण्यात आले. मराठी व्यंगचित्रकारितेचा इतिहास हा वसंत सरवटे यांच्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

मंगेश तेंडुलकर – मंगेश तेंडुलकर यांच्या मते व्यंगचित्र ही माणसांची भूक आहे. हे केवळ थट्टा मस्करीचे माध्यम नाही. त्यातून आदर, गौरव, काव्यात्मक आशयही व्यक्त करता येतो. व्यंगचित्रातून श्रद्धांजली वाहण्याचा प्रयत्नही मी केला आहे व ते देखील परिणामकारकरीत्या करता आले आहे. गेली ४ दशकं ते व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाजातील अवगुणांवर मार्मिक कोपरखळी करत आलेत.

बी.बी. राममूर्ति– दक्षिण भारतातील पॉकेट कार्टुनचे जनक राममूर्ती यांचे 'मि. सिटीझन' मागील ३३ वर्षापासून लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवीत आहे. टेक्कन हेरॉल्ड,

प्रजावाणी, सुधा आणि मयुराच्या वाचकांचा दिवस 'मि. सिटीझनच्या' सामान्य माणसाच्या समस्या आणि विनोदात मनाला भिडणाच्या गोष्टींशिवाय सुरुच होत नाही. एकदा त्यांनी आपल्या मुख्य पात्राचा म्हैसुरी फेटा हटवून त्याला टक्कल पडलेले दाखविले. त्यावर वाचकांनी त्यांना लाखो पत्रे पाठविली, यावरुन त्यांच्या लोकप्रियतेची प्रचिती येते. शेवटी राममूर्ती यांना 'मि. सिटीझनला' पुन्हा फेटा घालावा लागला. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिमी कार्टर यांच्यावर तयार करण्यात आलेले काटुन 'ग्रीन ऑफ द उयरने' तर त्यांना आंतरराष्ट्रीयस्तरावर नवी ओळख मिळवून दिली.''[१७]

२.०७.१८ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती.

व्यंगचित्राचा मथळा : सबिर नजर, पाकिस्तानी व्यंगचित्रकार.

दिनांक : २० ऑगस्ट २०१६

पान नंबर : ३

अभिव्यक्ती बद्दल सर्व जगभर चर्चा चालू असते. परंतु धर्मांध राष्ट्रात व हुकूमशाही राष्ट्रात अभिव्यक्तीचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा बनला जातो. यावेळी याला उत्तर हे लेखातून अथवा वैचारिक मांडणी करून देण्यापेक्षाही एक व्यंगचित्रातून कसे दिले जाते याचे उदाहरण म्हणून पुढील व्यंगचित्र पहावे लागेल. हे व्यंगचित्र पाकिस्तानी व्यंगचित्रकार सबिर नजर यांनी काढले आहे. हे व्यंगचित्र एकूणच जागतीक हुकूमशाही प्रवृत्तीविरोधात भाष्य करणारे व्यंगचित्र आहे.



२.०७.१९ प्रकाशन : दैनिक सकाळ

लेखाचे नाव : समाज प्रबोधनीच्या ध्यासाची अथक वाटचाल.

लेखकाचे नाव : मल्हार अरणकल्ले.

प्रकाशन दिनांक : २० सप्टेंबर, २०१६.

पान नंबर : ६, संपादकीय.

या वृत्तपत्रात संपादकीय पानावर लेखकाने दैनिक सकाळचे संस्थापक डॉ. नानासाहेब परूळेकर यांचेवर लेख लिहला आहे. या लेखात लेखक लिहतात, ''सकाळ चे संस्थापक डॉ. नानासाहेब परूळेकर यांनी वृत्तपत्रांची पारंपारिक चौकट मोडली, आणि पत्रकारितेच्या केंद्रस्थानी सर्वसामान्य माणसांना महत्त्वाचे स्थान दिले. वृत्तपत्र म्हणजे केवळ बातम्या देण्याचे किंवा मनोरंजनपर मजकूर प्रसिध्द करण्याचे माध्यम नाही तर ते समाजसेवेचे महत्त्वाचे साधन आहे अशी त्यांची धरणा होती. नानासाहेबांनी 'सकाळ'ला लोकांच्या हक्काच्या व्यासपीठाचे स्वरूप दिले. सर्वसामान्यांचे प्रश्न, त्यांची गऱ्हाणी, 'सकाळ' मधून हिरिरीने मांडली, तड लागेपर्यंत त्याचा पाठपुरावा केला. त्यांनी लोकांना 'सकाळ'शी जोडून घेतले आणि अनेक सामाजिक कामे केली. पत्रकाराला समाजच्या सुख–दुःखाची जाणीव असली पहिजे; आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यात त्याने अग्रभागी असले पाहिजे, असा नानासाहेबांचा अग्रह होता. त्यांची पत्रकारिता लोकांना नवी, वेगळी व ताजी माहिती पुरविणारी तर होतीच; पण तेवढीच ती त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी धावून जाणारी होती.''[१८] वरील लेखातून लेखक लोकभिमूख पत्रकारिता परूळेकरांनी कशी केली याची माहिती पुरवितात. लोकांचे प्रश्न सोडवण्याचे माध्यम म्हणून वृत्तपत्र होवू शकते याची जाणीव करून सामाजिक बांधिलकी या मूल्यासाठी डॉ. नानासाहेब परूळेकर कसे झटले याची मांडणी या लेखात करण्यात आली आहे.

वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेला हा लेख मूल्यवर्धीत पत्रकारिता कशी असावी याची जाणीव करून देणारा असल्याने प्रस्तुत संशोधनासाठी तो उपयेागी आहे. संशोधन करीत असताना दै. सकाळ या वृत्तपत्रातील व्यंगचित्रे निवडल्याने त्या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक कसे होते? हे देखील वरील माहितीतून लक्षात येते हे संशोधनसाठी उपयेागी आहे.

२.०७.२० वृत्तपत्राचे नाव: दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती

लेखाचे नाव: भाषा आणि रेषा दोन्हींवर हुकमत.

लेखक: विकास सबनीस.

दिनांक: गुरूवार, १७ नोव्हेंबर २०१६

पान नंबर : ९.



बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील नामवंत व्यंगचित्रकार होते. त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून राजकीय, सामाजीक, सांस्कृतिक इत्यादी बाबी अभिव्यक्त केल्या. व्यंगचित्रांना वृत्तपत्रात स्थान टिकून ठेवण्याचे कामा बाळासाहेब ठाकरेंच्या व्यंगचित्रपत्रकारितेमुळे झाल्याचे दिसून येते. त्यांच्या बाबत दैनिक सकाळ या मराठी भाषिक वृत्तपत्रामध्ये पुढील माहिती मिळते. ''जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये कलेचं शिक्षण घेत असताना बाळासाहेबांच्या व्यंग्यचित्रकलेनं मी भारावून गेलो होतो. त्या वेळी त्यांनी आम्हाला शिकवायला असलेल्या फॅकल्टीमधील शिक्षकाची भूमिका निभावली आम्ही त्या वेळी 'मार्मिक' च्या अंकाची वाट बघत बसायचो . त्याच वेळी बाळासाहेबांची व्यंगचित्रकला पाहून मी मनाशी पक्कं ठरवलं, की मला कार्टूनिस्ट व्हायचंय. माझं शिक्षण पुर्ण झाल्यानंतर मग मी कुठल्याही ॲड एजन्सीत वगैरे काम

न करता स्वतंत्र कार्टूनिस्ट म्हणून काम करू लागलो. 'मार्मिक' मध्ये मी १२ वर्ष काम केलं. शिवसेनेचा पक्ष म्हणून उदय झाला आणि बाळासाहेबांची जबाबदारी वाढली, मग त्यांनी मार्मिकची जबाबदारी माझ्यावर सोपवली. त्यांच्यातील कलावंताने मला अचूक हेरलं आणि मार्मिकच्या टीममध्ये सामावून घेतलं. बाळासाहेबांकडे माणसं हेरण्याची कला होती. त्यांच्यासोबत काम करताना सकारात्मक ऊर्जा जाणवायची. एका पक्षाचे प्रमुख असले., तरीही त्यांनी माझ्या व्यक्तिस्वातंत्र्यावर कुठलीही बंधनं घातली नाहीत. त्यामुळे त्यांच्याबरोबर मी प्रदीर्घ काळ काम करू शकलो. दुसऱ्याचा मान राखणं, त्याला आर्थिक गोष्टी कमी पडू नयेत म्हणून इतरत्र काम करायला स्वातंत्र्य देणं, त्यावर हरकत न घेणं, हे फक्त बाळासाहेबच करू शकतात. त्यांचा माझ्यावर खूप विश्वास होता. त्यांनी माझ्या ५० व्या वाढदिवशी स्वतः शब्दांकन केलेलं मानपत्र राज ठाकरेंच्या हस्ते देऊन सत्कार समारंभ आयोजित केला होता. मी जे यश मिळवलंय, त्यात बाळासाहेबांचा खूप मोठा वाटा आहे. बाळासाहेबांना उत्कृष्टतेचा ध्यास होता. व्यंग्यचित्रामध्ये एकही त्रुटी आवडत नसे. ॲनॉटॉमीबाबत ते काटेकोर असत. अफाट कल्पनाशक्तीचं सामर्थ्य त्यांच्याकडे होतं. व्यंग्यचित्रकला इतर कलावंतांनीही आत्मसात करावी , यासाठी त्यांची धडपड असे त्याचं मराठी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होतं आणि विचारांमध्ये स्पष्टता होती त्यामुळे त्यांची भाषणं आजही आपल्या स्मरणात आहेत आणि त्यांची कला आपल्याला नवं काही करण्याची प्रेरणा देते, भाषा आणि रेषा या दोन्ही गोष्टींवर त्यांची कमांड होती.''[१९]

२.०७.२१ वृत्तपत्राचे नाव: दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती.

लेखाचे नाव: अस्सल कलावंताची नजर.

लेखक: मंगेश तेंडूलकर.

दिनांक: गुरूवार, १७ नोव्हेंबर २०१६.

पान नंबर: ९

मार्मीक या मराठी प्रसिध्द व्यंगचित्र नियतकालीकाच संपादक बाळासाहेब ठाकरे यांच्या चौथ्या स्मृति दिनानिमित्ताने त्यांच्यातील व्यंगचित्रकारीतेच्या पैलू विषयी जो लेख प्रकाशित करण्यात आला त्यामध्ये व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबत माहिती मिळाली ती पुढील प्रमाणे, ''माझा आणि बाळासाहेबांचा परिचय १९६० पासूनचा. याच दरम्यान

बाळासाहेबांनी साप्ताहिक 'मार्मिक' सुरू केले. माझीही व्यंग्यचित्रे मार्मिकमध्ये छापून यावीत, अशी माझी मनोमन इच्छा होती. म्हणून मी एके दिवशी पुण्याहून मुंबईला बाळासाहेबांच्या घरी गेलो. त्यांनी आनंदाने माझं स्वागत केलं. एखाद्या सामान्य माणसासारखीच त्यांची राहणी होती त्यांनी मला बसायला सांगितलं आणि स्वतः खाली सतरंजीवर त्यांचं साहित्य घेऊन व्यंग्यचित्रं काढत बसले. मीही त्यांना व्यंग्यचित्र काढताना बघू लागलो. याआधी कुठल्याही निष्णांत कलावंताला त्याची कलाकृती रेखाटताना पाहिलं नव्हतं. बाळासाहेब पेन्सिल न घेता थेट शाईने चित्र चितारायचे. एकदम शार्प पॉवरफुल फटकारे मारत आकाशात घिरट्या घातल्यासारखा त्यांचा ब्रश फिरे. त्यांनी क्षणार्धात माझ्यासमोर अटलबिहारी वाजपेयींचं चित्र पुरं केलं. एखादं व्यंग्यचित्र काढताना ते स्पष्ट विचार करून ठरवत. त्यानंतरच चित्रात साकारत. एखाद्या राजकीय घडामोडीवर घाईने भाष्य करत नसत. थोडा वेळ घेऊन अतिशय कल्पक आणि सामाजिक विचार करून मग चित्र काढीत. मग त्यामुळे जे वादळ उठे, ते आपल्याला माहीतच आहे. राजकीय व्यंग्यचित्र काढताना जो पंच लागतो, तो त्यांच्याकडे होता. त्यांना कुणावर टिका करायची असल्यास ते थेट टीका करायचे. आचार्य अत्रेही यातून सुटले नव्हते. माझी व्यंग्यचित्रं बाळासाहेबांनी पाहिली आणि ती मार्मिकमध्ये आल्यानंतर बाळासाहेबांचे काही खास पैलू आपण स्वतः व्यंग्यचित्रातून रेखाटावेत, या विचाराने मी बाळासाहेबांना पंचेस आणि ठोसे देणारी काही व्यंग्यचित्रे काढली. पण व्यंग्यचित्रे कुणीच छापायला तयार होईना मग मुंबईतील एका संपादकाने ती व्यंग्यचित्रे छापली आणि बाळासाहेबांना नेऊन दाखवली. त्यांनी चित्रं कौतुकाने पाहिली. त्यानंतर मी एका प्रदर्शनाला त्यांना बोलवायला गेलो असताना त्यांनी माझे त्या व्यंग्यचित्रांसाठी कौतुक केलं आणि म्हणाले, 'कलाकाराला आपल्यावरील मिश्कील, मार्मिक भाष्य आणि टीका दोन्हीही खिलाडू वृत्तीने स्वीकारता आली पाहिजे.' त्यांच्या स्वभावातच खिलाडू वृत्ती होती.''[२०]

२.०७.२२ प्रकाशन : दैनिक दिव्य मराठी

लेखाचे नाव : भारतात चित्रकार म्हणून मुलींचे, स्त्रियांचे अस्तित्व काय?

लेखकाचे नाव : आनंद साई.

प्रकाशन दिनांक : ११ डिसेंबर २०१६, रविवार.

पान नंबर : ३.

या वृत्तपत्रात आनंद साई या युवा चित्रकाराचा 'भारतात चित्रकार म्हणून मुलींचे, स्त्रियांचे अस्तित्व काय?' या मथळ्याचा लेख प्रकाशित झाला आहे. यात म्हटले आहे, ''चित्रकले विषयी बोलायचे म्हटल्यावर आदिवाशी अवस्थेच्या काळापासून म्हणजे गुफाचित्रे ही चित्रभाषा पहिली कला अस्तित्वात आली. नंतर संगीत, गायन, ललित, साहित्य, नृत्य, फिल्म, सिनेमा, अशा सर्वांचा अनुक्रमे नंबर नंतर लागतो.

चित्रांचा म्हणजे विविध अंगी चित्रकलेचा भारतात प्रसार झालाच नाही. किंबहुना या बाबतीत पुर्ण ज्ञान ही नाही. युरोपात तसेच अमेरिकेत चित्रकेलेचा प्रसार खूप वेगाने झाला. कारण तेथील कले बद्दल मानसिकता पूर्वी पासूनच सकारात्मक होती. संगीत, गायन, चित्रपट अशा क्षेत्रांचा भारतीय स्त्रियांचा लक्षणीय प्रभाव आहे व आपण तो वेगवेगळ्या उदाहरणातून बघितलेला आहे''[२१] अशा प्रकारे चित्रकलेचा ऐतिहासीक मांडणी करून भारतीय परंपरेत चित्रकेलेला नसलेले स्थान तसेच पुर्ण ज्ञान नसल्याचेही मत लेखक व्यक्त करतात. परंतु यूरोप या बाबतीत पुढारलेला आहे असे सांगून ''तब्बल सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात चित्रकार म्हणून मला उदयास का येत नाहीत हा एक जणू अभ्यासाचा विषय आहे. चित्र कलेत मुलींनी यावे आणि आपले अस्तित्व निर्माण करावे. कारण मला वाटते. चित्रकले ऐवढ स्वातंत्र्य कशातही नाही''[२२] असे मत लेखक आपल्या लेखातून व्यक्त करतो. तसेच स्वातंत्र्याचा पूर्ण अविष्कार निर्माण करायचा असल्यास चित्रकलेचा उपयोग होवू शकतो असे मतच लेखक आपलया लिखानातून मांडतात. आपल्या देशात ऐवढ्या मोठ्या लोकसंख्येत स्त्रीया चित्रकार नसल्याचे दुःख ते व्यक्त करतात. सोबतच मेक्सिकन महिला चित्रकार फ्रिडा काहला व भारतीय महिला चित्रकार शेरगी यांची माहिती देतात. त्यात म्हणले आहे, ''फ्रि डा काहलो– (१९०७–१९५४) विसाव्या शतकातील मेक्सिकन चित्रकार स्वयं अभिव्यक्तीसाठी प्रसिध्द. तसेच सेल्फ प्रोट्रेटसाठी त्या प्रसिध्द आहेत. मक्सिकन संस्कृतीतील स्त्रीवादी दृष्टीने भावनांचे जगण्याचे चित्रण त्यांनी केले. एका बसच्या भीषण अपघातने त्यांचे आयुष्य पालटले. डॉक्टर होण्या ऐवजी त्या चिकलेकडे वळल्या आणि जगात मान्यता पावल्या अलिकडेच २०१६ मध्ये त्यांचा टू लव्हर्स इन द फारिस्ट (१९३९) चित्राचा लिखाव झाला. त्यावेळी त्यत ५२० कोटी रूपयांना बोली आली.''[२३] त्या सोबतच भारतीय महिला चित्रकार ''अमृता शेलगीर (१९१३–१९४१)– आताही काही महिला चित्रकार देशात

आहेत. मात्र त्यांचे पुरूषांचया तुलनेने नगण्यच आहे. भारतात विसाव्या शतकातील महिला चित्रकार अमृता शेरगी यांचे नाव मोठ आहे. त्याला आंतराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली आहे. अशी अनेक मोठे नावे होणे आपेक्षित आहे. शेरगील यांच्या विषयी पुस्तकातून नेटवरून उपलब्ध आहे. थोडक्यात परिचय असा, त्याचा जन्म बुडापेस्ट (हंगेरी) शीख कुटुंबात झाला. आई हंगेरीयन ज्यू आणि वडिल शीख होते. शेरगील यांना भारतीय फ्रि डा काहेलो म्हणून ओळखले जाते. सय्यद रजा आणि अप्रिता सिंग आदी चित्रकारांवर त्यांचा प्रभाव व्हिलेज सीन चित्राचा लिलाव २००६ मध्ये झाल त्यावेळी सुमारे सात कोटी रूपयांना ते विकले गेले''[२४] अशी माहिती आपल्या लेखात करून देतात. चित्रकेलेची ऐतिहासिक माहिती तसेच जागतिक पातळीवरील मान्यता पावलेल्या महिला चित्रकारांचा आढावा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगी ठरणारा आहे.

२.०७.२३ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती.

छायाचित्राचा : 'कॉमन मॅन'ला पोलिसांचा सॅल्यूट.

दिनांक : ३ डिसेंबर २०१६.

पान नंबर : २


'कॉमन मॅन'ला पोलिसांचा सॅल्यूट

दिव्यमराठीच्या पान नंबर २ वर वरील बाजूस खालील छायाचित्र प्रकाशित झाले होत. यामध्ये आर. के. लक्ष्यण यांचा 'कॉमन मॅन' या व्यंगचित्राच्या पुतळ्याचे सिंबॉयसिय

युन्व्हसिटी, पुणे येथे अनावरण करण्यात आले होते. यावेळी 'कॉमन मॅन' या व्यंगचित्राच्या समोर 'कॉमन मॅन' पेक्षा उंचीने मोठा असणारा पोलीस हवालदार हा सॅल्यूट करताना दाखवला आहे. तसेच 'कॉमन मॅन' हा पुतळा आदरपूर्वक आपल्या खांद्यावर छत्री घेवून पोलीसाचा सन्मान स्विकारत असल्याचे या छायाचित्रात पुतळा अनावरणाचा प्रसंग टिपला आहे. या छायाचित्राच्या खाली पुढील ओळी दिल्या आहेत त्यात म्हणले आहे, ''प्रसिध्द व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' व त्याला सॅल्यूट करणारा पोलिस कर्मचारी या पुतळ्याचे अनावरण कोल्हापूर पोलिस अधीक्षक कार्यालय महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे नेते सतेज पाटील, खासदार छत्रपती शाहू महाराज, विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील आदी.''[२५]

२.०७.२४ वृत्तपत्राचे नाव: दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती

लेखाचे नाव: व्यंगचित्रकारांचे महात्म वर्णन करणाऱ्या ५ व्यंगचित्रकथा.

दिनांक: शुक्रवार, ५ मे २०१७.

पान नंबर: ५

जागतिक व्यंगचित्रकार दिना निमित्ताने दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामध्ये 'व्यंगचित्रकारांचे महात्म वर्णन करणऱ्या ५ व्यंगचित्रकथा' प्रकाशित करण्यात आल्या होत्या. यामध्ये व्यंगचित्रांमुळे समाजावर जो प्रभाव पडतो, वाचकांवर जो परिणाम होतो. याची प्रचिती येते. या व्यंगचित्रकथा सोबत व्यंगचित्रे ही देण्यात आली आहेत.

यामध्ये 'राजीव गांधींचा आर. के. लक्ष्मण यांना प्रश्न: नेहमी माझे टक्कल का दाखवता?' या मथळ्याचा लेख प्रकाशित करण्यात आला आहे. यामध्ये अशा पध्दतीचे वर्णन करण्यात आले आहे.



''राजीव गांधी उंच आणि देखणे असल्यामुळे त्यांच्या शारीरिक ठेवणीतील कच्चे दुवे शोधून व्यंगचित्र बनवणे आर . के . लक्ष्मण यांना कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी राजीव गांधींना थोडे जाड आणि गोलाकार दाखवले. नाक बारीक व भुवया घनदाट मात्र त्यातील केस कमी केले. डोक्यावर तर टक्कलच ठेवले. एखाद्या समस्येविषयी कुणी बोलत असेल तर राजीव गांधी नेहमीच 'आय ॲम लुकिंग इन टू द मॅटर' असे म्हणायचे. ही बाब लक्ष्मण यांनी हेरली होती. १९८८ मध्ये राजीव गांधी व लक्ष्मण यांची भेट झाली. तेव्हा गांधी म्हणाले, मला तुमचे काम खूप आवडते. मात्र, तुम्ही मला नेहमीच टक्कल का दाखवता. त्यावर लक्ष्मण उत्तरले , 'आय ॲम लुकिंग इन टू द मॅटर'.''[२६]

त्याचप्रमाणे पुढील प्रमाणे माहिती मिळते, ''आर . के . लक्ष्मणांबाबत एक किस्सा लोकप्रिय आहे. मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टसने लक्ष्मण यांना प्रवेश नाकारला होता. मात्र, आता त्याच जे. जे. स्कूलमध्ये आर. के. लक्ष्मण यांचे संग्रहालय बनवण्यात आले आहे.''[२७]

त्याचप्रमाणे, 'नेपोलियन कायमसाठीच ठेंगणा बनवणार व्यंगचित्र' या मथळ्याखाली पुढील कथा देण्यात आली आहे, ''जगप्रसिद्ध व्यंगचित्र – लिटिन बोनी इन ए स्ट्रॉंग फिट.

यानंतरच नेपोलियन यांना सर्वत्र ठेंगण्या रूपातच दाखवण्यात आले. हे व्यंगचित्र बनवणारे ब्रिटिश व्यंगचित्रकार काढणारे जेम्स गिलेरी यांना 'फादर ऑफ द मॉडर्न पॉलिटिकल कार्टून' म्हटले जाते.

''मृत्यूच्या २०० वर्षांनंतरही नेपोलियन बोनापार्ट यांच्याविषयी जगात त्यांच्या दोन गोष्टी अत्यंत लोकप्रिय आहेत. एक तर ते फ्रेंच होते आणि दुसरे म्हणजे ते ठेंगणे होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, नेपोलियन यांची उंची ५ फूट ७ इंच होती आणि १८०३ मध्ये अशी उंची चांगली मानली जायची. मात्र, त्याचवर्षी एक व्यंगचित्र प्रकाशित झाले. त्यात लिहिले होते , 'लिटिन बोनी इन स्ट्रॉंग फिट'. त्यात नेपोलियन यांना ठेंगणे बालकांप्रमाणे खोड्या करताना दाखवले होते. त्यानंतर नेपोलियन यांना नेहमीसाठीच याच रूपात दाखवले जाऊ लागले.

हे  व्यंगचित्र जेम्स गिलेरी यांनी बनवले होते. त्यांच्याबाबत नेपोलियन म्हणाले होते की, 'माझ्याविरोधात युरोपातील संपूर्ण लष्कर जे काम करू शकले नाही. ते काम एकट्या जेम्सने केले. त्याने मला ठेंगणे सिद्ध केले.''[२८]




तसेच 'लष्कर नव्हे, व्यंगचित्रकारांना घाबरतात दहशतवादी' या मथळ्याखाली 'चार्ली हेब्दो' या नियतकालीकावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांवर जे व्यंगचित्र प्रकाशित करण्यात आले त्या बाबत पुढील व्यंगचित्रकथा देण्यात आली आहे, ''७ जानेवारी २०१५ रोजी चाली हेब्दो नियतकालिकेच्या कार्यालयावर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात १२ जण ठार झाले . त्यानंतर जगभरातील व्यंगचित्रकारांनी मिळून दहशतवादाला आपल्या अनोख्या शैलीतून उत्तर द्यायला सुरुवात केली. दहशतवादाविरोधात इतक्या मोठ्या प्रमाणात व्यंगचित्र बनवण्याची ही पहिलीच घटना आहे.''[२९]

त्याचप्रमाणे, पुढील माहिती देणारा लेख 'आय ॲम चार्ली' : घोषवाक्य , जग एकवटण्यासाठी कारण' या मथळ्याने प्रसिध्द झाला आहे, त्यात म्हणले आहे

''चार्ली हेब्दोच्या हल्ल्यानंतर काही तासांतच 'आय ॲम चाली' हे व्यंगचित्र चर्चेत आले जेम्स मॅक्लॉयड या व्यंगचित्रकाराने बनवलेले हे घोषवाक्य जगभर व्हायरल झाले. यात चार्ला हेब्दोवर हल्ला करणाच्या दहशतवाद्याला हातात बंदूक आणि रक्ताने माखलेल्या पायासह दाखवले होते. त्याच्यासमोर एक व्यगचित्रकार कागदावर 'आय ॲम चार्ली' असे लिहिताना दाखवले. हे घोषवाक्य ट्विटरच्या इतिहासातील सर्वाधिक लोकप्रिय न्यूज हॅशटॅगपैकी एक, ठरले आहे.

मॅक्लॉयड यांचे टाइम मॅगझिन, ' एपी आणि बीबीसीसारख्या माध्यमांनी, वृत्तसंस्थांनीही प्रकाशित केले.''[३०]

व्यंगचित्राची ताकद काय आहे हे आपल्याला वरील कथेवरून लक्षात येते येते. वृत्तपत्रीय व्यंगचित्रे ही समाजमनावर किती परिणामकारक ठरू शकतात. प्रशासनावर दबाव आणणारे महत्त्वाचे साधन म्हणून वृत्तपत्र याचा वापर करून शकते. ज्या पध्दतीने लेखाने लेखाचे उत्तर देता येते त्याच प्रमाणे प्रभावीपने आपले मत व्यंगचित्रकार व्यंगचित्रांच्या मदतीने मांडत असतो. याचीच माहिती देणारा 'व्यंगचित्राला व्यंगचित्रानेच प्रत्युत्तर' ही व्यंगचित्रकथा प्रकाशित करण्यातआली आहे. या म्हणले आहे,



''भारताच्या मंगळयान अभियानाची खिल्ली उडवणारे व्यंगचित्र हेंग किम सांग यांनी न्यूयॉर्क टाईम्स मध्ये प्रकाशित केले होते. त्याच्या प्रत्युत्तरात संदीप अध्वर्यू यांनी २०१७ मध्ये एक व्यंगचित्र बनवले. हे व्यंगचित्र भारताने एकाच वेळी प्रक्षेपित केलेल्या १०४ उपग्रहांच्या मोहिमेवर आधोरेखीत होते.''[३१]

व्यंगचित्राची ताकद ही व्यंगचित्रकार जाणत असतो. व्यंगचित्रांना कमी शब्दांची जोड देणे ही त्याची कसरत असते. अगदी सहज नजरेत भरणारा असा संदेश व्यंगचित्रातून दिला जातो. अशाची व्यंगचित्रकथा 'मोरारजी देसाई होते बंदी घालण्याच्या तयारीत' या मथळ्याखाली देण्यात आली आहे त्यात म्हणले आहे, ''मोरारजी देसाई दारूबंदीसोबतच घोड्यांच्या शर्यतीवरही बंदी घालण्याच्या तयारीत होते. त्यांच्या याच धोरणावर टीका करत आर. के. लक्ष्मण यांनी अनेक व्यंगचित्रे प्रकाशित केली. कलेच्या नावावर नेत्यांची व्यंगचित्रे

बनवण्यावर बंदी घालण्यासाठी त्यांनी चक्क मंत्रिमंडळाची बैठकही बोलावली. मात्र अशी बंदी घालता येत नसल्याचे त्यांना सांगण्यात आल्याने मुद्दा संपला. देसाई पंतप्रधान बनले तेव्हाही लक्ष्मण यांनी त्यांना सोडले नाही. नोटबंदीसह अनेक मुद्यांवर त्यांनी व्यंगचित्रे बनवली.''[३२]



२.०७.२५ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर जिल्हा आवृत्ती.

लेखाचे नाव : मंगेश तेंडूलकर यांची साहित्य संपदा.

दिनांक : १२ जूलै २०१६

पृष्ठ क्रमांक : ५.

मंगेश तेंडूलकर या मराठी भाषीक वृत्तपत्रीय व्यंगचित्रकाराच्या निधनानंतर त्यांचेवर जे विशेष वृत्तपत्रीय पान छापण्यात आले होते. 'मंगेश तेंडूलकर यांची साहित्य संपदा' या मथळ्याखाली त्यांच्या साहित्याचा आढावा घेण्यात आला होता. त्यासोबतच त्यांचा अल्पपरिचय देखील करून देण्यात आला आहे. व्यंगचित्रकार हे विचार करणारे विचारवंत असतात. कोणतेही व्यंगचित्र निर्माण करताना हजार वेळा विचार करून त्याला जन्माला घालावे लागते. त्याचीच प्रचिती पुढील माहिती वरून येते, ''मंगेश तेंडुलकरांनी व्यंगचित्रांच्या प्रदर्शनाचे व्रत स्वीकारले होते. त्यामुळे स्वतःला सतत व्यग्र ठेवण्यासाठी दर तीन ते चार महिन्यांनी ते व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरवत असत आणि प्रत्येक वेळी किमान पंधरा वीस नवी व्यंगचित्रे त्यांच्या प्रदर्शनात हमखास पहायला मिळत. व्यंगचित्रांच्या माध्यमातून त्यांनी केलेली

टिपणी अनुभवण्यासाठी त्यांच्या प्रत्येक प्रदर्शनाला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळत असे. व्यंगचित्रांच्या सोबतीने तेंडुलकर लेखनातही मनापासून रमले. 'भुईचक्र', 'पॉकेट कार्टून्स', 'संडे यांची मूर्ट' ही त्यांची पुस्तके गाजली आणि लोकप्रिय ठरली या पुस्तकांना मानाचे पुरस्कारही लाभले. त्यात वि. मा. पटवर्धन पुरस्कार, मसापचा चि. वि. जोशी पुरस्कार यांचा समावेश आहे. तेंडुलकरांनी दैनिके आणि दिवाळी अंक तसेच नियतकालिकांतून सातत्याने विपुल लेखन केले. तसेच कित्येक नियतकालिके व दिवाळी अंकांतून त्यांच्या व्यंगचित्रांच्या मालिका प्रकाशित झाल्या. वयाच्या साठीनंतर तेंडुलकर कॅरीक्रेचर या कलाप्रकाराकडे वळले आणि त्यावरही त्यांनी प्रभुत्व मिळवले.

अल्पपरिचय – मंगेश धोंडोपंत तेंडुलकर यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९३९ रोजी झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. त्यांना रघुनाथ, विजय, मंगेश आणि सुरेश असे चार भाऊ होते. ते विज्ञान शाखेचे पदवीधर होते. दारूगोळा कारखान्यात त्यांनी अभियंता म्हणून त्यांनी वीस वर्षे नोकरी केली. व्यंगचित्रकलेचे कुठलेही औपचारिक प्रशिक्षण त्यांनी घेतले नव्हते पण ही कला त्यांना जन्मजात वश होती. सुरूवातीला केवळ छंद म्हणून ते व्यंगचित्र रेखाटत असत. पुढे हा छंद त्यांचा व्यवसाय बनला. दैनिक, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, दिवाळी अंक आणि पुस्तके असा तेंडुलकरांच्या व्यंगचित्रांचा प्रवास विस्तारत गेला.''[३३]

२.०७.२६ वृत्तपत्राचे नाव: दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती

लेखाचे नाव: चित्रकार विद्यार्थीनीला भेट दिला अमूल्य ठेवा.

दिनांक: बुधवार, १२ जूलै २०१७.

पान नंबर: ५.

मंगेश तेंडुलकर हे मराठी भाषीक वृत्तपत्रासाठी व्यंगचित्रपत्रकारिता करणारे जेष्ठ व्यंगचित्रकार होते. त्यांच्या निधनानंतर दैनिक दिव्य मराठीने विशेष पान छापले. 'चित्रकार विद्यार्थीनीला भेट दिला अमूल्य ठेवा' या मथळ्या खाली पुढील माहिती प्रकाशित करण्यात आली त्यात म्हणले आहे, ''आपल्याला ज्या क्षेत्राची आवड असते त्यामधील गुरूंचा आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळावे, अशी प्रत्येकाचीच अतोनात इच्छा असते. कमी वयात अशा प्रकारे मार्गदर्शन मिळाले तर कलाकारास आपली कला भविष्यात विकसित करण्यासाठी मोठी संधी मिळत असते. पुण्यातील हुजूरपागा शाळेत आठवीत शिकणाच्या पूर्वा विजय गवळी या मुलीच्या

पेंटिंगवर प्रसन्न होत, ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी तिला चक्क ते स्वतः वापरत असलेले ब्रश, ड्रॉइंग बोर्ड, चित्रांचे स्टॅड, कलर असा अमूल्य ठेवा मागील महिन्यातच भेट दिला होता. तेंडुलकर यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी पूर्वा तिच्या कुटूंबीयांना या आठवणींनी गहिवरून आले.

पूर्वा हिने सांगितले की, पहिलीत असताना माझ्या चित्रांचे पहिले प्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर येथे भरले होते. वृत्तपत्रातील संबंधित प्रदर्शनाची माहिती वाचून मंगेश तेंडुलकर हे पहिल्या दिवशी सकाळीच प्रदर्शन पाहण्यास आले. त्यांनी सर्व वॉटर कलर, पेंटिंगची सुमारे १२५ चित्रे निरखून पाहत मला शाबासकी दिली. स्केचशिवाय थेट चित्र काढत असल्याचे व सदर चित्र बोटांनी कापड, स्पंज याने रंगवत असल्याचे ऐकून त्यांनी सुरुवातीला मला एक ब्रश भेट दिला.

आतापर्यंत माझ्या चित्रांची १२ प्रदर्शने झाली आहेत. त्यापैकी नाशिकचे एक प्रदर्शन वगळता उर्वरित ११ प्रदर्शनांना तेंडुलकर यांनी न चुकता भेट दिल्याने आमच्या दोघात घट्ट नाते निर्माण झाले होते.

पूर्वा म्हणाली, 'तेंडुलकर यांनी त्यांच्याकडील ब्रश, रंग देताना सांगितले की, हे ब्रश जरी मी वापरलेले असले तरी तु तुझ्या पद्धतीने यांचा वापर कर. नवीन कल्पना वापरून चित्रे काढ आणि तुझी वेगळी चित्रकलेची स्वतंत्र शैली जप. मी एका गोगलगायीवर बसल्याचे एक व्यंगचित्र काढले होते, ते तेंडुलकरांना सर्वाधिक भावले होते.' ''[३४]

२.०७.२७ वृत्तपत्राचे नाव: दैनिक मराठी, सोलापूर आवृत्ती.

लेखाचे नाव: कुंचल्याव्दारे वाहतूक नियमांची शिकवण.

दिनांक: १२ जूलै २०१७.

पान नंबर: ५.

मंगेश तेंडूलकर हे वृत्तपत्रांमधून सामाजिक, राजकीय अंगाने वृत्तपत्रीय व्यंगचित्रे काढणारे व्यंगचित्रकार होते. त्यांनी समाजाला मार्गदर्शन व्हावे यासाठी वाहतूक नियमांची शिकवण आपल्या व्यंगचित्रांतून करून दिली. 'कुंचल्याव्दारे वाहतूक नियमांची शिकवन' या मथळ्या खाली प्रकाशित केलेल्या लेखात म्हणले आहे, ''ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या कुंचल्याच्या फटक्यातून विविध विषयातील असंख्य खुसखुशीत व्यंगचित्रांनी रसिकांचे,

अनेकवेळा मनोरंजन केले. मात्र, वाहतूक नियमांचे पालन करा असा सहज सोप्या शैलीत संदेश देणारी त्यांची व्यंगचित्रे विशेषत्वाने गाजली. वृत्तपत्रात व्यंगचित्राच्या माध्यमातून वाहतुकीच्या नियमांची शिकवण देण्यासोबतच, रस्त्यावर उभे राहून प्रत्यक्ष लोकांना वाहतुकीचे धडे दिल्याची भावना वाहतूक पोलीस शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. पुणे वाहतूक शाखेचे पोलीस उपआयुक्त अशोक मोराळे यांनी सांगितले. तेंडुलकरांनी वाहतूक व्यवस्था सुधारण्याकरिता तसेच नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे याकरिता व्यंगचित्रांची मालिका चालवली. नागरिकांना वाहतूक नियमांचा संदेश देणारी व्यंगचित्र काढलेली ग्रीटिंग कार्ड भेट देऊन त्यांचे मन वळविण्याचे काम तेंडुलकर कधी ही आपल्या जबाबदारीपासून मागे हटले नाहीत. मंगेश तेंडुलकर यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून संदेश देण्याचे काम सदैव केले असून ते जरी दिवंगत झाले असले तरी त्यांची व्यंगचित्रे यापुढील काळात आमच्यासाठी अमर राहतील अशी प्रतिक्रिया पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी व्यक्त केली.''[३५]

२.०७.२८ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर जिल्हा आवृत्ती.


लेखाचे नाव : स्वतःला कैलासवासी म्हणवून घेणारा व्यंगचित्रकार

पान नंबर : ५

दिनांक १२ जूलै २०१७



प्रसिध्द व्यंगचित्रकार मंगेश तेंडूलकर यांच्या निधनानंतर त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये स्वतःला कैलासवासी असे घोषीत करणारे व्यंगचित्र काढले होते. त्याला प्रसिध्दी मिळाली होती. हे व्यंगचित्राचे वेगळेपण असे की, स्वतःला मृत घोषीत केल्याचे व्यंगचित्रात दाखवलल्या पाटीवर कुत्रे लघुशंका करीत असल्याचे दाखवून स्वतःला सामान्य माणूस असल्याचे त्यांनी दाखवले होते. त्यांनी त्यांचा मोठेपणा आपल्या व्यंगचित्रातून प्रगट केला होता. स्वतःवर ही भाष्य करणारे असे व्यंगचित्रकार तेंडूलकर यांच्या निधनानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फ डणवीस व उच्चशिक्षण व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडेयांनी आदरांजली दिली होती. त्या बाबत माहिती देणारा मजकूर पुढील प्रमाणे आहे,



''१९८६ सालापर्यंत संरक्षण खात्याच्या अभियांत्रिकी प्रयोगशाळेत नोकरी केल्यावर तेंडुलकरांनी पूर्णवेळ व्यंगचित्रकार म्हणून काम करण्यास सुरवात केली. अखेरच्या श्वासापर्यंत व्यंगचित्रकार म्हणून कार्यरत राहिले. त्यांचे पहिले व्यंगचित्र १९५४ साली प्रकाशित झाले. पण पूर्णवेळ व्यंगचित्रकार झाल्यावरच त्यांनी पूर्वीची चित्रे प्रदर्शनातून सादर केली. आपल्या हयातीतच आपल्या मृत्यूचे व्यंगचित्र साकारणारे तेंडुलकर नेहमीच वेगळेपण जपणारे कलाकार राहिले . तेंडुलकरांना सोमवारी सकाळी उपचारांसाठी . रुग्णालयात दाखल करण्यात आले.

शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांना नेत असताना मुलगा महेश आणि मुलगी वंदना यांना जवळ बोलवून त्यांनी आपला रुमाल, मोबाईल, श्रवणयंत्र काढून दिले. तेव्हाच 'आता मी आऊट ऑफ कव्हरेज जाणार, असे उद्‌गार त्यांनी काढले होते. मात्र ते पुन्हा भेटले नाहीत, असे सांगताना त्यांच्या कन्या वंदना यांना भावनावेग आवरता आला नाही.''[३६]

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणतात, ''देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री ज्येष्ठ-- व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या निधनाने सामाजिक विसंगतीवर रेषांच्या साहय्याने प्रभावी भाष्य करणारा कलावंत आपण गमावला आहे. सहज साध्या प्रसंगावरही ते मार्मिक हास्यचित्र रेखाटायचे व्यक्तिमत्त्वातील साधेपणा त्यांच्या चित्रातही उमटायचा. एक हास्य व्यंगचित्रकार म्हणून त्यांची ख्याती होतीच, परंतु त्यांचे ललित लेखनही लोकप्रिय होते. त्यासोबतच सामाजिक बांधिलकीपोटीही विविध सामाजिक प्रश्नाबाबत ते सक्रिय होते. त्यांच्या निधनाने एक व्यासंगी कलावंत आणि सामाजिक जाणिवा जोपासणारे व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे.''[३७]

महाराष्ट्राचे उच्च शिक्षण व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे म्हणतात, ''विनोद तावडे, सांस्कृतिक मंत्री-- मंगेश तेंडुलकर यांच्या निधनाने साध्या , सोप्या चित्रसंकल्पनांच्या माध्यमातून बोलकी हास्य चित्रे रेखाटणारा व्यंगचित्रकार गमावला आहे. व्यंगचित्राच्या माध्यमातून त्यातून त्यांनी स्वतःची शैली आणि वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या व्यंगचित्राच्या प्रदर्शनालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यंगचित्राबरोबरच त्यांनी विविध वर्तमानपत्रे, नियतकालिकांमधून ललित लेखन करतानाच काही पुस्तकेही लिहिली. व्यंगचित्रे आणि लिखाणाबरोबरच सांस्कृतिक सामाजिक उपक्रमांमध्ये आवर्जून सहभागी होणाऱ्या तेंडुलकर यांच्या निधनाने या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.''[३८]

२.०७.२९ वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती.

लेखाचे नाव : व्यंगचित्रांच्या माध्यमातून आत्मचारित्र साकारायची तेंडूलकारांची इच्छा अधुरीच.

पान नंबर : ५.

दिनांक : १२ जूलै २०१७.

दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्तीच्या पान नंबर ५ वर जेष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडूलकर यांच्या निधनानंतर त्यांची माहिती देणारा मजकूर छापण्यात आला होता. यामध्ये वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार आपले आत्मचारित्र व्यंगचित्रातून मांडण्याची इच्छा व्यक्त करतो परंतु

ती इच्छा पूर्ण होवू शकत नाही, व्यंगचित्रातून एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण आत्मचारित्र मांडता येवू शकते या वरून व्यंगचित्राची ताकद लक्षात येऊ शकते. 'व्यंगचित्रांच्या माध्यमातून आत्मचारित्र साकारायची तेंडूलकारांची इच्छा अधुरीच' या मथळ्याखालील लेखात पुढील माहिती मिळते, ''ख्यातनाम व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांना आपले आत्मचरित्र व्यंगचित्राच्या माध्यमातून साकारायचे होते. त्यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आले असते तर मराठी साहित्यातील व्यंगचित्रकाराचे अशा प्रकारचे पहिले आत्मचरित्र म्हणून त्यांच्या पुस्तकाला बहुमान मिळाला असता. मात्र, तेंडुलकरांच्या निधनाने हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. मराठी व्यंगचित्रकारांची १९४०च्या दशकातील पिढी डेव्हिड लो या व्यंगचित्रकाराला आपला आदर्श मानत होती. मूळचा न्यूझिलंडचा असलेला पण त्यानंतर ब्रिटनमध्ये अनेक वर्षे वास्तव्य केलेल्या डेव्हिड लो यांच्या व्यंगचित्रांनी ब्रिटनसहित जगभरातील नेत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. लो या व्यंगचित्रकाराचा आदर्श आर. के. लक्ष्मण व बाळासाहेब ठाकरे यांनीदेखील ठेवला होता. मंगेश तेंडुलकरांनाही लो यांची व्यंगचित्रे आवडत असत. लो यांनी आपले आत्मचरित्र 'लोज ऑटोबायोग्राफी' या नावाने लिहिले होते, तेही तेंडुलकरांच्या विशेष आवडीचे होते. १९५७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या आत्मचरित्रामध्ये लो यांनी जीवनचरित्राबरोबरच आपण काढलेल्या व्यंगचित्रांपैकी काही निवडक व्यंगचित्रे तसेच नातेवाईक व सग्यासोयऱ्यांची काही छायाचित्रेही दिली आहेत. जागतिक कीर्तीच्या व्यंगचित्रकारांपैकी एक असलेल्या लो यांचे आत्मचरित्र व्यंगचित्रकलेच्या इतिहासाचे प्रमुख संदर्भसाधन मानले जाते. ख्यातनाम व्यंगचित्रकार आर. के. , लक्ष्मण यांनी 'द टनेल ऑफ टाइम' हे आत्मचरित्र लिहिले. त्यात लक्ष्मण यांची काही निवडक व्यंगचित्रे दिली आहेत. डेव्हिड लो किंवा आर. के. यांनी ज्या स्वरूपाचे आत्मचरित्र लिहिले आहे तसे मंगेश तेंडुलकर यांना लिहायचे नव्हते.

प्राख्यात चित्रकार दीनानाथ दलाल., रघुवीर मुळगावकर हे देखील व्यंगचित्रे काढत असत. परंतु व्यंगचित्रकार म्हणून कारकीर्द अधिक गाजली ती बाळासाहेब ठाकरे यांची, आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या मराठी व्यंगचित्रकाराची सर्वप्रथम मोठ्या प्रमाणावर दखल घेतली गेली ते म्हणजे बाळासाहेब ठाकरे. त्यांच्या समकालीन पिढीत श्रीकांत ठाकरे, त्यानंतरच्या पिढीत विकास सबनीस ते आजमितीला प्रशांत कुलकर्णी पर्यंत अशी मराठी व्यंगचित्रकारांची मोठी फळी निर्माण झाली. पण यातील एकाही व्यंगचित्रकाराने आपले आत्मचरित्र लिहिलेले नाही.

त्यामळे मराठी साहित्यात हा व्यंगचित्रकाराचे आत्मचरित्र हा प्रकारच उमललेला नाही. त्याची सुरुवात मंगेश तेंडुलकर यांच्या प्रस्तावित आत्मचरित्राने झाली असती. पण तेही होणे नव्हते.''[३९]

२.०७.३० दैनिक दिव्य मराठी, १२ जूलै २०१७, पृष्ठ क्रमांक ५.

व्यंगचित्राचा मथळा : स्वातंत्र्यांनतर प्रकाशित व्यंगचित्र.

वृत्तपत्राचे नाव : दैनिक दिव्य मराठी, सोलापूर आवृत्ती.

दिनांक : १५ ऑगस्ट २०१७

पान नंबर : ६

संपादकीय पान नंबर ६ वर स्वातंत्र्य काळातील व स्वातंत्र्याच्या चळवळीची महत्त्वाची माहिती देणारे लेख या पानावर प्रकाशित करण्यात आले होते. यामध्ये खालील व्यंगचित्र देखील प्रकाशित करण्यात आले होते. या व्यंगचित्राच्या बाबत माहिती पुरविताना म्हणले आहे, ''स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एका वृत्तपत्राने हे व्यंगचित्र प्रकाशित केले होत. त्यात ब्रिटनेच पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना धोबीपछाड करताना एक भारतीय शेतकरी दाखवण्यात आला होता.''[४०]



व्यंगचित्रे स्वातंत्र्यपुर्व काळात व स्वातंत्र्यानंतर तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील आपली मते व्यंगचित्रांच्या मदतीने किती प्रभावी मांडत होती याचे पुढील व्यंगचित्र जीवंत उदाहरण होय.

२.०७.३१ प्रकाशन : दैनिक दिव्य मराठी.

लेखाचे नाव : कार्टूनचे मनोरंजक जग.

प्रकाशन दिनांक : ४ ऑक्टोबर २०१८, गुरूवार.

पान नंबर : ३.

या वृत्तपत्रात 'कार्टूनचे मनोरंजक जग' या मथळ्याखाली पुढील माहिती मिळते. ''मित्रांनो, कार्टूनचा इतिहास १८४३ पासूनचा आहे. तेव्हा ते फक्त एक विनोद करणारे चित्र असे होते. आत आपण जे टीव्हीवर कार्टून बघतो त्यांना 'ॲनिमेटेड (चलचित्रे) कार्टून' असे म्हटले जाते. म्हणजे मूळात कागद किंवा संगणकावर चित्रं काढून मग त्यांना हलते-बोलते केले जाते. अशा प्रकारची पहिली ॲनिमेटेउ चित्रमालिका फ्रान्समधील चार्ल्स-एमिनो-रेन्नुड यांनी तयार केली. २८ ऑक्टोबर १८९२ मध्ये सर्व प्रथम 'पूअर पेट' ही ॲनिमेटेल फिल्म चित्रपटगृहात दाखवण्यात आली. आज जगभरातून सर्वाधिक टीव्हीवर पाहिले जाणारे कार्टून चॅनेल म्हणजे 'कार्टून नेटवर्क' हे होय. याची स्थापना १ ऑक्टोबर १९२५ रोजी अमेरिकेत झाली. 'टर्नर ब्रॉडकास्टिंग' या कंपनीचे हे सॅटेलाइट चॅनल आहे. या चॅनलचे मालक टेड अर्नर यांनी १९८६ मध्येच या प्रकल्पाची सुरूवात केली होती जी १९९२ मध्ये पूर्णत्वास आली. या चॅनेलवर सर्वप्रथम 'डूपी' या खोडकर कुत्र्याच्या गोष्टींनी सुरूवात करण्यात आली. 'हॅपसोडी रॅबिट' ही पहिली मालिका कार्टून नेटवर्कमध्ये सर्वप्रथम दाखवण्यात आली अर्थात आज जगभरातून अनेक कार्टून नेटवर्कने अवघ्या २१ वर्षात जगभरातून ९,८६,७१,००० इतके प्रेक्षक जोडले आहेत. एवढ्या अमेरिकेत कार्टून नेटवर्क बघणारे ८६ टक्के लोक आहेत. आपल्या देशात हे चॅनेल १ मे १९९५ रोजी सुरू करणयात आले जे मूलांसाठीचे पहिले चॅनेल आहे. हिंदी, इंग्लिश, तमिळ व तेलुगू भाषेतून हे प्रसारित करणयात येते.''[४१]

प्रस्तुत संशोधन हे व्यंगचित्रांशी संबंधीत आहे. त्यामुळे व्यंगचित्रे ही चलचित्रे कशी, कधी, कोणी सुरू केली हे पाहणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनसाठी या वृत्तपत्रात मिळालेली माहिती उपयेागी व मार्गदर्शक आहे. वरील लेख ऐतिहासिक माहिती पुरविणारा मूलभूत लेख आहे. संशोधनाच्या बाबत हा महत्त्वाचा व मार्गदर्शक आहे.

२.०७.३२ प्रकाशन : दैनिक दिव्य मराठी.

लेखाचे नाव : कार्टूनची कथा, प्रसिध्दीच्या ५२ वर्षांनी या कार्टूनवर सुरू झाला वाद.

प्रकाशन दिनांक : १६ मार्च २०१९, शनिवार.

पान नंबर : ७.



या वृत्तपत्रात ' कार्टूनची कथा, प्रसिध्दीच्या ५२ वर्षांनी या कार्टूनवर सुरू झाला वाद ' या मथळ्याखाली पुढील माहिती मिळते. कार्टूनची कती शक्ती असते. त्याचा राजकारणावर कसा परिणाम होतो याची जाणीव करणारा पुढील उतारा आहे, ''दक्षिणेत विशेषतः तामिळनाडूत हिंदीचा विरोध नवीन गोष्ट नाही, परंतु १९६० मध्ये हिंदीच्या विरोधात येथे तीव्र आंदोलन झाले. पोलिसांच्या गोळीबारात अनेक जणांचा मृत्यू झाला. डीएमकेने त्या वेळी सत्ता मिळवण्यासाठी हिंदीविरोधात भावना तयारे करण्यात मोठी भूमिका तयार करण्यात मोठी भूमिका बजावली. त्यावेळी आर. के. लक्ष्मण यांनी एक कार्टून बनवले. त्यात एक युवक इंग्रजीची वकिली करत होता. परंतु अशा पोस्टरवर दगडफे कही करत होता. या कार्टूनची चांगली चर्चा झाली होती. परंतु ५२ वर्षांनी हे कार्टून पुन्हा मोठा राजकीय मुद्दा झाला. एनसीईआरटी बारावीच्या पॉलिटिकल सायन्स विषयातील पुस्तकात या कार्टूनचा

समावेश केला गेला. त्या वेळी द्रविड पक्षांनी त्याचा विरोध केला. त्यानंतर हे कार्टून पुस्तकातून काढून टाकले.'' [४२]

२.०८. संबंधित संशोधनांचा आढावा.

वृत्तपत्रीय व्यंगचित्र पत्रकारिता तसेच मूल्य य समस्येवरील विविध ठिकाणी झालेल्या संशोधनावर आधिरित विद्यापीठामधून सादर कलेले शोध प्रबंधांच्या स्वरूपातील, शोध निबंधाच्या स्वरूपातील सहित्य या विभागात असेल.

२.०८.०१ प्रविण म. मस्तुद, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर, महाराष्ट्र. भारत.

एम.फिल. २०१२.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

संशोधन समस्या

''वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेशांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास''.

संशोधन समस्येची उद्दिष्टे

१. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेश वाचकांपर्यंत पाहेचवण्याचे प्रमाण तपासणे.
२. वृत्तपत्रांतील व्यंगचित्र सदराविषयी वाचकांच्या दृष्टिकोनाचा शोध घेणे.
३. वृत्तपत्रांतील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
४. वृत्तपत्रांतील व्यंगचित्रांच्या सदराची परिणामकारकता पडताळणे.
५. वृत्तपत्रांतील व्यंगचित्र सदराच्या उपयुक्ततेविषयी उपाय सुचविणे.

संशोधन पध्दती

सदर संशोधनासाठी संशाोधकाने संशोधनाची समस्या वर्तमानकाळाशी निगडीत असल्याने संशाोधनाच्या तीन पध्दतीपैकी वर्णनात्मक संशोधन पधदतीचा वापर केला आहे. संशोधकाने संशोधन विषयाची स्थिती पडताळून पाहण्यासाठी वर्णनात्मक तंत्राचा वापर करून

मिळालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. निवडलेल्या संशोधन समस्येची माहिती ही संबंधित संशोधन कार्यक्षेत्रात घडणाऱ्या विविध घटनांमध्ये अंतर्भूत असल्याने संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

निष्कर्ष

१. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे सर्व वाचक पाहतात व वाचतात.

२. वृत्तपत्रातून पृसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेश हा ९४.५९ टक्के वाचकांपर्यंत पाहेचतो.

३. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेश हा ९४.५९ टक्के वाचकांना योग्य वाटतो.

४. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाारे व्यंगचित्र सदर हे सद्यःपरिस्थितीतील प्रश्नांचा समावेश करणारे सदर आहे असा; दृष्टिकोन व्यंगचित्र सदराविषयी सर्व वाचकांचा आहे.

५. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे संदेश प्रसारणासाठी पुरेसे वाटत नाही, असा व्यंगचित्र सदराविषयी ५४.५९ टक्के वाचकांचा दृष्टिकोन आहे.

६. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे संदेश प्रसारणासाठी वृत्तपत्रातील महत्वाचे सदर आहे, असा व्यंगचित्र सदराविषयी ७८.३७ टक्के वाचकांचा दृष्टिकोन आहे.

७. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे वाचकांना मनोरंजनास उपयुक्त वाटते, असा व्यंगचित्र सदराविषयी ९८.११ टक्के वाचकांना दृष्टिकोन आहे.

८. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे सामाजिक व राष्ट्रीय विषयामधील चुकाचे दिग्दर्शन करणारे सदर आहे, असे ३२.९७ टक्के वाचकांचा व्यंगचित्र सदराविषयी दृष्टिकोन आहे.

९. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे समाज प्रबोधनाचे काम करते, असे २९.७२ टक्के वाचकांचा व्यंगचित्र सदराविषयी दृष्टिकोन आहे.

१०. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदर हे वाचकांना मनोरंजन करणारे सदर आहे, असा २२.७० टक्के वाचकांचा व्यंगचित्र सदराविषयी दृष्टिकोन आहे.

११. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारे व्यंगचित्र सदर हे आत्मपरिक्षण करावयास लावणारे सदर आहे, असा १४.५९ टक्के वाचकांचा व्यंगचित्र सदरा विषयी दृष्टिकोन आहे.

१२. वृत्तपत्रातून होणारे व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेश हा विचार प्रवर्तक आहे असे ९२.९७ टक्के वाचकांना वाटते.

१३. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा ९४.५९ टक्के वाचकांवर परिणाम होतो.

१४. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा ६२.१६ टक्के वाचकांवर अगदी थोडा वेळ परिणाम होतो.

१५. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा अगदी थोडा वेळ परिणाम होणाऱ्या वाचकांपैकी ४६.९५ टक्के वाचक हे संदेश अगदी अचूक व बोलका आहे, असे मनोगत व्यक्त करातात.

१६. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदशाचा अगदी थोडा वेळ परिणाम होणाऱ्या वाचकांपैकी ४३.४७ टक्के वाचक हे संदेश योग्यपणाने समस्या मांडतो, असा विचार व्यक्त करातात.

१७. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा अगदी थोडा वेळ परिणाम होणाऱ्या वाचकांपैकी ९.५६ टक्के वाचकांना हा संदेश मनोरंजन करणारा आहे असे वाटते.

१८. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा ३२.४३ टक्के वाचकांवर गांभार्याने परिणाम होतो.

१९. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा गांभार्याने परिणाम होणाऱ्या वाचकांपैकी ५१.६६ टक्के वाचक हे संदेश कल्पना शक्ती वापरून सद्यःपरिस्थितीतल्या विसंगतीवर अचूक बोट ठेवणारा लोकशाहीतील अंकुश आहे असा गांभार्याने विचार करतात.

२०. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदाराच्या माध्यमातून प्रसारित संदेशाचा गांभार्याने परिणाम होणाऱ्या वाचकांपैकी ५१.६६ टक्के वाचक हे संदेश असामान्य घटना सामान्य नागरिकांना उमजतील अशा पातळीवर आणत ताणतणावाने भरलेल्या जीवनात थोडासा प्रसन्नतेचा शिडकावा करणारा आहे असा विचार करतात.

गृहितकालाच धारणा असे म्हणतात. धारणा ही गृहित धरलेली परिस्थिती असते. संशोधनात प्राप्त परिस्थितीत अधिक चिकित्सा न करता आधारभूत मानलेली परिस्थिती म्हणजे गृहितक होय. गृहितक हे प्रश्नांच्या स्वरूपात मांडलेल्या समस्येपेक्षा वेगळे असते. संशोधकाने त्यासाठी अभ्यास विषयातील कोणते प्रश्न आहेत? व कोणती गृहितके आहेत ते स्पष्ट करणे आवश्यक असते. अभ्यास विषयात दिलेले प्रमाण मुद्दे हे अभ्यास विषय सत्य घटनांवर आधालेले असतात हे दर्शविण्यासाठी संशोधकाला प्रवृत्त करतात. गृहितकात काहीतरी सर्वसाधारण सार्वत्रिक असते. ह्या गृहीतकापासून सशोधक संशोधनास सुरूवात करतो. या गृहितकाविषयी उर्वरित अभ्यासामध्ये काही शंका प्रदर्शित होत नाही. उलट गृहितकाला पुरक प्रमाणवाक्ये विकसित केली जातात.

''गृहितक म्हणजे वाद सत्य होण्यापूर्वी मर्यादित अवस्थेतील साधन होय.''[३]

३.०३.०१ गृहितकांचे प्रयोजन

संशोधनात गृहितकांचे प्रयोजन करण्याची कारणे पुढील प्रमाणे होत.

१. गृहितके हे तात्कालिक तर्कसंगत अंदाज असतात.

२. गृहितकांमुळे संशोधकाला दिशा प्राप्त होते.

३. संशोधनात परिणामी उत्तरे मिळू शकतात.

४. एकाच प्रकारच्या आधार सामग्रीचे साधर्म्य असणाऱ्या व विशिष्ट हेतू भोवती असणाऱ्या आधार सामग्रीचे संग्रहण करण्यासाठी संशोधकाला गृहितकांचा उपयोग होतो.

५. संशोधन पूर्ण होईपर्यंत उत्तर मिळत नसल्याने गृहितक हे सभाव्य उत्तर मानले जाते.

६. संग्रहित माहितीच्या आधारे ते स्वीकृत वा अवीकृत ठरविले जाते.

७. गृहितक हे पूर्वानुमान असते.

८. चांगल्या प्रकारची गृहितके संशोधकाला निश्चित दिशा प्रदान करतात.

९. संशोधनाची पध्दती निश्चित करण्यासंबंधी संभाव्य अशी उपययोजना असते.

३.०३.०२ प्रस्तुत संशोधनाची गृहितके (Research Assumptions) :

१. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून मूल्ये व संदेश प्रसारित होतात.

२. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदर वाचक निरीक्षण करतात व वाचतात.

३. वृत्तपत्रातील वाचकाने, व्यंगचित्र सदराचे निरीक्षण व वाचन केल्यानंतर संदेशाद्वारे मिळालेल्या मूल्यांचा विचार करतात.

४. वृत्तपत्रातील व्यंगचित्र हे संदेश व मुल्ये प्रसारित करण्याचे प्रभावी साधन आहे.

३.०४ संशोधनाची परिकल्पना / गृहितकृत्य (Hypothesis) :

संशोधनाची परिकल्पना म्हणजे ज्या संमस्येचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन हाती घेतलेले असते त्या समस्येचे संभाव्य उत्तर होय. संशोधकाने चतुरपणे किंवा चाणाक्षपणे तो बांधलेला अंदाज असतो.

३.०४.०१ परिकल्पनेच्या / गृहितकृत्याच्या व्याख्या

''१. गुड आणि हॅट (Goode and Hatt) यांनी परिकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे,

'परिकल्पना म्हणजे आपण काय पाहत आहोत. हे कथन करते. परिकल्पना पुढे पाहत असते. गृहितकृत्य म्हणजे असे विधान की, ज्याची सप्रमाणता निश्चित करण्यासाठी परीक्षण केले जाते आणि पुढील संशोधनसाठी उपयोगी पडते' (A hypothesis states what we are looking for. Ahpothesis looks forward. It is a proposition which can be put to a test to determine its validity. It may prove to be correct or incrorrect.)

२. जॉन डब्ल्यू. बेस्टनेही (Johna W. Best) परिकल्पनेची व्याख्या केलेली आहे. त्यानुसार, 'तथ्यांचे अवलोकन करून एक अनुमानात्मक विधान पुढील संशोधन प्रक्रियेस मार्गदर्शक ठरून

याप्रकारे साधारणपणे केलेले विधान एक अनुमानात्मक विधान जे तथ्याचे अथवा परिस्थितीचे अवलोकन करून केलेले असते आणि पुढील संशोधन प्रक्रियेस मार्गदर्शक ठरत असते.' (It is shrewed guess or inference that is formulated and provisionally adopted to Explain observed facts ro conditions and to guide in further investigation.)

३. परिकल्पना अथवा गृहितक याची एक त्रोटक व सरल तथा स्पष्ट व्याख्या मॅकगुईन (McGuign) या संशोधकाने केली आहे. त्यांच्या मते, 'परिकल्पना हे दोन अथवा त्याहून अधिक चलांच्या संभाव्य संबंधाचे एक परिक्षण योग्य विधान आहे.' (A hypothesis is a testable statemtnt of a potential relationship between two or more variables.)

४. ब्राउन यांनीही परिकल्पनाची व्याख्या केलेली आहे. त्यांच्या मते, 'गृहितक हे तथ्यात्मक आणि संबोधात्मक तथ्य आणि त्यांच्या संबंधाविषयीचा एक असा प्रस्ताव असतो की, ज्याचा उद्देश माहित असलेली तथ्ये व अनुभवांच्या पलिकडील ज्ञान व माहिती वद्धिंगत करण्याचा असतो.' (A hypothesis is a proposition about factual and conceptual elements and their relationships that project beyond known facts and experiences for the purpose of furthering understanding.) Brown and Ghisseli.

५. ए. एल. एडवर्ड (A. L. Adwards) यांनी परिकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, 'परिकल्पना हे दोन अथवा चलांच्या संभाव्य संबंधाचे एक कथन असते. हे एक अशा प्रयोगाविषयीचे उत्तर असते की, ज्यात चलांच्या संबंधाची माहिती होते.' (A hypothesis is a statmet of the possible nature of the relationship between two or more variable, it is a tentative amwer to the question of what the relationship is.)

६. इ. एस. (E. S. Bogardus) बोबाईसच्या मते परिकल्पनेची व्याख्या खालीलप्रमाणे आहे, 'परीक्षण केल्या जाणाऱ्या विधानास परिकल्पना असे म्हणतात' (A hypothesis is a proposition to be tested.)

७. लुंडबर्ग (Lundburg G.A.) यांनी पण परिकल्पनेची यथार्थ व्याख्या केली आहे, त्यांच्या मते, 'परिकल्पना हे एक सामाईक आणि कामचलाऊ सामान्यीकरण अथवा अनुमान आहे. की, ज्याच्या सत्यतेची परीक्षा घेणे केवळ बाकी आहे. संशोधनाच्या प्राथमिक अवस्थेत परिकल्पना एक निष्कर्ष, मनोकल्पित, कल्पनापूर्ण विचार, सहज ज्ञान अथवा आणखी इतर असणारा जो क्रिया अथवा संशोधनाचा आधार असतो.' (A hypothesis is a tentative generalization, the validity of which remains to be tested. In its most elementary stage, the hypothesis may be any hunch, gues, imaginative idea or intuition whatsoever which becomes the basis for further investigation.)''[४]

३.०४.०२ परिकल्पनांचे / गृहितकृत्यांचे महत्त्व

संशोधनातून काही नवीन कल्पना उदयास येतील या अर्थाने परिकल्पानास संशोधनात महत्त्वाचे स्थान असते. परिकल्पनांचे महत्त्व संशोधनात पुढील बाबींमुळे आहे.

१. संशोधनात यथार्थ दिशा देण्याचे काम परिकल्पानामुळे होते.

२. सशोधनातील लहान लहान माहितीचा उलगडा होत जातो.

३. परिकल्पनेफुळे ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात त्यामुळे तथ्यांना विशेष प्रकारांना स्पष्टीकरण मिळते.

४. परिकल्पनांमुळे निष्कर्ष काढण्यास मदत होते. त्यासोबतच परिक्षण करणे सोयीचे होते.

३.०४.०३ परिकल्पनेची / गृहितकृत्यांची वैशिष्टे

परिकल्पनेचा थोडक्यात अर्थ असा होतो की, ''समस्येच्या निराकरणासाठी सुचविलेला सत्वर उपाय,''[५] होय. (A hypothesis is precisely defined as a tentative or woking proposton suggested as a solution to a prolem) परिकल्पनेची वैशिष्टे पुढिल प्रमाणे होत.

१. निसर्ग नियमाच्या विरोधी परिकल्पना नसते.

२. परिकल्पनेची रचना स्पष्ट शब्दात असावी लागते.

३. परिकल्पना बहुश्रुत असावी लागते.

४. परिक्षणात मुळ समस्येचे उत्तर मिळते. यासाठी परिकल्पना उपलब्ध ज्ञानाशी संबंधित असते.

५. परिकल्पना अवलोकित तथ्यांचा करार असला पाहिजे. परिकल्पना ही प्रचलित संकलित माहितीवर निर्भर असते.

६. परिकल्पना सिध्दांत समुहाशी संबंधित असली पाहिजे.

७. परिकल्पना सरळ व साधी असावी लागते.

८. परिकल्पनेचा कालानुरूप स्विकार अथवा अस्वीकार करावा लागतो.

९. परिकल्पना ही मापन योग्य असावी लागते.

३.०४.०४ प्रस्तुत संशोधनाची परिकल्पना / गृहितकृत्य (Research Hypothesis) :

१. वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्ये ही वाचकांमध्ये भावनिक व क्रियात्मक बदल घडवतात.

२. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून मिळालेली मूल्ये ही वाचकांस सहजपणे समजावते.

३. संदेशातून मूल्ये सांगणारे साधन म्हणून वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराकडे वाचक पाहतात

३.०४.०५ प्रस्तुत संशोधनातील परिकल्पनांचे / गृहितकृत्यांचे महत्व

उद्दिष्टांचे फलित भाकित करण्यासाठी प्रस्तुत सशोधनात परिकल्पनेला अधिकृत महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन करीत असताना कशा पध्दतीने परिकल्पनांचे महत्व स्पष्ट होते. याची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

१. ''मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.'' या अभ्यास विषयाच्या विस्तारासाठी परिकल्पना अधिक सुकर ठरली आहे.

२. संशोधनातील तथ्थांच्या तात्पुरत्या स्पष्टीकरणासाठी परिकल्पना महत्वाच्या ठरल्या आहेत.

३. संशोधन समस्येतील महत्वपूर्ण मुद्यांशी सुसंगत बाबींचा संशोधनात विचार करण्यास परिकल्पनांनी भाग पाडले आहे.

४. संशोधनात परिकल्पनांनी महत्वपूर्ण विधान पुरविले आहे. ज्यात तार्किकतेचे घटक व परिस्थितीचे स्पष्टीकरण विशद करण्यास मदत केली आहे.

५. प्रस्तुत संशोधनातील परिकल्पनांनी संशोधन विचार प्रक्रियेला मार्गदर्शन केले आहे आणि संशोधनास मदत केली आहे.

६. प्रस्तुत संशोधन परिकल्पनांनी अयोग्य संशोधन आढावा अति उयोगी नसलेल्या माहितीच्या संकलनास प्रतिबंध घातला आहे.

७. प्रस्तुत संशोधनातील परिकल्पनांनी नमुना निवडीचा आधार व अभ्यास प्रक्रियेची दिशा दिली.

८. प्रस्तुत संशोधनाच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्रीय तंत्राची गरज परिकल्पनांनी स्पष्ट केली व मिळालेल्या माहितीचे परिक्षण करण्यास मदत केली.

९. प्रस्तुत संशोधनातील परिकल्पनांनी संशोधकास अभ्यासाच्या व्याप्तीतील मर्यादा सांगण्यासाठी मदत केली.

१०. निष्कर्ष काढताना प्रस्तुत संशोधनातील परिकल्पनांनी विशिष्ट अशी चौकट पुरविली व योग्य निष्कर्षाप्रत संशोधकास जात आले.

११. प्रस्तुत प्रबंध रचनेतील परिकल्पनांची जागा छोटी घेतली आहे परंतु परिकल्पनेची जागा अतिशय महत्वपूर्ण आहे याची जाणीव संशोधना दरम्यान करून दिली.

३.०५ प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

संशोधन समस्येचा तात्विक पातळीवर विचार करताना त्यावेळी संशोधन हे समग्र आणि व्यापक असते. प्रत्यक्ष संशोधन हाती घेताना मात्र इतक्या व्यापक प्रमाणात वैयक्तिक पातळीवर हाती घेणे शक्य होत नाही. त्यामुळे संशोधकाला संशोधनाच्या सीमारेषा स्पष्ट कराव्यालागतात.

यासाठीच प्रस्तुत संशोधनात पुढील बाबींचा विचार करून व्याप्ती मर्यादा ठराविण्यात आल्या आहेत.

१. संशोधन कोणत्या गटासाठी आहे.

२. मुळे व्यापक समस्येच्या ज्या मर्यादित क्षेत्राविषयी निष्कर्ष काढले जातील जे क्षेत्र कोणते आहे? याचा विचार केला गेला आहे.

३. ज्या भौगोलिक क्षेत्रात संशोधन लागू केले आहे त्याचा विचार केला आहे.

४. प्रस्तुत संशोधनात वेळ, आर्थिक तरतूद, उपलब्ध सुविधा व साधने या संदर्भात मर्यादा आखताना हेतूतः विचार केला आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे कोणत्या घटकला उपयुक्त ठरेल? याचा विचार केला आहे.

३.०५.०१ प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशांतून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे ही संकल्पनात्मक व्याप्ती आहे.

३.०५.०२ प्रस्तुत संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधनाच्या पुढील मर्यादा आहेत.

१. प्रस्तुत संशोधन मराठी भाषीक वृत्तपत्रापूरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे सोलापूर जिल्ह्या उपलब्ध प्रकाशित होणाऱ्या १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१६ या दोन वर्षातील मराठी भाषिक दैनिक केसरी, दैनिक सकाळ व दैनिक लोकमत वृत्तपत्रापुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे मराठी भाषीक दैनिक केसरी या वृत्तपत्रातील जाता–जाता, दैनिक सकाळ या वृत्तपत्रातील काय सांगता? व दैनिक लोकमत या वृत्तपत्रातील टोलेबाजी या नावाने प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र या सदरापुरते मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे सोलापूर जिल्ह्यातील वाचकांची निवड करून करण्यात आले आहे.

३.०६ संशोधन केले गेलेल्या वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराची माहिती.

अ. नंबर	मराठी भाषीक वृत्तपत्राचे नाव	व्यंगचित्र सदराचे नाव	व्यंगचित्रकाराचे नाव
१.	दैनिक केसरी	जाता–जाता	गणेश काटकर
२.	दैनिक सकाळ	काय सांगता?	वैजनाथ दुलंगे
३.	दैनिक लोकमत	टोलेबाजी	अनिल डांगे

३.०७ संशोधन पध्दतीची निवड

सदर संशोधनासाठी संशोधकाने संशोधनाची समस्या वर्तमानकाळाशी निगडीत असल्याने संशोधनाच्या तीन पध्दतींपैकी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. संशोधकाने संशोधन विषयाची स्थिती पडताळून पाहण्यासाठी वर्णनात्मक तंत्राचा वापर करून मिळालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. निवडलेल्या संशोधन समस्येची माहिती ही संबंधित कार्यक्षेत्रात घडणाऱ्या विविध घटनांमध्ये अंतर्भूत असल्याने संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

''सामाजिक शास्त्रामध्ये पाहणी किंवा सर्वेक्षण करून संशोधन करण्याची पध्दत लोकप्रिय आहे. संवाद संशोधनातसुध्दा ही पध्दती सर्रास वापरण्यात येते. उदा. (वाचक पाहणी) दर्शक, विश्लेषण (कार्यक्रम स्तरीकरण) जनमत पाहणी, ग्राहक आणि बाजरपेठ संशोधन वगैरे प्रकारच्या संशोधनासाठी पाहणी किंवा सर्वेक्षण पध्दती वापरली जाते. योग्य प्रश्न विचारून दृष्टिकोन (ॲटिट्यूड्स) किंवा वृत्ती, विश्वास आणि वर्तन यांसंबंधीची अचूक माहिती प्रश्नावलीच्या साह्याने गाळा करणे हा सर्वेक्षण पध्दतीचा उद्देश असतो. ही माहिती मिळविण्यासाठी व्यक्तीशः किंवा गटास, प्रश्नावली पुरविण्यात येते. ही प्रश्नावली काही वेळा पोस्टाने पाठविण्यात येते, तर काही वेळा मुलाखत घेण्यात येते व काही वेळा दूरध्वनीवरून प्रश्न विचारून माहिती काढण्यात येते. ज्यांची पाहणी करावयाची आहे त्यांची अचूक निवड करणे. प्रश्नांचा अनुबंध आणि दर्जा योग्य राखणे, आणि मुलाखतीची प्रक्रिया योग्य तंत्राने पूर्ण करण्यातील अटींच्या पूर्ततेवर विश्वासार्ह आणि ठोस निर्णय मिळवणे यावर सर्वेक्षण पध्दतीचे यश अवलंबून असते. त्यासाठी नमुना म्हणजे काय हे नीट समजले पाहिजे. सर्वेक्षण पध्दतीचा संशोधकाला विशिष्ट लोकसंख्येतील श्रोते, वाचक व दर्शक यांच्यात विशिष्ट

गुणवैशिष्ट्ये किंवा विशिष्ट वृत्ती, प्रवृत्तीचे वितरण यांचे निरीक्षण करतो. उदा. एखाद्या संशोधकास पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये नियमितपणे अग्रलेख वाचन होते की नाही आणि अग्रलेख वाचणारे हे विद्यार्थी कोणत्या प्रकारचे, कोणत्या गटाचे आहेत याचा अभ्यास करावासा वाटेल किंवा एखाद्यास किती आणि कोणत्या प्रकारच्या गृहिणी दूरदर्शन मालिका पाहतात याचा अभ्यास करावासा वाटेल. या दोन्ही उदाहरणांतील ज्यांना अभ्यास करावयाचा त्यास जनसंख्या (पॉप्युलेशन) म्हणतात. त्यापैकी प्रश्न विचारण्यासाठी ज्यांची निवड केली जाईल त्या सर्वांना मिळून नमुना जनसंख्या असे म्हणतात. तसेच संशोधन करावयाच्या जनसंख्येचे वेगवेगळे स्तर आढळतात त्यास जनसंख्या स्तर (पॉप्युलेशन स्ट्राटा) म्हणतात. समजा, माध्यमिक शाळेतील मुलांची पाहणी करावयाची असेल तर माध्यमिक शाळेतील मुले ही जनसंख्या झाली, त्यांचे भौगोलिक स्थानाप्रमाणे वर्गीकरण केले तर शहरी आणि ग्रामीण असे होईल. लिंगाप्रमाणे केले तर मुले आणि मुली असे गट होईल. त्याचे पुन्हा शहरी मुले आणि शहरी मुली व ग्रामीण मुले व ग्रामीण मुली असे गट होऊ शकतील. असे गट म्हणजे माध्यमिक शाळेतील मुले या जनसंख्येचे वेगवेगळे जनसंख्या स्तर (पॉप्युलेशन स्ट्राटा) किंवा उपजत संख्या होय. ज्यावेळी एकूण सर्व लोकसंख्येच्या वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्यांची समग्र पाहणी केली जाते त्यावेळी त्यास जनगणना (सेन्सर) म्हणतात. असा समग्र जनसंख्येचा अभ्यास करणे कष्टप्रद, वेळकाढू व खर्चाचे काम असते. त्यामुळे अपेक्षित निष्कर्ष आपण काही ठराविक निवडक नमुन्यादाखल जनसंख्या घेऊन अभ्यास करू शकतो. संशोधन पध्दतीमध्ये त्याच नमुन्याचा (सॅम्लींग) अभ्यास म्हणतात. त्या नमुन्यावरून एकूण जनसंख्येविषयी आपण अनुमान करू शकतो. (इन्फ रींग) अभ्यासासाठी निवडलेला नमुना किती शास्त्रीय आहे किंवा किती पध्दतीनुसार आहे यावरून एकूण जनसंख्येच्या संबंधीचा निष्कर्ष किती शास्त्रीय किंवा पद्धतीनुसार आहे हे लक्षात येते. नमुन्याच्या अभ्यासावरून काढलेल्या निष्कर्षामुळे नमुन्याची सांख्यकी (सॅम्पल स्टॅटीस्टीक्स) म्हणतात, तर एकूण जनसंख्येवरून काढलेल्या निष्कर्षांना जनसंख्यामापक (पॉप्युलेशन पॅरामीटरर्स) म्हणतात. नमुना निवडण्याच्या वेगवेगळ्या पध्दती आहेत. प्रामुख्याने याच्या दोन पध्दती प्रसिध्द आहेत. त्यांपैकी एक म्हणजे, शक्यतेचा नमुना (प्रॉबेबिलीटी सॅम्लींग) दुसरा म्हणजे शक्यतेच्या अभावाचा नमुना तंत्र (नॉन प्रॉबेबिलिटी सॅम्लींग) या दोन्ही प्रकारास मुख्यतः जनगणनेतील प्रत्येक घटकातील गुणधर्म निवडलेल्या

प्रत्येक घटकात असण्याची निश्चिती तरी असते किंवा असण्याची शक्यता नसते. या सूत्रावर नमुन्याच्या दोन पध्दती आधारलेल्या आहेत.

येथे लक्षात घेतले पाहिजे की, प्रातिनिधिक नमुना निवडणे शक्य व्हावे म्हणून स्वीकारलेला दृष्टिकोन (ॲप्रोच) महत्त्वाचा ठरतो. शक्यतेचा अभाव असणारा नमुना ही एक नाममात्र प्रक्रिया असते. त्यातून निघालेल्या निष्कर्षावर फ ार अवलंबून राहता येत नाही. शक्यतेच्या नमुनातंत्राचे तीन प्रकार आहेत ते असे १. साधा यादृच्छिक नमुना निवड (सिंपल रॅन्डम सॅम्पल) २. यादृच्छिक स्तरात्मक नमुना (स्ट्रॉटिफ ाईड रॅन्डम सॅम्पल) ३. समूहात्मक नमुना (क्लस्टर सॅम्पल) या शिवाय शक्यतेच्या अभावाच्या नमुनातंत्राचे तीन प्रकार आहेत. ते असे १. योगायोगाचा नमुना (ॲक्सीडेन्टल सॅम्पल) २. वाटणीचा नमुना (को–सॅम्पल) किंवा सह नमुना ३. हेतूपूर्वक निवडलेला नमुना (परस्पॅझीव सॅम्पल).

साध्या यादृच्छिक नमुना निवडीमध्ये जनसंख्येतील सर्व गुण वैशिष्ट्यांची यादी केलेली असते आणि त्यामधून निवडावयाचे अनुक्रम लॉटरी पध्दतीने काढलेले असतात. याकरीता यादृच्छिक अनुक्रमांकाचे टेबलसुध्दा वापरता येईल. त्यापूर्वी जनगणनेतील मूलभूत घटक कोणते याची यादी करावी लागते. आणि त्यानंतरच यादृच्छिक स्वरूपाचा नमुना हाती येतो. यादृच्छिक स्तरात्मक आवश्यक तितके अनुक्रमांक निवडावे लागतात. त्यामुळे त्या स्तराचे प्रतिनिधीत्व एकूण प्रातिनिधिक नमुन्यात दिसू शकते. समूह नमुन्यामध्ये बहुविध गटांतील घटकांचे छोटे छोटे समूह करून त्यातून यादृच्छिक तंत्राने नमुना तयार करण्यात येते. शक्यतेच्या अभावाच्या नमुना निवडीच्या तंत्राची प्रक्रिया शास्त्रीय ठरत नाही आणि त्यात चुका होण्याची शक्यता जास्त असते.

संशोधनामध्ये निवडलेला नमुना योग्य आणि ठोस असावा लागतो. निष्कर्षाचा खरेखोटेपणा नमुन्याच्या निवडीवर अवलंबून असतो. नमुना पाहणीची यशस्वीता निवडलेला नमुना किती प्रातिनिधिक आहे आणि किती अचूक निवडला यावर अवलंबून आहे. योग्य नमुना निवडणे ही सर्वेक्षणाची पूर्व अट होय.''[६] सर्वेक्षण पध्दती ही वृत्तपत्रीय संशोधन क्षेत्रात वापरणे सोपी व अचूक माहिती मिळवून देणारी पध्दती मानली जाते. वृत्तपत्रीय क्षेत्रात चाललेले संशोधन हा एक नवा प्रवाह निर्माण होत आहे. जगभर चाललेले वृत्तपत्रातील संशोधन हे इतर संशोधनांच्या तूलनेत फारच कमी आहे. यामध्ये नवनवे प्रयोग केले जात

आहेत. हे प्रयोग पारंपारिक संशोधन पध्दतीने दिलेल्या साधने, तंत्रे यांच्या मदतीने पुढे जात आहेत. वृत्तपत्र हे वाचकांशी संबधित असणारे माध्यम आहे. वाचकांशिवाय वृत्तपत्राला कसलेही महत्त्व असू शकत नाही हे लक्षात घेता वाचकांचा विचार करून केले जाणारे संशोधन हे महत्त्वाचे आहे तसेच ते वाढण्याची शक्यता जास्ती आहे. वाचकांची मते, विचार, आचार, प्रभाव जाणून घेण्यासाठी त्यांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दती ही आदर्श पध्दती मानली जाते.

वर्णनात्मक संशोधन पध्दतीलाच 'आदर्शमूलक सर्वेक्षण' पध्दती असे म्हणतात. या संदर्भात आदर्शमूलक या शब्दातून संशोधनामध्ये आदर्श स्थिती अभिप्रेत असल्याने संशोधनकार्यक्षेत्रात निरीक्षण करत असतांना पुन्हा तशाच प्रकारच्या परिस्थितीला त्याच बाबींची पुर्नरावृत्ती होत असल्याने आपणास त्याच गोष्टीचे परत निरीक्षण करता येते.

सर्वेक्षण पध्दतीच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट परिस्थितीत एकूण मोठ्या जनसंख्येच्या संदर्भात माहिती गोळा केली जाते. जेव्हा एकाच व्यक्तीच्या गुणवैशिष्टे व अभिप्रायाशी याचा संबंध नसतो. सर्वेक्षण तंत्राचा अवलंब करून मोठ्या जनसंख्येपासून माहिती काढून निघालेले निष्कर्ष संख्याशास्त्रीय पध्दतीने नोंदविता येतात. सद्यःस्थितीची जाणीव ही संशोधनाची पहिली पायरी असल्याने निरीक्षणाबरोबर संशोधन समस्येशी निगडीत अभिप्रायाचे सर्वसामान्य प्रमाण ठरविण्यासाठी प्रश्नावल्या, मुलाखती इत्यादींचा वापर करून तौलनिक निष्कर्ष काढता येतात.

एकंदर वरील सर्व बाबींचा विचार करून संशोधकाने या संशोधनाची सर्वेक्षण पध्दतींची निवड केली आहे.

३.०८ सर्वेक्षण पध्दतीचे हेतू

सर्वेक्षण पध्दतीत अपणाला पुढील प्रमाणे तीन महत्त्वाचे हेतू सांगता येतात.

१. सद्य परिस्थितीबाबत किंवा वर्तमानाबाबत पुरावे गोळा करणे.
२. भविष्यातील योजनांचे किंवा पुढील पायऱ्यांचे निकष किंवा प्रमाणके निश्चित करणे.
३. ज्या स्थानावर किंवा दर्जावर वर्तमान परिस्थिती आहे त्यांच्या आधारे लगेच पुढचे पाऊल निश्चित करणे.


प्रस्तुत संशोधनात या हेतूंचा वापर करून संशोधकाने वर्तमानातील पुरावे संशोधनासाठी निर्माण कलेल्या साधनाव्दारे गोळा केले. तद्नंतर या पुराव्याच्या आधारे निश्चित केलेल्या प्रमाणकांच्या आधारे सद्यःस्थितीची तुलना करून भविष्यात वृत्तपत्राच्या वाचकांसाठी कराव्या लागणाऱ्या योजनांचे नियोजन, प्रयोजनांच्या पायऱ्यांची प्रमाणके निश्चित करता येतील.

३.०९ सर्वेक्षण पध्दतींचा संशोधनात वापर

''सर्वेक्षण पध्दतीचा वापर सामाजिक शास्त्रांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो. सामाजिक शास्त्रज्ञांनी संशोधन पध्दती म्हणून या पध्दतीचा विकास केला असला तरी या पध्दतीच्या काही अंगभूत मर्यादा आहेत. या मर्यादांमुळे ह्या पध्दतीबाबत अनेकजण साशंक असतात. ज्या पध्दतीबाबत साशंकता आहे ती पध्दत आपण वापरायची का? या पध्दतीने केलेले संशोधन वैज्ञानिक संशोधनांच्या कसोटीवर उतरणार नसेल तर त्याचा परिणाम संशोधनाच्या मान्यतेवर होईल का? असे काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. पण काही संशोधन विषयांचे स्वरूपच असे असते की तेथे सर्वेक्षण पध्दत वापरणेच संयुक्तिक ठरते. संशोधकाने ही पध्दत वापरताना काटेकोर, वस्तुनिष्ठता, परिस्थितीचे सखोल आकलन होण्यासाठी भरपूर व्यासंग, सुयोग्य माहिती संकलन साधने, प्रातिनिधीक नमुन्याची निवड, संकलित माहितीचे योग्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन ही काळजी घेतली तर या पध्दतीने झालेली संशोधने खुप उपयुक्त ठरतील''[७] वृत्तपत्राचा वाचक सध्या वाढत आहे. तो संपूर्ण जगभर वाढत आहे. त्यामुळे वाचकांच्या आवडी निवडी तसेच त्यांना वृत्तपत्रामधील कोणते सदर वाचावयास आवडते. हे पाहून व्यंगचित्रासारख्या छोट्याशा सदरातून प्रसारित संदशाव्दारे मिळणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आगामी काळात वृत्तपत्रांना अशा सदरांची दिशा ठरविणे सोपे जाईल अथवा त्यामध्ये काही बदल करावयासही हे संशोधन उपयुक्त ठरेल. यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

३.१० सर्वेक्षण संशोधन पध्दतीचे प्रकार

सदर संशोधनात संशोधक संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यामुळे सर्वेक्षण पध्दतींचे प्रकार कोणते हे जाणणे आवश्यक ठरते. सर्वेक्षण संशोधन पध्दतीमध्ये दोन प्रकारच्या पध्दती आहे त्या पुढील आकृतीव्दारे स्पष्ट करण्यात आल्या आहेत.



आकृती क्रमांक ३.०१

सर्वेक्षण संशोधन पध्दती दर्शवणारी आकृती.

३.१० .०१ आदर्शमूलक सर्वेक्षण संशोधन पध्दती (Normative Method)

या पध्दतीमध्ये मुलाखती, चाचण्या, सर्वेक्षण, प्रश्नावली, पॅनेल गट या आधारे संशोधकाला वर्तन किंवा दृष्टिकोन तपासता येतात. नॉर्मेटिव्ह सर्वेक्षण किंवा वर्तनाच्या प्रमाणकाच्या आधारे दर्जाचे निर्धारण केले जाते.

३.१०.०२ आशयाचे विश्लेषण सर्वेक्षण संशोधन पध्दती (Analytical Method)

''विश्लेषण अभ्यासांमध्ये आशय विश्लेषण किंवा दस्तऐवज विश्लेषण यांचा समावेश होतो. आशय विश्लेषणात भाषणे, पुस्तके, अग्रलेख, टी.व्ही. कार्यक्रम यांचे विश्लेषण विशिष्ट निकषांच्या आधारे केले जाते. विश्लेषणाच्या ह्या पध्दतीत घटक विश्लेषण हा प्रकार फ ार महत्त्वाचा आहे. दस्तऐवज विश्लेषणात संशोधकाचा हेतू एखाद्या मुद्याची वारंवारिता पाहणे हाच असतो. आशय विश्लेषण आणि दस्तऐवज विश्लेषण हे दोन्ही विश्लेषण अभ्यासाचे प्रकार

एकमेकांना फ ार जवळचे आहेत. आशयाचे स्वरूप लिखित किंवा चित्रमुद्रित कसेही असू शकते.''[८] आशयाचे विश्लेषण सर्वेक्षण पध्दती ही अवघड परंतु सर्वेक्षण पध्दतीमधील महत्त्वाची पध्दती मानली जाते. आशयाचे विश्लेषण करणे सोपे जावे यासाठी यासाठी या पध्दतीचा वापर संशोधनात होत असतो. आशयाचे विश्लेषण/ॲनॅलिटिक सर्वेक्षण पध्दतीमुळे एखाद्या मूद्याची वारंवारिता काढणे सोपे होते. आशय चित्रमुद्रित असल्यावर या आशयाचे विश्लेषण करणे फ क्त आशयाचे विश्लेषण/ॲनॅलिटिक सर्वेक्षण पध्दतीनेच करणे गरजेचे ठरते. या पध्दतीचा वापर करून संख्यात्मक व गुणात्मक माहिती मिळते. ॲनॅलिटिक सर्वेक्षण विश्लेषण पध्दतीचा वापर करताना पदनिश्चयन शलाका व निरीक्षण सूची या साधनाचा वापर करता येतो.

३.१०.०३ निरीक्षण सूची

आशयाचे विश्लेषण सर्वेक्षण संशोधन पध्दतीमध्ये निरीक्षण सूची व पदनिश्चयन शलाका या साधनांचा वापर केला जातो. आपण येथे निरीक्षण सूची बाबत पाहू. निरीक्षण करताना साधारपणे संशोधकाने ठरविलेल्या उद्दिष्टांच्या परिपूर्ती करण्यासाठी विविध प्रकारची माहिती गोळा करण्यासाठी निरीक्षण सूचीचा वापर केला जातो. निरीक्षणाचे वेगवेगेळे प्रकार पडतात. यामध्ये संरचित निरीक्षण, असंरचित निरीक्षण, सहभागी निरीक्षण, असहभागी किंवा अलिप्त निरीक्षण हे ते प्रकार होत.

३.१०.०४ संरचित निरीक्षण (Sturctured Observestion)

संरचित निरीक्षण पध्दतीमध्ये निरीक्षण हे रचनाबध्द असते. रचनाबध्द निरीक्षण म्हणजेच ते कशाचे, कशाच्या आधारे करावयाचे हे ठरवणे म्हणजे रचनाबध्द निरीक्षण होय. ''निरीक्षण कोठे केव्हा, कसे, कशाच्या साह्याने व कशाचे करावयाचे या सर्वांचे निश्चित व सुसूत्र आयोजन करणे होय. ही रचनाबध्दता विशिष्ट उद्दिष्टांपुरती ज्या हेतूसाठी निरीक्षण करावयाचे त्या माहिती पुरतीच संरचित निरीक्षणात उपयोगी ठरते.''[९] या निरीक्षणाने माहिती व्यवस्थितरित्या मिळते. निरीक्षणात पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, प्रश्नावली, अंकपत्र इत्यादींचाही उपयोग होत असतो.

३.११ संशोधनातील साधने व तंत्रे

आधार सामग्री करण्यासाठी ज्या परिस्थितीत निरीक्षण तंत्राचा वापर आवश्यक असतो तेथे प्रामुख्याने निरीक्षण पध्दतीचा वापर केला जातो. मात्र उपलब्ध माहितीची विश्वसनीयता पडताळण्यासाठी अनेक साधनांचा उपयोग होतो. जनसंवादविषयक संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या पध्दती ''कार्टरने म्हटल्याप्रमाणे जनसंवादविषयक संशोधन हे १. वर्तनाचे प्रत्यक्ष निरीक्षण २. मुलाखती ३. तयार केलेली प्रश्नावली अथवा ४. उपरोक्त बाबींच्या मिश्रणातून सिध्द पध्दती यापैकी एकाद्या पध्दतीने केले जाते.''[१०]

संशोधनात वापरली जाणारी साधने पुढील प्रमाणे होत.

१. प्रश्नावली

२. मुलाखत

३. निरीक्षण

३.११.०१ प्रश्नावली (Questionaire)

प्रश्नावली हा एक प्रश्नांची माहिती असलेला मसुदा असतो. प्रश्नावलीचे वाचन करणारे ते प्रतिवेदक असतात. संशोधकाने विचारलेल्या प्रश्नांना प्रतिसाद द्यावयाचा असतो. वरवर पाहता प्रश्नावली तयार करणे तसेच त्याचा वापर करणे एकंदरीत फ ार सोपे वाटते. परंतु प्रत्यक्षात ते कष्ट साध्य कालपव्ययी असते. ''सर्वेक्षण संशोधनामध्ये प्रश्नावली (Questionaire) देऊन किंवा मुलाखतीत प्रश्न विचारून माहिती गोळा केली जाते. प्रश्न विचारण्याला या पध्दतीत महत्त्व आहे. त्यामुळे प्रश्नाचे स्वरूप आणि त्यांचा दर्जा यांवरच सर्वेक्षणाचे यश अवलंबून आहे. प्रश्नावली ज्या दर्जाची असेल त्या दर्जाचे ते संशोधन ठरेल असे म्हटले जाते. अभ्यासाच्या मुद्याशी प्रश्नांचा अनुबंध असावा. चांगल्या प्रश्नांमध्ये चांगली उत्तरे मिळतात, तर चुकीच्या प्रश्नांमध्ये चुकीचा प्रतिसाद मिळतो. प्रश्न विचारताना व्दिअर्थी शब्दप्रयोग असू नये. संदिग्ध व मोघम प्रश्न टाळावेत. अपेक्षित उत्तर मनात धरून प्रश्नकर्ताने प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्याच्या दर्जाची भाषा वापरावी. ती साधी पण यथोचित असावी.

प्रश्न दोन प्रकारचे असतात. एकात पर्यायी उत्तरे दिलेली असतात (Close ended) तर दुसऱ्यात पर्याय दिलेले नसतात म्हणून त्यास ओपन एंडेड प्रश्न म्हणतात. 'हो किंवा नाही' 'मान्य आणि अमान्य' अशा साध्या स्वरूपाची उत्तरे मिळविणारे प्रश्न किंवा अनेक पर्यायांपैकी एक पर्याय निवडायला सांगणारे प्रश्न 'क्लोज एंडेड' प्रश्न म्हणतात. याउलट खुल्या प्रश्नांमध्ये मात्र कोणत्याही प्रकारे पर्यायी उत्तर दिले नसून उत्तरदात्याला स्वतःच्या शब्दांत उत्तर द्यावे लागते. बंदिस्त उत्तर देणे सोपे जाते. अशा उत्तरांचे वर्गीकरण करणे आणि त्याचे विश्लेषण करणे सोपे जाते. पण अशा प्रश्नांच्या उत्तरांमध्ये उत्तर देणाऱ्या व्यक्तीस त्या मुद्यासंबंधी स्वतःचे स्वतंत्र मत असेल तर ते प्रकट करता येते नाही. याउलट खुल्या प्रश्नांमध्ये उत्तरदात्यांना काय वाटते? त्यांना काय माहित आहे? हे स्पष्टपणे प्रगट करू शकतात. अशा उत्तरांचे वर्गीकरण करणे सोपे होते. उत्तरदाते आपल्या शब्दात उत्तरे देऊ शकतात. काही वेळा स्वतःच्या शब्दांत उत्तर मांडणे उत्तरदात्यास अवघड होते. अशा वेळी बंदिस्त प्रश्नावली उत्तरदात्यांना सोईची ठरते. उत्तरदात्यांच्या प्रतिसादाची तुलना करणे आणि त्यांचे विश्लेषण करणे सोपे जाते कारण आधी निर्धारित प्रश्नांमध्येचे त्यांची उत्तरे मिळालेली असतात. बंदीस्त प्रश्नावलीत उत्तरदाते मुक्त पणे आपल्याला जे वाटते ते मांडू शकतात. अर्थात त्यामुळेच काही वेळात उत्तरदाते अधिक विस्तृतपणे उत्तर देतात, तर काही वेळा अगदीच त्रोटक उत्तर देतात. त्यांच्या उत्तरातून नेमका अर्थ काढणे अवघड झाल्यामुळे त्यांचे सांकेतिकरण किंवा वर्गीकरण करणे अवघड जाते. वस्तुनिष्ठ माहिती गोळा करण्याच्या प्रयत्नात बाधा येण्याची शक्यता असते.

प्रश्नावली तयार करताना कोणत्या समस्येचा आपण अभ्यास करतो आहोत याची स्पष्ट कल्पना संशोधकास असावी लागते. संशोधनाचे नेमके क्षेत्र स्पष्ट असल्यामुळे योग्य तऱ्हेने प्रश्न विचारून माहिती काढून घेता येते. प्रश्न आकर्षक, स्पष्ट व निटनेटके असावेत. प्रश्न फ ार मोठे किंवा पाल्हाळीक स्वरूपाचे नसावेत. प्रश्नावलीशिवाय सर्वेक्षण नीट रीतीने करता येणार नाही. प्रश्नावली हे संशोधनाचे महत्त्वाचे साधन आहे.''[११] उत्तम प्रश्नावली तयार करण्यासाठी अतिशय श्रम, वेळ कौशल्य, दक्षता आवश्यक असते. चांगली प्रश्नावली तयार करण्यासाठी पुढील तत्त्वांचा विचार होणे आवश्यक आहे.

संशोधन विषयाच्या संदर्भात संख्यात्मक व गुणात्मक माहिती मिळविण्यासाठी संशोधकला संशोधन समस्येची उकल करण्यासाठी उद्दिष्टांनुरूप बहुपर्यायी प्रश्नांचे आयोजन करता येते.

प्रश्नावली प्रथम कच्ची तयार करून मार्गदर्शन दाखवून त्यात दुरूस्ती करूनच तिला अंतिम रूप देण्यात येते.

१. मुक्त प्रश्नांना प्रतिवेदक स्वतःच्या शब्दांत मुक्तपणे उत्तरे देत असतो. त्यामध्ये कोणतेही उत्तर सुचविलेले नसते. काही वेळा मुक्त प्रश्नाचा वापर आवश्यक असतो. परंतु शक्यतो मुक्त प्रश्नांना कमीत कमी वापर करण्यात येतो.
२. बहुपर्यायी प्रश्न प्रकाराचा वापर करणे अत्यंत चांगले त्यामुळे उत्तरे संकलित करता येतात व त्याचे मापन करणे सोपे जाते.
३. बहुपर्यायी प्रश्नांच्या प्रतिसादातून अगदीच तुटपुंजी मूलभूत माहिती मिळत असते, तर असे प्रश्न निरर्थक, क्षुल्लक ठरतात. त्यासाठी केवळ प्रश्नच नव्हे तर संभाव्य उत्तरदेखील महत्त्वपूर्ण असल्याची खात्री करून घ्यावी लागते.
४. प्रश्नावलीतील प्रश्नांची भाषा अतिशय सोपी असावी. प्रतिवेदकाला माहिती नाहीत अशा क्लिष्ट रचना, शब्दयोजना, कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.
५. प्रश्नावलीत सुसंगत भाषा अतिशय सोपी असावी. त्यामुळे प्रश्नावलीच्या अंतर्गतच काही प्रतिबंध हवेत.
६. काही वेळा प्रश्नावली ही लांब होते व प्रतिवेद ती सोडवून देण्यासाठी कंटाळतात परंतू उद्दिष्टांची परिपूर्ती व्हावी यासाठी ती मोठी बनवावी लागते.

३.११.०१ प्रश्नांचे प्रकार

१. बंदिस्त किंवा बध्द प्रश्न

''बंदिस्त प्रश्न म्हणजे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न होत. यात प्रतिसादकाला प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या उत्तरांपैकी योग्य वाटणाऱ्या उत्तरांवर खूण करावी लागते.''[१२] दिलेल्या पर्यायामधून उत्तर निवडावे लागते.

२. मुक्त प्रश्न

मुक्त प्रश्न म्हणजे प्रश्नांच्या उत्तराची शब्दरचना प्रतिसादक स्वतःच्या शब्दात करू शकतो असे प्रश्न होय.

३.११.०२ प्रश्नावलीची प्रकार

संशोधनाच्या स्वरूपावरून प्रश्नावलीचे खालील प्रमाणे सहा प्रकार पडतात.

१. असंरचित प्रश्नावली.
२. संरचित प्रश्नावली.
३. बध्द/बंदिस्त प्रश्नावली.
४. मुक्त प्रश्नावली.
५. मिश्र प्रश्नावली.
६. चित्रमय प्रश्नावली

३.११.०३ प्रश्नावलीच्या व्याख्या

''१. **बोगार्डस–** उत्तरे देण्यासाठी अनेक व्यक्तींना पाठविलेली प्रश्नांची यादी म्हणजे प्रश्नावली होय. २. **प्रा. सिन पिओ यांग**– प्रश्नावली म्हणजे पाहण्यासाठी तयार केलेल्या यादीत अंतर्भाव असणाऱ्या किंवा सर्वेक्षण नमुना निवड केलेल्या व्यक्तींना पाठवावयाची प्रश्नपत्रिका किंवा प्रश्नसुची होय. ३. **श्री. गुड आणि हॅट–** सर्वसामान्यपणे प्रश्नावली म्हणजे माहिती देणाऱ्याकडून विशिष्ट नमुन्याचा वापर करून प्रश्नांची उत्तरे मिळविण्याची पध्दती होय.

हे नमुने उत्तरे देणाऱ्याने/माहिती देणाऱ्याने स्वतःच भरावयाचे असतात. ४. **श्री. गुड आणि हॅट–** प्रश्नावली ही माहिती गोळा करण्याचे साधन आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे प्रतिसादक स्वतः भरून देत असतो.''[१३]

प्रश्नावलीच्या व्याख्या पाहिल्या नंरत हे लक्षात येते की, अनेक व्यक्तींकडून माहिती गोळा करण्याचे काम सोपे व्हावे यासाठी प्रश्नावली हे साधन अत्यंत महत्त्वाचे काम करते. प्रश्नावलीच्या वतीने संशोधनासाठी माहिती मिळते.

प्रश्नावलीची वैशिष्ट्ये ही पुढील प्रमाणे सांगितली आहेत, ''उत्तम प्रश्नावलीची वैशिष्ट्ये सांगताना अरूणकुमार सिंग यांनी प्रश्नावली ही

–सुनिश्चित अशा विषयांना हात घालणारी असावी.

–प्रश्नावलीचे हेतू व उद्दिष्टे स्पष्टपणे मांडलेली असावीत.

–प्रश्नांचा क्रम व्यवस्तित रचलेला असावा.

–दिसायला आकर्षक, सुव्यवस्थित छापलेली व व्यवस्थित मांडणी असावी. असे म्हटले आहे.''[१४] प्रश्नावली हे साधन संशोधनात जास्तप्रमाणात वापरले जाणारे साधन आहे. त्यामुळे त्यांची वैशिष्टे देखील ठरलेली आहेत. विशिष्ट अशा विषयाला हात घालण्यापासून ते प्रश्नावलीतील हेतू व उद्दिष्टे यांची परिपूर्ती व्हावी यासाठी प्रश्नावली उपयोगात आणली जात असते.

३.११.०४ प्रश्नावलीचे फायदे

''१. प्रश्नावलीतील वस्तुनिष्ठ प्रश्न/बध्द प्रश्नांच्या पर्यायामुळे प्रतिसादकाला उत्तरे देणे सोपे जाते. त्यामुळे संशोधकास प्रश्नांचे वर्गीकरण करून संख्याशास्त्रीय विश्लेषण करणे सोपे जाते.

२. प्रश्नावली ही इतर साधनांपेक्षा वापरण्यास कमी खर्चाची व वेळ वाचविणारी अशी आहे.

३. प्रश्नावली एकाचवेळी अनेक प्रतिसादकांकडे पाठविता येते.

४. संशोधक प्रश्नावली पोस्टाने पाठवत असल्याने प्रतिसादकांवर उत्तरे लिहिताना दडपण नसते. प्रतिसादकांना विचार करून उत्तरे देण्यात भरपूर वेळ मिळतो. प्रतिसादकाच्या सवडीप्रमाणे उत्तरे देऊ शकतो व व्यक्तिनिरपेक्ष तथ्य संकलन संशोधकास करतो येते.

५. उद्दिष्टांनुसार प्रश्नांची रचना केलेली असल्यामुळे निष्कर्ष शोधता येतात.

६. प्रश्नावली या साधनाव्दारे विस्तृत व विशाल क्षेत्राचे अध्ययन करता येते.

७. प्रश्नावलीद्वारे माहिती मागवायची असेल तर प्रतिसादकाला कोणतेही प्रशिक्षण देण्याची गरज नसते. कारण प्रश्नावलीत ठिकठिकाणी प्रश्नावली सोडविण्याबाबत सूचना दिलेल्या असतात.

८. प्रश्नावलीमुळे प्रतिसादकांनी दिलेल्या वैयक्तिक व खाजगी प्रश्नांच्या उत्तरांबाबतची गोपनियता इतर साधनांच्या मानाने अधिक असते.

९. प्रश्नावलीमुळे स्थानिक, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कुठल्याही नमुना गटाकडून कमी खर्चात माहिती मागविता येते.

१०. संशोधकाने प्रश्नावली तयार केली तर संशोधकाच्या वतीने इतरही व्यक्ती प्रश्नावली परिक्षण करू शकतात.

११. मुलाखत पध्दतीत उत्तरदात्याकडे पुनःपुन्हा जाऊ न माहिती मिळविणे शक्य होत नाही, परंतु प्रश्नावली पध्दतीव्दारे ही गोष्ट शक्य होते. त्याच व्यक्तींना विशिष्ट काळानंतर प्रश्नावली पाठवून त्यांची भिन्न काळांतील मते आजमावता येतात.

१२. प्रश्नावलीत दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांची उलट तपासणी करावयाची असेल तर सुरूवातीला होकारात्मक प्रश्न देऊ न तशाच स्वरूपाचा नकारात्मकक प्रश्न देऊ न उत्तरदाता कितपत खरी माहिती देतो हे पाहता येते.''[१५] वरील प्रमाणे प्रश्नावलीचे फ ायदे असल्यानेच संशोधनात प्रश्नावली हे साधन वापरले जाते. प्रश्नावली हे साधन संशोधनात वापरण्यास सोपे असल्याने याचे जास्त प्रमाणात वापर करण्यात येतो.

३.१२ मुलाखत

संबधित विषयासंबंधी विशेष माहिती मिळविणे हे मुलाखतीचे उद्दिष्ट असते. संबंधित विषयाच्या समस्येची जाण असणाऱ्या तज्ज्ञ अशा व्यक्तींची मुलाखत अयोजित केली जाते. या साधनाव्दारे प्रतिसादकाशी अधिक संपर्क साधता येतो. या साधनांव्दारे प्रायोग्याची म्हणजेच

ज्यांनी मुलाखत घ्यावयाची आहे त्याची विशिष्ट प्रश्नासंबधी खास अशी भूमिका आहे का? ती कोणती आहे? त्याच्या त्या संबंधात कोणत्या अपेक्षा आहेत? त्याला या प्रश्नाबाबत काय वाटते? अशा विविध प्रश्नांच्या संदर्भात माहिती विचारता येते. मुलाखतीमध्ये प्रतिसादकाकडून कोणकोणती माहिती मिळवायची आहे. त्यानुसार प्रश्न विचारावेत. प्रतिसादकाची हरकत नसेल तर सर्व मुलाखत ध्वनिमुद्रित करणे चांगले असते.

३.१२.०१ मुलाखतीचे प्रकार

मुलाखतीचे पुढील विविध प्रकार आहेत. संशोधकाने आपल्या संधोधनाच्या दृष्टिकोनातून कोणत्याही प्रकारची निवड करावी. मुलाखतीच्या उद्दिष्टांवर ही निवड अवलंबून राहील. तसेच मुलाखत घेण्यासाठी एकापेक्षा अधिक तज्ज्ञ उपलब्ध असतील तर आपण यातील विशिष्ट प्रकार निवडू शकतो.

१. व्यक्तिगत मुलाखत.
२. मुलाखतकार एक–मुलाख देणारे अनेक.
३. नियंत्रित मुलाखत व अनियंत्रित मुलाखत.
४. उथळ मुलाखत–सखोल मुलाखत.

३.१२.०२ मुलाखत तंत्राचे फायदे

मुलाखत या साधनाचे अनेक फायदे व उपयोग आहेत ते पुढीलप्रमाणे

१. मुलाखतीमध्ये मुलाखतकार व प्रतिसादक समोरासमोर असल्याने विषयाची चर्चा करता येते. शंका निरसन होऊ शकते. विषयाला अनुरूप अशी खुप आवश्यक माहिती उपलब्ध करून घेता येते.
२. ज्या प्रतिवेदकांना लिहिता–वाचता येत नाही अशांकडून समस्येच्या संदर्भात आवश्यक माहिती काढून घेता येते.
३. मुलाखतीत बोलण्याची प्रक्रिया असल्याने त्या ओघात प्रतिसादक वस्तुस्थितीचे अचूक वर्णन करतो.

४. मुलाखतीमुळे संशोधनासाठी चांगले वातावरण निर्माण करता येते.

३.१२.०३ निरीक्षण

'निरीक्षण' हे संशोधनाचे एक नैसर्गिक साधन आहे. प्रयोगातील प्रयोज्य हे विविध परिस्थितीत कोणती कृती करतात. याची पाहणी करणे म्हणजे निरीक्षण होय. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीचीच संशोधक नोंद करीत असल्याने या निरीक्षणाने मिळणारी माहिती ही सत्यता या निष्कर्षावर उतरणारी आहे. अर्थात हे निरीक्षण परिपूर्ण होणे आवश्यक आहे.

निरीक्षणाची वैधता व विश्वसनीयता वाढविण्यासाठी एका निरीक्षकाने एखाद्या विशिष्ट कृतीचे एकापेक्षा अधिक वेळा निरीक्षण करावे व हे करतांना दोन निरीक्षणामध्ये थोडे अंतर ठेवावे. निरीक्षणामध्ये वैधता, विश्वसनीयता व पुनरावृत्ती क्षमता असावी लागते. हे अत्यंत व्यवस्थित, निश्चित व वस्तुनिष्ठ असावे लागते. ते शक्यतो संख्यात्मक स्वरूपाचे असावे व त्याची नोंद ताबडतोब करावी. उशिरा केलेल्या नोंदी विस्मरणाने अपूर्ण राहण्याची शक्यता असते आणि नोंदी सातत्यापासून दूर जाण्याचीही शक्यता असते.

इतर कोणत्याही पध्दतीपेक्षा निरीक्षण तंत्राच्या सहाय्याने काढलेली निष्कर्षाची विश्वनीयता केव्हाही अधिक असते. निरीक्षणाच्या नोंदी करण्यासाठी गुणतक्ते, पदनिश्चयन श्रेणी, विविध कसोट्या, पडताळासूची, घटनांच्या नोंदी ध्वनिचित्र फित्ती इत्यादी साधने वापरली जातात.

३.१३ प्रस्तुत संशोधनात वापरण्यात येणारी साधने व तंत्रे निवड

संशोधन समस्येची उकल करण्यासाठी संशोधकाला विविध प्रकारच्या संशोधन साधनांचा उपयोग होतो. या साधनांमधून योग्य त्या साधनाची निवड करणे आवश्यक आहे. ही निवड योग्य होण्यास संशोधकास साधनाच्या गुणदोषांची व मर्यादांची जाणीव असणे आवश्यक असते. या साधनांपैकी एक किंवा अनेक साधनांचा संशोधक उपयोग करू शकतो.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या तीन साधनांचा वापर केला आहे. उद्दिष्टांची परिपूर्ती व्हावी यासाठी उद्दिष्टनिहाय या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

३.१३.०१ प्रश्नावली

संशोधन विषयाच्या संदर्भात या साधनांद्वारे संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती उपलब्ध होते. संशोधनाच्या विविध साधनांमध्ये हे एक अत्यंत लोकप्रिय व फ ार मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे असे साधन आहे. विशेषतः वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीत या साधनाचा फ ार मोठा वापर केला जातो. प्रतिसादकांची संख्या व संशोधकाचे वास्तव्य यामुळे प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला जातो.

म्हणून संशोधकाने संशोधन विषयांशी संबंधित कार्यक्षेत्रातील सोलापूर जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यापैकी ५०% पेक्षा जास्त तालुक्यातील शहरी वाचक गट व शहरालगतील वाचक गट असा विचार करून उद्दिष्ट निहाय क्रमबध्द प्रश्नांचे आयोजन करून प्रश्नांवली साधनाचा वापर करण्यात आला.

संशोधन हे वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराशी निगडीत असल्याने व्यंगचित्र सदरांचा समावेश प्रश्नावलीमध्ये करण्यात आला आहे. काही वेळेस शाब्दिक प्रश्नावली ऐवजी प्रश्नावलीत प्रश्नाबरोबर चित्रांचाही समावेश असतो व चित्रांच्या मदतीने प्रश्न विचारले जातात. अशा प्रश्नावलीस चित्रमय प्रश्नावली म्हणतात. व्यंगचित्र सदरांचा प्रश्नावलीत वापर केल्याणे प्रश्नावली चित्रमय व नावीन्यपूर्ण बनली. नावीन्यपूर्ण प्रश्नावली झाल्याने प्रतिसादकास उत्तर देण्यासाठी प्रेरणा मिळाली असल्याचे दिसते.

३.१३.०२ प्रस्तुत संशोधनात वापरलेल्या प्रश्नावलीचे स्वरूप

प्रस्तुत संशोधनासाठी तयार करण्यात आलेली छापील प्रश्नावली पाच भागात असून प्रश्नावलीच्या पहिल्या भागात प्रश्नावली कशी भरायची याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

दुसऱ्या भागात प्रश्नांची उत्तरे देणाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे प्रश्नावली भरणाऱ्या व्यक्तीची एकूणच पार्श्वभूमी याचा अंदाज घेता येणे शक्य झाले. प्रश्नावली भरून घेताना संबंधित व्यक्तीने पुरवलेली व्यक्तीगत माहिती प्रस्तुत संशोधन कार्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याच कामाकरिता वापरली जाणार नाही याचे लेखी आश्वासन स्वतंत्र पत्राव्दारे प्रस्तुत संशोधनकर्त्याकडून संबंधितांना देण्यात आले होते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यकती सामग्री प्रश्नांच्या उत्तरांच्या स्वरूपात अतिशय मोकळेपणाने उपलब्ध होण्यास मदत झाली.

प्रश्नावलीच्या तिसऱ्या भागात उद्दिष्ट क्रमांक एकची पूर्ती व्हावी यासाठी उपयोगी होणारे २४ प्रश्न प्रश्नावलीसाठी निर्माण करून त्यात मांडले होते.

प्रश्नावलीच्या चौथ्या भागात उद्दिष्ट क्रमांक दोनची पूर्ती व्हावी यासाठी १२७ व्यंगचित्रे प्रश्नावलीमध्ये देऊन वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरणरक्षण, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी ही मूल्ये व्यंगचित्रातून प्रसारित होतात काय? अशा स्वरूपाचा प्रश्न विचारून माहिती मिळवली होती.

प्रश्नावलीच्या विभाग पाच मध्ये पद्‌निश्चयन पध्दतीचा वापर करत पंचबिंदू शलाकेचा वापर करून ४० प्रश्न विचारण्यात आले होते. हे चाळीस प्रश्न उद्दिष्ट क्रमांक तिनच्या पूर्ततेसाठी निर्माण केले होते. सकारात्मक भावना व नकारात्मक भावना तसेच सकारात्मक कृती व नकारात्मक कृती अशा स्वरूपाचे प्रश्न तयार करण्यात आले होते. यामध्ये १० प्रश्न हे सकारात्मक भावनेशी निगडीत आहेत. १० प्रश्न नकारात्मक भावनेशी निगडीत आहेत. त्याचप्रमाणे १० प्रश्न हे समारात्म कृतिशी निगडीत आहेत. १० प्रश्न हे नकारात्मक कृतिशी निगडीत आहेत.

प्रश्नावलीमधील संदिग्ध व अधिक व्यापक अर्थ संभावनाऱ्या बाबी टाळण्याकडेही लक्ष देण्यात आले आहेत. प्रश्न शक्य तेवढे सुस्पष्ट, काटेकोर व टोकदार करण्याचा प्रयत्नही केला आहे. संशोधनाच्या निष्कर्षावर परिणाम संभवतः असल्याने ध्यानात घेवून प्रश्नावली शक्य तेवढी सुलभ व सोपी ठेवण्यात आली होती.

प्रश्नावली तयार करताना प्रश्नांचा क्रम निश्चित करण्याची काळजी घेतली जाणे आवश्यक असते. ही काळजी घेतली गेली होती. प्रश्नांचे गट तयार करतानाही अर्थवाहीत्व व तार्किकतेचे भान राखून एका प्रश्नाकडून दुसऱ्या प्रश्नाकडे वा प्रश्नगटाकडील संक्रमण यथास्थित होईल याची काळजी घेण्यात आली होती.

३.१३.०२ संशोधनात वापरलेल्या प्रश्नावलीची वैशिष्ट्ये

संशोधनात संशोधकाने प्रश्नावली हे साधन माहिती संकलित करण्यासाठी वापरलेल्या आहेत. या साधन निर्मितीचा उद्देश मुळात गुणात्मक व संख्यात्मक माहिती संकलित करणे हा आहे. त्यासाठी संशोधकाने प्रश्नावली निर्माण केली होती. तिची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे नोंदविता येतील.

१. प्रतीसादकांना प्रश्नावली देताना सोबत सहपत्र पुढील मुद्यानुसार देण्यात आले. त्यात संशोधनाचा विषय, उद्देश, हेतू तसेच सदर माहिती गोपनीय ठेवण्याबाबत हमी, प्रश्नावली भरून देण्याबाबत विनंती इत्यादींचा उल्लेख होता.
२. प्रश्नावलीचे पाच विभाग करण्यात आले आहेत.
३. विभाग उद्दिष्ट निहाय निर्माण केले होते यात, विभाग क्रमांक एक हा सूचनांचा विभाग होता, विभाग क्रमांक दोन यात वाचकांची वैयक्तीक माहिती विचारण्यात आली होती, विभाग क्रमांक तिन मध्ये वाचकांना प्रश्न देण्यात आले होते, विभाग क्रमांक चार या विभागात व्यंगचित्रांचे परिक्षण देण्यात आले होते, विभाग क्रमांक पाच मध्ये पद्निश्चयन स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आले होते.
४. प्रश्नावली बध्द/बंदिस्त अशा प्रकारचे प्रश्न निर्माण करण्यात आले होते.

५. संशोधन व्यंगचित्र सदराशी निगडीत असल्याने सदर प्रश्नावली बध्द/बंदिस्त व चित्रमय स्वरूपाची निर्माण करण्यात आली होती.

६. प्रश्नावली हि संशोधनाच्या उद्दिष्टानुसार होती. त्यामुळे संशोधनात आवश्यक तेवढीच योग्य माहिती मिळली.

७. प्रश्नावलीची छापाई व आकार स्वच्छ व आकर्षक होता.

३.१४ प्रस्तुत संशोधनाची कार्यपध्दती

''जनसंवाद–माध्यम संशोधन कार्यातील पुढील अवस्था ही मूल्यमापनात्मक, समीक्षात्मक अशा दृष्टीकोणाची होती. ह्या दृष्टीकोणाचा भर हा संवाद–जनसंवादाकडे केवळ संवाद प्रक्रिया अथवा तंत्रज्ञान म्हणून बघण्याचा नसून संवादाकडे एक सामाजिक प्रक्रिया म्हणून बघण्याचा आहे.''[१६] संवादाची ही सामाजिक प्रक्रिया लक्षात घेवून त्या बाबत केले जाणारे मूल्यमापन तसेच समीक्षात्मक दृष्टीने विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

३.१४.०१. कार्यपध्दती टप्पा पहिला

प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट उद्दिष्ट क्रमांक १ ते ३ साठी म्हणजेच १. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांमुळे वाचकांवर झालेला भावनात्मक व क्रियात्मक बदल तपासणे. २. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून कोणती मूल्ये प्रसारित झालेली आहेत, हे वाचकांकडून जाणून घेणे. ३. वृत्तपत्रीय वाचकांकडून मूल्यांबाबत मते जाणून घेणे., या उद्दिष्टांसाठी सर्वेक्षण पध्दतीतील (Normative Method) आदर्शमूलक सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा (Normative Sarvey Method) वापर केला गेला आहे. त्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे. उद्दिष्ट क्रमांक २ साठी ही प्रश्नावली बध्द स्वरूपाची व चित्रमय स्वरूपाची करण्यात आली आहे.

सदर संशोधनात वाचकांकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली विकसित केली आहे. तीची वैशिष्टे आपण वरती पाहिली आहेत. ही प्रश्नावली वाचकांकडून भरून घेवून उद्दिष्ट क्रमांक १ ते ३ साठी माहिती संकलित केली गेली आहे.

३.१४.०२. कार्यपध्दती टप्पा दुसरा

प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्रमांक १ साठी म्हणजेच ''वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांमुळे वाचकांवर झालेला भावनात्मक व क्रियात्मक बदल तपासणे.'' या उद्दिष्टासाठी व्यक्तिमत्व मापीका चाचणी निर्माण करून प्रश्नावलीत तसेच प्रश्न निर्माण केला आहे. या प्रश्नांच्या उत्तरासाठी पंचबिंदू शलाका पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. व्यक्तिमत्व मापनाचे साधारण दोन प्रकार पडतात ते पुढील प्रमाणे होय, ''व्यक्तिमत्त्वाची व्याख्या करताना व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचा बांधा, अंतःस्थ अभिरूची, अभिक्षमता, इत्यादींचे वैशिष्टपूर्ण संघटन असे म्हटले आहे. व्यक्तीचा बांधा किंवा शरीरयष्टी जशी मापनीय आहे तसेच तिची क्षमता, अभिक्षमता, इत्यादी अंतःस्थ गुणवैशिष्ट्यांचही मापन करता येते. किंबहूना व्यक्तीला मार्गदर्शन करताना– मग ते शैक्षणिक, व्यावसायिक वा चिकित्सात्मक असो– व्यक्तिमत्त्व– मापनाशिवाय पर्याय नाही... बुध्दिमत्ता–चाचण्यांप्रमाणे व्यक्तिमत्त्व–मापनाची विविध तंत्रे व साधने आहेत. त्यांचा येथे आपण विचार करू. व्यक्तिमत्त्व–मापन–चाचणीचे दोन प्रकार सांगता येतील. १. व्यक्तीने स्वतःच प्रश्नांची उत्तरे देऊ न स्वतःचे मूल्यांकन करणे म्हणजेच व्यक्तिमत्त्व–शोध–चाचणी (पर्सनॅलिटी इन्व्हेन्टरी) किंवा २. एखाद्या व्यक्तीचे इतरांनी मूल्यांकन करणे म्हणजेच पदनिश्चयन–पध्दती (रेटिंग स्केल).''[१७] संशोधनामध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्र सदरातून प्रसारित होणाऱ्या संदेशातून जी मूल्ये प्रसारित होतात त्यांचा वाचकांवर होणारा परिणाम हा तपासणे हा हेतू आहे. वाचकांना व्यंगचित्र सदरातून काही मूल्ये मिळतात त्यावर वाचक विचार करता काय आणि करीत असतील तर त्याचा त्यांच्यावर परिणाम झालेला आहे हे निश्चत आहे. व्यंगचित्र सदरातून मिळालेल्या मूल्यांप्रमाणे होणारे वर्तन तपासण्यासाठी व्यक्तिमत्व मापीका चाचणीचा वापर येथे करता येऊ शकतो. त्यासाठी काढलेले प्रश्नावलीतील प्रश्न हे पदनिश्चयन पध्दतीचा वापर करत पंचबिंदू परिणाम वापरून तयार केले आहेत. संशोधनातील हेतू साध्य करण्यासाठी पदनिश्चयनपध्दती (रेटिंग स्केल) वापरता येतो, तो काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे, ''व्यक्तिमत्त्व मापनाचा हा दुसरा प्रकार होय. जेव्हा व्यक्ती स्वतःचे मूल्यांकन स्वतःकरते तेव्हा तिच्या व्यक्तिनिष्ठ घटकांचा– म्हणजेच तिची चाचणीविषयीची अभिवृत्ती, इतरांना आपले चांगले व आदर्श व्यक्तिमत्त्व दिसावे म्हणून दिलेल्या प्रतिक्रियांचा परिणाम

उत्तरातील प्रमाणिकपणावरही होतो. त्याशिवाय तिच्या ठिकाणी असलेल्या काही सुप्त (चांगल्या वा वाईट) गुणांची तिला स्वतःला कल्पना नसते. असे गुण चाचणीव्दारे इतरांना प्रदर्शित झालेलेही तिला आवडत नाही. व्यक्तित्व –शोध–चाचणीतील ह्या उणिवांवर मात करण्याच्या दृष्टिने अनेक प्रयत्न केले जात असले तरी सर्वस्वी यशस्वी असा एकही प्रयत्न दिसत नाही. तेव्हा हे सर्व टाळण्याकरिता व्यक्तीचे मूल्यांकन दुसऱ्या कोणी तरी ओळखीच्या व्यक्तीने करणे इष्ट ठरते. अशा तऱ्हेने मूल्यांकन त्या व्यक्तीला ओळखणारी व्यक्ती करू शकते किंवा एखाद्या परिस्थितीत त्या व्यक्तीचे निरीक्षण करून त्याचे मूल्यांकन करता येते. त्या पध्दतीलाच पदनिश्चयन–पध्दती म्हणतात. अशा मूल्यांकनाकरिता त्रिबिंदू, पंचबिंदू, सप्तबिंदू, नवबिंदू, इत्यादी परिणामे वापरतात.

ह्याप्रमाणे सप्तबिंदू व नवबिंदू परिणामे तयार केली जातात. हे मूल्यांकन जास्त अर्थपूर्ण व वस्तुनिष्ठ होण्याकरिता पुढील गोष्टी आवश्यक आहेत. १. जो मूल्यांकन करतो त्याला ज्याचे मूल्यांकन करावयाचे आहे त्याची माहिती असणे आवश्यक आहे. २. परिमाणाची तपशीलवार नीट माहिती असणे आवश्यक आहे. म्हणजे ज्या गुणवैशिष्ट्यांचे मूल्याकन करावयाचे त्याला अर्थ, त्याची संकल्पना नीट समजणे अतिशय आवश्यक आहे. ३. परिचयाचा परिणाम टाळला पाहिजे. याचा अर्थ असा की, केवळ व्यक्ती परिचित आहे म्हणून मूल्यांकन करताना तिला काय वाटेल किंवा तिला दुखवू नये म्हणून केवळ अनुकूल मुल्यांकन करण्याचे टाळले पाहिजे.

त्याशिवाय मूल्यांकन करणारी व्यक्ती, मूल्यांकन केल्या जाणाऱ्या व्यक्तीला ओळखत नसेल तर मूल्यांकन करणाऱ्या व्यक्तीवर 'सामाजिक स्थिरते' चा (सोशल स्टीरिओटाईप) परिणाम होणे शक्य आहे. मूल्यांकन केली जाणारी व्यक्ती एखाद्या विशिष्ट व्यवसायाची, जातीची किंवा वर्गाची असेल तर त्या विशिष्ट व्यवसाय, जात किंवा वर्गाबद्दलच्या सामाजिक धारणेनुसार मूल्यांकन केले जाईल. परिणामी मानसशास्त्रीय मूल्यांकनातील प्राथमिक हेतू साध्य होणार नाही. असे असले तरी एखाद्या व्यक्तीविषयी एकापेक्षा जास्त व्यक्तींनी वेगवेगळ्या परिस्थितीत मूल्यांकन केल्यास त्यात बरीच यथार्थता व वस्तुनिष्ठता आढळते.''[१८]


सदर संशोधनातील उद्दिष्ट क्रमांक १ साठी म्हणजेच ''वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांमुळे वाचकांवर झालेला भावनात्मक व क्रियात्मक बदल तपासणे.''

या उद्दिष्टासाठी माहिती मिळवण्यासाठी पद्‌निश्चयन पध्दतीने वाचकांचा झालेला परिणाम म्हणजेच 'वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांमुळे वाचकांवर झालेला भावनात्मक व क्रियात्मक बदल तपासणे' सुकर होईल.

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्ट क्रमांक १ साठी पुढील पध्दतीची पंचबिंदू परिणाम पदनिश्चयन श्रेणी तयार केले आहे व वाचकांकडून मते जाणून घेवून माहिती मिळवली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी पदनिश्चयन पंचबिंदू परिणाम

प्रश्न



कधीही नाही एखादे वेळी कधी कधी खुप वेळा प्रत्येक वेळी

वरील पाच पैकी योग्य पर्यायावर (√) खूण करा.

आकृती क्रमांक ३.०२

प्रस्तुत संशोधनातील पदनिश्चयन पंचबिंदू परिणाम दर्शवणारी आकृती.

माहिती मिळवण्यासाठी एकूण ४८० वाचकांकडून प्रश्नावली भरूण घेतली गेली आहे. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण शहरी वाचक व शहरालगतील वाचक असे गट पाडून तुलनात्मक पध्दतीचा वापर करून निष्कर्ष काढले आहेत.

प्रस्तुत संशोधनात पदनिश्चयन पंचबिंदू परिणामासाठी गुणदान

प्रश्नावलीमध्ये पाचव्या भागात विचारलेले प्रश्न हे पंचबिंदू शलाका पध्दतीने आहेत. यामध्ये ४० प्रश्न असून प्रत्येकी पाच पर्याय देण्यात आले आहेत. प्रत्येक विधानासाठी कोणत्याही एकाच पर्यायाची निवड करावयाची आहे. सकारात्मकक विधानासाठी व नकारात्मकक विधानासाठी गुणदान योजना पुढीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ३.०१

पदनिश्चयन गुणदान योजना कोष्टक.

विधानाचे स्वरूप	कधीही नाही	एखादे वेळी	कधी कधी	खुप वेळा	प्रत्येक वेळी
सकारात्मक	१	२	३	४	५
नकारात्मक	५	४	३	२	१

कोष्टक क्रमांक ३.०२

मापिकेत घेतलेले घटक व त्यांचे विधान क्रमांक कोष्टक.

अ.नं	घटक	विधान क्रमांक	स्वरूप	एकूण		भारांश टक्केवारी
१	भावना	१,२,३,४,५,६,७,८,९,१०	सकारात्मक	१०	२०	५०
		११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०	नकारात्मक	१०		
२	कृती	२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०	सकारात्मक	१०	२०	५०
		३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०	नकारात्मक	१०		
एकूण					४०	१००

वाचकांचे शहरी व शहरालगतील वाचक गट–

अ. शहरी वाचक गट.

ब. शहरालगतील वाचक गट.

३.१४.०३. कार्यपध्दती टप्पा तिसरा

प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्रमांक ४ साठी म्हणजेच ''वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांबाबत तज्ज्ञांची मते घेणे.'' या उद्दिष्टासाठी सर्वेक्षण पध्दतीतील (Normative Method) आदर्शमूलक सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा (Normative Surve Method) वापर केला गेला आहे. त्यासाठी मुलाखत या साधनाचा वापर करण्यात आला आहे. मुलाखत घेण्यासाठी संशोधनात्मक मुलाखतीचा वापर केला गेला आहे. यासाठी औपचारिक मुलाखत पध्दतीचा वापर करून मुलाखत पूर्ण करण्यात आली आहे.

३.१५ प्रस्तुत संशोधनात विश्लेषणासाठी तुलनात्मक पध्दतीचा वापर.

माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यासाठी तुलनात्मक संशोधन पध्तीचा वापर केला आहे. तुलना केल्यास संशोधन समस्येची वैशिष्टे आणि परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट होते. घटनांची कारणमीमांसा करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात तुलनात्मक पध्दतीने निष्कर्ष काढले आहेत. एखाद्या घटनेची नोंद घेताना दोन किंवा अधिक वेळा एकच परिस्थिती समान असेल व त्या परिस्थितीतच नेमके तसेच घडत असेल तर ती परिस्थितीच ती घटना घडण्यामागील कारण व परिणाम असते. त्याचप्रमाणे दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा घटना घडण्यासाठी एकच परिस्थिती समान नसेल तेव्हा किंवा दोन किंवा अधिक वेळा ती घटना घडत नसेल व ती समान परिस्थिती नसेल तर त्या दोन्ही वेळी फ रक घडवून आणणारी परिस्थिती हे त्या घटनेमागील कारण, परिणाम किंवा कारणाचा महत्त्वाचा भाग असते. म्हणजेच घटनेनंतर किंवा अगदी वर्तमान स्थितीतील घटनांचा देखील अभ्यास या पध्दतीने केला जातो. तुलनात्मक

संशोधन पध्दतीमध्ये साधारणपणे दोन परस्परविरोधी गट असतात व त्यांची तुलना करून कारणे शोधली जातात म्हणून या संशोधन पध्दतीला तौलनिक कार्यकारण पध्दती म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात तुलनात्मक पध्दतीचा वापर केला आहे. एकाच परिस्थितीत दोन विभाग कशा पध्दतीने उत्तर देतात याचा शोध घेण्यासाठी या पध्दतीचा वापर केला आहे. एका प्रश्नांची उत्तरे हे दोन विभाग कशा प्रकारे देतात यातून शोधता येईल. प्रस्तुत संशोधनात वाचकांचे अ. शहरी वाचक गट ब. शहरालगतील वाचक गट असे गट पाडून तूलना केली आहे.

३.१६ प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड

संशोधन समस्येचे उत्तर शोधण्यासाठी संशोधकाला विविध प्रतिसादकांकडून माहिती प्राप्त करावी लागते. सर्वेक्षण पध्दतीमध्ये संग्रहित केलेल्या माहितीपासून विशिष्ट निष्कर्ष काढण्यासाठी गटातील लोकांच्या मतांबाबत चिकित्सा केली जाते. यासाठी विशिष्ट समूह निवडण्यासाठी नमुना निवड पध्दतीचा अवलंब करावा लागतो. नमुना निवडीमुळे सखोल अभ्यास करणे शक्य होते. तसेच माहिती मिळवणे सापे होते. नमुना निवडीमुळे मिळालेली माहिती ही मर्यादित मिळते त्यामुळे मर्यादित माहितीचे विश्लेषण करणे त्याचे निष्कर्ष काढणे सोपे जाते. नमुना निवडीमुळे व्यापक क्षेत्र निवडता येते. तसेच संशोधनातील प्रत्येक बाब ही शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून पुढे जाता येते.

३.१६.०१. प्रश्नावलीसाठी व्यंगचित्र सदरांची नमुना निवड

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला गेल्याने लक्षागटाकडून माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली साधनाची निर्मिती करावी लागली. प्रश्नावली या साधनाची निर्मीती करताना उद्दिष्ट क्रमांक २ साठी व्यंगचित्र सदरांची निवड करावयाची होती. त्यासाठी १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१६ या दोन वर्षातील दैनिक केसरी, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत या तीन दैनिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या एकूण १२७२ व्यंगचित्र सदरांपैकी १०% व्यंगचित्र सदरांचा वापर करून प्रश्नांची निर्मीती केली गेली. ही १०% व्यंगचित्र सदरे निवड संभाव्य नमुना निवड पध्दतीचा (Probabilit Sampling) अवलंब

करून निवडली गेली. यासाठी यासाठी सरल यादृच्छिक नमुना निवड पध्दती (Sample Random Sampling) मधील लॉटरी सोडत पध्दतीचा (Lottery Method) वापर करण्यात आला. संशोधकाने प्रथम १२७२ व्यंगचित्र सदराच्या क्रमांकच्या चिठ्ठ्या तयार केल्या. या चिठ्ठ्या रंगाने सारख्या असणाऱ्या, आकारने सारख्या असणाऱ्या कागदावर निर्माण केल्या. यामुळे उपलब्ध सर्व व्यंगचित्र सदरांना नमुना निवडीत समावेश होण्याची संभाव्यता निर्माण झाली. ही नमुना निवड पध्दती विधीवत पुर्ण करून प्रश्नावलीसाठी या १२७ व्यंगचित्रांची निवड केली गेली.

३.१६.०२. संशोधनासाठी निवडावयाच्या तालुक्याची नमुना निवड

प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यातून वाचकांची नमुना निवड करावयाची असल्याने प्रथमतः संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात असणाऱ्या एकूण तालुक्यापैकी ७०% पेक्षा जास्त तालुक्यांची निवड करणे आवश्यक होते. ही निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा (Probabilit Sampling) अवलंब करून करण्यात आली. यासाठी सरल यादृच्छिक नमुना निवड पध्दती (Sample Random Sampling) मधील लॉटरी सोडत पध्दतीचा (Lottery Method) वापर करण्यात आला. यामुळे उपलब्ध सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना नमुना निवडीत समावेश होण्याची संभाव्यता निर्माण झाली. ही निवड विधिवत पूर्ण करण्यात आली. या विधीचा वापर करून शास्त्रीय पध्दतीने सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, मोहळ, माळशिरस, माढा, अक्कलकोट, पंढरपूर, करमाळा, उत्तर सोलापूर हे ८ तालुके नमुना म्हणून मिळाले. ही नमुना निवड पध्दती विधीवत पुर्ण केली गेली. या ८ तालुक्यातून वाचकांकडून प्रश्नावली भरून घेतली गेली. मिळालेल्या ८ तालुक्यामधून वाचकांचे शहरी वाचक गट व शहरालगतील वाचक गट यांचा विचार करून ४८० वाचकांकडून प्रश्नावली भरून घेतील गेली.

३.१६.०३. संशोधनासाठी वाचकांची नमुना निवड

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली ही वृत्तपत्राच्या वाचकांकडून भरून घ्यावयाची असल्याने वाचकांची निवड करणे आवश्यक होते. संशोधकाला वाचकांचे शहरी वाचकगट व

शहरालगतील वाचकगट याप्रमाणे विश्लेषण करावयाचे असल्याने तशा स्वरूपाचा वृत्तपत्रीय वाचक संशोधनासाठी निवडणे गरजेचे होते. सोलापूर जिल्ह्यातील नमुना निवडीत समावेश झालेल्या ८ तालुक्यातील वृत्तपत्रीय वाचकांची निवड ही असंभाव्यता नमुना निवड (Non-Probabilit Sampling) पध्दतीचा अवलंब करून निवडण्यात आले आहेत. यासाठी सोयीस्कर नमुना निवड पध्दती (Accidental or Convenience Samplaing) या पध्दतीचा अवलंब केला गेला आहे. या पध्दतीमुळे वृत्तपत्राचे वाचक मिळणे सोईचे गेले आहे. तसेच ही पध्दती उपयुक्त आहे. तसचे वाचकांचे शहरी वाचक गट व शहरालगतील वाचक गट या निर्धारित गटापर्यंत संशोधकास जाता आले. या पध्दतीमुळे पुढील गटांच्या वाचकांचा या नमुना निवडीत समावेशा झाला.

३.१६.०४. तज्ज्ञांची नमुना निवड

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्ट क्रमांक ४ साठी म्हणजेच ''वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्यांबाबत तज्ज्ञांची मते घेणे.'' या उद्दिष्टांसाठी तज्ज्ञांची मते जाणून घेण्यासाठी दैनिक केसरी, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत या वृत्तपत्राच्या संपादकांची व या वृत्तपत्रांच्या व्यंगचित्रकारांची निवड मुलाखत घेण्यासाठी केली. वृत्तपत्राचे संपादक हे समाजामध्ये नितीवान मूल्ये संवर्धनाचे काम हाती घेतलेले समाजनेते मानले जातात तसेच वृत्तपत्रीय व्यंगचित्रकार हे समाजात घडत असणाऱ्या वेगवेगळ्या घटनांचे सुक्ष्मनिरीक्षण करत विचारांचा आशय देऊन वाचकांना विचारप्रवण बनवणारे दृष्टे विचारंवत कलाकार असतात, म्हणूनच यांची निवड तज्ज्ञ म्हणून केली आहे. ३ संपादक व ३ व्यंगचित्रकांराशी संपर्क करून त्यांची मुलाखत घेण्यासाठी प्रयत्न केले परंतू दैनिक लोकमतचे संपादक व दैनिक केसरीचे व्यंगचित्रकार यांनी या मुलाखतीसाठी प्रतिसाद दिला.

प्रस्तुत संशोधन विषयाबाबत निष्कर्षाप्रत जाण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीमधील वेगवेगळ्या साधनांचा, तंत्रांचा, पध्दतींचा वापर करण्यात आला आहे. या सर्वांचा वापर हा शास्त्रीय पध्दतीने केल्याने मिळालेली माहिती उद्दिष्ट पूर्ततेसाठी अचूक आहे. यातून मिळालेले निष्कर्ष हे त्यामुळे अचूक येण्यास मदत होणार आहे.

३.१७ प्रकरणाचा समारोप

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी कोणती संशोधन साधने, तंत्रे, पध्दती वापरले व ती का वापरले गेले आहेत? याची माहिती या प्रकरणात करून दिली आहे. तसेच संशोधनात वापरलेल्या साधने, तंत्रे, पध्दती यांचे स्वरूप, महत्त्व, तसचे प्रत्यक्ष कार्यवाही कशी केली आहे याचे विवेचन या प्रकरणात केले आहे. संशोधनातील कार्यपध्दती काय हे या प्रकरणात स्पष्ट केल्याने संशोधनाची पुढील मांडणी पुढील प्रकरणात करता आली आहे.

पुढील प्रकरणात माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन या बद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

प्रकरण चौथे

माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन

४.०१ प्रास्ताविक

४.०२ सांख्यिकीय तंत्राच्या निवडीचे स्पष्टीकरण

४.०३ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.०४ तज्ज्ञांच्या मुलाखती

४.०५ प्रकरणाचा समारोप

प्रकरण चौथे

माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन

४.०१ प्रास्ताविक.

वृत्तपत्रातून विविध सदरे प्रसिध्द होत असतात. वृत्तपत्र हे माहिती, ज्ञान, मनोरंजन पुरविणारे पत्र झाले आहे. त्याचबरोबर समाजामध्ये लोकशाहीची व इतर मूल्ये रूजविण्याचे कार्य देखील वृत्तपत्र करीत आहेत. वेगवेगळ्या बातम्या वैचारिक ज्ञाने पुरवून वृत्तपत्र वाचकांना जीवन जगण्याची प्रेरणा त्याचबरोबर समाजातील अनिष्ट घटकांविरोधात मत तयार करण्याचे काम वृत्तपत्र करीत असतात. त्याचप्रमाणे वृत्तपत्रातील महत्त्वाची सदरे वेगवेगळ्या वयोगटासाठी अनमोल अशी माहिती व त्यातून मूल्ये पुरवीत असतात. वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदर देखील अशाच प्रकारचे काम करते. व्यंगचित्रे अशीच माहिती पुरवीत वाचकांशी संवाद साधत असतात. मराठी भाषिक वृत्तपत्रामध्ये सध्या व्यंगचित्रांचे प्रमाण वाढत आहे. वृत्तपत्राचे वेगळेपण टिकवण्यासाठी वृत्तपत्र आकर्शक बनवण्यासाठी लेखाची, बातमीचे वेगळेपण दाखवण्यासाठी व्यंगचित्रांचा मराठी वृत्तपत्रात आता व्यंगचित्रांचा वापर वाढत आहे. त्याचमुळे 'मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित होणाऱ्या मूल्यांचा वाचकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.' करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील वाचकांकडून प्रश्नावली भरून घेत, तज्ज्ञांच्या मुलाखती घेत, तसेच व्यंगचित्रांचे परिक्षण करीत माहिती संकलन केले आहे. या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून संशोधनाची सविस्तर चर्चा या प्रकरणात करण्यात आलेली आहे. संशोधकाने माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन हे स्वतःची मते, दृष्टिकोन व आवडी-निवडी बाजूला ठेवून अंतिम निष्कर्ष काढला आहे.

मागील प्रकरणात म्हटल्याप्रमाणे रचण्यात आलेल्या व्यंगचित्रासह १९१ प्रश्नांची मराठी भाषेत छापलेली प्रश्नावली सोलापूर जिल्हयातील ४८० प्रतिसादकांकडून भरूण घेण्यात आली आहे. त्यामुळे **१९१ प्रश्नांच्या ४८० व्यक्तींनी भरून दिलेल्या ९१६८० उत्तरांनी ही एकूण सामुग्री सिध्द झालेली आहे.** गोळा करण्यात आलेल्या सामुग्रीतील प्रथम व्यक्तिगत माहिती वेगळी काढण्यात आली. शहरी वाचक गट-शहरालगील वाचक गट या आधारावर वर्गीकरण

करून त्याचे तक्ते तयार करण्यात आले. प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकाने दिलेल्या उत्तराचे वेगवेगळे वर्गीकरण करण्यात आले. प्रत्येक प्रश्नावलीला त्यासाठी क्रमांक देण्यात आले होते. प्रत्येक प्रतिसाद देणाऱ्याने प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरातील सर्वांच्या प्रतिसादाच्या निष्कर्षाच्या स्वरूपात पुढील प्रकरणात नमुद करण्यात आले आहेत. **सुमारे १३९२० टंकमुद्रित पृष्ठांची एकूण सामुग्री प्रश्नावली या साधनाद्वारे या दरम्यान तयार झाली**.

४.०२ सांख्यिकीय तंत्राच्या निवडीचे स्पष्टीकरण.

संख्याशास्त्र ही विज्ञानाची ज्ञान शाखा आहे. संख्याशास्त्राचा उपयोग करून संकलीत माहितीचे विश्लेषण करणे सोपे जात असते. संख्याशास्त्रात त्यातील पध्दतीप्रमाणे सादरीकरण, विघटन, करून स्पष्टीकरण केले किंवा विधानांना संख्याशास्त्राच्या आधारे अन्वयार्थ लावला जातो.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने खालील संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग संशोधनामध्ये केला आहे.

४.०२.०१ अनुमानात्म सांख्यिकी

''निवडलेल्या नमुन्यावरून जेव्हा आपण संपूर्ण जनसंख्येविषयी निष्कर्ष काढतो त्यासाठी जे संख्याशास्त्र वापरले जाते त्यास अनुमानात्मक संख्याशास्त्र म्हणतात.''[१] सदर संशोधनासाठी केंद्रीय प्रवृत्तीचे टक्केवारी हे संख्याशास्त्र तंत्र वापरले आहे.

४.०२.०१.०१ टक्केवारी (Percentage)

संशोधकाने उद्दिष्ट क्रमांक एक साठी प्रश्नावलीतील विभाग तीन ची निर्मीती केलेली आहे. या विभागातील प्रश्न मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक रूपांतर करण्यासाठी टक्केवारी या संख्यातंत्राचा वापर करण्यात आला आहे. टक्केवारी काढताना वरील संख्यात्म तंत्राचा उपयोग केला गेला आहे.

''संशोधक वेगवेगळ्या नमुना संचाकडून माहिती मिळवितो. हिच माहिती १०० या आकारमानाच्या नमुन्याकडून मिळविली असती तर माहितीचे स्वरूप कसे झाले असते हे पाहण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या संख्याशास्त्रीय परिणामाला टक्केवारी म्हणतात.''[२]

त्याच संख्याशास्त्र तंत्राला शेकडेवारी पध्दती असे देखील संबोधले जाते, ''घटकांचे प्रमाण शेकड्यात मांडले जाते. एखाद्या घटकाची किंमत शंभरापैकी किती आहे, हे सांगणे म्हणजेच शेकडेवारी प्रमाण देणे होय.''[३] या पध्दतीमुळे गुणात्मक घटकांचे संख्यात्मक मापण करण्याच्या या अंकगणिती पध्दतीचा वापर करून संख्यात्मक विश्लेषण करणे शक्य होते.

सदर संशोधनात टक्केवारी पध्दतीने गुणात्मक माहितीचे संख्यात्मक माहितीत ज्या सुत्राच्या साहाय्याने रूपांतर केले ते पुढीलप्रमाणे होय.

जर, अ हा प्रश्नाला N1 + N2 + N3 वाचकांनील प्रतिसाद दिला. .

म्हणजेच अ ह्या प्रश्नाला N1 ह्या वाचकाने 'होय' असा प्रतिसाद दिला.

१. अ ह्या प्रश्नाला N2 ह्या वाचकाने 'नाही' असा प्रतिसाद दिला.

२. अ ह्या प्रश्नाला N3 ह्या वाचकाने 'यापैकी नाही' असा प्रतिसाद दिला.

तर,

टक्केवारी = N1/×100 /N1+ N2 +N3.

1. टक्केवारी = N1/×100 /N1+ N2 +N3.

2. टक्केवारी = N1/×100 /N1+ N2 +N3.

४.०२.०१.०२ मध्यमान (चशरप)

मध्यमान

$M = \sum X / N$

M = मध्यमान

$\sum X$= सर्व प्राप्तांकाची बेरीज

N= एकूण प्रतिसादक

संशोधकाने उद्दिष्ट क्रमांक ३ साठी प्रश्नावलीतील विभाग ५ ची निर्मीती केलेली आहे. या विभागातील प्रश्न हे पदनिश्चयन पध्दतीचा वापर करून निर्माण केले आहेत. या माहितीचे संख्यात्मक रूपांतर करण्यासाठी मध्यमान या संख्यातंत्राचा वापर करण्यात आला आहे. मध्यमान काढताना वरील संख्यात्म तंत्राचा उपयोग केला गेला आहे.

४.०३ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढील विभागात करण्यात आले आहे.

वाचकांचे शहरालगतील वाचक व शहरी वाचक अशा गटानुसार माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

अ. शहरालगतील वाचक गट.

ब. शहरी वाचक गट.

'वृत्तपत्रीय वाचकांकडून मूल्यांबाबत मते जाणून घेणे,' या उद्दिष्ट क्रमांक एक साठी शहरालगतील व शहरी वाचकांची तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रश्नावलीच्या या साधनाच्या साह्याने मिळालेल्या प्राप्तांकाचे पृथ्यकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

४.०३.०२. ०१ प्रश्नावली विभाग क्रमांक तीन मधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रश्न क्रमांक १ : आपण रोज वृत्तपत्र वाचतात काय ?

कोष्टक क्रमांक ४.०१


रोज वृत्तपत्र वाचकांचे प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२१०	८७.५०	१००.००
			नाही	३०	१२.५०	
२	शहरी	२४०	होय	२१३	८८.७५	१००.००
			नाही	२७	११.२५	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०१ नुसार रोज वृत्तपत्र वाचणाऱ्या शहरालगतील वाचक हे ८७.५० टक्के आहेत. वरील कोष्टक क्रमांक ४.१ नुसार रोज वृत्तपत्र वाचणाऱ्या शहरी वाचकांची संख्या ही ८८.७५ टक्के आहे.

आलेख क्रमांक ४.०१
रोज वृत्तपत्र वाचकांचे प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, रोज वृत्तपत्र वाचण्याचे प्रमाण हे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत शहरी वाचकांचे प्रमाणे अधिक आहे.

प्रश्न क्रमांक २ : आपण खालील पैकी कोणती वृत्तपत्रे वाचतात ?

कोष्टक क्रमांक ४.०२

वृत्तपत्र वाचक वर्गीकरण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण
१	दैनिक केसरी	२४०	शहरालगतील	२५	१०.४१
		२४०	शहरी	२२	९.१६
२	दैनिक लोकमत	२४०	शहरालगतील	१३६	५६.६६
		२४०	शहरी	१३८	५७.५०
३	दैनिक सकाळ	२४०	शहरालगतील	५८	२४.१६
		२४०	शहरी	६४	२६.६६
४	इतर	२४०	शहरालगतील	५५	२२.९१
		२४०	शहरी	४५	१८.७५

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०२ नुसार दैनिक केसरी या वृत्तपत्राचे शहरालगतील वाचक हे १०.४१ टक्के आहेत, तर शहरी वाचक हे ९.१६ आहेत.


वरील कोष्टक क्रमांक ४.०२ नुसार दैनिक लोकमत या वृत्तपत्राचे शहरालगतील वाचक हे ५६.६६ टक्के आहेत, तर शहरी वाचक हे ५७.५० टक्के आहेत.

वरील कोष्टक क्रमांक ४.०२ नुसार दैनिक सकाळ या वृत्तपत्राचे शहरालगतील वाचक हे २४.१६ टक्के आहेत, तर शहरी वाचक हे २६.६६ टक्के आहेत.

वरील कोष्टक क्रमांक ४.०२ नुसार इतर वृत्तपत्राचे शहरालगतील वाचक हे २२.९१ टक्के आहेत, तर शहरी वाचक हे १८.७५ टक्के आहेत.

आलेख क्रमांक ४.०२

वृत्तपत्र वाचक वर्गीकरण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, दैनिक केसरी या वृत्तपत्राचे वाचक शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचक हे जास्त आहेत.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, दैनिक लोकमत या वृत्तपत्राचे वाचक हे शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतीलल वाचक हे अधिक आहेत.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, दैनिक सकाळ या वृत्तपत्राचे वाचक हे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत शहरी वाचक हे अधिक आहेत.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, इतर वृत्तपत्राचे वाचक हे शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचक हे जास्त आहेत.

प्रश्न क्रमांक ३ : आपण वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर रोज पाहता व वाचता का?

कोष्टक क्रमांक ४.०३


वृत्तपत्र व्यंगचित्र सदर रोज पाहणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१८०	७५.००	१००.००
			नाही	६०	२५.००	
२	शहरी	२४०	होय	१७४	७२.५०	१००.००
			नाही	६६	२७.५०	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०३ नुसार वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर रोज पाहणारे व वाचणारे शहरालगतील वाचक हे ७५.०० टक्के आहेत. वरील कोष्टक क्रमांक ४.०३ नुसार वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर रोज पाहणारे व वाचणारे शहरी वाचक हे ७२.५० टक्के आहेत.

आलेख क्रमांक ४.०३
वृत्तपत्र व्यंगचित्र सदर रोज पाहणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर रोज पाहणारे व वाचणारे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत शहरी वाचक हे जास्त आहेत.

प्रश्न क्रमांक ४ : जीवन जगत असताना मूल्यांची आवश्यकता आहे का ?


कोष्टक क्रमांक ४.०४

जीवन जगत असताना मूल्यांची आवश्यकता वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२२१	९२.०८	१००.००
			नाही	१९	७.९१	
२	शहरी	२४०	होय	२१०	८७.५०	१००.००
			नाही	३०	१२.५०	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०४ नुसार जीवन जगत असताना मूल्याची आवश्यकता आहे असे म्हणणाऱ्या शहरालगतील वाचक ह्या ९२.०८ टक्के आहेत. वरील कोष्टक क्रमांक ४.०४ नुसार जीवन जगत असताना मूल्याची आवश्यकता आहे असे म्हणणारे शहरी वाचक हे ८७.५० टक्के आहेत.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, जीवन जगत असताना मूल्याची आवश्यकता आहे असे शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचक हे जास्त आहेत

.

प्रश्न क्रमांक ५ : खालील पैकी कोणकोणती मूल्ये महत्वाची वाटतात ?

कोष्टक क्रमांक ४.०५

महत्वाची मूल्ये वाटत असणारा शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	मूल्य	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादक	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण
१	वैज्ञानिकदृष्टिकोन	२४०	शहरालगतील	२९	१२.०८
		२४०	शहरी	३०	१२.५०
२	पर्यावरण रक्षण	२४०	शहरालगतील	३७	१५.४१
		२४०	शहरी	३७	१५.४१
३	संवेदनशीलता	२४०	शहरालगतील	११	४.५८
		२४०	शहरी	१५	६.२५
४	सामाजिक बांधिलकी	२४०	शहरालगतील	१२	५.००
		२४०	शहरी	१९	७.९१
५	दिलेले सर्व	२४०	शहरालगतील	१४७	६१.२५
		२४०	शहरी	१३३	५५.४१

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०५ नुसार वैज्ञानिकदृष्टिकोन हे मूल्य १२.०८ टक्के शहरालगतील वाचकांना महत्त्वाचे वाटते, तर १२.५० टक्के शहरी वाचकांना वैज्ञानिकदृष्टिकोन हे मूल्य महत्त्वाचे वाटते.


वरील कोष्टक क्रमांक ४.०५ नुसार पर्यावरणरक्षण हे मूल्य १५.४१ टक्के शहरालगतील वाचकांना महत्त्वाचे वाटते, तर १५.४१ टक्के शहरी वाचकांना पर्यावरणरक्षण हे मूल्य महत्त्वाचे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०५ नुसार संवेदनशीलता हे मूल्य ४.५८ टक्के शहरालगतील वाचकांना महत्त्वाचे वाटते, तर ६.२५ टक्के शहरी वाचकांना संवेदनशीलता हे मूल्य महत्त्वाचे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०५ नुसार सामाजिक बांधिलकी हे मूल्य ५.०० टक्के शहरालगतील वाचकांना महत्त्वाचे वाटते, तर ७.९१ टक्के शहरी वाचकांना सामाजिक बांधिलकी हे मूल्य महत्त्वाचे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०५ नुसार दिलेली सर्व मूल्ये ६१.२५ टक्के शहरालगतील वाचकांना महत्त्वाचे वाटते, तर ५५.४१ टक्के शहरी वाचकांना दिलेली सर्व मूल्ये हे मूल्य महत्त्वाची वाटतात.

आलेख क्रमांक ४.०५
महत्वाची मूल्ये वाटत असणारा शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.



वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिकदृष्टिकोन, स्त्री–पुरूष समानता, पर्यावरणरक्षण, संवेदनशीलता, सौजन्यशिलता, वक्तशीरपणा, निटनेटकेपणा, सामाजिक बांधिलकी ही सर्व मूल्ये महत्त्वाची वाटतात.

प्रश्न क्रमांक ६ : देशाच्या नैतिक उभारणीत मूल्यांचे महत्त्व असते का?


कोष्टक क्रमांक ४.०६

देशाच्या नैतिक उभारणीत मूल्याचे महत्त्व वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२२४	९३.३३	१००.००
			नाही	१६	६.६६	
२	शहरी	२४०	होय	२१३	८८.७५	१००.००
			नाही	२७	११.२५	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०६ नुसार देशाच्या नैतिक उभारणीत मूल्याचे महत्त्व आहे असे ९३.३३ टक्के शहरालगतील वाचकांना वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.०६ नुसार देशाच्या नैतिक उभारणीत मूल्याचे महत्त्व आहे असे म्हणणारे शहरी वाचक हे ८८.७५ टक्के आहेत.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, देशाच्या नैतिक उभारणीत मूल्याचे महत्त्व आहे असे शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांना अधिक वाटते आहे.

प्रश्न क्रमांक ७ : आजच्या परिस्थितीत मूल्यांचे महत्त्व कमी होत आहे काय?


कोष्टक क्रमांक ४.०७

आजच्या परिस्थितीत मूल्याचे महत्त्व वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१९४	८०.८३	१००.००
			नाही	४६	१९.१६	
२	शहरी	२४०	होय	१८२	७५.८३	१००.००
			नाही	५८	२४.१६	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०७ नुसार आजच्या परिस्थितीत मूल्याचे महत्त्व कमी होत असल्याचे ८०.८३ टक्के शहरालगतील वाचकांना वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.०७ नुसार आजच्या परिस्थितीत मूल्याचे महत्त्व कमी होत असल्याचे ७५.८३ टक्के शहरी वाचकांना वाटते.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, आजच्या परिस्थितीत मूल्याचे महत्त्व कमी होत असल्याचे शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वाटते.

प्रश्न क्रमांक ८ : कोणकोणत्या कारणांनी मूल्यांची घसरण होते असे आपणास वाटते?

कोष्टक क्रमांक ४.०८

मूल्यांची घसरण करणारी कारणे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	मूल्यांची घसरण करणारी कारणे	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादक	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण
१	आर्थिक	२४०	शहरालगतील	९१	३७.९१
		२४०	शहरी	८१	३३.७५
२	सामाजिक	२४०	शहरालगतील	५६	२३.३३
		२४०	शहरी	६२	२५.८३
३	राजकीय	२४०	शहरालगतील	९७	४०.४१
		२४०	शहरी	८९	३७.०८

४	धार्मिक	२४०	शहरालगतील	५७	२३.७५
		२४०	शहरी	६२	२५.८३
५	प्रसारमाध्यमे	२४०	शहरालगतील	४५	१८.७५
		२४०	शहरी	५४	२२.५०
६	सांस्कृतिक	२४०	शहरालगतील	३०	१२.५०
		२४०	शहरी	२८	११.६६
७	इतर	२४०	शहरालगतील	६१	२५.४१
		२४०	शहरी	५३	२२.०८

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, ३७.९१ टक्के शहरालगतील वाचकांना आर्थिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर ३३.७५ टक्के शहरी वाचकांना आर्थिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, २३.३३ शहरालगतील वाचकांना सामाजिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर २५.८३ टक्के शहरी वाचकांना सामाजिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, ४०.४१ शहरालगतील वाचकांना राजकीय कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर ३७.०८ टक्के शहरी वाचकांना राजकीय कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते.


वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, २३.७५ शहरालगतील वाचकांना धार्मिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर २५.८३ टक्के शहरी वाचकांना धार्मिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, १८.७५ टक्के शहरालगतीलल वाचकांना प्रसारमाध्यमामूळे मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर २२.५० टक्के शहरी वाचकांना प्रसारमाध्यमामूळे मूल्यांची घसरण होते असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, १२.५० टक्के शहरालगतील वाचकांना सांस्कृतिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते. तर ११.६६ टक्के शहरी वाचकांना सांस्कृतिक कारणांनी मूल्यांची घसरण होते असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.०८ नुसार असे दिसून येते की, २५.४१ टक्के शहरालगतील वाचकांना मूल्यांची घसरण होण्याची इतर कारणे वाटतात. तर २२.०८ टक्के शहरी वाचकांना मूल्यांची घसरण होण्याची इतर कारणे वाटतात.

आलेख क्रमांक ४.०८
मूल्यांची घसरण करणारी कारणे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना मूल्यांची घसरण होण्याचे आर्थिक कारण वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांना मूल्यांची घसरण होण्याचे राजकीय कारण वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना मूल्यांची घसरण होण्याचे धार्मिक कारण वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत शहरी वाचकांना मूल्यांची घसरण होण्यास प्रसारमाध्यमे जबाबदार असल्याचे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांना मूल्यांची घसरण होण्याचे कारण हे सांस्कृतिक वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना मूल्यांची घसरण होण्याची इतर कारणे वाटतात.

प्रश्न क्रमांक ९ : मूल्ये वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे वाटते का?


कोष्टक क्रमांक ४.०९

मूल्ये वृध्दींगतेसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२१६	९०.००	१००.००
			नाही	२४	१०.००	
२	शहरी	२४०	होय	२१३	८०.७५	१००.००
			नाही	२७	११.२५	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.०९ नुसार मूल्ये वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे ९०.०० टक्के शहरालगतील वाचकांना वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.०९ नुसार मूल्ये वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे ८०.७५ टक्के शहरी वाचकांना वाटते.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना मूल्ये वृध्दींगतेसाठी प्रयत्न होण्याची आवश्यता वाटते.

प्रश्न क्रमांक १० : मूल्ये वृध्दींगतेसाठी खालील पैकी कोणता प्रयत्न करावा असे आपणास वाटते?

कोष्टक क्रमांक ४.१०

मूल्ये वृध्दींगतेसाठी करावयाचा प्रयत्न याबाबत दिलेल्या मतांची शहरालगतील व शहरी वाचक यांची दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	मूल्यांची घसरण करणारी कारणे	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादक	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण
१	वाचन संस्कृती वाढवणे	२४०	शहरालगतील	५७	२३.७५
		२४०	शहरी	७४	३०.८३
२	आर्थिक बदल	२४०	शहरालगतील	४५	१८.७५
		२४०	शहरी	५७	२३.७५
३	सामाजिक बदल	२४०	शहरालगतील	११२	४६.६६
		२४०	शहरी	८२	३४.१६
४	शिक्षणास जास्त महत्त्व	२४०	शहरालगतील	९४	३९.१६
		२४०	शहरी	११२	४६.६६
५	कायद्यांची सक्ती	२४०	शहरालगतील	५२	२१.६६
		२४०	शहरी	६१	२५.४१
६	इतर	२४०	शहरालगतील	३३	१३.७५
		२४०	शहरी	४५	१८.७५

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, २३.७५ टक्के शहरालगतील वाचकांना वाचन संस्कृती वाढवल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, ३०.८३ टक्के शहरी वाचकांना वाचन संस्कृती वाढवल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, १८.७५ टक्के शहरालगतील वाचकांना आर्थिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, २३.७५ टक्के शहरी वाचकांना आर्थिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, ४६.६६ टक्के शहरालगतील वाचकांना सामाजिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊ शकतात असे वाटते. वरील कोष्टक


क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, ३४.१६ टक्के शहरी वाचकांना सामाजिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, ३९.१६ टक्के शहरालगतील वाचकांना शिक्षणास जास्त महत्त्व दिल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, ४६.६६ टक्के शहरी वाचकांना शिक्षणास जास्त महत्त्व दिल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, २१.६६ टक्के शहरालगतील वाचकांना कायद्यांची सक्ती केल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, २५.४१ टक्के शहरी वाचकांना कायद्यांची सक्ती केल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, १३.७५ टक्के शहरालगतील वाचकांना इतर बदल केल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१० नुसार असे दिसून येते की, १८.७५ टक्के शहरी वाचकांना इतर बदल केल्यास मूल्ये वृध्दींगत होऊ शकतात असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१०
मूल्ये वृध्दींगतेसाठी करावयाचा प्रयत्न याबाबत दिलेल्या मतांची शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत आधिक शहरी वाचकांना वाचन संस्कृती वाढल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत आधिक शहरी वाचकांना अर्थिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत आधिक शहरालगतील वाचकांना सामाजिक बदल झाल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांना शिक्षणास जास्त महत्त्व दिल्यास मूल्ये वृध्दींगत होऊशकते असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत आधिक शहरी वाचकांना कायद्याच्या सक्तीने मूल्ये वृध्दींगत होऊशकतात असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत आधिक शहरी वाचकांना मूल्ये वृध्दींगत होण्यासाठी इतर बदल आपेक्षित आहेत.

प्रश्न क्रमांक ११ : उच्चतम मानवी जीवन हे मूल्ये केंद्रीत असते असे आपणास वाटते का?


कोष्टक क्रमांक ४.११

उच्चतम मानवी जीवन मूल्येकेंद्रीत असल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१९४	८०.८३	१००.००
			नाही	४६	१९.१६	
२	शहरी	२४०	होय	१९९	८२.९१	१००.००
			नाही	४१	१७.०८	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.११ नुसार उच्चतम मानवी जीवन मूल्यकेंद्री असते असे ८०.८३ टक्के शहरालगतील वाचकांना वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.११ नुसार उच्चतम मानवी जीवन मूल्यकेंद्री असते असे ८२.९१ टक्के शहरी वाचकांना वाटते.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, उच्चतम मानवी जीवन मूल्यकेंद्री असते असे वाटण्याचे प्रमाण हे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांचे आहे.

प्रश्न क्रमांक १२ : मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे ही महत्त्वाचे साधन होऊ शकतात का?

कोष्टक क्रमांक ४.१२

मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे महत्त्वाचे साधन असल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१९८	८२.५०	१००.००
			नाही	४२	१७.५०	
२	शहरी	२४०	होय	१९३	८०.४१	१००.००
			नाही	४७	१९.५८	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१२ नुसार मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे महत्त्वाचे साधन आहेत असे ८२.५० टक्के शहरालगतील वाचकांना वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१२ नुसार मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे महत्त्वाचे साधन आहेत असे ८०.४१ टक्के शहरी वाचकांना वाटते.

आलेख क्रमांक ४.१२

मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे महत्त्वाचे साधन असल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, मूल्यांच्या वृध्दींगतेसाठी वृत्तपत्रातील वेगवेगळी सदरे महत्त्वाचे साधन आहेत असे वाटण्याचे प्रमाण शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांचे प्रमाण हे अधिक आहे.

प्रश्न क्रमांक १३ : मूल्ये व वृत्तपत्र हे अतूट नाते आजही टिकून आहे काय?

कोष्टक क्रमांक ४.१३

मूल्ये व वृत्तपत्र यांचे अतूट नाते असल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१६१	६७.०८	१००.००
			नाही	७९	३२.९१	
२	शहरी	२४०	होय	१६५	६८.७५	१००.००
			नाही	७५	३१.२५	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१३ नुसार असे दिसून येते की, ६७.०८ टक्के शहरालगतील वाचकांना मूल्ये व वृत्तपत्र हे अतूट नाते आजही टिकून आहे असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१३ नुसार ६८.७५ टक्के शहरी वाचकांना मूल्ये व वृत्तपत्र हे अतूट नाते आजही टिकून आहे असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१३

मूल्ये व वृत्तपत्र यांचे अतूट नाते असल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, मूल्ये व वृत्तपत्र हे अतूट नाते आजही टिकून आहे असे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत थोडे अधिक प्रमाण हे शहरी वाचकांचे आहे.

प्रश्न क्रमांक १४ : मूल्य प्रसारणातस कोणते माध्यम प्रभावी ठरते असे आपणास वाटते?

कोष्टक क्रमांक ४.१४

छापील की इलेक्ट्रॉनिक्स या पैकी मूल्य प्रसारणाच प्रभावी माध्यम शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	छापील	११४	४७.५०	१००.००
			इलेक्ट्रॉनिक	१२६	५२.५०	
२	शहरी	२४०	छापील	१०२	४२.५०	१००.००
			इलेक्ट्रॉनिक	१३८	५७.५०	


विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१४ नुसार असे दिसून येते की, ४७.५० टक्के शहरालगतील वाचकांना मूल्य प्रसारणातसाठी छापील माध्यम प्रभावी ठरते असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१४ नुसार असे दिसून येते की, ५२.५० टक्के शहरालगतील वाचकांना इलेक्ट्रॉनिक माध्यम हे मूल्य प्रसारणातसाठी प्रभावी माध्यम वाटते.

वरील कोष्टक क्रमांक ४.१४ नुसार असे दिसून येते की, ४२.५० टक्के शहरी वाचकांना मूल्य प्रसारणातसाठी छापील माध्यम प्रभावी ठरते असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१४ नुसार असे दिसून येते की, ५७.५० टक्के शहरी वाचकांना इलेक्ट्रॉनिक माध्यम हे मूल्य प्रसारणातसाठी प्रभावी माध्यम वाटते.

आलेख क्रमांक ४.१४

छापील की इक्लेट्रॉनिक्स या पैकी मूल्य प्रसारणाचे प्रभावी माध्यम शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना छापील माध्यम हे मूल्य प्रसारणातसाठी प्रभावी माध्यम आहे असे वाटते.

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, मूल्य प्रसारणातसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यम हे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांना प्रभावी माध्यम असल्याचे वाटते.

प्रश्न क्रमांक १५ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित होणारा संदेश मूल्यांना सोबत घेऊन दिला गेलेला असतो का?

कोष्टक क्रमांक ४.१५

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेश हा मूल्यासह दिला जातो असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२००	८३.३३	१००.००
			नाही	४०	१६.६६	
२	शहरी	२४०	होय	१८६	७७.५०	१००.००
			नाही	५४	२२.५०	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१५ नुसार असे दिसून येते की, ८३.३३ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित होणारा संदेश मूल्यांना सोबत घेऊन दिला गेलेला असतो असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१५ नुसार ७७.५० टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित होणारा संदेश मूल्यांना सोबत घेऊन दिला गेलेला असतो असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१५

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेश हा मूल्यासह दिला जातो असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित होणारा संदेश मूल्यांना सोबत घेऊन दिला गेलेला असतो असे वाटते.

प्रश्न क्रमांक १६ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून प्रसारित होणारा संदेश मूल्यांना सोबत घेऊन दिला गेलेला असतो का?

कोष्टक क्रमांक ४.१६

वृत्तत्रीय व्यंगचित्र सदरातून रोज मूल्ये प्रसारणाच प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	२०५	८५.४१	१००.००
			नाही	३५	१४.५८	
२	शहरी	२४०	होय	१७९	७४.५८	१००.००
			नाही	६१	२५.४१	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१६ नुसार असे दिसून येते की, ८५.४१ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून रोज वेगवेगळी मूल्ये प्रसारित होतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१६ नुसार ७४.५८ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून रोज वेगवेगळी मूल्ये प्रसारित होतात असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१६

वृत्तत्रीय व्यंगचित्र सदरातून रोज मूल्ये प्रसारणाचे प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांचे प्रमाण हे वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून रोज वेगवेगळी मूल्ये प्रसारित होतात असे वाटणारे आहे.

प्रश्न क्रमांक १७ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत मूल्ये प्रसारित केली जातात का?

कोष्टक क्रमांक ४.१७

एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत व्यंगचित्रातून मूल्ये प्रसारीत होतात असे वाटण्याचे प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१६९	७०.४१	१००.००
			नाही	७१	२९.५८	
२	शहरी	२४०	होय	१६९	७०.४१	१००.००
			नाही	७१	२९.५८	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१७ नुसार असे दिसून येते की, ७०.४१ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत मूल्ये प्रसारित केली जातात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१७ नुसार असे दिसून येते की, ७०.४१ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत मूल्ये प्रसारित केली जातात असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१७

एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत व्यंगचित्रातून मूल्ये प्रसारीत होतात असे वाटण्याचे प्रमाण शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून एखाद्या घटनेची खिल्ली उडवत, वैगुण्य दाखवत मूल्ये प्रसारित केली जातात असे वाटण्याचे प्रमाण हे शहरी व शहरालगतील वाचकांचे समान आहे.

प्रश्न क्रमांक १८ : बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र सरातून प्रसारित संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांची उपयुक्तता आहे काय?

कोष्टक क्रमांक ४.१८

बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र प्रसारित संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांची उपयूक्त वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१८३	७६.२५	१००.००
			नाही	५७	२३.७५	
२	शहरी	२४०	होय	१८५	७७.०८	१००.००
			नाही	५५	२२.९१	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१८ नुसार असे दिसून येते की, ७६.२५ टक्के शहरालगतील वाचकांना बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांची उपयुक्तता आहे असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१८ नुसार असे दिसून येते की, ७७.०८ टक्के शहरी वाचकांना बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांची उपयुक्तता आहे असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१८

बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र प्रसारित संदेशाव्दारे प्रसारित मूल्यांची उपयूक्त वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरालगतील वाचकांच्या तुलनेत थोडे अधिक शहरी वाचकांना बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांची उपयुक्तता आहे असे वाटते.

प्रश्न क्रमांक १९ : वृत्तपत्रीय इतर सदरापेक्षा व्यंगचित्र सदर मूल्य प्रसारणात जास्त प्रभावी ठरते काय?

कोष्टक क्रमांक ४.१९

वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराचा मूल्य प्रसारणात प्रभाव वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१८०	७५.००	१००.००
			नाही	६०	२५.००	
२	शहरी	२४०	होय	१६९	७०.४१	१००.००
			नाही	७१	२९.५८	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.१९ नुसार असे दिसून येते की, ७५.०० टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील इतर सदरापेक्षा व्यंगचित्र सदर हे मूल्य प्रसारणात जास्त प्रभावी ठरते असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.१९ नुसार असे दिसून येते की, ७०.४१ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील इतर सदरापेक्षा व्यंगचित्र सदर हे मूल्य प्रसारणात जास्त प्रभावी ठरते असे वाटते.

आलेख क्रमांक ४.१९

वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराचा मूल्य प्रसारणा प्रभाव वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील इतर सदरापेक्षा व्यंगचित्र सदर हे मूल्य प्रसारणात जास्त प्रभावी ठरते असे वाटते.

प्रश्न क्रमांक २० : वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर निर्भयपूर्वक तसेच ठामपणे मूल्ये प्रसारित करते का?

कोष्टक क्रमांक ४.२०

वृत्तपत्रातील व्यंगचित्र निर्भयपूर्वक व ठामपणे मूल्ये प्रसारीत करत अल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१७९	७४.५८	१००.००
			नाही	६१	२५.४१	
२	शहरी	२४०	होय	१७४	७२.५०	१००.००
			नाही	६६	२७.५०	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२० नुसार असे दिसून येते की, ७४.५८ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर हे निर्भयपूर्वक व ठामपणे मूल्ये प्रसारित करते असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.२० नुसार असे दिसून येते की, ७२.५० टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर हे निर्भयपूर्वक व ठामपणे मूल्ये प्रसारित करते असे वाटते.

आलेख क्रमांक ४.२०

वृत्तपत्रातील व्यंगचित्र निर्भयपूर्वक व ठामपणे मूल्ये प्रसारीत करत अल्याचे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक याची तुलना दाखवनारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदर हे निर्भयपूर्वक व ठामपणे मूल्ये प्रसारित करते असे वाटते.

प्रश्न क्रमांक २१ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्ये विचारशक्तीस चालना देतात का?

कोष्टक क्रमांक ४.२१

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित मूल्ये विचारशक्तीस चालना देतात असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१९७	८२.०८	१००.००
			नाही	४३	१७.९१	
२	शहरी	२४०	होय	१९३	८०.४१	१००.००
			नाही	४७	१९.५८	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२१ नुसार असे दिसून येते की, ८२.०८ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्ये ही विचारशक्तीस चालना देतात असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.२१ नुसार असे दिसून येते की, ८०.४१ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्ये ही विचारशक्तीस चालना देतात असे वाटते.

आलेख क्रमांक ४.२१

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदरातून प्रसारित मूल्ये विचारशक्तीस चालना देतात असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्ये ही विचारशक्तीस चालना देतात असे शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वाटते.

प्रश्न क्रमांक २२ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदशाव्दारे प्रसारित मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो का?

कोष्टक क्रमांक ४.२२

वृत्तपत्रातील व्यंगचित्रातील व्यंगचित्रातील मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१७९	७४.५८	१००.००
			नाही	६१	२५.३४१	
२	शहरी	२४०	होय	१७४	७२.५०	१००.००
			नाही	६६	२७.५०	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२२ नुसार असे दिसून येते की, ७४.५८ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.२२ नुसार असे दिसून येते की, ७२.५० टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे वाटते.

आलेख क्रमांक ४.२२

वृत्तपत्रातील व्यंगचित्रातील मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून संदेशाद्वारे प्रसारित मूल्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे शहरी तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांना वाटते.

प्रश्न क्रमांक २३ : वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी का?

कोष्टक क्रमांक ४.२३

वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१८८	७८.३३	१००.००
			नाही	५२	२१.६६	
२	शहरी	२४०	होय	१८८	७८.३३	१००.००
			नाही	५२	२१.६६	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२३ नुसार असे दिसून येते की, ७८.३३ टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.२३ नुसार असे दिसून येते की, ७८.३३ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी असे वाटते.

आलेख क्रमांक ४.२३

वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, वृत्तपत्रातील व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी करावी असे वाटण्याचे प्रमाण हे शहरी व शहरालगतील वाचकांचे समान आहे.

प्रश्न क्रमांक २४ : वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होते का?

कोष्टक क्रमांक ४.२४

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होते असे वाटणारे शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	होय	१८६	७७.५०	१००.००
			नाही	५४	२२.५०	
२	शहरी	२४०	होय	१७०	७०.८३	१००.००
			नाही	७०	२९.१६	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२४ नुसार असे दिसून येते की, ७७.५० टक्के शहरालगतील वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होते असे वाटते. वरील कोष्टक क्रमांक ४.२४ नुसार असे दिसून येते की, ७०.८३ टक्के शहरी वाचकांना वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होते असे वाटते.

आलेख क्रमांक ४.२४

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होत असे वाटणारे ग्रामीण व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, शहरी वाचकांच्या तुलनेत अधिक शहरालगतील वाचकांचे प्रमाण हे वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या माध्यमातून मूल्यांची पेरणी होते असे वाटणारे आहे.

४.०३.०२.०२ प्रश्नावली विभाग क्रमांक पाच मधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्रमांक दोन साठी शहरालगतील वाचक व शहरी वाचक यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली या साधनाच्या साह्याने १२७ व्यंगचित्र सदरांच्या पाहणीत, निरीक्षण, चिंतन यातून २४० शहरालगतील व २४० शहरी वाचकांकडून व्यंगचित्र सदराच्या संदेशाद्वारे प्रसारित झालेली मूल्ये मिळालेल्या प्राप्तांकाचे पृथ्यकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्रमांक ४.२५

वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्ये शहरालगतील व शहर वाचक किती प्रमाणात पोहचली यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


शहरालगतील व शहरी वाचक	एकूण व्यंगचित्र	२४० शहरालगतील व शहरी वाचकांनी पुढील १२७ व्यंगचित्रातून खालील मूल्ये प्रसारित होत असल्याची माहिती दिली आहे.					--
		वैज्ञानिक दृष्टिकोन	पर्यावरण रक्षण	संवेदनाशिलता	सामाजिक बांधिलकी	यापैकी नाही	एकूण
शहरालगतील वाचक	**१२७**	२८७५	४९४५	४८५२	३१२३	७१८८	**२२९८३**
शेकडा प्रमाण	--	९.४३	१६.२२	१५.९२	१०.२५	२३.५८	----
शहरी वाचक	**१२७**	३११३	४६९२	५०५४	३५८९	६५९६	**२३०४४**
शेकडा प्रमाण	--	१०.२१	१५.३९	१६.५८	११.७७	२१.६४	-----

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२५ नुसार, २४० शहरालगतील वाचकांच्या १२७ व्यंगचित्र सदरांच्या पाहणीत, निरीक्षण, चिंतन यातून व्यंगचित्र सदराच्या संदेशाद्वारे प्रसारित वैज्ञानिक दृष्टीकोन हे मूल्य ९.४३ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, पर्यावरणरक्षण हे मूल्य १६.२२ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, संवेदनशीलता हे मूल्य १५.९२ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, सामाजिक बांधिलकी हे मूल्य १०.२५ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, यापैकी कोणतेही मूल्य प्रसारित होत नसल्याचे २३.५८ टक्के वाचकांनी नोंद केली आहे

वरील कोष्टक क्रमांक ४.२५ नुसार, २४० शहरी वाचकांच्या १२७ व्यंगचित्र सदरांच्या पाहणीत, निरीक्षण, चिंतन यातून व्यंगचित्र सदराच्या संदेशाद्वारे प्रसारित वैज्ञानिक दृष्टीकोन हे मूल्य १५.३९ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, पर्यावरणरक्षण हे मूल्य १६.३२ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, संवेदनशीलता हे मूल्य १६.५८ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, सामाजिक बांधिलकी हे मूल्य ११.७७ टक्के प्रमाणात प्रसारित होत आहे, यापैकी कोणतेही मूल्य प्रसारित होत नस्ल्याचे २१.६४ टक्के वाचकांनी नोंद केली आहे

आलेख क्रमांक ४.२५
वृत्तपत्रीय व्यंगचित्र सदराच्या संदेशातून प्रसारित मूल्ये शहरालगतील व शहर वाचक किती प्रमाणात पोहचली यांची तूलना दाखवणारे कोष्टक.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून वरील कोष्टक क्रमांक ४.२५ नुसार, २४० शहरालगतील व शहरी वाचकांच्या १२७ व्यंगचित्र सदरांच्या पाहणीत, निरीक्षण, चिंतन यातून व्यंगचित्र सदराच्या संदेशाद्वारे प्रसारित पर्यावरणरक्षण, वक्तशीरपणा ही मूल्ये जास्त प्रमाणात प्रसारित होत आहेत असे शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांना वाटते, तर वैज्ञानिक दृष्टीकोन, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी ही मूल्ये जास्त प्रमाणात प्रसारित होत आहेत असे शहरालगतील वाचकांच्या तुलनेत शहरी वाचकांना वाटते. तसेच दिलेली सर्व मूल्ये ही शहरालगतील वाचकांच्या तुलनेत अधिक शहरी वाचकांना व्यंगचित्र सदरातून मूल्ये प्रसारित होतात असे वाटते.

४.०३.०२.०३ प्रश्नावली विभाग क्रमांक पाच मधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्रमांक तीन साठी शहरालगतील व शहरी यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रश्नावलीच्या या साधनाच्या साह्यान मिळालेल्या प्राप्तांकाचे पृथ्यकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

प्रश्न क्रमांक १ : व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपणाला मूल्यांबाबत आदरभाव वाटतो का?

कोष्टक क्रमांक ४.२६

मूल्यांबाबत आदरभाव वाटणाऱ्या शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.

अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	गूणक	गुणांक	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	कधीही नाही	४१	१	४१	५.८२	१००.००
			एखादे वेळी	५७	२	११४	१६.१९	
			कधी कधी	६१	३	१८३	२५.९९	
			खूप वेळा	३९	४	१५६	२२.१५	
			प्रत्येक वेळी	४२	५	२१०	२९.८३	
२	शहरी	२४०	कधीही नाही	३४	१	३४	४.७२	१००.००
			एखादे वेळी	५६	२	११२	१५.५५	
			कधी कधी	६५	३	१९५	२७.०८	
			खूप वेळा	४६	४	१८४	२५.५५	
			प्रत्येक वेळी	३९	५	१९५	२७.०८	


विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२६ नुसार, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपणाला मूल्यांबाबत आदरभाव कधीही न वाटण्याचे शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण ५.८२ टक्के आहे. मूल्यांबाबत एखादे वेळी आदरभाव वाटणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण १६.१९ टक्के आहे. मूल्यांबाबत कधी कधी आदरभाव वाटणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २५.१९ टक्के आहे. मूल्यांबाबत खूप वेळा आदरभाव वाटणाऱ्या शहरालगतील ल वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २२.१५ टक्के आहे. मूल्यांबाबत प्रत्येक वेळी आदरभाव वाटणाऱ्या एहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २९.८३ टक्के आहे.

वरील कोष्टक क्रमांक ४.२६ नुसार, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपणाला मूल्यांबाबत आदरभाव कधीही न वाटण्याचे शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण ४.७२ टक्के आहे. मूल्यांबाबत एखादे वेळी आदरभाव वाटणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण १५.५५ टक्के आहे. मूल्यांबाबत कधी कधी आदरभाव वाटणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २७.०८ टक्के आहे. मूल्यांबाबत खूप वेळा आदरभाव वाटणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २५.५५ टक्के आहे. मूल्यांबाबत प्रत्येक वेळी आदरभाव वाटणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २७.०८ टक्के आहे.

आलेख क्रमांक ४.२६

मूल्यांबाबत आदरभाव वाटणाऱ्या शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारा आलेख.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर मूल्यांबाबत प्रत्येकवेळी आदरभाव वाटण्याचे सकारात्मकक भावनेचे प्रमाण शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांचे प्रमाण अधिक आहे.

प्रश्न क्रमांक २ : व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपल्या मनात मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना निर्माण होते का?

कोष्टक क्रमांक ४.२७
मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना निर्माण होणाऱ्या शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	गूणक	गुणांक	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	कधीही नाही	१९	१	१९	२.३४	१००.००
			एखादे वेळी	६४	२	१२८	१६.१६	
			कधी कधी	५०	३	१५०	२१.५१	
			खूप वेळा	५९	४	२३६	३३.८९	
			प्रत्येक वेळी	४८	५	२४०	२६.०७	
२	शहरी	२४०	कधीही नाही	१८	१	१८	२.४५	१००.००
			एखादे वेळी	६२	२	१२४	१६.५५	
			कधी कधी	५५	३	१६५	१९.४०	
			खूप वेळा	६५	४	२६०	३०.५३	
			प्रत्येक वेळी	४०	५	२००	३१.०४	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२७ नुसार, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपल्या मनात मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना निर्माण कधीही न निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण २.३४ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना एखादे वेळी निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण १६.१६ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना कधी कधी निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २१.५१ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना खूप वेळा निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे ३३.८९ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना प्रत्येक वेळी निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २६.०७ टक्के आहे.

वरील कोष्टक क्रमांक ४.२७ नुसार, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपल्या मनात मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना निर्माण कधीही न निर्माण होणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण २.४५ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना एखादे वेळी निर्माण होणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण १६.५५ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना कधी कधी निर्माण होणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे १९.४० टक्के आहे. मूल्यांची

जपणूक झाली पाहिजे अशी भावना खूप वेळा निर्माण होणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे ३०.५३ टक्के आहे. मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी भावना प्रत्येक वेळी निर्माण होणाऱ्या शहरी वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे ३०.०४ टक्के आहे.



अर्थनिर्वचन :

वरील कोष्टक निरीक्षणावरून असे दिसून येते की, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपल्या मनात मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे अशी सकारात्मकक भावना खूप वेळा निर्माण होण्याचे प्रमाण शहरी वाचकांच्या तुलनेत शहरालगतील वाचकांचे प्रमाण अधिक आहे.

प्रश्न क्रमांक ३ : व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर आपल्या मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना निर्माण होते काय?

कोष्टक क्रमांक ४.२८

मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना निर्माण होणाऱ्या शहरालगतील व शहरी वाचक यांची तुलना दाखवणारे कोष्टक.


अ.क्र.	प्रतिसादक	एकूण प्रतिसादक संख्या	प्रतिसादकाचे उत्तर	प्रतिसाद संख्या	गूणक	गुणांक	शेकडा प्रमाण	एकूण शेकडा प्रमाण
१	शहरालगतील	२४०	कधीही नाही	२७	१	२७	३.५२	१००.००
			एखादे वेळी	५०	२	१००	१३.०७	
			कधी कधी	५९	३	१७७	२३.१३	
			खूप वेळा	५९	४	२३६	३०.८५	
			प्रत्येक वेळी	४५	५	२२५	२९.४१	
२	शहरी	२४०	कधीही नाही	१४	१	१४	२.३७	१००.००
			एखादे वेळी	५५	२	११०	१८.६७	
			कधी कधी	७९	३	२३७	४०.२३	
			खूप वेळा	५७	४	२२८	३८.७०	
			प्रत्येक वेळी	३५	५	१७५	२९.७१	

विश्लेषण :

वरील कोष्टक क्रमांक ४.२८ नुसार, व्यंगचित्र सदराच्या निरीक्षण व वाचनानंतर मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना कधीही न निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण ३.५२ टक्के आहे. मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना एखादे वेळी निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण १३.०४ टक्के आहे. मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना कधी कधी निर्माण होणाऱ्या शहरालगतीलल वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २३.१३ टक्के आहे. मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना खूप वेळा निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे ३०.८५ टक्के आहे. मनात मानव व निसर्गाप्रति दयाखूपणाची व आपुलकीची भावना प्रत्येक वेळी निर्माण होणाऱ्या शहरालगतील वाचकांच्या भावनेचा गुणांक शेकडा प्रमाण हे २९.४१ टक्के आहे.

